# भीषण लढा

## दि ग्रेट कॉन्ट्रोव्हर्सी - १८५८ची सर्वप्रथमची आवृत्ति

*ख्रिस्त व त्याचे देवदूत*
*आणि सैतान व त्याचे दूत*
*यांच्यातला भीषण लढा*

**"The Great Controversy Between Christ and His Angels, and Satan and His Angels"**
**by Ellen G. White (1858 edition)**

This Marathi translation was made in 2005.
Available online at www.earlysda.com

# लेखिकेची संक्षिप्त माहिती

# एलन जी. व्हाईट, १८२७-१९१५

येशू ख्रिस्ताची एक समर्पित शिष्या, एलन वयाच्या १७व्या वर्षापर्यंत मेथडिस्ट पंथाची सदस्या होती. १८४३ सालीं ख्रिस्ताच्या त्वरित येण्यासंबंधी बोलत राहण्यामुळें व ख्रिस्ताच्या निकट द्वितीय आगमनावर विश्वास ठेवण्यामुळें तिला मंडळीतून काढून टाकले गेले. देवाने तिला दृष्टांत दिले आणि जगाला देण्यासाठीं संदेश दिला. तत्पूर्वी ही सेवा देवाने इतर दोघांना देऊ केली होती, परंतु त्यांनी ती नाकारली होती. श्रीमती व्हाईट यांनी अनेक लेख लिहिले व पुस्तके लिहिली व निषेधात्मक संदेश व इशारेवजा उपदेश दिले. त्यांना आरोग्यासंबंधीचा प्रकाश मिळाल्यानंतर त्या आरोग्यसुधारणेच्या कळकळीच्या प्रवर्तक बनल्या, व एदेन बागेत देवाने मानवाला जें मूळ अन्न नेमले होते त्यासमान अन्न माणसांनी सेवन करावे, अपायकारक गोष्टी वर्ज्य कराव्या, आणि सर्व बाबतींत संयम राखावा असें पाचारण लोकांना करीत राहिल्या.

श्रीमती व्हाईट यांनी स्वतःला "संदेष्ट्री" असें कधीं म्हटले नाही, जरी दुसऱ्यांनी त्यांना तसें म्हणण्याला त्यांनी हरकत घेतली नाही; परंतु जेव्हा त्यांना त्याविषयीं विचारणा केली जात असे तेव्हा त्या म्हणत असत कीं त्या "देवाच्या संदेशवाहक" होत्या. त्या उत्तरातून उघड होते कीं त्यांचे आरोग्यसुधारणेचे कार्य, पापांकरिता पश्चात्ताप करावा म्हणून पाचारण करण्याचे कार्य, आणि "भेग बुजविण्याची" जी चळवळ आहे त्या चळवळीस पाठिंबा देण्याचे कार्य, यात, संदेष्ट्याला सहसा जें काम दिले जाते असें सर्वसामान्यपणे समजले जाते - म्हणजे देवाच्या दृष्टिकोनातून भविष्यकालीन घटनांची माहिती देणे - त्यापेक्षा बऱ्याच अधिक गोष्टींचा समावेश होतो. त्यांनी कैक धार्मिक पुस्तके लिहिली आहेत जीं जगप्रसिद्ध झाली आहेत. त्यांत "ख्रिस्ताकडे वाटचाल" हें पुस्तक सर्वांत लोकप्रिय झालेले आहे. परंतु त्यांच्या मतें हें तुमच्यापुढे असलेले पुस्तक - "ख्रिस्त व त्याचे देवदूत, आणि सैतान व त्याचे दूत यांतील घोर संघर्ष" - हें त्यांचे सर्वांत महत्त्वाचे पुस्तक आहे.

# प्रस्तावना

देवाच्या आज्ञा व देवाच्या साक्षीकडे पाहा! जर ते या वचनाप्रमाणे बोलत नसतील, तर त्याचे कारण त्यांच्यामध्ये प्रकाश नाही हें आहे. *यशया* ८:२०.

आता, आपल्या २१व्या शतकाच्या सुरुवातीला, असें भासते कीं जणू प्रत्येकजणच संदेष्टा बनला आहे. आज इंटरनेटवरसुद्धा संदेष्ट्यांच्या वेब-साइट्स आहेत. परंतु त्यांच्यातले काही जरा विक्षिप्त गोष्टी सांगतात असें भासते. आपल्याला कसें माहीत होईल कीं ते स्वतःविषयीं जें म्हणतात, तें खरोखरी खरे आहे? ते म्हणतात कीं त्यांना देवापासून संदेश मिळाले आहेत. त्यांचे म्हणणे देवाच्या आज्ञांशीं व देवाच्या साक्षीशीं पडताळून पाहिले पाहिजेत. खात्रीने ज्या देवाने गतकाळात लोकांना त्याचे संदेश दिले व त्यांच्याकडून तें लेखी स्वरूपात लिहून घेतले (जें नंतर पवित्रशास्त्रामधील पुस्तके बनली), तोच देव त्यानेच दिलेल्या संदेशांच्या परस्परविरोधी होईल असें काहीच सांगणार नाही.

येशूने ह्याबाबतचे भविष्य सरळसरळपणे केले आहे, कारण त्याला माहीत होते कीं शेवटल्या काळात जगणाऱ्यांकरिता भविष्यसंदेशांचा मुद्दा एक मोठी कसोटी राहणार आहे: "पुष्कळ खोटे संदेष्टे उठतील व अनेकांस फसवितील." *मत्तय* २४:११. या सत्यावर अधिक भर देण्याकरिता देवाने योहानामार्फत हा संदेश दिला आहे: "प्रियजनहो, प्रत्येक आत्म्याचा विश्वास धरू नका, तर ते आत्मे देवापासून आहेत किंवा नाहीत ह्याविषयीं त्यांची परीक्षा करा; कारण पुष्कळ खोटे संदेष्टे जगात उठले आहेत." अर्थात एलन व्हाईट यांचा काही अपवाद नाही. त्यांचे हें पुस्तक घ्या, व तें पवित्रशास्त्राशीं पडताळून पहा; तें कसोटीस उतरते किंवा नाही? आपल्या स्वर्गातील दयाळू पित्याची प्रार्थना करा; तो सर्व सत्यांत आपले मार्गदर्शन करण्यास त्याच्या पवित्र आत्म्याला पाठवील.

विसाव्या शतकाची शेवटली दोन वर्षे, जे स्वतःला "ख्रिस्ती" म्हणवीत होते ते बहुतेक जण देवापासून प्रगटीकरणे मिळाल्याचा दावा कोणी केला कीं त्याच्याविरुद्ध ठाकत असत या गोष्टीवर आता आपला जवळजवळ विश्वास बसणार नाही. ते बहुधा *प्रगटीकरण* २२:१८-१९ हीं वचने त्यांचा मुद्दा सिद्ध करण्याकरिता वापरत: "ह्या पुस्तकातील संदेशवचने ऐकणाऱ्या प्रत्येकाला मी निश्चयपूर्वक सांगतो कीं जो कोणी ह्यात भर घालील त्याच्यावर ह्या पुस्तकात लिहिलेल्या पीडा देव आणील; आणि जो कोणी ह्या संदेशाच्या पुस्तकातील वचनांतून काही काढून टाकील त्याचा वाटा ह्या पुस्तकात वर्णिलेल्या जीवनाच्या झाडातून व पवित्र नगरीतून देव काढून टाकील."

परंतु हें असें म्हणणे आहे कां कीं योहानाच्या मृत्युनंतर देवापासून संदेष्टे अजिबात येणार नाहीत?

आणि जर तसें असेल, तर येशूने आपल्याला "खोट्या" संदेष्ट्यांविषयीं सावधान कां केले? पवित्र आत्म्याने योहानामार्फत आपल्याला कां सांगितले कीं आपण "आत्मे देवापासून आहेत किंवा नाहीत ह्याविषयीं त्यांची परीक्षा करावी"? जर आपल्याकरिता देवाची योजना अशी असती कीं योहानानंतर जे कोणी संदेष्टे असल्याचा दावा करतील ते खोटेच संदेष्टे असतील, तर त्यांच्याकडे सरळसरळ दुर्लक्ष करणे कितीतरी सुलभ होईल, नव्हे कां? परंतु देवाची योजना तशी नाही. जेव्हा नव्या सत्याची गरज पडते तेव्हा तो तें देतो व त्याची इच्छा माहीत करून देतो, आणि अंतःकरणाचे खरे असलेले लोक तें खरे असल्याची तपासून खात्री करून घेतील, व मग तें आनंदाने स्वीकारतील व अनुसरतील. अर्थात सैतानालासुद्धा जें काही करावयास पाहिजे तें करण्याची मुभा दिली जाईल. जर त्याला तसा वाव दिला गेला नाही, तर देव अन्यायी असल्याचा तो देवावर आरोप करू शकेल.

पवित्र आत्मा पौलातर्फे काही महत्त्वाचे प्रश्न विचारतो. ह्या प्रश्नांकडे अनेकदा कानाडोळा केला जातो. हें प्रश्न *१करिंथ.* १२व्या अध्यायात दिलेले आहेत. सगळेच प्रेषित आहेत काय? सगळेच संदेष्टे आहेत काय? सगळेच अद्भुत कृत्ये करणारे आहेत काय? निरोगी करण्याची कृपादाने सगळ्यांनाच आहेत काय? सगळेच भिन्नभिन्न भाषा बोलतात काय? मग तो म्हणतो कीं तो आपल्याला एक अधिक "सर्वोत्कृष्ट मार्ग" दाखवील, व तो म्हणतो कीं जर आपल्यामध्ये प्रीति नसेल तर कोठल्याच देणग्यांनी आपला फायदा होणार नाही. १४व्या अध्यायात तो एक पाऊल पुढे जाऊन म्हणतो: "प्रीति हें तुमचे ध्येय असू द्या. तरी आध्यात्मिक दानांची आणि विशेषतः तुम्हांला संदेश देता यावा अशी उत्कंठा बाळगा." "म्हणून, बंधुजनहो, तुम्ही संदेश देण्याची उत्कंठा बाळगा, व निरनिराळ्या भाषा बोलण्यास मना करू नका." "आत्म्याला विझवू नका; संदेशांचा धिक्कार करू नका; सर्व गोष्टींची पारख करा; चांगले तें बळकट धरा." *१थेस्सल.* ५:१९-२१.

एलन व्हाईट यांना "घोर संघर्षाचा" (महाभयंकर संघर्षाचा) दृष्टांत १८५८ सालच्या वसंत ऋतुत अमेरिकेतल्या ओहियो राज्यामधील लव्हेट्स ग्रोव्ह येथे देण्यात आला. या दृष्टांतात पाहिलेल्या बहुतेक गोष्टी त्यांना अगोदरच्या दृष्टांतात अकरा वर्षांपूर्वी दाखविण्यात आल्या होत्या, परंतु या खेपेला त्यांना त्या लिहून काढण्याचा आदेश दिला गेला, जरी सैतान त्यांना अडथळण करण्यास कमालीची शिकस्त करील असें त्यांना सांगण्यात आले. या पुस्तकातील काही भाग, विशेषतः ३०वा अध्याय, १८४७ सालीं "लिटल फ्लॉक"मध्यें, १८५१मध्ये "ख्रिश्चन एक्सिपिरियन्स व व्ह्यूज"मध्ये, आणि १८५४मध्ये "सप्लिमेंट" पुस्तिकांमध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते. तें सर्व पवित्र आत्म्याद्वारें प्रेरित केलेले आहेत; एका अशक्त, परंतु देवभीरू भगिनीद्वारें तें लिहून काढले गेले व प्रथम १८५८मध्ये एकत्र रुपात छापले गेले. सैतानाने जगातून पवित्रशास्त्र नष्ट करण्यास पाहिले होते, आणि तें अशक्य झाल्याने त्याने पवित्रशास्त्राच्या अनेक भ्रष्ट केलेल्या आवृत्त्या जगभर पसरविल्या आहेत; त्याचप्रमाणे तो हें पुस्तकसुद्धा एकतर नष्ट करण्यास नाहीतर भ्रष्ट करण्यास पाहत आहे कारण कीं तें देवाच्या भक्ताकरिता आख्ख्या जगात पवित्रशास्त्राखालोखालचे दुसरे सर्वांत मूल्यवान पुस्तक आहे. परंतु देवाने त्याचे वचन सुरक्षित राखले आहे.

अनेकांना प्रश्न पडतो कीं आपल्या या जगात इतक्या समस्या कां आहेत, लढाया, गुन्हेगारी, स्त्रीपुरुषांमधील अपवित्र संबंध, आणि, होय, धर्मतत्वांमधीलसुद्धा फारकती. या प्रश्नांची बरोबर उत्तरे आपल्याला तेव्हाच मिळू शकतात कीं जेव्हा आपल्याला ख्रिस्त आणि सैतान यांच्यामध्ये जो घोर संघर्ष मानवजाति अस्तित्वात येण्याच्या अगोदरच्या काळापासून होत आलेला आहे आणि सध्या चालू आहे त्याचा बरोबर समज प्राप्त होईल.

वाचकहो, तुम्ही ह्या पुस्तकात जें काही लिहिले गेले आहे तें देवाच्या वचनाशीं - पवित्रशास्त्राशीं - पडताळून पाहत असतांना, देव तुमच्यावर त्याच्या सर्वोत्कृष्ट देणग्यांचा वर्षाव करो.

या पुस्तकाची मोफत प्रत तुम्ही कृपया इंटरनेटवरील पुढील वेब-साइटवरून मिळवाः
http://www.earlysda.com.

<u>टीप</u>**:** संक्षिप्त चरित्र, प्रस्तावना, व प्रत्येक अध्यायानंतर अधिक अध्ययनाकरिता नमूद केलेल्या शास्त्रभागांचा उल्लेख, व देवाने त्याच्या स्वभावानुसार मानवजातिला घालून दिलेले त्याचे दहा कायदेकानू, डोंगरावरल्या प्रवचनात प्रभू येशूने शिकविलेली प्रार्थना, स्तोत्र १९: देवाची कृत्ये आणि त्याचे नियम, हे मूळ पुस्तकात एलन व्हाईट यांनी लिहिले नव्हते.

# अनुक्रमणिका


अध्याय १ सैतानाचे पतन ... ... ... ... ... ... ८
अध्याय २ मानवाचे पतन ... ... ... ... ... ... १०
अध्याय ३ उद्धाराची योजना ... ... ... ... ... ... १२
अध्याय ४ ख्रिस्ताचे पहिले आगमन ... ... ... ... ... १६
अध्याय ५ ख्रिस्ताचे सेवाकार्य ... ... ... ... ... २१
अध्याय ६ येशूचे रुपांतर ... ... ... ... ... ... २४
अध्याय ७ ख्रिस्ताचा विश्वासघात ... ... ... ... ... २७
अध्याय ८ ख्रिस्ताची न्यायालयीन चौकशी ... ... ... ३०
अध्याय ९ ख्रिस्ताला क्रूसखांबीं खिळणे ... ... ... ... ३५
अध्याय १० ख्रिस्ताचे पुनरुत्थान ... ... ... ... ... ४०
अध्याय ११ ख्रिस्ताचे स्वर्गारोहण ... ... ... ... ... ४८
अध्याय १२ ख्रिस्ताचे शिष्य ... ... ... ... ... ... ५०
अध्याय १३ स्तेफनाचा मृत्यु ... ... ... ... ... ... ५४
अध्याय १४ शौलाचा पालट ... ... ... ... ... ... ५६
अध्याय १५ यहूद्यांनी पौलाला ठार करण्याचे ठरविले ... ... ५८
अध्याय १६ पौलाने यरुशलेमला भेट दिली ... ... ... ६१
अध्याय १७ घोर धर्मभ्रष्टता ... ... ... ... ... ... ६४
अध्याय १८ अनीतिचे रहस्य ... ... ... ... ... ... ६७
अध्याय १९ मरण, दुर्दशेत सार्वकालीन जीवन नव्हे ... ... ७१
अध्याय २० धर्मसुधारणेचा काळ ... ... ... ... ... ७५
अध्याय २१ चर्चची आणि जगाची युति ... ... ... ... ७८
अध्याय २२ विलियम मिलर ... ... ... ... ... ... ८१

# अनुक्रमणिका


अध्याय २३ पहिल्या देवदूताचा संदेश ... ... ... ... ... ... ८४

अध्याय २४ दुसऱ्या देवदूताचा संदेश ... ... ... ... ... ... ८८

अध्याय २५ द्वितीय आगमनाच्या चळवळीचे चित्र ... ... ... ... ९१

अध्याय २६ दुसरे एक चित्र ... ... ... ... ... ... ... ... ९५

अध्याय २७ दर्शनमंडप ... ... ... ... ... ... ... ... ९९

अध्याय २८ तिसऱ्या देवदूताचा संदेश ... ... ... ... ... ... १०२

अध्याय २९ भक्कम व्यासपीठ ... ... ... ... ... ... ... १०६

अध्याय ३० पिशाच्चवाद ... ... ... ... ... ... ... ... १०९

अध्याय ३१ लोभी वृत्ति ... ... ... ... ... ... ... ... ११३

अध्याय ३२ चाळणी फिरविली जाणे ... ... ... ... ... ... ११६

अध्याय ३३ बाबेलची पापे ... ... ... ... ... ... ... १२०

अध्याय ३४ मोठी आरोळी ... ... ... ... ... ... ... १२३

अध्याय ३५ तिसऱ्या संदेशाचा शेवट ... ... ... ... ... ... १२५

अध्याय ३६ याकोबाचा क्लेशसमय ... ... ... ... ... ... १२८

अध्याय ३७ पवित्रजनांची सुटका ... ... ... ... ... ... १३०

अध्याय ३८ पवित्रजनांचे पारितोषिक ... ... ... ... ... ... १३३

अध्याय ३९ पृथ्वी ओसाड होते ... ... ... ... ... ... ... १३५

अध्याय ४० दुसरे पुनरुत्थान ... ... ... ... ... ... ... १३७

अध्याय ४१ दुसरा मृत्यु ... ... ... ... ... ... ... ... १३९

देवाने त्याच्या स्वभावानुसार मानवजातिला घालून दिलेले त्याचे दहा कायदेकानू ... ... ... ... ... १४१

डोंगरावरल्या प्रवचनात प्रभू येशूने शिकविलेली प्रार्थना ... ... ... १४२

स्तोत्र १९: देवाची कृत्ये आणि त्याचे नियम ... ... ... ... ... १४३

# अध्याय १
# सैतानाचे पतन

देवाने मला दाखवून दिले आहे कीं एके काळीं सैतान स्वर्गामध्ये माननीय देवदूत होता, येशू ख्रिस्ताच्या खालोखालचा सन्मान त्याला मिळत असे. त्याचा चेहरा सौम्य व इतर देवदूतांप्रमाणे प्रसन्न होता. त्याचे कपाळ उंच व रुंद होते; तें त्याची बुद्धिमत्ता प्रगट करीत असे. त्याची शरीरयष्टि परिपूर्ण, दोषविरहित होती. तो उमदा होता व चालण्यावागण्यात राजबिंडा दिसत असे. आणि मी पाहिले कीं जेव्हा देव त्याच्या पुत्राला म्हणाला कीं आपण मनुष्याला आपल्या प्रतिमेनुरूप घडवू या, तेव्हा सैतानाला येशूचा मत्सर वाटला. मानवाच्या घडणासंबंधी त्याच्याशीं सल्लामसलत केली जावी अशी त्याची इच्छा होती. त्याला अत्यंत हेवा, मत्सर, व द्वेष वाटू लागला. स्वर्गात देवाच्या खालोखाल सर्वांत उच्च स्थान त्याला मिळावे व सर्वोच्च मानसन्मान त्याला मिळावा अशी त्याची इच्छा होती. हा वेळपर्यंत सबंध स्वर्ग देवाच्या व्यवस्थापनेनुसार वागत असे व देवाच्या शासनापुढे लीन होत असे; स्वर्गात पूर्ण ऐक्य होते.

देवाच्या व्यवस्थापनाविरुद्ध व देवाच्या इच्छेविरुद्ध बंड करणे हें सर्वांत मोठे पाप होते. सर्व स्वर्ग गोंधळून गेल्यासारखे भासले. देवदूतांची रचना गटांगटांत केली गेली व प्रत्येक गटावर सेनापतित्व करणारा देवदूत नेमला गेला. सर्व देवदूत जोरदारपणे कामाला लागले. सैतान देवाच्या शासनाविरुद्ध आरोप करू लागला; स्वतःस उच्च करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती, व येशूच्या अधिकारापुढे नमण्यास तो तयार नव्हता. काही देवदूतांनी सैतानाला त्याच्या बंडाळीत सहानुभूति दर्शविली, तर इतरांनी देवाने त्याच्या पुत्राला अधिकार देण्यात काही गैर केले नाही, तर उलट त्याद्वारें देवाचा सन्मान व सुज्ञताच दिसून येते असें म्हणून देवाची बाजू जोरदारपणे उचलून धरली. आणि देवदूतांमध्ये संघर्ष होऊ लागला. सैतान व त्याच्या बाजूचे देवदूत, जे देवाच्या शासनात सुधारणा घडवून आणण्याकरिता प्रयत्न करू लागले होते, त्यांचा येशूला अमर्यादित सत्तासामर्थ्य प्रदान करण्यात देवाचा काय हेतु होता तो हेतु देवाच्या अथांग ज्ञानाचा शोध घेऊन माहीत करून घेण्याचा इरादा होता. त्यांनी देवाच्या पुत्राच्या अधिकाराविरुद्ध बंड पुकारले; तेव्हा सर्व देवदूतांना पित्यापुढे हजर राहण्याकरिता आदेश दिला गेला, यासाठीं कीं सर्वांचा न्यायनिवाडा करण्यात यावा. असा निर्णय घेण्यात आला कीं सैतानाला स्वर्गातून हद्दपार केले जावे व ज्यांनी त्याच्या बंडात भाग घेतलेला असेल त्या सर्वांना त्याच्यासोबत घालवून दिले जावे. मग स्वर्गात युद्ध झाले. देवदूत लढाईत जुंपले गेले. देवाच्या पुत्रावर व जे कोणी त्याच्या इच्छेपुढे नमत होते त्या सर्वांवर विजय मिळविण्याची

सैतानाची इच्छा अर्थातच होती; परंतु चांगल्या व एकनिष्ठ देवदूतांची सरशी झाली, आणि सैतानाला, त्याच्या अनुयायांसोबत, स्वर्गातून हाकलून दिले गेले.

सैतानाकरिता व त्याच्यासोबत ज्यांचेज्यांचे पतन झाले होते त्यांच्याकरिता स्वर्ग बंद केला गेल्यानंतर, सैतानाला जाणीव झाली कीं त्याने स्वर्गाचे पावित्र्य व गौरव कायमचे गमावले आहे. मग त्याला पस्तावा झाला व स्वर्गात त्याला पुन्हा घेतले जावे अशी उत्कंठा त्याच्या मनात उत्पन्न झाली. आता तो स्वर्गात त्याची योग्य जागा घ्यायला, किंवा जें कोणते पद त्याला दिले जाईल तें स्वीकारायला, तयार झाला. परंतु नाही, स्वर्गाला धोक्यात घातले जाता कामा नये. जर त्याला परत घेतले गेले तर सबंध स्वर्ग बिघडून जाण्याची शक्यता होती, कारण कीं पापाचा उगम त्याच्यापासून झाला होता व बंडाची बीजे अजूनही त्याच्यामध्ये होती. सैतानाने अनुयायी मिळविले होते, ज्यांनी त्याच्या बंडाळीत त्याला सहानुभूति दाखविली होती. त्याने व त्याच्या अनुयायांनी पश्चात्ताप केला, ते रडले, व देवाने त्यांच्यावर पुन्हा कृपा दाखववावी म्हणून त्यांनी देवाला गळ घातली. परंतु नाही, त्यांचे पातक, त्यांचा द्वेष, त्यांचा हेवा आणि मत्सर इतका जबरदस्त होता कीं देव तो पुसून टाकू शकत नव्हता. या गोष्टींची शिक्षा शेवटीं दिली गेलीच पाहिजे.

जेव्हा सैतानाला पूर्णपणे जाणवले कीं त्याच्यावर देवाची कृपादृष्टि होण्याची काहीच शक्यता राहिली नव्हती, तेव्हा त्याचा खुनशी स्वभाव व द्वेष प्रगट व्हायला लागला. त्याने त्याच्या दूतांसोबत संगनमत करून देवाच्या शासनाविरुद्ध इथून पुढेही कारस्थान करण्याकरिता एक योजना आखली. जेव्हा आदामाला व हवाबाईला सुंदर एदेन बागेत ठेवण्यात आले, तेव्हा त्यांना नष्ट करण्यासाठीं सैतान योजना आखत होता. त्याने त्याच्या दुष्ट दूतांशीं चर्चा केली. हें सुखी दांपत्य जोंवर देवाचे आज्ञापालन करतील तोंवर त्यांचे सौख्य कोणत्याही प्रकारें नष्ट केले जाऊ शकणार नव्हते. त्यांनी प्रथम देवाचे आज्ञाउल्लंघन केल्याशिवाय व देवाची कृपा गमाविल्याशिवाय सैतान त्यांच्यावर त्याची सत्ता चालवू शकणार नव्हता. देव त्यांच्यावर रुष्ट होईल अशा कोठल्यातरी आज्ञाउल्लंघनास त्यांना प्रवृत्त करण्याकरिता त्या दुष्टांनी कोठलीतरी योजना तयार केली पाहिजे, म्हणजे मग ते सरळसरळपणे सैतानाच्या व त्याच्या दूतांच्या प्रभावाखाली आणले जातील. त्यांनी निर्णय घेतला कीं सैतानाने दुसरे कोठलेंतरी रूप घेऊन मानवजातिच्या हिताकरिता आपुलकी दाखववावी. त्याने त्यांच्या मनांत देवाच्या खरेपणाबद्दल शंका उत्पन्न करावी, देव जें काही म्हटला त्यात त्याचा अर्थ तसाच होता कां याबद्दल त्यांना साशंक करावे, आणि तदनंतर त्यांची जिज्ञासा चेतवावी, आणि देवाच्या अथांग योजनांमध्ये डोकावून बघण्यास त्यांना प्रवृत्त करावे (हें पातक सैतानाने स्वतः केले होते), आणि बरेवाईटाच्या ज्ञानाच्या झाडाच्या बाबतीत देवाने जीं बंधने घातली होती त्याचे कारण काय असावे याबद्दल त्यांना विचार करायला लावावा.

पहा:

*यशया* १४:१२-२०; *यहेज्केल* २८:१-१९; *प्रगटीकरण* १२:७-९.

# अध्याय २
# मानवाचे पतन

मी पाहिले कीं पवित्र देवदूत एदेन बागेला वरचेवर भेट देत असत, आणि आदामाला व हवेला त्यांच्या उद्योगाबाबत सूचना करीत, आणि सैतानाच्या बंडाविषयीं व त्याच्या पतनाविषयींसुद्धा शिकवीत. देवदूतांनी त्यांना सैतानाबाबत इशारा दिला, व त्यांनी त्यांच्या दैनंदिनींच्या कामांत एकमेकांपासून विभक्त न होण्याची खबरदारी घ्यावी अशी सूचना केली, कारण कीं या पतन पावलेल्या शत्रुच्या निकट संबंधात येण्याची त्यांच्या बाबतीत दाट शक्यता होती. देवाने त्यांना दिलेल्या सूचना त्यांनी काटेकोरपणे पाळाव्या अशी विशेष सूचना देवदूतांनी त्यांना दिली, कारण कीं केवळ पूर्ण निर्दोष आज्ञापालनातच ते सुरक्षित राहू शकत होते. आणि जर ते आज्ञाधारक राहिले, तर हा पतित शत्रु त्यांच्यावर कसलीही सत्ता चालवू शकणार नव्हता.

सैतानाने त्याच्या कुटिल कार्यास हवेपासून सुरुवात केली, व तिने आज्ञाउल्लंघन करावे असें करण्यास तो पाहू लागला. तिने पहिली चूक तिच्या पतिपासून दूर भटकत जाण्याची केली; मग ती मनाई केल्या गेलेल्या झाडाभोवती घुटमळू लागली; आणि तदनंतर मोहपाश टाकणाऱ्याच्या वाणीस तिने कान दिला, आणि देवाने बोललेल्या शब्दांच्या बाबतीतसुद्धा शंका घेण्याचे धाडस केले - कीं ज्या दिवशीं तुम्ही त्या झाडाचे फळ खाल, त्या दिवशीं तुम्ही खात्रीने मराल. तिने विचार केला कीं देव जें बोलला होता एखादे वेळीं त्याचा नेमका इरादा तोच नसावा. तिने आज्ञा मोडण्याचे धाडस केले. तिने तिचा हात लांबवून झाडाचे फळ घेतले व खाल्ले. तें डोळ्याला दिसावयास आकर्षक होते, व चवीला आल्हादकारी होते. जें फळ खरोखरी त्यांच्या हिताचे होते तें देवाने त्यांच्यापासून दूर ठेवले म्हणून तिला हेवा वाटला. तिने तें फळ तिच्या नवऱ्याला देऊ केले, व त्याद्वारें त्याच्यावर मोह टाकला. सर्प जें काही बोलला होता तें सर्व तिने आदामाला सांगितले, व सर्पाला बोलण्याची पात्रता कशी मिळाली त्याबद्दल तिने आश्चर्य व्यक्त केले.

आदामाचा चेहरा खिन्न झाल्याचे मी पाहिले. तो भयभीत व आश्चर्यचकित झाल्याचे दिसत होते. त्याच्या मनात संघर्ष होत होता हें स्पष्ट जाणवत होते. त्याला खात्री वाटली कीं हाच तो शत्रु होता ज्याच्याविरुद्ध त्यांना इशारा देण्यात आला होता, व आता त्याच्या पत्नीला नक्कीच मरावे लागणार. त्यांना एकमेकांपासून वेगळे व्हावे लागणार. हवाबाईवर त्याचे जिवापाड प्रेम होते. अगदीच हताश होऊन त्याने तिचे दैव आपणही भोगण्याचा निर्धार केला. त्याने फळावर झडप घातली, व तें चटकन खाऊन टाकले. तेव्हा सैतान हुरळला. त्याने स्वर्गात बंड केले होते, आणि त्याच्यावर प्रेम करणारे व त्याच्याविषयीं

आपुलकी वाटणारे अनेकजण त्याच्या बंडात त्याला येऊन मिळाले होते. त्याचे स्वतःचे पतन झाले होते, आणि त्याच्यासोबत त्याने दुसऱ्यांचे पतन घडवून आणले होते. आणि आता त्याने स्त्रीला देवावर अविश्वास दाखवायला मोहित केले, त्याच्या ज्ञानाची चौकशी करण्यास व त्याच्या सर्वस्वी सुज्ञ असलेल्या योजना शोधून काढण्यास उद्युक्त केले. सैतानाला माहीत होते कीं स्त्रीचे एकटीचेच पतन होणार नाही. हवाबाईकरिता असलेल्या त्याच्या प्रेमामुळें आदामाने देवाची आज्ञा मोडली व तिच्यासोबत त्याचेही पतन झाले.

मानवाच्या पतनाचे वृत्त सबंध स्वर्गात पसरले. प्रत्येक वीणा गप्प केली गेली. देवदूतांनी दुःखाने त्यांच्या मस्तकांवरील मुगूट खाली काढले. सर्व स्वर्गात शोककल्लोळ माजला. दोषी दांपत्याबाबत काय केले गेले पाहिजे तें ठरविण्याकरिता सभा घेतली गेली. देवदूतांना भय वाटू लागले कीं ते जीवनी झाडाचे फळ तोडून खातील व अमर पातकी बनतील. परंतु देव म्हणाला कीं तो अपराध्यांना एदेन बागेतून घालवून देईल. जीवनाच्या झाडाच्या मार्गाचे रक्षण करण्याच्या कामीं देवदूतांची नेमणूक तावडतोब करण्यात आली. सैतानाने बराच विचार करून कारवाई केली होती कीं आदामाने व हवाबाईने देवाचे आज्ञाउल्लंघन करावे, त्याचा कोप स्वतःवर ओढवून घ्यावा, आणि मग जीवनी झाडाचे फळ खावे, म्हणजे मग ते सदासर्वकाळ पापात व आज्ञाउल्लंघनात जगतील, व तशा प्रकारें पाप अमर केले जाईल. परंतु त्यांना बागेतून घालवून देण्यास पवित्र देवदूतांना पाठविले गेले, आणि देवदूतांच्या दुसऱ्या गटाला जीवनी झाडाचा मार्ग रक्षिण्याकरिता नेमले गेले. या प्रत्येक बलाढ्य देवदूताच्या उजव्या हातीं काहीतरी होते, जें चमकणाऱ्या तलवारीसारखे दिसत होते.

मग सैतानाला विजयाचा आसुरी आनंद झाला. त्याच्या पतनाने त्याने दुसऱ्यांना दुष्परिणाम भोगावयास लावले. त्याला स्वर्गातून बाहेर घालविले गेले होते, त्यांना देवाच्या एदेन बागेतून घालवून दिले गेले.

पहाः *उत्पत्ति*, अध्याय ३.

# अध्याय ३
# उद्धाराची योजना

जेव्हा स्वर्गाला जाणीव झाली कीं मनुष्याचा नाश होणार आहे, व जें जग देवाने उत्पन्न केले होते तें दुर्दशा, रोगआजार, व मृत्यु यांच्या कब्जात जाणाऱ्या मानवांनी भरले जाणार आहे, आणि अपराध केलेल्यांकरिता सुटकेचा कोठलाही मार्ग नाही, तेव्हा आख्खा स्वर्ग अतिशय दुःखी झाला. आदामाच्या सर्व खानदानाने मरण भोगले पाहिजे. मी देखण्या येशूकडे पाहिले, व त्याच्या चेहऱ्यावर सहानुभूतिची व दुःखाची भावना पसरलेली पाहिली. लवकरच मी ज्या अत्यंत तेजस्वी प्रकाशाने पित्याला घेरलेले होते तिकडे त्याला पित्याजवळ जातांना पाहिले. माझ्या सोबतीचा देवदूत म्हणाला: तो त्याच्या पित्याशीं कळवळून व तळमळून संभाषण करीत आहे. जेव्हा येशू त्याच्या पित्याशीं समागम करीत होता तेव्हा देवदूतांची चिंता शिगेला पोहंचल्याचे दिसत होते. तीन वेळा तो पित्याभोवती असलेल्या गौरवी प्रकाशाने झाकला गेला, आणि तिसऱ्या वेळीं जेव्हा तो पित्यापासून आला, तेव्हा त्याचे रंगरूप दिसू शकले. त्याचा चेहरा शांत होता, काळजीचे किंवा त्रस्त मनःस्थितीचे थोडेसुद्धा चिन्ह त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हते; त्याच्या चेहऱ्यातून औदार्य व सौंदर्य ओसंडत होते जें शब्दांत व्यक्त करता येणे शक्य नाही. मग त्याने देवदूतांच्या जमावांना सांगितले कीं नाशाप्रत गेलेल्या मानवाकरिता सुटकेचा मार्ग तयार करण्यात आला होता. त्याने त्यांना सांगितले कीं तो त्याच्या पित्याची विनवणी करीत होता, आणि त्याने त्याचा प्राण खंडणी म्हणून देऊ केला आहे, व तो मरणाचा दंड स्वतःवर घेईल, कीं त्याच्यामार्फत मानवाला क्षमा प्राप्त व्हावी; त्याच्या रक्ताच्या पुण्याईद्वारें व देवाच्या आज्ञांचे पालन करून त्यांना देवाची कृपा संपादन करता येईल, व पुन्हा त्या सुंदर बागेत त्यांना आणले जाऊ शकेल व जीवनी झाडाचे फळ ते परत खाऊ शकतील.

प्रथम देवदूतांना आनंद करता येईना, कारण त्यांच्या सेनापतिने त्यांच्यापासून काहीच लपवून ठेवले नाही, तर त्यांच्यापुढे त्याने उद्धाराची योजना उघडी केली. येशूने त्यांना सांगितले कीं तो त्याच्या पित्याच्या कोपाच्या व दोषी मानवाच्या मध्ये उभा राहील, तो अनीति व हेटाळणी सहन करील, आणि तरी थोडकेच जण त्याचा देवाचा पुत्र म्हणून स्वीकार करतील. जवळजवळ सर्वजण त्याचा द्वेष करतील व त्याला अव्हेरतील. तो स्वर्गातील त्याचे सर्व गौरव सोडील, पृथ्वीवर मनुष्य म्हणून जाईल, मानव म्हणून स्वतःस लीन करील, त्याच्या स्वतःच्या अनुभवाने मानवाच्या विविध मोहांशीं परिचित होईल - तें यासाठीं कीं ज्यांच्यावर मोहपाश व संकटे येत आहेत त्यांना सहाय्य कसें करावे तें त्याला स्वानुभवाने माहीत होईल; आणि सरतेशेवटीं, शिक्षक या नात्याने असलेले त्याचे सेवाकार्य सिद्धिस गेल्यानंतर त्याला मनुष्यांच्या

हातीं दिले जाईल, व सैतान व त्याचे दूत दुष्ट माणसांना जेवढे क्रौर्य व क्लेश त्याच्यावर लादण्यास प्रवृत्त करू शकतील तें सर्व तो सहन करील; तो सर्वांत क्रूर असलेला मृत्यु भोगेल, आकाशे व पृथ्वी यांच्या मध्यभागीं अधांतरी दोषी पातकी म्हणून त्याला लटकविले जाईल; त्याला भयंकर क्लेश व वेदना सहन कराव्या लागतील, इतक्या भयंकर कीं देवदूतांना त्या बघवणार नाहीत व ते त्यांची तोंडे त्या दृश्यापासून झाकून घेतील. तो केवळ शारीरिक क्लेशच भोगेल असें नाही, तर मानसिक क्लेश भोगेल, ज्या क्लेशांपुढे शारीरिक यातनांच्या दुःखाची तुलना होऊ शकणार नाही. सबंध जगाच्या पापांचा भार त्याच्यावर असेल. त्याने त्यांना सांगितले कीं तो मरण पावेल व तिसऱ्या दिवशीं मरणातून उठेल, व बहकलेल्या, दोषी मानवाकरिता मध्यस्थी करण्याकरिता त्याचे त्याच्या पित्याकडे स्वर्गारोहण होईल.

देवदूतांनी त्याच्यापुढे लोटांगण घालून नमन केले. त्यांनी त्यांचे प्राण देण्याची तयारी दाखविली. येशू त्यांना म्हणाला कीं त्याच्या मृत्युने तो अनेकांना वाचवील, परंतु कोणत्याही देवदूताचे जीवन ही खंडणी भरू शकणार नाही. केवळ त्याचाच प्राण मानवाकरिता खंडणी म्हणून त्याचा पिता स्वीकारू शकेल.

येशूने त्यांना हेपण सांगितले कीं त्यांनासुद्धा या उद्धारयोजनेत काही कार्य करावे लागेलः त्यांना त्याच्यासोबत राहावे लागेल, व वेगवेगळ्या प्रसंगीं त्याला सबळ करावे लागेल. तो मानवाचे पतित स्वरूप घेणार आहे, आणि म्हणून त्याची शक्ति त्यांच्या बळाएवढीसुद्धा नसेल. ते त्याच्या लाजिरवाण्या स्थितीचे व त्याच्या भयंकर यातनांचे साक्षी बनतील. आणि त्याचे दुःख पाहत असतांना, व माणसांचा त्याच्याप्रीत्यर्थ असलेला द्वेष पाहतांना, त्यांच्या भावना खोलवर हेलावल्या जातील, आणि त्यांच्या त्याच्यावरील प्रेमामुळें ते त्याची सुटका करण्याची इच्छा करतील, व त्याला त्याच्या खून्यांच्या तावडीतून सोडविण्यास पाहतील; परंतु ते जें काही पाहतील त्या कोठल्याही गोष्टीस प्रतिबंध करण्याकरिता त्यांनी हस्तक्षेप करता कामा नये. आणि त्याच्या पुनरुत्थानातही त्यांचा एक कार्यभाग असेल. उद्धाराची योजना तयार केली गेली आहे, व त्याच्या पित्याने ही योजना मान्य केली आहे.

पवित्र दुःखाने, येशूने देवदूतांचे सांत्वन केले व त्यांना आनंदी केले, आणि त्यांना माहिती दिली कीं तो ज्यांचा उद्धार घडवून आणील ते इथून पुढे त्याच्यासोबत असतील, व सदासर्वकाळ त्याच्यासोबत राहतील; आणि त्याच्या मरणाने तो अनेकांचे तारण करील, व मृत्युचे सामर्थ्य असलेल्याला नष्ट करील. आणि त्याचा पिता त्याला राज्य देईल, व सबंध आकाशाखाली असलेल्या राज्याचे गौरव देईल, व तें कायमचे, सदासर्वकाळाकरिता, त्याचे बनेल. सैतानाला व पातक्यांना नष्ट केले जाईल, व ते तेथून पुढे कधींही स्वर्गाला किंवा शुद्ध केलेल्या नव्या पृथ्वीला त्रास देणार नाहीत. येशूने स्वर्गीय जमावांना सांगितले कीं त्याच्या पित्याने स्वीकारलेल्या योजनेला त्यांनीसुद्धा मान्यता द्यावी, व हर्ष करावा कीं पतित मानवाला त्याच्या मृत्युद्वारें पुन्हा उच्च केले जाऊ शकेल, देवाची कृपा मिळू शकेल व स्वर्गसुख लाभू शकेल.

मग स्वर्गात आनंदीआनंद, शब्दांत व्यक्त करता येणार नाही इतका हर्ष, झाला. आणि स्वर्गीय जमावांनी देवस्तुतिचे व देवभक्तिचे गीत गायिले. बंडखोरांच्या जातिसाठीं देवाने त्याचा अति प्रिय पुत्र मरण्यासाठीं दिला - देवाच्या या महान दयेने व औदार्याने भारावून जाऊन त्यांनी त्यांच्या वीणांवरून हात

फिरवून पहिल्यापेक्षा अधिक उच्च स्वरात गायन गायिले. येशूच्या स्वनाकारामुळें व स्वार्थत्यागामुळें त्यांनी मनापासून येशूची स्तुति व भक्ति केली: कीं त्याने त्याच्या पित्याचे वक्षस्थल सोडण्यास संमति द्यावी व दुःखक्लेशाच्या जीवनाची निवड करावी, व दुसऱ्यांना जीवन देण्याकरिता लज्जास्पद मृत्यु भोगण्यास तयार व्हावे.

देवदूत म्हणाला: पित्याने त्याच्या अति प्रिय पुत्राला मनस्तापावाचून देऊन टाकले असें तुम्हांला वाटते काय? नाही, नाही. स्वर्गाच्या देवालासुद्धा मोठ्या मानसिक संघर्षातून पार पडावे लागले होते कीं दोषी मानवांचा नाश होऊ द्यावा, कीं त्यांच्याकरिता मरावयास त्याच्या परमप्रिय पुत्राला द्यावे. मानवांच्या उद्धाराची कळकळ देवदूतांनासुद्धा इतकी जास्त होती कीं त्यांच्यातले काहीजण त्यांचे गौरव सोडून देण्यास व नाशाप्रत चाललेल्या मानवांकरिता त्यांचा प्राण द्यावयास तयार होते. परंतु, माझ्या सोबतीचा देवदूत म्हणाला: त्यामुळें काही फायदा झाला नसता. अपराध इतका मोठा होता कीं देवदूताच्या जीवनाद्वारें खंडणी भरली जाऊ शकत नव्हती. देवाच्या पुत्राच्या मृत्युखेरीज व मध्यस्थीखेरीज दुसऱ्या कशाने खंडणी भरली जाऊ शकत नव्हती व पतित मानवाचा आशाहीन दुःखापासून व दुर्दशेपासून बचाव केला जाऊ शकत नव्हता.

परंतु देवदूतांची कामगिरी त्यांना नेमून देण्यात आली, कीं त्यांना गौरवाच्या क्षेत्रातून निघून पृथ्वीवर खालीवर फेऱ्या कराव्या लागतील व देवाच्या पुत्राच्या दुःखयातनांत त्याला बळ देऊन त्याचे समाधान करावे लागेल व त्याची सेवा करावी लागेल. तसेंच, देवाच्या कृपेची जी प्रजा होती त्यांचे दुष्ट दूतांपासून व सैतान त्यांच्याभोवती सतत जो अंधकार पाडत राहील त्यापासून रक्षण करण्याचे कामसुद्धा त्यांना देण्यात आले. मी पाहिले कीं देवाला नाशवंत, पतित मानवाचा उद्धार करण्याकरिता त्याच्या आज्ञांत बदल करणे किंवा त्या रद्द करणे अशक्य होते, आणि म्हणून त्याने मानवाच्या अपराधांकरिता त्याच्या प्रिय पुत्राला मरण भोगण्यास येऊ दिले.

सैतानाने पुन्हा त्याच्या दूतांसह आनंदीआनंद केला कीं मानवाचे पतन घडवून आणून तो देवाच्या पुत्राला त्याच्या उच्च स्थानावरून ओढून खाली आणू शकत होता. त्याने त्याच्या दूतांना सांगितले कीं जेव्हा येशू पतित मानवाचे स्वरूप धारण करील, तेव्हा तो त्याच्यावर विजय मिळवू शकेल व उद्धाराची योजना यशस्वी होऊ नये म्हणून अडथळा उत्पन्न करू शकेल.

मग मला सैतान एके काळीं आनंदी, उच्च देवदूत होता तेव्हा कसा होता तें दाखविण्यात आले. त्यानंतर तो आता कसा आहे तें मला दाखविण्यात आले. अजूनही त्याचे आकारमान राजबिंडे आहे. त्याचे रंगरूप अजूनही उमदे आहे, कारण कीं तो पतन पावलेला एक देवदूत आहे. परंतु त्याच्या चेहऱ्यावरील भाव चिंतायुक्त, काळजीचे, दुःखाचे, मत्सराचे, द्वेषाचे, दुष्टपणाचे, खोडसाळपणाचे, फसवेगिरीचे, व सर्व प्रकारच्या वाईटाचे आहेत. तें कपाळ, जें एके काळीं इतके उमदे होते, त्याच्याकडे माझे विशेष लक्ष गेले. त्याचे कपाळ त्याच्या डोळ्यांपासून मागील बाजूस झुकत चालले होते. मी पाहिले कीं त्याने स्वतःची इतका दीर्घकाळ अवनति करून घेतली होती कीं त्याच्यातली प्रत्येक चांगली पात्रता घटत गेली होती व भ्रष्ट

झाली होती व प्रत्येक वाईट गुण त्याच्यात विकसित झाला होता. त्याचे डोळे चलाख व कावेबाज दिसत होते व त्याला अनुभवाने बराच समज प्राप्त झालेला असल्याचे त्याच्या डोळ्यांतून स्पष्ट होत होते. त्याच्या शरीराचे आकारमान मोठे होते, परंतु त्याच्या हातांभोवती व तोंडाभोवती त्याच्या शरीराचे मांस लोंबलेले होते. मी त्याला पाहिले, तेव्हा तो त्याच्या डाव्या हातावर हनुवट ठेवून आराम करीत होता. तो गहन विचारात असल्यासारखे वाटत होते. त्याच्या चेहऱ्यावर स्मित होते, जें पाहून माझा थरकाप झाला, कारण कीं त्याच्यातून भयंकर वाईटपणा व सैतानी कावेबाजपणा प्रगट होत होता. तो कोणावर त्याची पकड जेव्हा पक्की करतो तेव्हा तो अशा प्रकारें हसतो, आणि त्याच्या जाळ्यात कोणी जास्तजास्त पकडले जाऊ लागतात तेव्हा हें स्मित आणखीनच भयंकर होते.

पहा: *यशया,* अध्याय ५३.

# अध्याय ४
# ख्रिस्ताचे पहिले आगमन

मग मला त्या वेळेकडे नेण्यात आले कीं जेव्हा येशू मानवाचे स्वरूप धारण करणार होता, मनुष्य म्हणून स्वतःस लीन करणार होता, आणि सैतानाने आणलेल्या संकटांना व मोहपाशांना तोंड देणार होता.

त्याचा जन्म जगिक वैभवावाचून झाला. तो एका गोठ्यात जन्मला, गव्हाणीमध्ये विसावला; तरी त्याच्या जन्माचा मानसन्मान कोठल्याही मानवपुत्राच्या जन्मापेक्षा फारच फार अधिक करण्यात आला. स्वर्गातून आलेल्या देवदूतांनी मेंढपाळांना येशूच्या आगमनाविषयींचे वृत्त सांगितले; त्यांची साक्ष दैवी प्रकाशासोबत व देवाच्या गौरवासोबत दिली गेली. स्वर्गीय जमावाने त्यांच्या वीणा वाजविल्या व देवाचे गौरव केले. त्यांनी विजयश्रीच्या स्वरात देवाच्या पुत्राच्या आगमनाची बातमी दिली कीं देवाचा पुत्र उद्धाराचे कार्य सिद्धिस नेण्याकरिता पतित जगात आला आहे, व त्याच्या मरणाने तो मानवांसाठीं शांती, आनंद, आणि सार्वकालिक जीवन आणणार आहे. देवाने त्याच्या पुत्राच्या आगमनाचा सन्मान केला. देवदूतांनी त्याच्यापुढे नमून त्याला वंदन केले.

त्याच्या बाप्तिस्म्याच्या प्रसंगीं देवाचे देवदूत त्या ठिकाणीं पाखर घालीत होते, आणि पवित्र आत्मा कबुतराच्या रूपात खाली उतरून त्याच्यावर बसला, आणि लोक अत्यंत आश्चर्यचकित होऊन त्यांच्या नजरा त्याच्यावर रोखून पाहत असतांना स्वर्गातून पित्याची वाणी ऐकू आली, जी म्हणाली: तूं माझा परमप्रिय पुत्र आहेस, तुझ्यावर मी संतुष्ट आहे.

योहानाला खात्री नव्हती कीं त्याच्याकडून यार्देन नदीत बाप्तिस्मा घेण्याकरिता आलेला हा मनुष्य उद्धारक होता. परंतु एका चिन्हाद्वारें त्याला देवाचा कोंकरा ओळखता येईल असें अभिवचन देवाने त्याला दिले होते. येशूवर स्वर्गीय कबुतर उतरून विसावतांना तें चिन्ह दिले गेले, आणि देवाचे गौरव त्याच्या सभोवताली चमकले. योहानाने हात लांबवून व येशूकडे निर्देश करून मोठ्या आवाजात म्हटले: हा पहा जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोंकरा.

योहानाने त्याच्या शिष्यांना माहिती दिली कीं येशू हा वचनदत्त मशीहा आहे, जगाचा उद्धारक आहे. त्याचे सेवाकार्य संपण्याच्या मार्गावर असतांना त्याने त्याच्या शिष्यांना येशूकडे पाहावयास शिकविले, व तोच थोर गुरू आहे असें म्हणून त्याला अनुसरायला सांगितले. योहानाला त्याच्या आयुष्यात कोठलीही सुखे मिळाली नव्हती. त्याचे जीवन दुःखाचे व स्वार्थत्यागाचे होते. त्याने येशूच्या पहिल्या आगमनाचे वृत्त जाहीर केले होते, परंतु त्याला येशूचा कोठलाही चमत्कार डोळ्यांनी पाहू दिला गेला नव्हता; येशूकडून प्रगट

झालेल्या सामर्थ्याचा आनंद त्याला घेऊ दिला गेला नव्हता. त्याला माहीत होते कीं जेव्हा येशू शिक्षक म्हणून त्याचे कार्य हातीं घेईल, तेव्हा त्याला स्वतःला मरण येईल. त्याची वाणी रानाखेरीज क्वचितच दुसरीकडे कोठे ऐकली गेली होती. त्याचे जीवन एकटेपणाचे होते. तो मानवी सहवास उपभोगण्याकरिता त्याच्या वडिलांच्या कुटुंबियांना धरून राहिला नाही, तर त्याचे सेवाकार्य पूर्ण करता यावे म्हणून त्यांच्यापासून दूर झाला. लोक झुंडींच्या झुंडींनी उद्योगधंद्यांनी गजबजलेल्या नगरांतून व गांवांतून या अद्‌भुत, अगदीच वेगळ्या प्रकारच्या संदेष्ट्याचे शब्द ऐकण्याकरिता रानात गर्दी करू लागले. योहानाने कुऱ्हाड झाडाच्या मुळाशींच घातली. परिणामांची कदर न करता त्याने निर्भयपणे पापांचा निषेध केला व देवाच्या कोंकऱ्याकरिता मार्ग तयार केला.

योहानाच्या सामर्थ्यशाली, मुद्देसूद साक्षी ऐकून हेरोदावर बराच प्रभाव पडला. त्याचा शिष्य बनण्याकरिता त्याने काय केले पाहिजे अशी विचारणा त्याने मनापासून केली होती. योहानाला माहीत होते कीं तो त्याच्या भावाच्या बायकोशीं लग्न करू पाहत होता आणि तिचा नवरा तर अद्यापि जिवंतच होता. हें लग्न देवाच्या नियमांना धरून नाही असें त्याने हेरोदाला विश्वासूपणे सांगितले. हेरोद कोठलाही त्याग करायला तयार नव्हता. त्याने त्याच्या भावाच्या पत्नीबरोबर विवाह केला, आणि तिच्या प्रभावाखाली त्याने योहानाला पकडून तुरूंगात डांबले. परंतु त्याला पुन्हा मोकळे करण्याचा हेरोदाचा इरादा होता. तुरूंगात असतांना योहानाने त्याच्या शिष्यांकडून येशूच्या महान कृत्यांविषयीं ऐकले. तो स्वतःच्या कानांनी त्याचे कृपायुक्त शब्द ऐकू शकत नव्हता. परंतु त्याच्या शिष्यांनी त्याला माहिती दिली, आणि जें काही त्यांनी ऐकले होते तें त्याला सांगून त्याचे सांत्वन केले. लवकरच हेरोदाच्या बायकोच्या प्रभावामुळें योहानाचा शिरच्छेद केला गेला. मी पाहिले कीं येशूला अनुसरणारा सर्वांत कनिष्ठ शिष्यसुद्धा, ज्याने त्याचे चमत्कार पाहिले व त्याच्या मुखातून निघणारे सांत्वनदायीं शब्द ऐकले तो, बाप्तिस्मा करणाऱ्या योहानापेक्षा अधिक श्रेष्ठ ठरत होता. म्हणजे, हे लोक त्यांच्या आयुष्यात अधिक उच्च व सन्मानित होत होते व त्यांना जीवनात अधिक सुख मिळत होते.

योहान एलीयाच्या आत्म्याने व एलीयाच्या सामर्थ्यात येशूच्या पहिल्या आगमनाची घोषणा करण्याकरिता आला होता. शेवटच्या दिवसांकडे माझे लक्ष वेधले गेले, व मी पाहिले कीं जे एलीयाच्या आत्म्याने व एलीयाच्या सामर्थ्यात देवाच्या कोपाच्या दिवसाची व येशूच्या दुसऱ्या आगमनाची घोषणा करण्यास बाहेर पडतील, त्यांचा प्रतिनिधी योहान होता.

यार्देनेत येशूचा बाप्तिस्मा झाल्यानंतर, पवित्र आत्म्याने त्याला सैतानाच्या मोहांना तोंड देण्याकरिता रानात नेले. त्या भयंकर क्रूर मोहांच्या खडतर प्रसंगाकरिता पवित्र आत्म्याने त्याला पात्र बनविले होते. चाळीस दिवस त्याने सैतानाच्या मोहपाशांना तोंड दिले, आणि त्या दिवसांत त्याने काहीच खाल्ले नाही. येशूच्या सभोवतालचे सबंध दृश्य त्रासदायक होते, व मानवी स्वभावानुसार कोणत्याही मनुष्याने त्यापासून माघार घेतली असती. तो हिंस्त्र पशुंसोबत व सैतानासोबत ओसाड, एकलकोंड्या ठिकाणीं एकटाच

होता. मी पाहिले कीं देवाचा पुत्र उपासामुळें व क्लेशांमुळें निस्तेज झाला व खंगला. परंतु त्याचा मार्ग ठरलेला होता, व तो ज्या कामासाठीं आला होता तें त्याने पूर्ण केलेच पाहिजे.

सैतानाने देवाच्या पुत्राच्या दुःखयातनांचा गैरफायदा घेतला, आणि त्याच्यावर अनेक मोहपाश टाकण्याकरिता त्याने तयारी केली - अशी आशा धरून कीं मनुष्य म्हणून त्याने स्वतःस लीन केल्यामुळें त्याला त्याच्यावर विजय मिळविता येईल. सैतान त्याच्याकडे हा मोह घेऊन आला कीं: जर तूं देवाचा पुत्र असशील, तर ह्या दगडाची भाकर व्हावी अशी आज्ञा कर. त्याने येशूला असा मोह टाकला कीं तेणेकरून येशूने तो मशीहा असल्याबद्दलचा पुरावा त्याचे दैवी सामर्थ्य वापरून द्यावा. येशूने त्याला सौम्यपणे उत्तर दिले: असें लिहिले आहे कीं मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, तर देवाच्या प्रत्येक शब्दाने जगेल.

येशू देवाचा पुत्र असल्याबाबत सैतान त्याच्याशीं वाद घालू इच्छित होता. त्याने त्याच्या अशक्त, क्लेशमय स्थितीकडे लक्ष वेधले, आणि तो येशूपेक्षा बलवान असल्याची फुशारकी मारू लागला. परंतु स्वर्गातून बोलला गेलेला शब्द, कीं तूं माझा परमप्रिय पुत्र आहेस, तुझ्यावर मी संतुष्ट आहे, येशूला त्याच्या सर्व यातनांतून पार पाडण्यास व त्याने टिकून राहण्यास पुरेसा होता. मी पाहिले कीं त्याच्या एकंदर सेवाकार्यात सैतानाला त्याने त्याच्या सामर्थ्याची किंवा तो जगाचा उद्धारक असल्याबद्दलची खात्री करून देण्याचा काहीच कार्यभाग नव्हता, कारण कीं त्याच्या उच्च पदाचा व त्याच्या अधिकाराचा पुरेसा पुरावा सैतानाला मिळालेला होता. येशूच्या अधिकाराच्या अधीन होण्याची त्याची तयारी नसल्याने त्याला स्वर्गाबाहेर घालवून देण्यात आले होते.

सैतानाने, त्याची शक्ति दाखविण्याकरिता, येशूला उचलून यरुशलेमेला नेले, आणि त्याला मंदिराच्या एका कंगोऱ्यावर ठेवले, आणि पुन्हा त्याच्यापुढे मोह टाकला, कीं जर तो देवाचा पुत्र असेल, तर त्याने त्या डोळे गरगरविणाऱ्या उंच ठिकाणावरून, जेथे त्याने त्याला ठेवले होते, खाली उडी घेऊन त्याला पुरावा द्यावा. सैतान ईश्वरप्रेरित वचने घेऊन आला: कारण असा शास्त्रलेख आहे कीं, तो आपल्या दूतांना तुझ्याविषयीं आज्ञा करील, आणि तुझा पाय धोंड्यांवर आपटू नये म्हणून ते तुला हातांवर झेलून धरतील. येशूने त्याला उत्तर देतांना म्हटले: आणखी असा शास्त्रलेख आहे कीं, परमेश्वर जो तुझा देव त्याची परीक्षा पाहू नको. सैतानाची इच्छा होती कीं येशूने त्याच्या पित्याच्या दयेवर हक्क सांगावा व त्याच्या सेवाकार्याची पूर्तता होण्याच्या अगोदरच त्याचा जीव धोक्यात घालावा. त्याने आशा केली होती कीं उद्धाराची योजना फोल होईल; परंतु मी पाहिले कीं ही योजना इतकी गहन स्वरूपाची होती कीं ती अशा प्रकारें उलथविली जाणार नव्हती किंवा सैतानाकडून बिघडविली जाणार नव्हती.

मी पाहिले कीं जेव्हा आपण संकटात सापडतो किंवा आपले हक्क नाकारले जातात, तेव्हा आपणां सर्व ख्रिस्ती लोकांकरिता ख्रिस्त कित्ता आहे. ख्रिस्ती लोकांनी सर्वकाही धीराने सहन करावे. त्यांना असें वाटता कामा नये कीं देवाने त्याचे सामर्थ्य प्रगट करावे म्हणून देवाला पाचारण करण्याचा त्यांना हक्क आहे, कीं त्यांना त्यांच्या शत्रुंवर विजय मिळविता यावा. काही खास उद्दिष्ट नजरेपुढे असल्यासच, ज्याद्वारें देवाचा जाहीर रित्या मान केला जाईल व देवाचे नाम गौरविले जाईल, तरच आपण तसें करू शकतो. मी

पाहिले कीं जर येशूने स्वतःला कंगोऱ्यावरून खाली झोकून दिले असते, तर त्याद्वारें त्याच्या पित्याचे गौरव झाले नसते; कारण ती कृति सैतान व देवाचे देवदूत यांच्याखेरीज दुसऱ्या कोणी पाहिली नसती. आणि देवाला त्याचे सामर्थ्य त्याच्या कट्टर शत्रुपुढे दाखविण्यास सांगणे म्हणजे देवाची परीक्षा पाहणे झाले असते, ज्या शत्रुला येशू जिंकायला आला होता त्याच्यापुढे मान झुकविणे झाले असते.

"मग सैतानाने त्याला उंचावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये एका क्षणात दाखविली; आणि त्याला म्हटले: ह्यांवरचा सर्व अधिकार व ह्यांचे वैभव मी तुला देईन, कारण हें मला सोपून दिले आहे व माझ्या मनास येईल त्याला मी हें देतो. म्हणून तूं मला नमन करशील तर हें सर्व तुझे होईल. तेव्हा येशू त्याला म्हणाला: अरे सैताना, चालता हो, कारण असा शास्त्रलेख आहे कीं, परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर, व केवळ त्याचीच उपासना कर."

येथे सैतानाने येशूला जगाची राज्ये दाखविली. तीं सर्वांत आकर्षक दिसतील अशा प्रकारें त्याने सादर केली. जर येशू त्याला नमन करील तर त्याने तीं त्याला देऊन टाकण्याची तयारी दाखविली. त्याने येशूला सांगितले कीं तो पृथ्वीसंबंधीचे त्याचे सर्व मालकी हक्क त्याला देऊन टाकील. सैतानाला माहीत होते कीं त्याचे सामर्थ्य काही काळापुरतेच आहे, व जर उद्धाराची योजना यशस्वीपणे पार पाडण्यात आली तर सरतेशेवटीं तें त्याच्यापासून काढून घेतले जाईल. त्याला माहीत होते कीं जर येशू मानवाचा उद्धार करण्याकरिता मरण पावला, तर त्याची सत्ता काही काळानंतर संपुष्टात येईल, आणि त्याला नष्ट केले जाईल. आणि म्हणून देवाच्या पुत्राने जें महान कार्य करण्यास सुरुवात केली होती तें शक्यतों पूर्ण होऊ नये याकरिता तो बुद्धि पणास लावून प्रतिबंध करण्यास पाहत होता. जर मानवाच्या उद्धाराची योजना फोल झाली तर तो ज्या कोणत्या गोष्टींवर हक्क सांगत होता त्या गोष्टींचे राज्य त्याला स्वतःकडेच ठेवता येणार होते; जर तो यशस्वी झाला, तर तो स्वर्गाच्या देवाच्या विरोधात राज्य करील अशी त्याने स्वतःची समजूत करून घेतली.

जेव्हा येशूने स्वर्ग सोडला व तेथील सत्तासामर्थ्य व गौरव सोडले, तेव्हा सैतान हुरळून गेला. त्याला वाटले होते कीं देवाच्या पुत्राला त्याच्या सत्तासामर्थ्याखाली आणले गेले होते. एदेन बागेत पवित्र दाम्पत्याला त्याने इतक्या सहजपणे मोहात पाडले होते कीं त्याला आशा होती कीं त्याच्या सैतानी चलाखीने व सामर्थ्याने तो देवाच्या पुत्रालासुद्धा उलथून टाकू शकेल व त्याद्वारें स्वतःचा जीव व राज्य वाचवू शकेल. जर तो येशूला त्याच्या पित्याच्या इच्छेपासून ढळवू शकला तर त्याचे उद्दिष्ट साध्य होणार होते. येशूने सैतानाला चालते व्हायला सांगितले. तो फक्त त्याच्या पित्यापुढेच नमणार होता. जेव्हा येशू त्याच्या प्राणाचे अर्पण करून सैतानाच्या तावडीतून सर्वकाही सोडविणार होता, आणि, काही काळाने, स्वर्गातील व पृथ्वीवरील सर्वजण त्याच्यापुढे लीन होणार होते, ती घटका येणार होती. सैतानाने पृथ्वीच्या राज्यांवर स्वतःचा दावा सांगितला, आणि त्याने येशूला सुचविले कीं त्याने क्लेशयातनांतून जाण्याची अजिबात गरज नव्हती. या जगाची राज्ये मिळविण्याकरिता त्याला मरण्याची गरज नव्हती. जर तो त्याला नमन करील, तर त्याला आख्ख्या पृथ्वीची मालकी व तिचे गौरव मिळेल. येशू खंबीर राहिला. त्याने दुःखयातनांच्या आयुष्याची,

त्याच्या भयंकर मृत्युची, निवड केली, व त्याच्या पित्याने ठरविलेल्या मार्गानेच पृथ्वीच्या राज्यांचा कायदेशीर वारस बनण्याचे ठरविले; त्याचा पिताच हीं राज्ये त्याच्या सार्वकालीन मालकीची व्हावीत म्हणून त्याच्या हातीं देईल. सैतानालासुद्धा मरणाने नष्ट करण्याकरिता त्याच्या हवालीं केले जाईल, व तेथून पुढे तो कधींही येशूला, किंवा गौरवात गेलेल्या पवित्रजनांना त्रास देऊ शकणार नाही.

पहाः
*अनुवाद ६:१६; ८:३; २ राजे १७:३५-३६; स्तोत्र ९१:११-१२; लूक, अध्याय २-४.*

# अध्याय ५
# ख्रिस्ताचे सेवाकार्य

मोहपाश टाकून झाल्यानंतर, सैतान काही काळ येशूला सोडून गेला, व देवदूतांनी अरण्यात त्याच्यासाठीं अन्न तयार केले, व त्याच्यात बळ घातले, आणि त्याच्या पित्याचा आशीर्वाद त्याच्यावर राहिला. सैतान त्याच्या जास्तीत जास्त भयंकर मोहपाशांत फोल झाला होता, तरी तो येशूच्या सेवाकार्याच्या काळाकडे आशेने पाहू लागला, कीं तेव्हा तो वेगवेगळ्या प्रसंगीं त्याच्याविरुद्धचे कावे अंमलात आणू शकेल. अद्यापही त्याला आशा होती कीं जे येशूचा स्वीकार करणार नाहीत त्यांना त्याच्याविरुद्ध चेतवून तो त्याचा द्वेष करायला व त्याला नष्ट करायला प्रवृत्त करू शकेल. सैतानाने त्याच्या दूतांसोबत विचारविनिमयाकरिता एक खास सभा घेतली. त्यांची निराशा झाली होती व ते संतापले होते कीं देवाच्या पुत्राविरुद्ध त्यांचे काहीच चालले नव्हते. त्यांनी ठरविले कीं त्यांनी जास्त चलाख बनले पाहिजे, आणि त्यांचे जास्तीत जास्त सामर्थ्य त्याच्या स्वतःच्या राष्ट्राच्या लोकांच्या मनांत अविश्वास उत्पन्न करायला वापरले पाहिजे कीं तो जगाचा उद्धारक खरोखरी आहे कां? व अशा प्रकारें येशूला त्याच्या सेवाकार्यात हताश करायला पाहिजे. यहूदी लोक त्यांच्या कर्मकांडांच्या व यज्ञयागांच्या बाबतीत कितीही काटेकोर असले तरी त्यांना हरकत नव्हती, परंतु जर त्यांच्या नजरा पवित्रशास्त्राच्या भविष्यलेखांपासून ते हटवू शकले, आणि हें भविष्यलेख पूर्ण करण्याकरिता एक पराक्रमी, जगिक वृत्तिचा राजा येणार आहे असा विश्वास ठेवायला त्यांना प्रवृत्त करू शकले, तर ते त्यांच्या विचारांना ताणतच राहतील व येणाऱ्या मशीहाची वाट पाहतच राहतील.

मला मग दाखविण्यात आले कीं ख्रिस्ताच्या सेवाकार्याच्या काळात सैतान व त्याचे दूत माणसांमध्ये अविश्वास, द्वेष आणि तुच्छता उत्पन्न करण्याच्या कामीं फार कार्यरत होते. कैक वेळा जेव्हा येशू त्यांच्या पातकांचा निषेध करणारे एखादे धारदार सत्य बोले, तेव्हा ते संतापत. सैतान व त्याचे दूत देवाच्या पुत्राला त्यांनी जिवे मारावे म्हणून त्यांना भडकावीत असत. एकदा त्यांनी त्याला दगडमार करण्याकरिता हातीं धोंडे घेतले होते, परंतु देवदूतांनी त्याचे रक्षण केले होते, व त्या चिडलेल्या जमावापासून ते त्याला दूर सुरक्षित जागीं घेऊन गेले होते. पुन्हा एकदा जेव्हा त्याच्या पवित्र मुखातून स्पष्ट सत्य बाहेर पडले होते, तेव्हा जमावाने त्याला पकडले होते व ते त्याला डोंगराच्या कड्यावर घेऊन गेले होते, हेतु हा कीं त्याला कड्यावरून खाली फेकून द्यावे. त्यांच्यात्यांच्यातच वाद उद्‌भवला कीं त्याचे काय करावे, व तेव्हा देवदूतांनी त्याला पुन्हा त्यांच्या दृष्टिपासून लपविले होते, आणि तो, त्यांच्यामधून चालत जाऊन, तेथून निघून गेला होता.

सैतान अद्यापही आशा करीत होता कीं उद्धाराची महान योजना फोल होईल. लोकांची हृदये कठीण करावी, व त्यांच्या भावना येशूविरुद्ध कटु कराव्या म्हणून त्याने त्याचे सर्व सामर्थ्य पणाला लावले. त्याला आशा वाटत होती कीं त्याला देवाचा पुत्र म्हणून स्वीकारणाऱ्यांची संख्या इतकी कमी राहील कीं इतक्या थोड्या माणसांकरिता त्याने इतक्या भयंकर यातना सोसाव्या व इतके मोठे बलिदान करावे यांत त्याला तथ्य वाटणार नाही. परंतु मी पाहिले कीं येशूचा देवाचा पुत्र म्हणून स्वीकार करणारे केवळ दोनच जण जरी असते, ज्यांनी त्यांच्या जिवात्म्यांचा उद्धार होण्याइतपत त्याच्यावर विश्वास टाकला असता, तरी त्याने तारणाची योजना पूर्ण केली असती.

येशूने त्याच्या कार्याची सुरुवात सैतानाचे रोगआजारांवरील सामर्थ्य नष्ट करण्याद्वारें केली. जे त्याच्या वाईट सामर्थ्याखाली क्लेश भोगत होते त्यांना त्याने बरे केले. त्याने आजाऱ्यांना आरोग्यप्राप्ति करून दिली, लंगड्यापांगळ्यांना बरे केले; त्यांच्या उत्स्फूर्त आनंदात ते उड्या मारून देवाचे गौरव करू लागले. त्याने अंधळ्यांना दृष्टि दिली, सैतानाच्या क्रूर कब्जात अनेक वर्षे बांधले गेलेल्यांना व अशक्त शरीरप्रकृतिच्या लोकांना आरोग्याचा लाभ करून दिला. अशक्त, थरथरणाऱ्या, आणि निराश लोकांचे त्याने कृपायुक्त शब्दांनी सांत्वन केले. त्याने मृतांना जिवंत केले, आणि त्यांनी त्याच्या सामर्थ्याच्या प्रचंड प्रगटीकरणाबद्दल देवाचा महिमा वर्णिला. त्याने त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांकरिता महान कार्ये केली. आणि सैतान ज्या दुःखक्लेश भोगणाऱ्या कमकुंवत लोकांना मोठ्या उन्मत्तपणाने त्याच्या तावडीत ठेवीत होता, त्यांना येशूने त्याच्या पकडीतून मुक्त केले व त्याच्या सामर्थ्याने त्यांना सुदृढ शरीरप्रकृति, व मोठा हर्ष व आनंद प्राप्त करून दिला.

ख्रिस्ताचे आयुष्य पूर्णपणे औदार्याचे, सहानुभूतिचे व प्रीतिचे होते. त्याच्याकडे जे येत त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायला व त्यांची दुःखे दूर करायला तो नेहमी तयार असे. त्याच्या दैवी सामर्थ्याचे पुरावे हजारों लोक त्यांच्या शरीरांवर घेऊन वावरत होते. तरी त्यांच्याकरिता कार्य सिद्ध झाल्यानंतर लवकरच त्यांच्यातल्या अनेकांना त्या सामर्थ्यवान, परंतु दीन गुरूची लाज वाटे. शास्ते त्याच्यावर विश्वास ठेवीत नव्हते म्हणून तेसुद्धा येशूसोबत दुःख सोसायला तयार नसत. तो क्लेशांनी व्यापलेला व दुःखाशीं परिचित असलेला मनुष्य होता. त्याच्या साध्या, स्वार्थत्यागी जीवनाच्या तंत्रानुसार आपल्या आयुष्यास वळण लावण्याचा विचार फारच थोडक्यांना पटत होता. जगाच्या मानाला हपापलेले ते लोक जगिक सन्मानाचा उपभोग घेऊ इच्छित होते. देवाच्या पुत्राच्या मागेमागे अनेकजण गेले, व त्याची शिकवण त्यांनी ऐकली, त्याच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या कृपायुक्त शब्दांचे सुख त्यांनी उपभोगले. त्याचे शब्द अर्थभरीत असत, आणि तरी इतके साधेसोपे असत कीं सर्वांत कमकुंवत असलेल्यालासुद्धा ते समजू शकत.

सैतान आणि त्याचे दूत त्यांच्या कुटिल कामात गुंतलेले होते. त्यांनी यहूद्यांचे डोळे अंध केले आणि त्यांची बुद्धि भ्रष्ट केली. सैतानाने लोकांच्या मुख्यमुख्य नेत्यांना आणि शास्त्यांना त्याचा जीव घेण्याकरिता उचकाविले. त्यांनी येशूला त्यांच्याकडे आणण्याकरिता अधिकारी पाठविले, आणि जेथे तो होता तेथे ते अधिकाधिक जवळ येत असतांना, ते अत्यंत आश्चर्यचकित झाले. मानवी दुर्दशा पाहत असतांना येशूच्या

मनात किती सहानुभूति व करुणा उत्पन्न होत होती तें त्यांनी पाहिले. त्यांनी त्याला अशक्त व पीडित लोकांशीं प्रेमाने व ममतेने उत्तेजनपर शब्द बोलतांना पाहिले. त्यांनी त्याची वाणीसुद्धा ऐकली, अधिकारयुक्त आवाजात त्याने सैतानाच्या शक्तिचा निषेध केलेला व त्याच्या बंदिवानांस मुक्त केलेले त्यांनी ऐकले. त्यांनी त्याच्या मुखातून बाहेर पडणारे ज्ञानाचे व सुज्ञतेचे शब्द ऐकले, व ते मंत्रमुग्ध झाले. त्यांना त्याच्यावर हात टाकता येईना. ते येशूला न घेताच याजकांकडे व वडिलजनांकडे परतले. त्यांनी अधिकाऱ्यांना प्रश्न केला: तुम्ही त्याला कां आणले नाही? त्यांनी त्याचे जें काही चमत्कार पाहिले होते, व त्याच्या तोंडून ज्ञानाचे, प्रीतिचे व सुज्ञतेचे पवित्र शब्द ऐकले होते, तें त्यांना सांगितले, आणि शेवटीं असें म्हटले कीं: या मनुष्यासारखा कोणी मनुष्य कधीं बोललेला नाही. मुख्य याजकांनी त्यांच्यावर त्यांचीसुद्धा फसवणूक झाल्याचा आरोप केला. काहींना लाज वाटली कीं त्यांनी त्याला कां आणले नव्हते. मुख्य याजकांनी हेटाळणीच्या आवाजात विचारले कीं कोणीसुद्धा शास्त्र्याने त्याच्यावर विश्वास ठेवला होता कां? मी पाहिले कीं अधिकाऱ्यांपैकी आणि वडिलजनांपैकी अनेकांनी येशूवर विश्वास ठेवला होता, परंतु तसें कबूल करण्यापासून त्यांना सैतानाने रोखले होते. त्यांना देवाच्या भयापेक्षा लोकांच्या उपहासाची जास्त भीति वाटत होती.

येथवर सैतानाच्या चलाख काव्यांनी व द्वेषाने उद्धाराची योजना रद्द झाली नव्हती. येशू जें कार्य सिद्ध करण्याकरिता जगात आला होता, त्या कार्याच्या सिद्धतेची वेळ निकट येत होती. सैतानाने व त्याच्या दूतांनी एकत्र बसून चर्चा केली, आणि ख्रिस्ताच्या स्वतःच्याच राष्ट्राने त्याच्या रक्ताकरिता आरोळी ठोकावी म्हणून त्यांना प्रेरित करण्याचा निर्णय घेतला, आणि ख्रिस्तावर जास्तीत जास्त क्रौर्य व तुच्छता यांचा ढीग रचण्याकरिता तसल्या दुष्ट कृति शोधून काढण्याचे ठरविले. सैतानाने आशा केली कीं अशा प्रकारच्या वागणुकीचा येशू प्रतिकार करील, व त्याची नम्रता व लीनता टिकवून ठेवणार नाही.

जेव्हा सैतान त्याच्या कुटिल कारवाया तयार करीत होता, तेव्हा येशू त्याच्या शिष्यांना काळजीपूर्वक माहिती देत होता कीं त्याला कसल्या प्रकारच्या दुःखातून पार पडावे लागेल - कीं त्याला क्रूसखांबीं खिळतील, आणि तो तिसऱ्या दिवशीं पुन्हा जिवंत होईल. परंतु त्यांची बुद्धि जणू मंद झाली होती. त्याने त्यांना जें सांगितले तें ते समजू शकले नाहीत.

पहा: *लूक* ४:२९; *योहान* ७:४५-४८; ८:५९.

# अध्याय ६
# येशूचे रुपांतर

मी पाहिले कीं येशूच्या रुपांतराने शिष्यांचा विश्वास मोठ्या प्रमाणात बळकट झाला. येशू वचनदत्त मशीहा असल्याचा भक्कम पुरावा देवाने येशूच्या अनुयायांना देण्याचे ठरविले, तें यासाठीं कीं त्यांच्या कटु दुःखात व नैराश्यात त्यांनी त्यांचा येशूवरील विश्वास अगदीच काढून टाकू नये. रुपांतराच्या प्रसंगीं देवाने येशूबरोबर त्याच्या दुःखयातनांविषयीं व मृत्युविषयीं बोलण्यास मोशे व एलीया यांना पाठविले. त्याच्या पुत्राशीं संभाषण करायला देवदूतांची निवड करण्याऐवजी, ज्यांना पृथ्वीवरील मोहसंकटांचा वैयक्तिक अनुभव आलेला होता अशा लोकांची देवाने निवड केली. त्याच्या अनुयायांपैकी काही थोडक्यांना त्याच्यासोबत राहू दिले गेले व दैवी प्रकाशाने त्याचे मुख प्रकाशित झालेले पाहू दिले गेले, आणि तेजाने चमकणारा त्याचा शुभ्र पोषाख पाहू दिला गेला, व देवाची वाणी, भीतिप्रद गौरवात, असें बोलतांना ऐकू दिली गेली, कीं: हा माझा परमप्रिय पुत्र आहे, त्याचे ऐका.

एलीया जीवनात देवासोबत चालला होता. त्याचे काम आल्हादकारक नव्हते. देवाने त्याच्यामार्फत पातकाचा निषेध केला होता. तो देवाचा संदेष्टा होता, आणि जीव वाचविण्याकरिता त्याला ठिकठिकाणीं पलायन करावे लागले होते. हिंस्त्र पशुंप्रमाणे त्याचा पिच्छा केला गेला होता कीं त्याला ठार करावे. देवाने एलीयाचे रुपांतर केले. देवदूतांनी त्याला गौरवात व विजयात स्वर्गाला नेले.

मोशे देवाकडून मोठा सन्मान पावलेला मनुष्य होता. त्याच्याअगोदर जे कोणी पृथ्वीवर जगले होते, त्या सर्वांपेक्षा तो अधिक महान होता. जसा मनुष्य मित्राशीं बोलतो, तसें देवाशीं तोंडोतोंड बोलण्याचे भाग्य त्याला दिले गेले होते. पित्याला झाकून टाकणारा पित्याभोवतीचा तेजस्वी प्रकाश व उत्कृष्ट तेजाचे गौरव तें त्याला पाहू दिले गेले होते. देवाने इस्राएली लोकांना मिसराच्या गुलामगिरीतून मोशेमार्फत मुक्त केले होते. मोशे इस्राएली लोकांकरिता मध्यस्थ होता. तो त्यांच्यामध्ये आणि देवाच्या कोपामध्ये अनेकदा उभा राहिला होता. जेव्हा इस्राएलांविरुद्ध त्यांच्या अविश्वासामुळें, त्यांच्या कुरकुरण्यामुळें, व त्यांच्या घृण पातकांमुळें देवाचा क्रोध मोठ्या प्रमाणात जागृत झाला होता, तेव्हा त्यांच्याकरिता असलेल्या मोशेच्या प्रेमाची कसोटी झाली होती. देवाने त्याला अभिवचन दिले कीं जर तो इस्राएली लोकांना जाऊ देईल, त्यांना नष्ट होऊ देईल, तर तो त्याचे एक बलाढ्य राष्ट्र बनवील. मोशेने त्याच्या कळकळीच्या विनवण्यांनी त्याचे इस्राएलांवरील प्रेम दाखवून दिले. तो इतका त्रस्त झाला होता कीं त्याच्या दुःखात त्याने देवाची

प्रार्थना केली कीं देवाने त्याचा भयंकर कोप सोडून द्यावा, आणि इस्राएलांना क्षमा करावी, नाहीतर त्याच्या पुस्तकातून त्याचे नांव खोडून टाकावे.

जेव्हा इस्राएल लोक देवाविरुद्ध आणि मोशेविरुद्ध कुरकुरत होते, कां तर त्यांना पाणी मिळत नव्हते, तेव्हा त्यांनी त्याच्यावर आरोप केला होता कीं त्याने त्यांना व त्यांच्या मुलांबाळांना ठार करण्याकरिता त्यांचे नेतृत्व केले होते. देवाने त्यांची कूरकूर ऐकली, व मोशेला खडकावर प्रहार करायला सांगितले, कीं इस्राएली लोकांना पाणी मिळावे. मोशेने रागाने खडकावर प्रहार केला, आणि गौरव स्वतःकडे घेतले. इस्राएली लोकांची सततची मार्गभ्रष्टता आणि कूरकूर यांनी त्याला तीव्र दुःख होत असे; काही काळाकरिता तो विसरून गेला कीं देवाने त्यांचे किती सहन केले होते, आणि त्यांची कूरकूर मोशेविरुद्ध नव्हती, तर देवाविरुद्ध होती. तो फक्त स्वतःचाच विचार करू लागला, कीं त्याच्यावर किती भयंकर अन्याय केला गेला, आणि त्याच्या त्यांच्याकरिता असलेल्या अंतःकरणापासूनच्या गाढ प्रीतिच्या बदल्यात त्यांनी किती थोडी कृतज्ञता दाखविली.

खडकावर प्रहार करून मोशे देवाला सन्मानित करण्यास चुकला, व इस्राएली लोकांपुढे त्याचे गौरव करण्यास चुकला, कीं त्यांनी देवाला गौरवावे. त्यामुळें देव मोशेवर नाराज झाला, आणि तो म्हणाला कीं मोशे वचनदत्त भूमित प्रवेश करू शकणार नाही. इस्राएलांना कठीण परिस्थितीमध्ये अनेकदा आणून त्यांची कसोटी घ्यावी, आणि मग त्यांच्या मोठ्या गरजेच्या वेळीं त्याचे सामर्थ्य प्रगट करावे अशी देवाची योजना होती, ती यासाठीं कीं, त्याचे सामर्थ्य त्यांच्या स्मरणात राहावे, आणि त्यांनी त्याला गौरवावे.

जेव्हा मोशे डोंगरावरून दोन दगडी पाट्या घेऊन खाली आला, आणि त्याने इस्राएली लोकांना सोन्याच्या वासराची पूजा करतांना पाहिले, तेव्हा त्याचा क्रोध इतका भडकला कीं त्याने त्या दगडी पाट्या खाली फेकल्या व फोडून टाकल्या. मी पाहिले कीं यात मोशेने पाप केले नाही. त्याला देवाच्या गौरवाकरिता ईर्षा वाटली होती, तो देवाकरिता क्रुद्ध झाला होता. परंतु जेव्हा त्याने त्याच्या नैसर्गिक भावनांना वाव करून दिला, आणि स्वतःकडे श्रेय घेतले, जें गौरव त्याने देवाला द्यावयास पाहिजे होते, तेव्हा त्याने पाप केले, आणि त्या पातकाकरिता देव त्याला वचनदत्त देशात प्रवेश करू देईना.

देवदूतांपुढे मोशेवर आरोप करण्यास सैतान काहीतरी कारण शोधतच होता. जेव्हा त्याने त्याच्यावर देवाची नाराजी ओढवून घेतली तेव्हा त्याला विजयोन्माद झाला होता, आणि तो देवदूतांपुढे बढाया मारू लागला कीं जेव्हा जगाचा उद्धारक मानवाचा उद्धार करण्यास येईल तेव्हा तो त्याच्यावरसुद्धा विजयी होऊ शकेल. या अपराधामुळें मोशे सैतानाच्या कब्जात - मरणाच्या स्थितीत - गेला. जर तो खंबीर राहिला असता, आणि स्वतःकडे गौरव घेण्याचे पाप त्याने केले नसते, तर देवाने त्याला वचनदत्त भूमित आणले असते, आणि मग मरणाचा अनुभव त्याला येऊ न देता त्याचे रुपांतर करून स्वर्गाला नेले असते.

मी पाहिले कीं मोशे मरणात विसावला, परंतु मीखाएल खाली आला आणि त्याचे शरीर कुजण्यापूर्वीच त्याने त्याला जीवन देऊन परत जिवंत केले. सैतानाने त्याच्या शरीरावर आपला हक्क सांगितला, परंतु मीखाएलने मोशेचे पुनरुत्थान केले, आणि तो त्याला स्वर्गाला घेऊन गेला. सैतान त्याचे

शरीर स्वतःच्या पकडीत ठेवण्याचा प्रयत्न करू लागला; त्याने देवाविरुद्ध कटु शब्दांत निंदा केली, व देवाचा निषेध करीत म्हटले कीं देव अन्यायी आहे, व तो त्याच्यापासून त्याचे भक्ष्य अन्यायाने काढून घेत आहे. परंतु जरी सैतानाच्याच मोहामुळें व सैतानाच्या वर्चस्वाखाली आल्यामुळें देवाच्या सेवकाचे पतन झाले होते, तरी मीखाएलाने सैतानाला धमकाविले नाही. ख्रिस्ताने लीनपणे त्याला त्याच्या पित्यावर सोपवीत म्हटले: देव तुझा निषेध करो.

येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले कीं त्याच्याभोवती तेव्हा उभे असणारांपैकीं काहीजणांना ते देवाचे राज्य सामर्थ्याने येतांना पाहीपर्यंत मरणाचा अनुभव येणार नाही. येशूच्या रुपांतराच्या वेळीं ह्या अभिवचनाची पूर्तता झाली. येशूच्या चेहऱ्याचे रूप बदलले, आणि तो सूर्यासारख्या तेजाने चमकू लागला. त्याचे वस्त्र शुभ्र होते व प्रकाशाने चमचमत होते. मोशे हजर होता; येशूच्या दुसऱ्या आगमनसमयीं जे मृतांतून उठविले जाणार आहेत त्यांचा तो प्रतिनिधी होता. आणि एलीया, मरण न येता ज्याचे रुपांतर घडवून आणण्यात आले होते, तो ज्यांना ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनासमयीं अमरत्व प्रदान केले जाईल आणि मृत्युचा अनुभव न येता त्यांचे रुपांतर केले जाऊन त्यांना स्वर्गाला नेले जाईल, त्या गटाच्या लोकांचा प्रतिनिधी होता. शिष्यांनी भयभीत व आश्चर्यचकित होऊन येशूचे उत्कृष्ट गौरव व महिमा पाहिला, आणि त्यांच्यावर मेघाने छाया केलेले पाहिले. त्यांनी देवाची वाणी अत्यंत गौरवात असें म्हणतांना ऐकली कीं: हा माझा परमप्रिय पुत्र आहे, याचे ऐका.

पहा:
*निर्गम*, अध्याय ३२; *गणना* २०:७-१२; *अनुवाद* ३४:५;
२*राजे* २:११; *मार्क*, अध्याय ९; *यहूदाचे पत्र* ९.

# अध्याय ७
# ख्रिस्ताचा विश्वासघात

मग येशू त्याच्या शिष्यांसोबत वल्हांडणाचे भोजन करीत होता त्या प्रसंगाकडे मला नेण्यात आले. सैतानाने यहूदाला फसविले होते, आणि तो ख्रिस्ताच्या खऱ्या शिष्यांपैकी एक आहे असें त्याला वाटण्यास प्रवृत्त केले होते; परंतु त्याचे हृदय नेहमीच देहस्वभावाचे चिंतन करणारे होते. त्याने येशूची अद्‌भुत कृत्ये पाहिली होती, त्याच्या सेवाकार्यात तो त्याच्यासोबत राहिला होता, आणि तो मशीहा असल्यासंबंधाच्या भक्कम पुराव्यांपुढे तो झुकला होता; परंतु तो लोभी व पैशांचा लालची होता. त्याला पैसा फार आवडे. येशूवर अत्यंत किंमती सुगंधी तेल ओतल्याबद्दल त्याला राग आला होता व त्याने तक्रार केली होती. मरीयेची तिच्या प्रभूवर प्रीति होती. तिने अनेक पातके केली होती, परंतु त्याने तिच्या पातकांची क्षमा केली होती. त्याने तिच्या अति प्रिय भावाला मृतावस्थेतून उठवून जिवंत केले होते. तिला वाटत होते कीं येशूकरिता काहीही केले तरी तें कमीच पडेल. येशूकरिता खरेदी केलेले सुगंधी तेल जितके जास्त किंमती व मौल्यवान असेल, तितकी तिच्या उद्धारकाकरिता असलेली तिची कृतज्ञता मरीया जास्त प्रमाणात व्यक्त करू शकत होती. यहूदाने त्याच्या लोभीपणाकरिता सबब म्हणून म्हटले कीं हें तेल भारी किंमतीला विकता आले असते आणि पैसे गरीबांना देता आले असते. परंतु त्याला गरीबांची काळजी होती म्हणून तो असें बोलला नव्हता; कारण तो स्वार्थी होता, आणि त्याच्याकडे गरीबांकरिता सोपविलेले धन त्याने अनेकदा स्वतःवरच खर्च केले होते. यहूदाने येशूच्या आरामाकडे व गरजांकडे लक्ष पुरविले नव्हते, आणि त्याचा लोभीपणा लपविण्याकरिता तो अनेकदा गरीबांचे नांव काढी. त्याच्या लोभी वृत्तिचा सर्वांत मोठा निषेध मरीयेच्या ह्या औदार्याच्या कृतिने झाला.

यहूदाच्या हृदयात सैतानाच्या मोहपाशाकरिता सहज मार्ग तयार झाला. यहूदी येशूचा द्वेष करीत; परंतु लोकांच्या झुंडींच्या झुंडी त्याचे ज्ञानाचे व सुज्ञतेचे शब्द ऐकण्याकरिता व त्याची अद्‌भुत कार्ये पाहण्याकरिता त्याच्याभोवती गर्दी करीत. त्यामुळें लोकांचे लक्ष मुख्य याजकांपासून व वडिलजनांपासून दूर होत असे, कारण लोकांची मने जोरदारपणे हेलावली गेली होती व ते चिंतातुर होऊन येशूच्या मागेमागे जात होते आणि या अद्‌भुत धर्मगुरूच्या शिकवणी ऐकत होते. मुख्य शास्त्र्यांपैकी अनेकजण येशूवर विश्वास ठेवीत होते, पण तसें कबूल करण्यास भीत होते, कारण त्यांना सभास्थानातून बहिष्कृत केले जाण्याची भीति वाटत होती. याजकांनी आणि वडिलजनांनी ठरविले कीं लोकांचे लक्ष येशूपासून विचलित करण्यासाठीं काहीतरी केलेच पाहिजे. त्यांना भय वाटत होते कीं सर्व माणसे त्याच्यावर विश्वास ठेवतील.

त्यांना स्वतःकरिता काहीच सुरक्षितता दिसत नव्हती. त्यांनी त्यांची पदे गमावली पाहिजेत, नाहीतर येशूला ठार केले पाहिजे. आणि येशूला मृत्युमुखीं घातल्यानंतरसुद्धा त्याच्या सामर्थ्याची जिवंत स्मारके त्यांच्यापुढेच होती. येशूने लाजाराला मेलेल्यांतून उठविले होते. आणि त्यांना भय वाटत होते कीं जर त्यांनी येशूला मारले, तर लाजार त्याच्या पराक्रमी सामर्थ्याची साक्ष देईल. मरणातून उठविलेल्याला बघण्याकरिता लोक मोठ्या प्रमाणात जमत होते, आणि शास्त्यांनी ठरविले कीं ते लाजारालासुद्धा ठार करतील व लोकांचा उचंबळून आलेला उत्साह नष्ट करतील. मग ते लोकांची मने रीतिरिवाजांकडे व मनुष्यांच्या शिकवणींकडे वळवितील, त्यांना पुदिना आणि कोथिंबीरीसारख्या (गौण महत्त्वाच्या) गोष्टींचा दशांश काढायला शिकवितील, आणि पुन्हा त्यांच्यावर स्वतःचा प्रभाव पाडतील. येशू एकटा असतांना त्याला अटक करायचे त्यांनी एकमताने ठरविले; कारण कीं जर त्यांनी त्याला जमावापुढे अटक करण्याचा प्रयत्न केला, जेव्हा लोकांची मने त्याच्याकडे आकर्षिली गेलेली असतील, तर त्यांच्यावरच दगडमार होईल.

यहूदाला माहीत होते कीं येशूला ताब्यात घेण्याकरिता ते किती उतावीळ होते, आणि त्याने चांदीच्या थोडक्या शिक्क्यांकरिता येशूचा विश्वासघात करण्याची तयारी दाखविली. पैशांच्या लोभाने तो त्याच्या प्रभूचा विश्वासघात करून त्याला त्याच्या सर्वांत कट्टर शत्रुंच्या हवालीं करण्यास प्रवृत्त झाला. सैतान सरळसरळपणे यहूदाकरवीं काम करीत होता; शेवटल्या भोजनाच्या प्रभावशाली प्रसंगीं तो येशूला धरून देण्याकरिता योजना आखत होता. येशूने त्याच्या शिष्यांना दुःखाने सांगितले कीं त्या रात्रीं ते सर्वजण त्याच्यावर उलटतील. पण पेत्राने मनापासून ठणकावून म्हटले कीं जरी सर्वजण त्याच्याविरुद्ध वागले तरी तो तसा वागणार नाही. येशू पेत्राला म्हणाला: तुला गव्हाप्रमाणे चाळावे अशी सैतानाची तीव्र इच्छा आहे; परंतु मी तुझ्यासाठीं प्रार्थना केली आहे, कीं तुझा विश्वास ढळू नये; आणि जेव्हा तुझा पालट होईल, तेव्हा तूं तुझ्या बांधवांना सबळ कर.

मग मी येशूला त्याच्या शिष्यांसोबत बागेत पाहिले. त्याने मोठ्या दुःखाने त्यांना सांगितले कीं जागृत राहा आणि प्रार्थना करा, नाहीतर ते मोहात पडतील. येशूला माहीत होते कीं त्यांच्या विश्वासाची कसोटी होणार होती, आणि त्यांच्या आशांचा चुराडा होणार होता; लक्षपूर्वक जागृत व सतर्क राहून आणि मनापासून तळमळीने प्रार्थना करीत राहून मिळणाऱ्या सर्व बळाची त्यांना गरज पडणार होती. येशूने मोठ्याने रडून व शोक करून प्रार्थना केली कीं: बापा, जर तुझी इच्छा असेल, तर हा प्याला मजपासून दूर कर; तरी माझ्या इच्छेप्रमाणे नाही, तर तुझ्या इच्छेप्रमाणे होऊ दे. देवाच्या पुत्राने अत्यंत क्लेशांत प्रार्थना केली. त्याच्या चेहऱ्यावरून घामाचे रक्तासारखे मोठेमोठे थेंब खाली भूमिवर पडू लागले. त्या ठिकाणीं देवदूत पाखर घालून होते, तें दृश्य पाहत होते, परंतु फक्त एकावरच देवाच्या पुत्राच्या क्लेशांत त्याच्याकडे जाण्याची व त्याला बळ देण्याची सेवा सोपविली गेली. स्वर्गातील देवदूतांनी त्यांचे मुगूट व त्यांच्या वीणा त्यांच्यापासून दूर केल्या, व ते काही न बोलता अत्यंत कळकळीने येशूकडे पाहत राहिले. स्वर्गात आनंद अजिबात राहिला नाही. देवाच्या पुत्राला गराडा घालण्याची त्यांची तळमळ होती, पण सेनापतित्व करणाऱ्या देवदूतांनी त्यांना परवानगी दिली नाही, कारण कीं एखादे वेळीं त्याचा विश्वासघात पाहून ते

त्याची सुटका करण्यास पाहतील; कारण कीं दैवी योजना आखली गेली होती, व ती पूर्ण केलीच जायला पाहिजे.

प्रार्थना केल्यावर येशू त्याच्या शिष्यांना पाहायला आला. ते झोपलेले होते. त्या भयंकर घटकेला त्याला त्याच्या शिष्यांपासूनसुद्धा सांत्वन किंवा त्यांच्या प्रार्थना मिळाल्या नाही. पेत्र, जो थोड्याच वेळापूर्वी इतका आवेशी होता, तो गाढ झोपेत होता. येशूने त्याला त्याच्या खंबीर विधानांची आठवण करून दिली, आणि तो त्याला म्हणाला: काय! तुम्ही माझ्यासोबत एक ताससुद्धा जागे राहू शकत नव्हता कां? देवाच्या पुत्राने क्लेश भोगत तीन वेळा प्रार्थना केली. यहूदा, त्याने आणलेल्या माणसांसह, तिकडे पोहंचला. त्याने नेहमींप्रमाणे येशूला अभिवादन केले. त्याच्यासोबत आलेल्या माणसांनी येशूला घेरले; पण तेथे त्याने त्याचे दैवी सामर्थ्य असें म्हणत प्रगट केले कीं: तुम्ही कोणाला शोधता? मी तो आहे. ते तोल जाऊन मागच्या बाजूला भूमिवर पडले. त्यांनी त्याचे सामर्थ्य पाहावे म्हणून, व जर त्याने इच्छा केली तर तो स्वतःला त्यांच्या हातून सहज सोडवू शकत होता याचा पुरावा त्यांना मिळावा म्हणून, येशूने हा प्रश्न विचारला होता.

जेव्हा शिष्यांनी जमावाला त्यांच्या काठ्या आणि तलवारींसह इतक्या झटपट जमिनीवर कोसळतांना पाहिले तेव्हा त्यांना आशा वाटू लागली. जेव्हा ते उठले व पुन्हा त्यांनी देवाच्या पुत्राला घेरले, तेव्हा पेत्राने तलवार उपसून एकाचा कान कापून टाकला. येशूने त्याला तलवार पुन्हा म्यानात घालायला सांगितली, आणि तो त्याला म्हणाला: तुला काय वाटते कीं मी आता माझ्या पित्याची प्रार्थना करू शकत नाही कां, आणि तो माझ्याकडे ताबडतोब बारा तुकड्यांपेक्षा जास्त देवदूत पाठविणार नाही कां? मी पाहिले कीं हें शब्द उच्चारले जाताच देवदूतांचे चेहरे उजळले. त्या क्षणाला त्यांच्या दैवी सेनापतिच्या भोवती जाऊन त्या संतप्त जमावाची पांगापांग करण्याकरिता देवदूत उत्कंठित झाले. पण येशूचे पुढचे शब्द ऐकून त्यांच्या मुखांवर पुन्हा दुःख पसरले. येशू म्हणाला: पण मग हें असें झाले पाहिजे असा जो शास्त्रलेख आहे तो कसा काय पूर्ण होईल? शिष्यांची हृदये पुन्हा अति दुःखित झाली व ते हताश झाले. येशूने त्या लोकांना त्याला पकडून नेऊ दिले तेव्हा त्यांची अतिशय निराशा झाली.

शिष्यांना त्यांच्या स्वतःच्या जिवाची भीति वाटू लागली, आणि ते एक इकडे, तर दुसरा तिकडे, असें वाट सापडेल तिकडे पळून गेले, व येशूला एकटेच सोडले गेले. तेव्हा सैतानाचा किती मोठा जय झाला बरे! आणि देवाच्या देवदूतांना किती दुःख व क्लेश झाले बरे! पवित्र देवदूतांच्या अनेक तुकड्यांना तें दृश्य पाहण्यास पाठविले गेले होते. प्रत्येक तुकडीच्या अग्रभागीं सेनापतित्व करणारा उंच देवदूत होता. देवाच्या पुत्राविरुद्ध केलेल्या प्रत्येक कृतिची, प्रत्येक अपमानाची आणि क्रौर्याची या देवदूतांनी नोंद करावयाची होती, आणि येशूला दुःख होणाऱ्या प्रत्येक यातनेची व क्लेशाची नोंद ठेवायची होती; कारण कीं त्याच लोकांनी तें सर्वकाही ज्वलंत रूपात पुन्हा पाहावयाचे आहे.

पहा: *मत्तय* २६:१-५६; *मार्क* १४:१-५२; *लूक* २२:१-४६;
*योहान,* अध्याय ११, १२:१-११, १८:१-१२.

# अध्याय ८
# ख्रिस्ताची न्यायालयीन चौकशी

स्वर्ग सोडतांना देवदूतांनी दुःखाने त्यांचे चमकदार मुगूट काढून ठेवले. त्यांचा सेनापति दुःख भोगत असतांना - आणि काट्यांचा मुगूट त्याच्यावर घातला जाणार होता - तेव्हा ते त्यांचे मुगूट घालू शकत नव्हते. सैतान आणि त्याचे दूत त्या न्यायालयीन दालनात माणुसकी व सहानुभूति नष्ट करण्याकरिता जोरदार काम करीत होते. तेथील वातावरणच त्यांच्या प्रभावाने जड व दूषित झाले होते. त्यांनी मुख्य याजकांना आणि वडिलजनांना येशूला मारहाण करण्यास व येशूचा अपमान अशा प्रकारें करण्यास उद्युक्त केले होते कीं मानवी देहस्वभावाकरिता तो छळ सोसणे जास्तीत जास्त कठीण होईल. सैतानाने आशा बाळगली कीं अशा अवमानाने आणि यातनांनी देवाच्या पुत्राच्या तोंडून काहीतरी तक्रार किंवा कूरकूर निघेल; किंवा जमावाच्या पकडीतून निसटण्याकरिता तो त्याचे दैवी सामर्थ्य वापरील, व अशा प्रकारें उद्धाराची योजना सरतेशेवटीं फोल होईल.

येशूच्या विश्वासघातानंतर पेत्र त्याच्या प्रभूच्या मागेमागे गेला. येशूचे काय करणार हें जाणण्यासाठीं तो चिंताक्रांत झाला होता. आणि जेव्हा तो त्याच्या शिष्यांपैकी एक असल्याचा त्याच्यावर आरोप केला गेला, तेव्हा त्याने तो नाकारला. त्याला त्याच्या जिवाची भीति वाटली, आणि जेव्हा तो त्यांच्यातलाच एक असल्याचा आरोप त्याच्यावर केला गेला, तेव्हा त्याने स्पष्ट शब्दांत म्हटले कीं त्याला तो मनुष्य माहीतसुद्धा नव्हता. शिष्यांची त्यांच्या बोलण्यात शुद्ध, पवित्र भाषा वापरण्याबद्दल ख्याति होती, आणि पेत्राने, फसविण्याकरिता, आणि तो ख्रिस्ताच्या शिष्यांपैकी एक नाही अशी त्यांची खात्री पटविण्याकरिता, तिसऱ्या खेपेला शापोच्चार करून व शपथा वाहून त्याला नाकारले. येशू, जो पेत्रापासून काही अंतरावर होता, त्याने त्याच्यावर खेदाची निषेधपर नजर टाकली. तेव्हा त्याला वरच्या खोलीत येशूने बोललेले शब्द आठवले, आणि त्याचे आत्मविश्वासी उत्साही विधानही आठवले, कीं जरी सर्व माणसे तुझ्यापासून दूर होतील, तरी मी कदापि तुला सोडणार नाही. त्याने त्याच्या प्रभूला नाकारले, अगदी शापोच्चारांसहित व शपथांसहित; पण येशूच्या त्या नजरेने पेत्र लगेचच विरघळला, आणि त्याचा बचाव झाला. त्याने खूप रडून रडून शोक केला आणि त्याच्या मोठ्या पातकाकरिता पश्चात्ताप केला, व त्याच्या मनाचा पालट झाला, आणि मग त्याच्या बांधवांना सबळ करण्याकरिता त्याच्यामध्ये पात्रता आली.

जमाव येशूच्या रक्ताकरिता गोंधळ घालीत होता. त्यांनी त्याला क्रूरपणे फटके मारले, व त्याच्यावर एक जुना किरमिजी राजशाही झगा घातला, आणि त्याचे पवित्र मस्तक काट्यांच्या मुगुटाने बांधून टाकले.

त्यांनी त्याच्या हातीं एक बोरूची काठी दिली, आणि त्याची टिंगल करीत ते त्याच्यापुढे नतमस्तक होऊन त्याला वंदन करीत म्हणाले: यहूद्यांच्या राजाचे स्वागत असो! मग त्यांनी त्याच्या हातातली काठी काढून घेऊन त्या काठीने त्याच्या मस्तकावर मारले; त्यामुळें काटे त्याच्या कानशीलात खोलवर घुसले व त्याच्या चेहऱ्यावरून व दाढीवरून रक्त ओघळू लागले.

तें दृश्य सहन करणे देवदूतांकरिता कठीण होते. त्यांनी येशूला त्यांच्या हातून सोडविले असते; परंतु सेनापतित्व करणाऱ्या देवदूतांनी त्यांना मनाई केली, आणि म्हटले कीं मानवाकरिता महान खंडणी भरली जावयाची आहे; ती पूर्ण होईल, आणि ज्याच्याकडे मृत्युवर वर्चस्व आहे त्याचे मरण घडवून आणील. येशूला माहीत होते कीं देवदूत त्याच्या अपमानाचे दृश्य पाहत होते. मी पाहिले कीं सर्वांत कमकुंवत देवदूतालासुद्धा त्या जमावाला शक्तिहीन करून भूमिवर आडवे पाडून येशूची सुटका करणे शक्य होते. त्याला माहीत होते कीं जर त्याने त्याच्या पित्याकडे इच्छा दर्शविली तर देवदूत एका क्षणात त्याला मुक्त करतील. परंतु उद्धाराची योजना पार पाडण्याकरिता येशूने दुष्ट माणसांकडून अनेक गोष्टी सहन करणे आवश्यक होते.

तेथे येशू उभा होता, त्या संतप्त जमावापुढे, लीन व नम्र असा, आणि ते मात्र त्याला गलिच्छांतील गलिच्छ दूषणे देत होते. ते त्याच्या तोंडावर थुंकले - तें मुख ज्यापासून एके दिवशीं ते लपायला मागतील, तें मुख जें देवाच्या नगरीला प्रकाश देईल, आणि सूर्यापेक्षा अधिक तेजाने चमकेल - परंतु त्याने त्या गुन्हेगारांकडे एकही रागाचा दृष्टिक्षेप टाकला नाही. त्याने लीनपणे त्याचा हात वर घेऊन ती थुंकी पुसून टाकली. त्यांनी त्याच्या मस्तकावर एक जुने वस्त्र टाकले; त्याचे डोळे बांधून टाकले, आणि मग त्याच्या तोंडात चपराका मारून ते उपहासाने मोठ्याने म्हणाले: तुला कोणी मारले तें तुझ्या अंतर्ज्ञानाने आम्हांला सांग. देवदूतांची मने खवळली. त्यांनी त्याला क्षणात सोडविले असते; पण त्यांच्या सेनापति-दूताने त्यांना मागे ओढून धरले.

येशू जेथे होता तेथे प्रवेश करण्याकरिता, व त्याची न्यायालयीन चौकशी पाहण्याकरिता, शिष्यांनी तेथील लोकांचा विश्वास संपादन केला होता. त्यांची अपेक्षा होती कीं तो त्याचे दैवी सामर्थ्य प्रगट करील, आणि स्वतःला त्याच्या शत्रुंच्या हातून मुक्त करील, आणि त्यांनी त्याला जें क्रूरपणे वागविले त्याकरिता त्यांना तो शिक्षा करील. वेगवेगळी दृश्ये घडून येतांना त्यांच्या आशा उचंबळून येत व नष्ट होत. कधींकधीं त्यांच्या मनांत शंका येई, आणि त्यांची फसवणूक तर झाली नाही ना असें भय त्यांना वाटे. परंतु येशूचे रुपांतर होतांना त्यांनी रुपांतराच्या डोंगरावर जी वाणी ऐकली होती, आणि तेथे जें गौरव पाहिले होते, त्यामुळें तो देवाचा पुत्र असल्याबाबतच्या त्यांच्या विश्वासाला बळ मिळाले. त्यांनी पाहिलेली मन भारावून टाकणारी दृश्ये त्यांनी आठवली; त्यांनी येशूला चमत्कार करून आजाऱ्यांना बरे करतांना पाहिले होते, अंधांना दृष्टि देतांना पाहिले होते, बधीरांना ऐकू येईल असें केलेले पाहिले होते, भुतांचा निषेध करतांना व भुतांना माणसांतून घालवून देतांना पाहिले होते, मृतांना मेलेल्यांतून जिवंत केलेले पाहिले होते, आणि वाऱ्यालासुद्धा धमकावितांना पाहिले होते व वाऱ्याने त्याचे आज्ञापालन केले होते. तो मरेल असा त्यांना

विश्वासच वाटत नव्हता. ते आशा करीत होते कीं तो अजूनही त्याच्या सामर्थ्यात उठेल व त्याच्या हुकमी आवाजात त्या रक्तपिपासू जमावाला पांगवून टाकील, जसे त्याने मंदिरात प्रवेश केल्यावर केले होते व जे देवाचे आराधनागृह व्यापाराचे ठिकाण करीत होते त्यांना हाकलून दिले होते; तेव्हा ते त्याच्यापुढून घाईघाईने पळून गेले होते, जणू शस्त्रधारी सैनिकांची टोळी त्यांचा पिच्छा करीत होती. शिष्यांनी आशा केली कीं येशू त्याचे सामर्थ्य प्रगट करील आणि तो इस्राएलाचा राजा असल्याबद्दल सर्वांची खात्री करून देईल.

येशूचा विश्वासघात केल्याच्या त्याच्या घातकी कृत्याकरिता यहूदाला फार पस्तावा झाला व लाज वाटू लागली. आणि जेव्हा त्याने येशूवर लादलेला अवमान पाहिला, तेव्हा तें त्याला सहन होईना. त्याचे येशूवर प्रेम होते, पण त्याला पैशांचा लोभ अधिक होता. त्याने वाट दाखवीत आणलेल्या गुंड जमावाच्या हातीं येशू स्वतःला राहू देईल असें त्याला वाटले नव्हते. त्याला वाटले होते कीं येशू एखादा चमत्कार करील व स्वतःला त्यांच्यापासून सोडवून घेईल. आणि जेव्हा त्याने न्यायालयाच्या दालनात त्याच्या रक्ताकरिता आसुसलेल्या संतप्त जमावाला पाहिले, तेव्हा त्याला त्याचा दोष खोलवर जाणवला, आणि अनेकजण येशूवर तावातावाने आरोप करीत असतांना यहूदाने जोर लावून जमावातून वाट काढली आणि पुढे जाऊन कबुली दिली कीं निष्पाप रक्ताचा विश्वासघात करण्यात त्याने पाप केले होते. त्याने त्यांना तें पैसे देऊ केले आणि त्यांनी येशूला सोडून द्यावे अशी कळवळून विनवणी केली; त्याने जाहीर केले कीं येशू पूर्णपणे निर्दोष आहे. काही थोडा वेळ याजक त्रस्त होऊन व गोंधळून गप्प राहिले. त्यांनी येशूच्या उघडउघडपणे अनुयायी म्हणविणारांपैकी एकाला येशूचा विश्वासघात करून त्यांच्या हातीं देण्याकरिता लाच दिली होती ही गोष्ट लोकांना माहीत पडावी हें त्यांना नको होते. ते येशूला चोराप्रमाणे धुंडाळीत होते व त्याने त्याला गुप्तपणे त्यांच्या ताब्यात दिले ही गोष्ट लपविण्याची त्यांची इच्छा होती. परंतु यहूदाची कबुली, त्याचे खप्पड पडलेले तोंड आणि दोषी चेहरा, जमावापुढे याजकांचे खरे रूप उघड करून गेला कीं त्यांनी द्वेषामुळें येशूला अटक केले होते. यहूदा येशू निर्दोष असल्याचे मोठ्याने जाहीर करीत असतांना याजकांनी त्याला उत्तर दिले: त्याचे आम्हांला काय? तूं तुला काय करायचे तें कर. येशू त्यांच्या तावडीत होता, आणि त्याला सोडावयाचे नाही असा त्यांनी निर्धार केलेला होता. यहूदाचा मनस्ताप अनावर झाला; ज्यांनी त्याला लाच दिली होती त्यांच्या पायांशीं त्याने तें पैसे फेकले; त्या पैशांचा त्याला आता अगदीच वीट वाटत होता, आणि त्याच्या गुन्ह्याकरिता तळमळून दुःखाने व भयाने तो बाहेर गेला आणि त्याने स्वतःस फासावर लटकविले.

त्या जमावात येशूबद्दल सहानुभूति वाटणारे अनेकजण होते, आणि त्याला टाकलेल्या अनेक प्रश्नांचे त्याने काहीच उत्तर दिले नाही याचे जमावाला नवल वाटले. इतक्या सर्व अपमानाने आणि टिंगलबाजीने त्याच्या कपाळावर एकही आठी उमटली नाही कीं त्याच्या चेहऱ्यावर कसलीही त्रस्त भावना व्यक्त झाली नाही. तो उमदा दिसत होता आणि त्याचा स्वतःवर पूर्ण ताबा होता. त्याचे बाह्य रूप निर्दोष व राजबिंडे होते. बघे त्याच्याकडे नवल करीत बघत होते. ते त्याच्या निर्दोष रुपाची व त्याच्या खंबीर, उमद्या वागणुकीची, त्याच्याविरुद्ध न्याय करण्यास बसणाऱ्यांशीं तुलना करू लागले, आणि एकमेकांना म्हणू लागले कीं कोठल्याही शास्त्यापेक्षा तोच ज्याच्या हातीं त्याचे राज्य सोपविले जाणार अशा एखाद्या

राजासारखा दिसत होता. गुन्हेगार असल्याच्या कोठल्याही खूणा त्याच्यात दिसत नव्हत्या. त्याची नजर सौम्य, स्वच्छ, आणि निडर होती, त्याचे कपाळ रूंद व उंच होते. प्रत्येक अवयवावर औदार्य व उमदेपणाचा ठळक ठसा होता. त्याचा धीर आणि सहनशीलता मानवस्वभावानुसार नव्हती, त्यामुळें अनेकांचा थरकाप झाला. त्याच्या महान, देवासमान असणाऱ्या वागणुकीने हेरोद आणि पिलातसुद्धा खूप घाबरले.

पिलाताची पहिल्यापासूनच खात्री झाली होती कीं तो कोणी साधारण मनुष्य नाही, तर एक उत्कृष्ट स्वभावाचा जीव आहे. तो पूर्णपणे निर्दोष असल्याचा त्याचा विश्वास होता. जे देवदूत हें सर्व दृश्य पाहत होते त्यांनी पिलाताचे विचार जाणले, आणि येशूकरिता असलेली त्याच्या मनाची खात्री, सहानुभूति व करुणा त्यांनी लक्षपूर्वक पाहिली; येशूला क्रूसखांबीं वधण्याकरिता जमावाच्या हवालीं करण्याच्या भयंकर कृत्यापासून त्याला वाचविण्याकरिता पिलाताच्या बायकोकडे एका देवदूताला पाठविण्यात आले, ज्याने तिला स्वप्नातून माहिती दिली कीं ज्या खटल्यात पिलात गुंतलेला होता तो खटला देवाच्या पुत्रावर चालविला जात आहे, आणि तो तर निर्दोष असूनही क्लेश भोगत आहे. तिने तावडतोब पिलाताकडे निरोप धाडला कीं येशूमुळें तिने स्वप्नात बऱ्याच गोष्टी व बरेच दुःख भोगले आहे, अणि त्या पवित्र मनुष्याच्या संबंधातल्या कोठल्याही गोष्टीत त्याने भाग घेऊ नये असा तिने त्याला इशारा दिला. तिची चिट्ठी घेऊन निरोप्या घाईघाईने गर्दीतून आत घुसला, आणि त्याने ती पिलाताच्या हातीं दिली. ती वाचतांना तो थरथर कापू लागला व त्याचा चेहरा फिका पडला. त्याने लगेच विचार केला कीं तो ह्या बाबतीत काही भाग घेणार नाही; जर त्यांना येशूचे रक्त हवे असेल तर तो त्यांच्या बाजूने जाणार नाही, तर त्याला मुक्त करण्याकरिता तो झटेल.

जेव्हा पिलाताने ऐकले कीं हेरोद त्या क्षणीं यरुशलेमेतच होता तेव्हा त्याला आनंद वाटला, आणि ह्या त्रासदायक खटल्यातून आपला कार्यभाग पूर्णपणे काढून घेण्याची त्याने आशा केली; येशूला दंडपात्र ठरविण्यात त्याचा कार्यभाग असणार नाही असें त्याने ठरविले. त्याने त्याला, त्याच्या फिर्यादींसह, हेरोदाकडे पाठविले. हेरोद कठीण हृदयाचा होता. त्याने योहानाचा जो खून केला होता त्यामुळें त्याच्या विवेकावर डाग लागला होता व त्यापासून तो स्वतःस मुक्त करू शकत नव्हता; आणि जेव्हा त्याने येशूविषयीं व त्याच्या अद्‌भुत कृत्यांविषयीं ऐकले, तेव्हा त्याला वाटले कीं योहान मेलेल्यांतून उठला आहे. तो भयभीत झाला व त्याचा थरकाप झाला, कारण कीं दोषी भावना बाळगून तो जगत होता. पिलाताने येशूला हेरोदाच्या हातीं सोपविले. ही कृति पिलात त्याचे सामर्थ्य, त्याची सत्ता, व त्याचा सुज्ञपणा मानतो असें हेरोद समजला. यापूर्वी ते एकमेकांचे शत्रु होते, पण आता ते एकमेकांचे मित्र बनले. येशूला पाहायला हेरोदाला आनंद वाटला, कारण कीं तो त्याच्या समाधानाखातर एखादा अद्‌भुत चमत्कार करील अशी त्याची अपेक्षा होती. परंतु जिज्ञासेची तृप्ति करणे हें येशूचे काम नव्हते. त्याचे चमत्काराचे दैवी सामर्थ्य दुसऱ्यांच्या उद्धाराकरिता वापरले जावयाचे होते, त्याच्या स्वतःच्या हिताखातर नाही.

हेरोदाने त्याला विचारलेल्या अनेक प्रश्नांचे येशूने काहीच उत्तर दिले नाही; आणि त्याच्यावर तावातावाने आरोप करणाऱ्या त्याच्या वैऱ्यांनासुद्धा त्याने मुळींच किंमत दिली नाही. येशू त्याच्या

सत्तासामर्थ्याला घाबरत नव्हता असें पाहून हेरोद फार संतापला, आणि त्याच्या सैनिकांसोबत त्याने त्याचा उपहास केला, त्याची टिंगल केली, आणि देवाच्या पुत्राशीं गैरवर्तणूक केली. लज्जास्पद रित्या छळ केला जाऊनही येशू कसा उमदा, देवासमान दिसत होता तें पाहून हेरोद आश्चर्यचकित झाला व त्याला दंडाज्ञा सुनावण्यास भ्याला, आणि त्याने त्याला पुन्हा पिलाताकडे पाठवून दिले.

सैतान आणि त्याचे दूत पिलातावर मोह टाकीत होते, व त्याने त्याचाच नाश स्वतःवर ओढवून घ्यावा म्हणून त्याला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनी त्याच्या मनात विचार घातले कीं जर त्याने येशूला दंडाज्ञा करण्यात काही भाग घेतला नाही, तर दुसरे घेतील; जमाव त्याच्या रक्ताकरिता आसुसला होता; आणि जर त्याने येशूला वधस्तंभीं मरण भोगण्याकरिता त्यांच्या हवालीं केले नाही, तर तो त्याचे सामर्थ्य आणि जगिक सन्मान गमवून बसेल, आणि येशूला ढोंगी म्हणणारा जमाव पिलात त्या ढोंग्यावर विश्वास ठेवणारा आहे असें म्हणून त्याचा निषेध करतील. त्याचे सामर्थ्य व त्याचा सत्ताधिकार गमविण्याच्या भीतिने पिलाताने येशूच्या मरणाला संमति दिली. त्याने जरी येशूचे रक्त त्याच्यावर आरोप करणारांवर घातले, आणि जमावाने असें म्हणत तें स्वीकारले कीं: त्याचे रक्त आम्हांवर आणि आमच्या मुलांबाळांवर असो, तरी पिलात दोषमुक्त नव्हता; ख्रिस्ताच्या रक्ताचा तो दोषी होता. त्याच्या स्वतःच्या स्वार्थी हिताखातर, आणि पृथ्वीच्या महान माणसांकडून मिळणाऱ्या सन्मानाच्या हावेखातर, त्याने एका निर्दोष मनुष्याला मरण्यासाठीं जमावाच्या हवालीं केले. जर पिलात त्याच्या मनाच्या खात्रीनुसार वागला असता, तर येशूला दंडाज्ञा देण्यात त्याने काही भाग घेतला नसता.

येशूची न्यायालयीन चौकशी आणि त्याला दंडपात्र ठरविले जाणे या गोष्टी अनेकांच्या मनांवर कार्य करीत होत्या आणि त्यांना प्रभावीत करीत होत्या; हें परिणाम त्याच्या पुनरुत्थानानंतर दिसून येणार होते आणि अनेकजणांची ख्रिस्ताच्या मंडळीत भर पडणार होती, ज्यांचा अनुभव व पालट येशूच्या न्यायालयीन चौकशीच्या वेळेस झाला होता.

जेव्हा सैतानाने पाहिले कीं येशूवर इतके सर्व क्रौर्य ओतण्यास त्याने मुख्य याजकांना प्रवृत्त करूनही येशूकडून अत्यल्पसुद्धा तक्रार आली नाही तेव्हा त्याचा क्रोध फारच वाढला. मी पाहिले कीं, जरी येशूने मानवी स्वरूप घेतले होते, तरी देवासमान असणाऱ्या शक्तिने व खंबीरपणाने त्याला स्थिर ठेवले होते, व तो त्याच्या पित्याच्या इच्छेपासून किंचितसुद्धा ढळला नाही.

पहा:

*मत्तय* २६:५७-७५; २७:१-३१; *मार्क* १४:५३-७२; १५:१-२०; *लूक* २२:४७-७१; २३:१-२५; *योहान*, अध्याय १८; १९:१-१६.

# अध्याय ९
# ख्रिस्ताला क्रूसखांबीं खिळणे

देवाच्या पुत्राला क्रूसखांबीं खिळून ठार करण्याकरिता लोकांच्या हवालीं केले गेले. प्रिय उद्धारकाला ते घेऊन गेले. त्याच्यावर केल्या गेलेल्या प्रहारांनी व फटक्यांच्या माराने वेदना आणि क्लेश सहन करीत तो अशक्त व कमकुंवत झालेला होता, तरी ज्या वधस्तंभावर ते लवकरच त्याला खिळणार होते तो जड क्रूस त्यांनी वाहून नेण्याकरिता त्याच्यावर लादला. परंतु येशू त्या ओझ्याखाली बेशुद्ध पडला. तीन वेळा त्यांनी जड क्रूस त्याच्यावर लादला, आणि तीन वेळा तो बेशुद्ध झाला. मग त्यांनी त्याच्या अनुयायांपैकी एकाला धरले, ज्या माणसाने उघडउघड ख्रिस्तावर विश्वास दाखविलेला नव्हता, तरी त्याचा त्याच्यावर विश्वास होता. त्यांनी त्याच्यावर तो क्रूस लादला, आणि त्याने त्यास त्या घातक ठिकाणीं वाहून नेले. त्या जागेवर हवेत देवदूतांच्या तुकड्या पद्धतशीरपणे जमलेल्या होत्या. त्याचे कैक शिष्य त्याच्या मागेमागे दुःखाने व रडूनरडून शोक करीत कवटीच्या ठिकाणीं गेले. त्यांनी आठवण केली कीं येशू विजयश्रीने कसा यरुशलेमेत गाढवीच्या शिंगरावर बसून गेला होता, आणि ते "ऊर्ध्वलोकीं होसान्ना" म्हणत त्याच्या मागेमागे गेले होते आणि त्याच्या मार्गावर त्यांनी आपली वस्त्रे अंथरली होती व सुंदर झावळ्या पसरल्या होत्या. तेव्हा त्यांना वाटले होते कीं तो त्याचे राज्य घेऊन इस्राएलावर जगाच्या अधिपतींप्रमाणे राज्य करणार आहे. आता दृश्य किती बदलले होते! त्यांची स्वप्ने कशी भंग पावली होती! ते येशूच्या मागेमागे जात होते, पण हर्ष करीत नाही; हृदये उचंबळून येऊन व आनंदी आशांनी नाही, तर भीतिने त्यांच्या हृदयांचा थरकाप होत आणि हताशपणे ते ज्याला अवमानित केले गेले होते व लज्जित केले गेले होते, व जो लवकरच मरणार होता, त्याच्यामागे हळूहळू, दुःखाने जात होते.

येशूची आई तेथे होती. तिचे हृदय दुःखाने विंधले गेले होते, ज्या प्रकारचे दुःख प्रेमळ मातेशिवाय दुसऱ्या कोणाला जाणवत नाही. तिच्या प्रहार झालेल्या हृदयाला, अजूनही शिष्यांप्रमाणे, आशा वाटत होती, कीं तिचा दैवी पुत्र कोणतातरी अद्भुत चमत्कार करील आणि स्वतःची त्याच्या खून्यांपासून सोडवणूक करून घेईल. तो स्वतःला क्रूसावर चढविला जाऊ देईल हा विचारसुद्धा तिला सहन होत नव्हता. परंतु सर्व तयारी केली गेली, आणि त्यांनी येशूला क्रूसावर आडवे झोपविले. हातोडा आणि खिळे आणले गेले. त्याच्या शिष्यांची हृदये आतल्या आत अतिदुःखाने होरपळली गेली. येशूच्या आईला सहन करण्यापलिकडे क्लेश होत होते, आणि जेव्हा त्यांनी येशूला क्रूसावर ओढून ताणले, आणि ते त्याचे हात क्रूरपणे खिळे ठोकून क्रूसाच्या आडव्या लाकडावर पक्के बसविणार होते, तेव्हा शिष्य येशूच्या आईला त्या

दृश्यापासून दूर घेऊन गेले, कीं त्याच्या कोवळ्या हातांपायांच्या हाडांतून व स्नायुंतून खिळे ठोकले जात असतांनाचा आवाज तिच्या कानीं पडू नये. येशूने तोंडातून एक शब्द काढला नाही; परंतु वेदनांमुळें तो कण्हू लागला. त्याचा चेहरा निस्तेज पडला होता, आणि त्याच्या कपाळावर घामाचे मोठेमोठे थेंब थबकले. देवाचा पुत्र ज्या क्लेशांतून पार होत होता तें पाहून सैतानाला आसुरी आनंद झाला होता, तरी त्याचे राज्य गमाविले गेले आहे व सरतेशेवटीं त्याला मरण भोगावे लागेल असें भय त्याला वाटत राहिले.

येशूला क्रूसाला खिळल्यानंतर त्यांनी तो वधस्तंभ उचलला, आणि त्याच्याकरिता जमिनीत जो खड्डा खणलेला होता त्यात त्यास जोरात टाकले; त्यामुळें येशूचे मांस फाटले आणि त्याला अत्यंत क्लेशदायक वेदना झाल्या. त्यांनी त्याचा मृत्यु जितका लज्जित करणारा होऊ शकेल तितका लज्जास्पद केला. त्याच्यासोबत त्यांनी दोन चोरांना क्रूसांवर खिळले, एक त्याच्या ह्या बाजूला व दुसरा त्याच्या त्या बाजूला. चोरांना धरून ठेवायला बराच जोर वापरावा लागला; त्यांनी बराच प्रतिकार केल्यानंतर त्यांचे हात क्रूसांवर पाठीमागल्या बाजूला टाकून त्यांना क्रूसांवर खिळण्यात आले. परंतु येशूने प्रतिकार न करता लीनपणे सर्वकाही सहन केले. त्याच्या बाहूंना क्रूसावर पाठीमागल्या बाजूला बळजबरीने टाकण्याकरिता कोणाची गरज नव्हती. चोर त्यांच्या मरणदंडाची अंमलबजावणी करणाऱ्यांना शिव्याशाप देत होते, पण येशू त्याच्या यातनांमध्येसुद्धा त्याच्या शत्रुंसाठीं प्रार्थना करीत होता कीं: बापा, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करतात हें त्यांना माहीत नाही. येशू केवळ शारीरिक क्लेशच सहन करीत होता असें नाही, तर सबंध जगाची पातके त्याच्यावर लादली गेली होती.

येशू वधस्तंभावर टांगलेला असतांना, त्या बाजूने जाणाऱ्या काहींनी त्याचा उपहास करीत व डोकीं हलवीत, जणू एखाद्या राजापुढे नमन करीत आहेत, त्याला म्हटले: तूं मंदिर नष्ट करून तीन दिवसांत तें परत बांधणार होतास ना? मग स्वतःला वाचव कीं. जर तूं देवाचा पुत्र असशील, तर वधस्तंभावरून खाली ये. सैतानाने अरण्यात ख्रिस्ताला तेंच शब्द वापरून मोह टाकला होता कीं: जर तूं देवाचा पुत्र असशील तर. मुख्य याजकांनी आणि वडिलजनांनी आणि शास्त्र्यांनी त्याची चेष्टा करीत म्हटले: त्याने दुसऱ्यांना वाचविले, पण तो स्वतःला वाचवू शकत नाही. जर तो इस्राएलाचा राजा असेल तर आता त्याने क्रूसावरून खाली यावे, आणि आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. ख्रिस्ताला वधस्तंभीं दिल्याच्या ठिकाणीं जे देवदूत पाखर घालीत होते त्यांनी जेव्हा शास्त्र्यांना असें बोलून त्याचा उपहास करतांना पाहिले, कीं जर तो देवाचा पुत्र असेल तर त्याने स्वतःची सुटका करून घ्यावी, तेव्हा ते मनातून फार संतापले. लगेच येशूकडे जाऊन त्याची सुटका करावी अशी त्यांना उत्कट इच्छा झाली; पण त्यांना तसें करू दिले गेले नाही. त्याच्या सेवाकार्याचे उद्दिष्ट जवळजवळ सिद्धिस गेले होते. येशू त्या भयंकर क्लेशांच्या घटकांत क्रूसावर टांगलेल्या स्थितीत असतांना त्याच्या आईला विसरला नाही. त्या क्लेशांच्या दृश्यापासून ती दूर राहू शकत नव्हती. येशूचा शेवटला धडा करुणेचा व मानवतेचा होता. त्याने त्याच्या आईकडे पाहिले, जिचे हृदय दुःखाने जवळजवळ फाटण्याइतपत विव्हळ झाले होते, आणि मग त्याच्या प्रिय शिष्याकडे, योहानाकडे, पाहिले.

तो त्याच्या आईला म्हणाला: बाई, तुझा पुत्र पहा. मग तो योहानाला म्हणाला: ही पाहा तुझी आई. त्या घटकेपासून योहान तिला त्याच्या स्वतःच्या घरीं घेऊन गेला.

येशूला त्याच्या क्लेशांत तहान लागली; पण त्याला प्यायला व्हिनिगर (आंब) देऊन त्यांनी त्याच्यावर आणखी अपमान लादला. देवदूतांनी त्यांच्या प्रिय सेनापतिच्या क्रूसखांबीं टांगले जाण्याचे भयाण दृश्य इथवरच पाहिले कारण ते जास्त वेळ पाहू शकले नाही, आणि त्यांनी त्या दृश्यापासून आपली तोंडे झाकून घेतली. सूर्याने त्या भयाण दृश्याकडे पाहण्यास नकार दिला. येशूने मोठ्या आवाजात आरोळी ठोकली कीं: *पूर्ण झाले*; त्या आरोळीने त्याच्या खून्यांच्या हृदयांत दरारा उत्पन्न झाला. तेव्हा मंदिरातला पडदा वरून खालपर्यंत फाटला, भूमि हादरली, आणि खडक फुटून कोसळले. पृथ्वीच्या चोहों बाजूंस मोठा अंधकार पडला. जेव्हा येशू मरण पावला तेव्हा शिष्यांच्या शेवटल्या आशेचा चुराडा झाल्याचे दिसले. त्याच्या अनेक अनुयायांनी त्याच्या यातनांचे व मृत्युचे दृश्य पाहिले, आणि त्यांचा दुःखाचा पेला पूर्णपणे भरला.

तेव्हा सैतानाला पूर्वीप्रमाणे विजयाचा आसुरी आनंद झाला नाही. त्याला वाटले होते कीं तो उद्धाराची योजना फोल करू शकेल; परंतु तिचा पाया खूप खोलवर घातला गेलेला होता. आणि आता येशूच्या मृत्युने त्याला माहीत झाले कीं सरतेशेवटीं त्याने मेले पाहिजे, आणि त्याचे राज्य त्याच्याकडून काढून घेतले जाऊन येशूला दिले जाईल. त्याने त्याच्या दूतांबरोबर सभा घेऊन विचारविनिमय केला. देवाच्या पुत्राविरुद्ध त्याचे काहीच चालले नव्हते, आणि आता त्यांनी त्यांचे प्रयत्न वाढविले पाहिजेत, व त्यांच्या चलाखीने आणि सामर्थ्याने येशूच्या अनुयायांच्या विरुद्ध मोर्चा वळविला पाहिजे. येशूने त्यांच्याकरिता खंडणी देऊन घेतलेला उद्धार स्वीकारण्यापासून त्यांनी जास्तीत जास्त लोकांना परावृत्त केले पाहिजे. असें केल्याने सैतान अजूनही देवाच्या शासनाविरुद्ध काम करू शकेल. आणि येशूपासून जास्तीत जास्त लोकांना दूर ठेवण्यात त्याचाच फायदा होणार होता, कारण कीं ख्रिस्ताच्या रक्ताने ज्या कोणाचा उद्धार होईल व ते पातकांवर विजयी होतील, त्या सर्वांची पातके सरतेशेवटीं पापाच्या उगमावर, सैतानावर, लादली जातील; परंतु जे येशूमार्फत उद्धार स्वीकारणार नाहीत त्यांना त्यांच्या स्वतःच्या पातकांचा भार स्वतःलाच वाहावा लागेल.

येशूचे जीवन जगिक ऐश्वर्याशिवाय किंवा चैनबाजीच्या दिखावटीशिवाय होते. त्याचे लीन, स्वनाकार करणारे आयुष्य याजकांच्या आणि वडिलजनांच्या आयुष्यांपेक्षा फारच निराळे होते; त्या लोकांना आरामाची व जगिक सन्मानाची आवड होती, आणि येशूच्या पवित्र व कडक शिस्तीच्या आयुष्याने त्यांचा त्यांच्या पातकांमुळें सतत निषेध होत असे. ते त्याला त्याच्या नम्रपणाकरिता आणि शुद्धतेकरिता तुच्छ लेखीत. परंतु इथे ज्यांनी त्याला तुच्छ लेखले, ते एके दिवशीं त्याला स्वर्गीय ऐश्वर्यात आणि त्याच्या पित्याच्या अतुलनीय गौरवात पाहतील. तो न्यायालयाच्या दालनात त्याच्या शत्रुंनी घेरलेला होता, जे त्याच्या रक्ताकरिता आसुसलेले होते; त्याचे रक्त आम्हांवर आणि आमच्या मुलांबाळांवर असो, असा ओरडा करणारे ते कठीण हृदयाचे लोक त्याला सन्माननीय राजा म्हणून पाहतील. त्याच्या मार्गावर त्याला घेऊन जाण्याकरिता सर्व स्वर्गीय दूतांचे थवे विजयाच्या गीतांसह हजर असतील; जो ठार केला गेला, तरी परत

पराक्रमी विजेता म्हणून जगत आहे त्याच्या वैभवाची व पराक्रमाची गीते ते गातील. गरीब, अशक्त, दुर्दशा झालेला मानव गौरवी राजाच्या तोंडावर थुंकला होता, आणि तो हीन दर्जाचा अपमान पाहून गुंड जमावाने हिंस्त्र पशुंप्रमाणे जणू विजयाच्या आरोळ्या ठोकल्या होत्या. आख्ख्या स्वर्गाला ज्याचे खूप आकर्षण वाटते तो चेहरा त्यांनी ठोसे मारून आणि क्रूर वागणूक देऊन बिघडवून टाकला. ते तो चेहरा पुन्हा पाहतील, मध्यान्हीच्या सूर्याप्रमाणे तळपत असलेला, आणि त्याच्यापुढून पळून जायचा ते प्रयत्न करतील. हिंस्त्र पशुंच्या विजयाच्या आरोळ्यांऐवजी, ते त्याच्यामुळें भयग्रस्त होऊन मोठमोठ्याने रडू लागतील. येशू त्याच्या क्रूसखांबावर खिळले जाण्याच्या खूणा असलेले त्याचे हात त्यांच्यापुढे सादर करील. ह्या क्रौर्याच्या खूणा त्याच्या शरीरावर नेहमी राहतील. खिळ्यांचा प्रत्येक ठसा मानवाच्या अद्‌भुत उद्धाराची कहाणी सांगेल, व त्याकरिता किती मोलाची किंमत मोजावी लागली तें विदित करील. ज्या मनुष्यांनी जीवनाच्या प्रभूच्या कुशीत भाला भोसकला, ते त्या भाल्याचा ठसा पाहतील, आणि त्याचे शरीर बिघडवून टाकण्यात त्यांनी केलेल्या कार्यभागाबद्दल ते अत्यंत दु:खी होऊन शोक करतील. येशूच्या डोक्यावर क्रूसावर लेख लिहिला गेला होता कीं: **हा यहूद्यांचा राजा आहे**; त्या लेखाने त्याच्या खून्यांना फार चीड आली होती. पण त्यांना त्याला त्याच्या सर्व गौरवात व राजेशाही सामर्थ्यात पाहणे भाग पडेल. त्याच्या वस्त्रावर आणि त्याच्या मांडीवर ज्वलंत अक्षरांत लिहिलेले शब्द: **राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू**, ते पाहतील. तो क्रूसावर टांगलेला असतांना ते चेष्टामस्करी करीत त्याला म्हणाले होते कीं: इस्राएलाचा राजा असलेल्या ख्रिस्ताने क्रूसावरून खाली उतरावे, म्हणजे आम्हांला पाहता येईल व विश्वास ठेवता येईल. ते त्याला तेव्हा त्याच्या राजेशाही सामर्थ्यात व अधिकारात पाहतील. तेव्हा तो इस्राएलाचा राजा असल्याबद्दलच्या पुराव्याची मागणी ते करणार नाहीत; उलट त्याच्या वैभवाच्या गौरवाने व त्याच्या आत्यंतिक ऐश्वर्याने ते इतके भारावून जातील कीं त्यांना कबुली देणे भाग पडेल कीं: प्रभूच्या नामाने येणारा धन्यवादित असो.

येशूने त्याचा प्राण सोडतांना मारलेली मोठी जोरदार आरोळी कीं: *पूर्ण झाले आहे,* त्यावेळचे भूमिचे हादरणे, खडक फुटणे, पृथ्वीवर अंधार पसरणे, या गोष्टींनी त्याच्या शत्रुंची घबराट झाली, आणि त्याचे खूनी थरथर कापू लागले. शिष्यांना या अनोख्या घटनांचे नवल वाटले, परंतु त्यांच्या सर्व आशांचा चुराडा झाला होता. त्यांना भीति वाटत होती कीं यहूदी लोक त्यांनासुद्धा ठार करायला बघतील. देवाच्या पुत्राविरुद्ध उघड केलेला इतका भयंकर द्वेष तेवढ्यावरच थांबणार नाही असें त्यांना वाटले. शिष्यांनी दु:खात व त्यांच्या निराशेमुळें शोक करण्यात त्या एकाकीपणाच्या घटका घालविल्या. त्यांनी अपेक्षा केली होती कीं तो जगिक अधिपतींप्रमाणे राज्य करील; परंतु त्यांच्या आशा येशूसोबतच मरण पावल्या. त्यांच्या दु:खात आणि नैराश्यात त्यांच्या मनांत शंका आली कीं येशूने त्यांची फसवणूक तर केली नव्हती ना? त्याची आई लज्जित झाली, आणि तो मशीहा असल्याबद्दलचा तिचासुद्धा विश्वास डळमळू लागला.

परंतु जरी येशूसंबंधीच्या त्यांच्या आशांच्या बाबतीत शिष्यांच्या पदरीं निराशा आली होती, तरी त्यांचे त्याच्यावर अद्यापही प्रेम होते, आणि त्याच्या शरीराचा ते आदर व सन्मान करीत होते; पण त्याचा देह कसा मिळवायचा तें त्यांना समजत नव्हते. अरिमथाईकर योसेफ, एक सन्माननीय सल्लागार, त्याचा

माणसांवर बराच प्रभाव होता, आणि तो येशूच्या खऱ्या शिष्यांपैकी एक होता. तो खाजगी रित्या, परंतु धीटपणे, पिलाताकडे गेला, आणि त्याने येशूच्या देहाकरिता आग्रहाची मागणी केली. उघडपणे जाण्यास तो धजला नाही, कारण यहूद्यांचा द्वेष इतका जास्त होता कीं शिष्यांना भय वाटत होते कीं येशूच्या देहाला मानाचे विश्रामस्थान मिळण्यास प्रतिबंध करण्याचा ते प्रयत्न करतील. परंतु पिलाताने त्याची विनंती मान्य केली, आणि त्यांनी येशूचे शरीर क्रूसावरून खाली उतरविले. तो देह खाली काढतांना त्यांचे दुःख द्विगुणित झाले, आणि त्यांच्या चुथडा झालेल्या आशांमुळें ते अति मानसिक क्लेशांनी शोक करू लागले. त्यांनी येशूला उत्तम कापडामध्ये गुंडाळले, आणि योसेफाने त्याला त्याच्या स्वतःच्या नव्या कबरेत ठेवले. तो जिवंत असतांना ज्या स्त्रिया त्याच्या लीन अनुयायी होत्या, त्या त्याच्या मृत्युनंतरसुद्धा त्याच्याजवळच राहिल्या, आणि त्याचे पवित्र शरीर कबरेत ठेवलेले पाहीपर्यंत, व कबरेच्या दाराशीं मोठ्या वजनाचा धोंडा ठेवला जाईपर्यंत, कीं त्याच्या शत्रुंना त्यांनी प्रयत्न करूनही त्याचा देह मिळू नये, त्या त्याला सोडून जाईनात. परंतु त्यांनी घाबरण्याची काही गरज नव्हती; कारण मी पाहिले कीं देवदूतांचे जमाव शब्दांत व्यक्त करता येणार नाही इतक्या कुतुहलाने येशूचे विश्रामस्थान पाहत होते. त्यांनी कबरेबाहेर पहारा ठेवला, व गौरवाच्या राजाला त्याच्या बंदिशाळेतून (तुरुंगातून) मुक्त करण्यात त्यांचा कार्यभाग करण्याच्या हुकमाकरिता ते उत्कंठेने वाट पाहत राहिले.

खिस्ताच्या खून्यांना भीति वाटत होती कीं तो अद्यापही जिवंत होईल व त्यांच्या तावडीतून सुटेल. त्यांनी पिलाताकडे विनवणी करून तिसऱ्या दिवसापर्यंत कबरेभोवती पहारा ठेवण्याकरिता सैनिक मागितले. पिलाताने कबरेपुढे पहारा करण्यासाठीं सशस्त्र सैनिक पुरविले; त्यांनी कबरेच्या प्रवेशद्वाराकडील धोंड्याला सीलबंद केले, तें यासाठीं कीं त्याच्या शिष्यांना त्याला चोरून नेता येऊ नये, व तो मेलेल्यांतून उठला आहे असें म्हणता येऊ नये.

पहा:
*मत्तय* २१:१-११; २७:३२-६६; *मार्क* १५:२१-४७;
*लूक* २३:२६-५६; *योहान* १९:१७-४२; *प्रगटीकरण* १९:११-१६.

# अध्याय १०
# ख्रिस्ताचे पुनरुत्थान

शिष्यांनी शब्बाथाच्या दिवशीं विश्राम केला, ते त्यांच्या प्रभूच्या मृत्युचे दुःख करीत होते, आणि गौरवाचा राजा येशू त्याच्या कबरेत विसावला होता. रात्र हळूहळू सरली, आणि अद्याप काळोख असतांना, कबरेवर पाखर घालणाऱ्या देवदूतांना माहीत होते कीं देवाच्या प्रिय पुत्राच्या, त्यांच्या प्रिय सेनापतिच्या, सुटकेची वेळ जवळजवळ आलीच होती. आणि त्याच्या विजयाच्या घटकेची अत्यंत भावनाशील होऊन ते वाट पाहत असतांना, स्वर्गातून एक बलाढ्य व पराक्रमी देवदूत जलद गतिने उडत आला. त्याचे तोंड विजेसारखे होते, आणि त्याची वस्त्रे हिमासारखी शुभ्र होती. त्याच्या प्रकाशाने त्याच्या वाटेवरला अंधार नष्ट झाला, आणि येशूच्या शरीरावर विजयोन्मादात हक्क सांगणारे वाईट दूत त्याच्या तेजापुढून व गौरवापुढून भयभीत होऊन पळून गेले. येशूच्या अवमानाचे दृश्य पाहिलेला दूतजमावापैकी एक, जो त्याच्या पवित्र विश्रामस्थानावर पहारा ठेवीत होता, तो स्वर्गातून येणाऱ्या देवदूताला जाऊन मिळाला, आणि दोघे एकत्र खाली कबरेकडे आले. ते पृथ्वीच्या जवळ येतांना पृथ्वी हादरली व थरथर कापली, आणि एक प्रचंड भूकंप झाला. त्या बलाढ्य व पराक्रमी देवदूताने धोंड्याला धरून त्याला कबरेच्या प्रवेशद्वारापासून चटकन बाजूला केले, आणि तो त्याच्यावर बसला.

पहारेकरी सैनिक अत्यंत भयभीत झाले. येशूच्या शरीराचे रक्षण करण्याचे त्यांचे सामर्थ्य आता कोठे होते? त्यांच्या कर्तव्याचा, किंवा शिष्य त्याला चोरून नेण्याचा, विचारही त्यांच्या मनांत आला नाही. देवदूतांचा कमालीचा तेजस्वी प्रकाश त्यांच्याभोवती सर्वत्र सूर्यापेक्षा तेजस्वी तेजाने प्रकाशतांना पाहून त्यांना अचंबा आणि भीति वाटली. रोमी पहारेकऱ्यांनी देवदूतांना पाहिले, आणि ते भूमिवर मृत माणसांप्रमाणे कोसळले. एका देवदूताने जयाच्या भावनेने धोंडा मागे सारला, आणि स्पष्ट व बलाढ्य वाणीने तो मोठ्याने म्हणाला: तूं देवाच्या पुत्रा! तुझा पिता तुला बोलावीत आहे! बाहेर ये! त्याच्यावर मृत्युचे साम्राज्य याउप्पर चालू शकणार नव्हते. येशू मेलेल्यांतून उठला. तो दुसरा देवदूत कबरेत गेला, आणि येशू विजयाच्या हर्षात उठत असतांना त्याने त्याच्या मस्तकाला बांधलेली पट्टी सोडली, आणि येशू विजयी विजेता म्हणून कबरेबाहेर पडला. दूतांचे थवे गांभीर्याने तें दृश्य पाहत होते. आणि येशू कबरेतून चालत गौरवाने बाहेर पडत असतांना, त्या चमकणाऱ्या देवदूतांनी त्याच्यापुढे जमिनीवर लोटांगण घालून त्याला नमन केले; मग त्यांनी पराक्रमाच्या व विजयाच्या गीतांनी त्याचे स्वागत केले, कीं याउप्पर मृत्यु त्याच्या दैवी बंदिवानाला

त्याच्या कैदेत ठेवू शकणार नव्हता. आता सैतानाला विजयाचा आनंद होत नव्हता. स्वर्गीय देवदूतांच्या भेदणाऱ्या तेजस्वी प्रकाशापुढे त्याच्या दूतांनी पलायन केले होते. त्यांनी त्यांच्या राजापुढे रडूनरडून तक्रार केली कीं त्यांच्या भक्ष्याला त्यांच्याकडून बळजबरीने काढून घेतले होते, आणि ज्याचा ते इतका द्वेष करीत होते तो मेलेल्यांतून उठला होता.

सैतानाने आणि त्याच्या दूतांनी विजयाचे काही क्षण उपभोगले होते कीं पतित मानवावरील त्यांच्या सामर्थ्यामुळें जीवनाच्या प्रभूला कबरेमध्ये ठेवले गेले होते; पण त्यांचा नरकी विजय थोड्याच वेळाकरिता होता. कारण कीं जेव्हा येशू त्याच्या तुरुंगातून गौरवी विजेता म्हणून बाहेर पडला, तेव्हा सैतानाला माहीत पडले कीं काही काळानंतर त्याला मरावे लागेल, आणि त्याचे राज्य ज्याच्या हक्काचे होते त्याच्याकडे जाईल. त्याने शोकविलाप केला व संतापाने त्याच्या अंगाची लाहीलाही झाली, कीं त्याने इतके सर्व प्रयास करूनही व त्याचे सामर्थ्य पणाला लावूनही त्याला येशूवर विजय मिळविता आला नव्हता, तर मानवाकरिता उद्धाराचा मार्ग उघडा केला गेला होता, आणि ज्या कोणाला पाहिजे तो त्या मार्गात जाऊन तारणप्राप्ति करून घेऊ शकणार होता.

काही थोडा वेळ सैतान दुःखी दिसला व हताश झाल्यासारखा वाटला. त्याने त्याच्या दूतांबरोबर विचारविनिमय करण्यासाठीं सभा घेतली कीं देवाच्या शासनाविरुद्ध कारवाई करण्याकरिता त्यांनी आता पुढे काय करावे. सैतान म्हणाला: तुम्ही मुख्य याजकांकडे व वडिलजनांकडे त्वरेने गेले पाहिजे. आपण त्यांना फसविण्यात आणि त्यांचे डोळे अंधळे करण्यात, व येशूविरुद्ध त्यांची मने कठीण करण्यात यशस्वी झालो. तो ढोंगी व फसवा आहे असा त्यांना विश्वास ठेवण्यास आपण लावले. ते रोमी पहारेकरी ख्रिस्त उठल्याचे आपल्याला नावडणारे वृत्त त्यांच्याकडे घेऊन जातील. आपण याजकांना आणि वडिलजनांना येशूचा द्वेष करायला व त्याचा खून करायला प्रवृत्त केले. आता त्यांच्यापुढे ही गोष्ट ठळक, ज्वलंत प्रकाशात ठेवा कीं ते त्याचे खूनी असल्याकारणाने, जर येशू उठल्याचे वृत्त सगळीकडे पसरले तर त्यांनी एका निर्दोष मनुष्याचा वध केल्याबद्दल लोक त्यांना धोंडमार करून ठार करतील.

मी पाहिले कीं दूतांचा थवा परत स्वर्गाकडे गेल्यानंतर आणि त्यांचे तेज व गौरव दूर झाल्यानंतर, रोमी पहारेकरी आडवे होते ते उठून बसले व पाहू लागले कीं त्यांचे इकडेतिकडे पाहणे सुरक्षित आहे कां. कबरेच्या द्वाराकडला भलामोठा धोंडा बाजूला सारल्याचे पाहून व येशू जिवंत झाल्याचे पाहून त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. मुख्य याजकांकडे आणि वडिलजनांकडे जाण्याची व त्यांनी जें काही पाहिले होते ती अद्‌भुत कथा त्यांना सांगण्याची त्यांनी घाई केली. तो अद्‌भुत अहवाल ऐकून त्या खून्यांच्या तोंडचे बळ पळाले व प्रत्येक चेहरा पांढराफटक पडला. त्यांनी जें केले होते त्याबद्दल ते अत्यंत भयभीत झाले. त्यांना जाणीव झाली कीं जर हा अहवाल खरा असला तर त्यांचा सर्वनाश झाल्यातच जमा आहे. काही थोडा वेळ त्यांना विचारच करता येईना, आणि काय करावे किंवा काय बोलावे हें न समजून ते स्तब्ध राहून एकमेकांकडे पाहू लागले. ते अशा कात्रीत सापडले होते कीं त्यांनाच दोषी ठरविले गेल्यावाचून ते विश्वास ठेवू शकत नव्हते. काय करावे याविषयीं बोलण्याकरिता ते एकत्र मिळून एका बाजूला गेले. त्यांनी विचार केला कीं

येशू जिवंत झाला आहे हें वृत्त जर सगळीकडे पसरले, आणि इतक्या आश्चर्यजनक गौरवाची बातमी पसरली कीं त्यापुढे पहारेकरी मृत माणसांप्रमाणे पडले होते, हें वर्तमान लोकांप्रत पोहंचले तर खात्रीने लोक अतिशय संतापतील आणि त्यांना ठार करतील. त्यांनी ही बाब गुप्त ठेवण्याकरिता सैनिकांना लाच द्यायचे ठरविले. त्यांनी त्यांना खूप पैसे देऊ करीत म्हटले कीं: तुम्ही असें म्हणा कीं त्याचे शिष्य रात्रीं आले आणि आम्ही झोपलो असतांना ते त्याला चोरून घेऊन गेले. आणि जेव्हा पहारेकऱ्यांनी विचारणा केली कीं त्यांच्या कामाच्या ठिकाणीं ते झोपले होते या गुन्ह्याबद्दल त्यांना काय शिक्षा होईल, तेव्हा याजक व वडिलजन म्हणाले कीं ते राज्यपालाचे मन वळवितील आणि त्यांचा बचाव करतील. पैशांखातर रोमी पहारेकऱ्यांनी त्यांची नीति विकली आणि याजकांचा व वडिलजनांचा सल्ला मानण्याचे कबूल केले.

जेव्हा येशूने क्रूसावर टांगलेल्या स्थितीत असतांना आरोळी मारली होती कीं: *पूर्ण झाले आहे,* तेव्हा खडकांना भेगा पडल्या होत्या, पृथ्वी हादरली होती, आणि काही कबरा हलविल्या जाऊन उघड्या झाल्या होत्या; कारण कीं जेव्हा येशू मरणावस्थेतून उठून जिवंत झाला आणि त्याने मृत्युवर व कबरेवर विजय मिळविला, जेव्हा तो त्याच्या बंदिगृहातून विजयी विजेता म्हणून बाहेर पडला, तेव्हा पृथ्वी हादरत असतांना व फिरली जात असतांना, आणि त्या पवित्र ठिकाणाभोवती स्वर्गाचे उत्कृष्ट गौरव सामावलेले असतांना, त्याच्या पाचारणाचे आज्ञापालन करून धार्मिक मृतांपैकी अनेकजण तो उठला आहे यासंबंधीची साक्ष देण्याकरिता त्याचे साक्षीदार म्हणून कबरांबाहेर पडले. ते कृपा पावलेले पुनरुत्थित पवित्रजन गौरवी देह धारण करून उठले. सृष्टिनिर्मितीच्या काळापासून तें ख्रिस्ताच्या काळापर्यंतच्या प्रत्येक युगात होऊन गेलेल्या निवडलेल्या व पवित्र जनांपैकी ते थोडके काहीजण होते. आणि इकडे मुख्य याजकलोक आणि परूशी लोक ख्रिस्ताचे पुनरुत्थान झाकून टाकण्यास बघत असतांना तिकडे देवाने येशूच्या पुनरुत्थानाची साक्ष देण्याकरिता आणि त्याचे गौरव जाहीर करण्याकरिता कबरांतून पवित्र जनांच्या एका आख्ख्या गटाचे पुनरुत्थान घडवून आणण्याची किमया केली.

ज्यांचे पुनरुत्थान घडवून आणले गेले ते वेगवेगळ्या आकारमानाचे व रुपाचे होते. मला माहिती दिली गेली कीं पृथ्वीवरील रहिवाश्यांची अवनति घडत गेली होती, व त्यांचे बळ आणि देखणेपण जास्तजास्त घटत गेले आहे. सैतानाकडे रोगआजाराचे व मृत्युचे सामर्थ्य आहे, आणि प्रत्येक युगात हा शाप जास्तजास्त उघडपणे दिसून आलेला आहे, आणि सैतानाचे सामर्थ्य जास्तजास्त स्पष्टपणे दिसत आहे. मेलेल्यांतून जिवंत केलेल्यांत काहीजण बाह्य रुपात आणि आकारमानात इतरांहून अधिक उमदे होते. मला सांगितले गेले कीं नोहाच्या आणि अब्राहामाच्या काळात जे जगले होते ते आकारमानात, देखणेपणात आणि बळात बऱ्याच अंशीं देवदूतांप्रमाणे होते. परंतु प्रत्येक पिढी जास्तजास्त कमकुंवत होत गेलेली आहे, आणि तिच्यावर रोगआजार जास्त प्रमाणात येत गेलेले आहेत, व त्यांचे आयुष्य त्यांच्या अगोदरच्या पिढ्यांपेक्षा अधिक अल्पकालीन होत गेले आहे. मनुष्यांना कसें त्रस्त करावयाचे व मानवजातिला कसें कमकुंवत करावयाचे हें तंत्र सैतान शिकत आलेला आहे.

ते पवित्रजन, जे येशूच्या पुनरुत्थानानंतर कबरांतून बाहेर पडले होते, ते अनेकांना भेटले आणि

त्यांनी त्यांना सांगितले कीं मानवाकरिता करावयाचे बलिदान पूर्ण झाले आहे, कीं यहूद्यांनी क्रूसावर खिळलेला येशू मेलेल्यांतून उठला आहे; आणि या वृत्तात भर घालून ते म्हणाले: आम्ही त्याच्यासोबत उठलो आहोत. त्यांनी साक्ष दिली कीं त्याच्या पराक्रमी सामर्थ्याने त्यांना त्यांच्या कबरांतून बाहेर बोलाविले गेले होते. खोटेपणाचे अहवाल जरी सर्वत्र पसरविले गेले होते, तरी सैतानाला, त्याच्या दूतांना, किंवा मुख्य याजकांना ही बाब गुप्त ठेवता आली नाही; कारण कीं हा पवित्र गट, ज्यांना त्यांच्या कबरांतून उठवून बाहेर आणले गेले होते, त्यांनी तें अद्‌भुत, हर्षभरित वृत्त सर्वत्र पसरविले; आणि येशूनेसुद्धा स्वतःस त्याच्या दुःख करणाऱ्या, अंतःकरण भंगलेल्या शिष्यांना दाखविले, आणि त्यांच्या भित्या दूर केल्या व त्यांना आनंदी व हर्षित केले.

हें वृत्त जसजसें एका नगरातून दुसऱ्या नगरात, आणि एका गांवाहून दुसऱ्या गांवात, पसरले, तसतसें यहूदी त्यांच्या जिवाच्या भीतिने घाबरले, आणि शिष्यांप्रीत्यर्थ असलेला त्यांचा धुमसणारा द्वेष त्यांनी उघड केला नाही. खोटे अहवाल पसरविण्यातच त्यांना एकमेव आशा दिसली. आणि हा खोटेपणा खरा असला तर किती बरे होईल अशी इच्छा करणारांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. पिलाताचा थरकाप झाला. येशू मेलेल्यांतून उठविला गेला आहे आणि त्याने त्याच्यासोबत इतर अनेकांना कबरांतून बाहेर आणले आहे या भक्कम साक्षीवर त्याने विश्वास ठेवला, आणि त्याची शांती कायमची ढळली. जगिक सन्मानाखातर, त्याचा पदाधिकार व त्याचा जीव गमावला जाण्याच्या भीतिखातर, त्याने येशूला मरायला लोकांकडे सुपुर्द केले होते. त्याची आता पूर्णपणे खात्री पटली कीं ज्याच्या रक्ताकरिता तो दोषी होता तो केवळ एक सामान्य, निर्दोष मनुष्यच नव्हता, तर तो देवाच्या पुत्राच्या रक्ताकरिता दोषी होता. पिलाताचे आयुष्य फार दुःखाचे झाले, शेवटपर्यंत त्याची दुर्दशा भयंकर होती. हताश व चिंताग्रस्त भावनेने त्याच्या मनातील प्रत्येक आशेची, आनंदाची भावना चिरडून टाकली. तो कोणाचे सांत्वन स्वीकारीना, आणि त्याचा मृत्यु अति भयंकर दुःखकष्टाचा झाला.

हेरोदाचे हृदय अधिकच कठीण झाले, आणि जेव्हा त्याने ऐकले कीं येशू उठला आहे, तेव्हा त्याला त्याबाबत विशेष असें काही वाटले नाही. त्याने याकोबाचा प्राण घेतला, आणि जेव्हा त्याने पाहिले कीं या कृतिने यहूदी खूष झाले, तेव्हा त्याने पेत्रालाही धरले, व त्याला ठार करण्याचा त्याचा इरादा होता. परंतु पेत्राकरिता देवाचे एक काम होते, आणि त्याने त्याचा देवदूत पाठविला व त्याची सोडवणूक केली. हेरोदावर न्याय्य पीडा आली. तो मोठ्या जमावापुढे स्वतःला उच्च करीत असतांना, त्या सर्वांच्या देखत देवाने त्याच्यावर प्रहार केला, आणि तो फार भयानक मृत्युने मरण पावला.

भल्या पहाटे, उषःकाल होण्यापूर्वी, पवित्र स्त्रिया येशूच्या शरीराला लावण्याकरिता सुगंधित मसाले घेऊन कबरेकडे आल्या, तेव्हा पाहा! कबरेच्या द्वारापासून तो जड धोंडा बाजूला काढून ठेवल्याचे त्यांना आढळले, आणि येशूचा देह तेथे नव्हता. त्यांची हृदये खचली, आणि त्यांना भय वाटू लागले कीं त्यांच्या शत्रुंनी तो देह नेलेला असावा. आणि, पाहा, शुभ्र वस्त्र परिधान केलेले दोन देवदूत त्यांच्या बाजूला उभे राहिले; त्यांचे चेहरे तेजस्वी होते व चमकत होते. पवित्र स्त्रियांचे उद्दिष्ट त्यांना समजत होते, आणि

त्यांनी त्यांना लगेच सांगितले कीं त्या येशूचा शोध करीत होत्या, परंतु तो तेथे नव्हता, तो उठला होता, आणि तो जेथे विसावला होता ती जागा त्या पाहू शकत होत्या. त्यांनी त्यांना जाऊन त्याच्या शिष्यांना सांगायला सांगितले कीं तो त्यांच्या अगोदर गालीलात जाईल. परंतु स्त्रिया घाबरल्या होत्या व आश्चर्यचकित झाल्या होत्या. त्या घाईघाईने शिष्यांकडे पळत गेल्या. शिष्य विलाप करीत होते आणि सांत्वन पावू शकत नव्हते कारण कीं त्यांच्या प्रभूला क्रूसावर खिळले गेले होते. स्त्रियांनी त्यांना पाहिलेल्या आणि ऐकलेल्या गोष्टी घाईघाईने सांगितल्या. तो उठला आहे यावर शिष्यांचा विश्वास बसेना, तरी, ते ती बातमी आणलेल्या स्त्रियांसोबत कबरेकडे घाईघाईने पळत गेले, आणि त्यांना आढळले कीं खरोखरीच येशू तेथे नव्हता. त्याची तागाची वस्त्रे तेथेच होती, परंतु येशू मेलेल्यांतून उठला आहे या शुभवृत्तावर त्यांचा विश्वासच बसेना. त्यांनी पाहिलेल्या गोष्टींबद्दल नवल करीत ते घरीं परतले, तसेंच स्त्रियांनी आणलेल्या वृत्ताबद्दल त्यांनी नवल केले. पण मरीया कबरेच्याच आसपास थांबली, व जें तिने पाहिले होते त्याबद्दल विचार करीत राहिली, आणि एखादे वेळीं तिची फसगत झाली असेल या विचाराने तिला अति दुःख झाले. तिला वाटले कीं तिच्यापुढे आणखी नवी संकटे उभी होती. तिचे दुःख अनावर झाले, आणि ती मोठमोठ्याने शोकविलाप करू लागली. तिने कबरेत पुन्हा पाहिले, आणि तिला शुभ्र वस्त्रातले दोन देवदूत दिसले. त्यांचे चेहरे तेजस्वी व चमकणारे होते. येशू जेथे विसावला होता तेथे एक त्याच्या मस्तकाशीं व दुसरा त्याच्या पायांशीं बसला होता. ते तिच्याशीं ममतेने बोलले, आणि ती कां रडत होती असें त्यांनी तिला विचारले. तिने उत्तर दिले: त्यांनी माझ्या प्रभूला नेले आहे, आणि त्यांनी त्याला कोठे ठेवले आहे तें मला माहीत नाही.

आणि ती कबरेपासून वळत असतांना तिने येशूला तिच्या शेजारीं उभे राहिलेले पाहिले; पण तिने त्याला ओळखले नाही. येशू मरीयेशीं ममतेने बोलला, आणि त्याने तिला तिच्या दुःखाचे कारण विचारले, आणि ती कोणाला शोधत होती तें विचारले. ती गृहित धरून चालली कीं तो माळी होता, आणि तिने त्याची काकुळतीने विनवणी केली कीं जर त्याने तिच्या प्रभूला नेले असेल, तर त्याने त्याला कुठे ठेवले हें तिला सांगावे, आणि ती त्याला घेऊन जाईल. येशू तिच्याशीं त्याच्याच स्वतःच्या स्वर्गीय वाणीने बोलला, आणि म्हणाला: मरीये. त्या प्रिय वाणीच्या स्वरांशीं ती परिचित होती, आणि तिने चटकन उत्तर दिले: प्रभो! आणि अत्यानंदाने व हर्षाने ती त्याला आलिंगन देणार होती; पण येशू मागे सरला, आणि म्हणाला: मला स्पर्श करू नको, कारण मी अद्यापि माझ्या पित्याकडे वर जाऊन आलेलो नाही. पण माझ्या बांधवांकडे जा आणि त्यांना म्हण, मी माझ्या पित्याकडे, आणि तुमच्या पित्याकडे, आणि माझ्या देवाकडे, आणि तुमच्या देवाकडे वर जात आहे. ती हर्षाने तें चांगले वृत्त घेऊन शिष्यांकडे त्वरेने गेली. येशू चटकन वर त्याच्या पित्याकडे गेला, त्याच्या तोंडून ऐकण्याकरिता कीं त्याने त्याचे बलिदान स्वीकारले आहे, आणि त्याने सर्व गोष्टी चांगल्या केल्या आहेत; त्याच्या पित्याकडून स्वर्गातील व पृथ्वीवरील सर्व सत्तासामर्थ्य मिळविण्याकरिता तो गेला.

देवाच्या पुत्राभोवती देवदूत ढगाप्रमाणे जमले, आणि त्यांनी सनातन प्रवेशद्वारांना उघडायला

सांगितले, कीं गौरवाचा राजा आत यावा. मी पाहिले कीं जेव्हा येशू त्या तेजस्वी, स्वर्गीय दूतजमावासोबत होता, आणि त्याच्या पित्याच्या समक्षतेत होता आणि देवाचे गौरव त्याला घेरून होते, तेव्हा तो पृथ्वीवरील त्याच्या बिचाऱ्या शिष्यांना विसरला नव्हता; तर त्याच्या पित्यापासून त्याने सामर्थ्य मिळविले, तें अशासाठीं कीं त्याने त्यांच्याकडे परतावे आणि तो त्यांच्यासोबत असतांना त्याने त्यांना सामर्थ्य प्रदान करावे. त्याच दिवशीं तो परतला आणि त्याने स्वतःस त्याच्या शिष्यांना दाखविले. मग त्याने त्यांना त्याला स्पर्श करू दिला, कारण कीं तो आरोहण करून वर त्याच्या पित्याकडे गेला होता, आणि त्याने सामर्थ्य मिळविले होते.

परंतु त्या वेळेस थोमा उपस्थित नव्हता. तो नम्रपणे शिष्यांकडून शुभवृत्त स्वीकारीना; तर खंबीरपणे आणि आत्मविश्वासाने त्याने पुन्हापुन्हा जाहीर केले कीं जोंवर तो खिळ्यांच्या खूणांमध्ये त्याची बोटे घालत नाही, आणि त्याच्या कुशीत भोसकल्या गेलेल्या क्रूर भाल्याच्या ठिकाणीं त्याचा हात घालत नाही, तोंवर तो विश्वास ठेवणारच नाही. असें म्हणण्यात त्याने त्याच्या बांधवांवर त्याचा विश्वास नसल्याचे दाखवून दिले. आणि जर सर्वांनी तोच पुरावा मागितला, तर फार थोडके जण येशूचा स्वीकार करतील, व त्याच्या पुनरुत्थानावर विश्वास ठेवतील. परंतु देवाची इच्छा अशी होती कीं शिष्यांकडून हें वृत्त एकाकडून दुसऱ्याला दिले जावे, आणि ज्यांनी पाहिले व ऐकले त्यांच्या तोंडून मिळालेले वृत्त अनेकांनी स्वीकारावे. अशा अविश्वासाबद्दल देवाला संतोष वाटला नाही. जेव्हा येशू पुन्हा त्याच्या शिष्यांना भेटला, त्यावेळीं थोमा त्यांच्यासोबत होता. ज्या क्षणीं त्याने येशूला पाहिले, त्या क्षणीं त्याने लगेच विश्वास ठेवला. पण त्याने जाहीर केले होते कीं भावनांना दृश्य गोष्टींची जोड मिळणारा पुरावा मिळाल्याशिवाय त्याचे समाधान होणार नाही, आणि येशूने त्याला पाहिजे होता तो पुरावा दिला. थोमा भावना उचंबळून म्हणाला: माझा प्रभू आणि माझा देव. पण येशूने थोमाचा त्याच्या अविश्वासाबद्दल निषेध केला. तो त्याला म्हणाला: थोमा, तूं मला पाहिले आहेस म्हणून तूं विश्वास ठेवला आहेस; जे न पाहता तरीसुद्धा विश्वास ठेवतात ते धन्य.

तदनुसार, मी पाहिले कीं, ज्यांना पहिल्या व दुसऱ्या देवदूतांच्या संदेशांत[१] अनुभव मिळालेला नाही त्यांनी ज्यांना तो अनुभव आलेला आहे व ज्यांनी हें संदेश अनुसरले आहेत त्यांच्याकडून तें स्वीकारले पाहिजेत. जसा येशू वधस्तंभीं खिळला गेला होता, त्याप्रमाणे, मी पाहिले, कीं हें संदेश खिळले गेले आहेत. आणि जसें शिष्यांनी जाहीर घोषणा केली होती कीं आकाशाखाली मनुष्यांमध्ये दुसऱ्या कोणाला दिले गेलेले नाही अशा येशूच्या नांवावाचून दुसऱ्या कोणापासून उद्धार नाही, त्याचप्रमाणे देवाच्या सेवकांनीसुद्धा विश्वासूपणे आणि निर्भयपणे जाहीर केले पाहिजे कीं तिसऱ्या संदेशाशीं[२] जोडून जीं सत्ये आहेत त्यांतला काही भागच स्वीकारणाऱ्यांनी देवाने जो पहिला, दुसरा आणि तिसरा संदेश दिला आहे तें सर्वच संदेश आनंदाने ग्रहण केले पाहिजेत, नाहीतर त्यांना या संदेशांच्या कोठल्याही बाबतीत कार्यभाग किंवा आशीर्वाद मिळणार नाही.

मला दाखविण्यात आले कीं ज्यावेळीं पवित्र स्त्रिया येशूचे पुनरुत्थान झाले आहे हें वृत्त पसरवीत होत्या, तेव्हा रोमी पहारेकरी त्यांच्या तोंडीं मुख्य याजकांनी आणि वडिलजनांनी दिलेला खोटेपणा पसरवीत

होते कीं ते झोपले असतांना येशूचे शिष्य रात्रीं आले आणि त्यांनी येशूचे शरीर चोरून नेले. सैतानाने ही लबाडी मुख्य याजकलोकांच्या मनांत आणि मुखांत घातली होती, आणि लोक त्यांचा शब्द मानायला तयारच होते. पण देवाने ही बाब पक्की केली होती, आणि ही महत्त्वाची घटना, जिच्यावर उद्धार अवलंबून आहे, इतकी शंकेपलिकडे ठेवली कीं याजकांना व वडिलजनांना ती झाकून टाकता येणे अशक्य झाले. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाची साक्ष देण्याकरिता मेलेल्यांतून साक्षीदार उठविले गेले.

येशू त्याच्या शिष्यांसोबत चाळीस दिवस राहिला, त्यांची हृदये त्याने हर्षाने व आनंदाने भरली, व देवाच्या राज्याची सत्यस्थिती त्यांच्यापुढे अधिक पूर्णपणे उघड केली. त्याने त्यांना साक्ष देण्याचे सेवाकार्य दिले कीं त्यांनी त्याच्या दुःखभोगासंबंधीच्या, मृत्युसंबंधीच्या आणि पुनरुत्थानासंबंधीच्या ज्या गोष्टी पाहिल्या होत्या आणि ऐकल्या होत्या त्यांची साक्ष द्यावी; कीं त्याने पापांकरिता बलिदान केले होते, यासाठीं कीं ज्या कोणाला पाहिजे असेल ते त्याच्याकडे येऊन जीवन मिळवू शकतील. त्याने विश्वासूपणे व ममतेने त्यांना सांगितले कीं त्यांचा छळ होईल व त्यांना दुःखत्रास भोगावे लागतील; परंतु असेंही सांगितले कीं त्यांच्या अनुभवाकडे निर्देश करतांना त्यांना समाधान वाटेल, आणि तो (येशू) त्यांच्याशीं जें शब्द बोलला होता त्यांचे स्मरण करून त्यांना दिलासा वाटेल. त्याने त्यांना सांगितले कीं त्याने सैतानाच्या मोहांवर विजय मिळविला होता, आणि त्याच्या सर्व संकटांत व दुःखभोगांत त्याने जय टिकवून ठेवला होता, कीं सैतानाला इतःपर त्याच्यावर मुळींसुद्धा सामर्थ्य असू नये; पण तो त्याचे मोहपाश आणि सामर्थ्य त्यांच्याविरुद्ध आणि जे कोणी त्याच्या नामावर विश्वास ठेवतील त्या सर्वांच्या विरुद्ध अधिक सरळपणे आणील. त्याने त्यांना सांगितले कीं जसा त्याने विजय मिळविला, तसा ते विजय मिळवू शकतील. येशूने त्याच्या शिष्यांना चमत्कार करण्याचे सामर्थ्य दिले, आणि त्यांना सांगितले कीं जरी दुष्ट मनुष्यांना त्यांच्या देहांवर सत्ता चालविता येईल, तरी काहीकाही वेळां तो त्याचे देवदूत पाठवून त्यांची सुटका करील; त्यांचे सेवाकार्य सिद्धिस गेल्याशिवाय त्यांचे प्राण कोणी घेऊ शकणार नाही. आणि जेव्हा त्यांची साक्ष पूर्ण होईल, तेव्हा एखादे वेळीं त्यांनी दिलेल्या साक्षी शिक्कामोर्तब करण्यासाठीं त्यांच्या जिवाची मागणी होईल. त्याच्या चिंतातुर अनुयायांनी त्याच्या शिकवणी आनंदाने ऐकल्या. त्याच्या पवित्र मुखातून बाहेर पडलेल्या प्रत्येक शब्दावर त्यांनी उत्सुकतेने मेजवानी केली. तेव्हा त्यांना खात्रीपूर्वक माहीत झाले कीं तो जगाचा उद्धारक होता. प्रत्येक शब्द त्यांच्या हृदयांत खोलवर गेला व प्रत्येक शब्दाचे मर्म त्यांना खोलवर कळले, आणि त्यांना दुःख वाटले कीं त्यांच्या धन्य, स्वर्गीय गुरूपासून त्यांना विभक्त होणे भाग पडणार आहे; कीं काही थोड्या काळानंतर त्यांना त्याच्या मुखाचे सांत्वनदायीं, कृपादायीं शब्द पुन्हा ऐकायला मिळणार नाहीत. परंतु पुन्हा त्यांची अंतःकरणे प्रीतिने आणि आत्यंतिक हर्षाने भरली गेली जेव्हा येशूने त्यांना सांगितले कीं तो जाऊन त्यांच्यासाठीं महाल तयार करणार आहे, आणि मग तो पुन्हा येईल व त्यांना घेऊन जाईल, कीं त्यांनी सदासर्वकाळ त्याच्यासोबत असावे. त्याने त्यांना सांगितले कीं तो त्यांच्याकडे सांत्वनदायीं पवित्र आत्म्यास त्यांचे मार्गदर्शन करण्यास, त्यांना आशीर्वादित करण्यास व त्यांना सर्व सत्यात घेऊन जाण्यास पाठवील; आणि त्याने त्याचे हात उंचावून त्यांना आशीर्वाद दिला.

टीप १ - पहा: *प्रगटीकरण* १४:६-८.

या पुस्तकाच्या २३व्या व २४व्या अध्यायांत स्पष्टिकरण दिले आहे.

टीप २ - पहा: *प्रगटीकरण* १४:९-१२.

या पुस्तकाच्या २८व्या अध्यायात स्पष्टिकरण दिले आहे.

पहा:

*मत्तय* २७:५२-५३; अध्याय २८; *मार्क* १६:१-१८;
*लूक* २४:१-५०; *योहान*, अध्याय २०; *प्रेषितांची कृत्ये*, अध्याय १२.

# अध्याय ११
# ख्रिस्ताचे स्वर्गारोहण

येशू कधीं त्याच्या पित्याकडे आरोहण करून येतो त्या विजयी घटकेकरिता सबंध स्वर्ग प्रतीक्षा करीत होता. गौरवाच्या राजाला नेण्याकरिता आणि त्याला स्वर्गाला विजयात घेऊन जाण्याकरिता देवदूत आले. येशूने त्याच्या शिष्यांना आशीर्वाद दिल्यानंतर तो त्यांच्यापासून विभक्त झाला व वर घेतला गेला. आणि वरच्या मार्गावर मार्गक्रमण करीत असतांना, त्याच्या पुनरुत्थानाच्या वेळीं ज्या मृत्युच्या बंदिवानांच्या मोठ्या जमावाला कबरांतून उठविले गेले होते ते त्याच्या मागेमागे गेले. स्वर्गीय देवदूतांचा थवा त्याच्या तैनातीस होता; आणि स्वर्गात असंख्य देवदूत त्याच्या आगमनाची प्रतीक्षा करीत होते. पवित्र नगरीकडे त्यांचे आरोहण झाले तेव्हा येशूला घेऊन जाणारे देवदूत आनंदातिशयाने म्हणाले: अहो वेशींनो, आपल्या कमानी उंच करा; सार्वकालीन द्वारांनो, उंच व्हा; म्हणजे गौरवाचा राजा आत येईल. नगरीतले देवदूत, जे त्याच्या येण्याची वाटच पाहत होते, ते हर्षाने हुरळून जाऊन उच्च स्वरात म्हणाले: हा गौरवाचा राजा कोण? येशूच्या सोबतीने येणाऱ्या देवदूतांनी विजयी स्वरात उत्तर दिले: बलवान व पराक्रमी परमेश्वर! युद्धात पराक्रमी परमेश्वर तोच! अहो वेशींनो, आपल्या कमानी उंच करा; सार्वकालीन द्वारांनो, उंच व्हा; म्हणजे गौरवाचा राजा आत येईल. पुन्हा स्वर्गीय दूतजमाव उच्च स्वरात म्हणतात: हा गौरवाचा राजा कोण? सोबतीचे देवदूत संगीतासारख्या मधूर स्वरात उत्तर देतात: सेनाधीश परमेश्वर! हाच गौरवाचा राजा आहे! आणि स्वर्गीय मिरवणूक नगरात गेली. तेव्हा सर्व दूतजमावांनी देवाच्या पुत्राला, त्यांच्या गौरवशाली सेनापतिला, घेरले, आणि मनांतल्या सखोल भक्तिने त्याच्यापुढे नमन करून त्यांचे चकाकणारे मुकुट त्याच्या पायांशीं ठेवले. आणि मग त्यांनी त्यांच्या सोनेरी वीणांवर हळूवार हाताने गोड, मधूर सूर काढून, जो वधला गेला होता पण तरी वैभवात व गौरवात पुन्हा जगत आहे त्या कोंकऱ्याच्या स्तवनांनी, त्यांच्या उत्कृष्ट संगीताने आणि गायनांनी, सबंध स्वर्गाला भरून टाकले.

शिष्य त्यांच्या स्वर्गारोहण होणाऱ्या प्रभूचे शेवटले दर्शन घेण्याकरिता दुःखाने स्वर्गाच्या दिशेने कसें बघत होते तें दृश्य त्यानंतर मला दाखविले गेले. त्यांच्या बाजूला शुभ्र पोशाख परिधान केलेले दोन देवदूत होते, आणि ते त्यांना म्हणाले: अहो गालीलकरांनो, तुम्ही आकाशाकडे कां पाहात उभे राहिला? हा जो येशू तुम्हांपासून वर आकाशात घेतला गेला आहे तोच, तुम्ही त्याला जसें आकाशात जातांना पाहिले, तसाच येईल. शिष्यांनी, येशूच्या आईसमवेत, देवाच्या पुत्राचे स्वर्गारोहण पाहिले, आणि त्यांनी ती रात्र

त्याच्या अद्भुत कृत्यांविषयीं बोलण्यात घालविली व अल्प काळात ज्या अनोख्या व गौरवी गोष्टी घडून आल्या होत्या त्यांच्याबद्दल बोलण्यात घालविली.

सैतानाने त्याच्या दूतांसोबत विचारविनिमय केला, आणि देवाच्या शासनाविरुद्धच्या कटु द्वेषाने त्यांना सांगितले कीं जोंवर पृथ्वीवर त्याचे सामर्थ्य व अधिकार टिकून राहील तोंवर त्यांनी येशूच्या अनुयायांविरुद्ध दहापट अधिक जोराने प्रयत्न केले पाहिजेत. त्यांचे येशूपुढे काहीच चालले नव्हते, पण शक्यतों त्यांनी त्याच्या अनुयायांना उलथून टाकले पाहिजे, आणि प्रत्येक पिढीतून त्याची कामगिरी पुढे नेली पाहिजे; जे येशूवर, त्याच्या पुनरुत्थानावर आणि स्वर्गारोहणावर विश्वास ठेवतील त्यांना मोहजालांत अडकविले पाहिजे. सैतानाने त्याच्या दूतांना सांगितले कीं येशूने त्याच्या शिष्यांना त्यांना (भुतांना) मानवी देहांतून काढून टाकण्याचे, त्यांचा निषेध करण्याचे, आणि तो ज्यांच्यावर पीडा आणील त्या पीडितांना पीडांतून बरे करण्याचे सामर्थ्य दिले होते. मग सैतानाचे दूत गर्जणाऱ्या सिंहांप्रमाणे येशूच्या अनुयायांना नष्ट करायला पाहत त्यांच्या कामगिरीवर गेले.

पहा: *स्तोत्र* २४:७-१०; *प्रेषितांची कृत्ये* १:१-११.

# अध्याय १२
# ख्रिस्ताचे शिष्य

शिष्यांनी मोठ्या सामर्थ्याने क्रूसखांबीं दिलेल्या व पुनरुत्थित झालेल्या उद्धारकाची घोषणा केली. त्यांनी आजाऱ्यांना बरे केले, जन्मापासून पंगु असलेल्या मनुष्यालासुद्धा बरे केले आणि तो त्यांच्यासोबत सर्व लोकांच्या देखत चालत, उड्या मारीत व देवाची स्तुति करीत मंदिरात गेला. ही बातमी सगळीकडे पसरली, आणि लोक शिष्यांभोवती गर्दी करू लागले. अनेकजण पळतपळत आले; व्याधिमुक्त केल्याच्या या चमत्काराने सर्वांना फार नवल वाटले आणि ते आश्चर्य करू लागले.

जेव्हा येशूचे मरण झाले तेव्हा मुख्य याजकांना वाटले होते कीं इतःपर त्यांच्यामध्ये चमत्कार घडवून आणले जाणार नाहीत, उचंबळून आलेला उत्साह मावळेल, आणि लोक पुन्हा मानवी रूढिंकडे वळतील. परंतु, पहा! अगदी त्यांच्या मध्ये, शिष्य चमत्कार करीत होते, आणि लोक आश्चर्यचकित होऊन त्यांच्याकडे नवलाईने पहात होते. येशूला तर क्रूसखांबीं ठार केले गेले होते, मग शिष्यांना हें सामर्थ्य कोठून मिळाले याबद्दल त्यांना विस्मय वाटला. जेव्हा तो जिवंत होता तेव्हा त्यांना वाटले होते कीं तो त्याच्या शिष्यांना सामर्थ्य देत होता; जेव्हा येशूचा मृत्यु झाला, तेव्हा त्या चमत्कारांचा शेवट होईल अशी त्यांची अपेक्षा होती. पेत्राला त्यांची गोंधळलेली मनःस्थिती कळत होती, आणि तो त्यांना म्हणाला: अहो इस्राएल लोकांनो, ह्याचे आश्चर्य कां करता? अथवा आम्ही आपल्या सामर्थ्याने किंवा सुभक्तीने ह्याला चालावयास लावले आहे असें समजून आम्हांकडे निरखून कां पाहता? अब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांचा देव, आपल्या पूर्वजांचा देव, ह्याने आपला सेवक, येशू, ह्याचे गौरव केले आहे; त्याला तुम्ही धरले व पिलाताने त्याला सोडून देण्याचा निश्चय केला असताही त्याच्यासमक्ष तुम्ही त्याला नाकारले. जो पवित्र व नीतिमान त्याला तुम्ही नाकारले, आणि खूनी पुरुष आम्हांला द्या अशी मागणी केली. आणि तुम्ही जीवनाच्या अधिपतीला जिवे मारले; पण देवाने त्याला मेलेल्यांमधून उठविले ह्याचे आम्ही साक्षी आहो. पेत्राने त्यांना सांगितले कीं येशूवरील विश्वासामुळें ह्या माणसाला अगदीच सुदृढ बनविले होते जो पूर्वी असहाय्य लंगडा होता.

मुख्य याजकांना आणि वडिलजनांना हें शब्द सहन झाले नाहीत. त्यांनी शिष्यांना पकडले आणि तुरुंगात ठेवले. परंतु हजारोंचा पालट घडून आला, आणि शिष्यांच्या तोंडून केवळ एक भाषण ऐकून त्यांनी येशूच्या पुनरुत्थानावर व स्वर्गारोहणावर विश्वास ठेवला. मुख्य याजक आणि वडिलजन गोंधळून गेले. त्यांनी लोकांची मने आपणाकडे वळविण्याकरिता येशूचा वध केला होता; परंतु आता तर ही बाब पहिल्यापेक्षा जास्तच वाईट झाली होती. शिष्य त्यांना उघडपणे देवाच्या पुत्राचे खूनी म्हणत होते व त्यांच्यावर खूनाचा

आरोप करीत होते, आणि ह्या गोष्टी कोणत्या थराला जातील याचा त्यांना अदमास करता येईना, किंवा लोक त्यांच्याकडे कोणत्या दृष्टिने पाहू लागतील तें त्यांना समजेना. त्यांनी शिष्यांनाही आनंदाने मारून टाकले असते; पण लोक त्यांना दगडमार करतील या भीतिने तसें करण्यास ते धजेनात. त्यांनी शिष्यांना बोलाविले, आणि त्यांना सभेपुढे आणण्यात आले. ज्या माणसांनी मोठ्या आनंदाने नीतिमान येशूच्या रक्ताकरिता ओरड केली होती, तीच तीं माणसे तिथे होती. त्यांनी पेत्राचा डरपोकपणे येशूचा शापोच्चारासहित व शपथांसहित केलेला नकार ऐकला होता, जेव्हा तो त्याच्या शिष्यांपैकी एक असल्याचा आरोप त्याच्यावर केला गेला होता. त्यांनी पेत्राला घाबरविण्याचा विचार केला; पण आता त्याचा पालट झालेला होता. येशूचे नाम उंचविण्याची पेत्राला इथे संधी दिली गेली. त्याने एकदा त्याला नाकारले होते; पण त्या घाईगडबडीत केलेल्या डरपोक नकाराचा डाग तो आता काढून टाकू शकत होता, आणि ज्या नामाचा त्याने नकार केला होता त्या नामाचा सन्मान करू शकत होता. त्यावेळीं पेत्राच्या हृदयीं कोठल्याही भयांना स्थान नव्हते; पण पवित्र धैर्याने, आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने, त्याने निर्भयतेने त्यांना जाहीर केले कीं ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले, ज्याला देवाने मेलेल्यांमधून उठविले, त्या नासोरी येशू ख्रिस्ताच्या नांवाने हा मनुष्य बरा होऊन तुमच्यापुढे उभा राहिला आहे. तुम्ही बांधणाऱ्यांनी तुच्छ मानलेला जो दगड कोनशिला झाला तो हाच आहे; आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असें दुसरे कोणतेंही नांव आकाशाखाली मनुष्यांमध्ये दिलेले नाही.

लोकांना पेत्राच्या व योहानाच्या धीटपणाचे आश्चर्य वाटले. त्यांनी विशेष नोंद घेतली कीं ते येशूसोबत राहिले होते; कारण त्यांची उमदी, निर्भय वागणूक येशूच्या वागणुकीसमान असल्याचे जाणवत होते जेव्हा त्याचा त्याच्या खून्यांनी छळ केला होता. पेत्राने येशूला नाकारल्यानंतर येशूने करुणेच्या व दुःखाच्या एका नजरेने पेत्राचा निषेध केला होता, आणि आता तो धैर्याने त्याच्या प्रभूचा अंगिकार करीत होता तेव्हा पेत्राला दैवी मान्यता मिळाली व आशीर्वाद प्राप्त झाला. येशूच्या मान्यतेचे चिन्ह म्हणून तो पवित्र आत्म्याने भरला गेला.

शिष्यांचा मुख्य याजकांना जो द्वेष वाटत होता तो प्रगट करण्यास ते धजत नव्हते. त्यांनी त्यांना सभेच्या बाहेर जाऊन थांबण्याचा आदेश दिला, आणि आपसांत चर्चा करून ते म्हणू लागले: ह्या माणसांना आपण काय करावे? कारण त्यांच्याकडून खरोखरच प्रसिद्ध चमत्कार घडला आहे हें सर्व यरुशलेमकरांस कळून चुकले आहे; तेव्हा तें आपणांला नाकारता येत नाही. हें चांगले कार्य पसरू देण्यास ते घाबरत होते. जर तें पसरले, तर याजकांची सत्ता गमावली जाईल, आणि लोक त्यांच्याकडे येशूचे खूनी म्हणून पाहतील. ते जास्तीत जास्त एवढेच करण्यास धजत होते कीं त्यांना धमकवावे, आणि त्यांना मरायचे नसेल तर त्यांनी याउप्पर येशूच्या नांवे बोलू नये असा हुकूम त्यांना द्यावा. पण पेत्राने धैर्याने जाहीर केले कीं त्यांनी पाहिलेल्या आणि ऐकलेल्या गोष्टींविषयीं बोलल्याखेरीज ते राहू शकत नव्हते.

येशूच्या सामर्थ्याने शिष्य त्यांच्याकडे आणल्या गेलेल्या प्रत्येक पीडिताला व आजाऱ्याला बरे करीत राहिले. मुख्य याजकलोक आणि वडिलजन, आणि त्यांच्यासोबत विशेष रित्या गोवल्या गेलेल्यांना,

अतिशय भय वाटू लागले. क्रूसखांबीं वधलेल्या, पुनरुत्थित झालेल्या व स्वर्गारोहण केलेल्या उद्धारकाच्या ध्वजाखाली रोजच्या रोज शेकडों आपल्या नांवांची नोंदणी करीत होते. याजकांनी प्रेषितांना तुरुंगात बंद करून ठेवले, आणि आशा केली कीं उचंबळलेला उत्साह मावळेल. सैतानाचा विजय झाला, आणि वाईट दूतांना विजयानंद झाला; पण देवाच्या देवदूतांना पाठविले गेले आणि त्यांनी तुरुंगाची दारे उघडली, आणि, मुख्य याजकाच्या आणि वडिलजनांच्या आज्ञेविरुद्ध त्यांना मंदिरात जाण्याचा व या जीवनाचे सर्व शब्द बोलण्याचा आदेश दिला. सभा एकत्र जमली आणि त्यांनी त्यांच्या कैद्यांना आणण्याचा आदेश दिला. अधिकाऱ्यांनी तुरुंगाची दारे उघडली; पण त्यांना पाहिजे होते ते कैदी तेथे नव्हते. ते याजकांकडे आणि वडिलजनांकडे परतले, आणि त्यांना म्हणाले: बंदिशाळा चांगल्या व्यवस्थेने बंद केलेली आणि दरवाजांपाशीं पहारेकरी उभे राहिलेले आम्हांला आढळले, परंतु तुरुंग उघडल्यावर आम्हांला आंत कोणी सापडले नाही. इतक्यात कोणीतरी येऊन त्यांना असें सांगितले कीं: पाहा, ज्या माणसांना तुम्ही तुरुंगात ठेवले होते ते तर मंदिरात उभे राहून लोकांना शिक्षण देत आहेत. तेव्हा सरदाराने शिपायांसह जाऊन त्यांना जुलूम न करता आणले; कारण लोक आपणाला दगडमार करतील असें त्यांना भय वाटत होते. त्यांनी त्यांना आणून न्यायसभेपुढे उभे केले. तेव्हा प्रमुख याजकाने त्यांना विचारले: ह्या नांवाने शिक्षण देऊ नका असें आम्ही तुम्हांला निक्षून सांगितले होते कीं नाही? तरी पाहा, तुम्ही आपल्या शिकवणीने यरुशलेम भरून टाकले आहे आणि ह्या मनुष्याच्या रक्तपाताचा दोष आम्हांवर आणू पाहत आहा.

ते ढोंगी होते, आणि देवावर भक्ति करण्यापेक्षा त्यांना मनुष्यांची स्तुति अधिक प्रिय होती. त्यांची हृदये कठीण झालेली होती, आणि प्रेषितांनी केलेली सर्वांत सामर्थ्यशाली कृत्येसुद्धा त्यांना केवळ संतप्तच करीत होती. त्यांना माहीत होते कीं जर शिष्यांनी येशूची घोषणा केली, त्याच्या क्रूसखांबावर वधले जाण्याविषयीं, त्याच्या पुनरुत्थानाविषयीं आणि स्वर्गारोहणासंबंधी सांगितले, तर त्यांच्यावर दोष पक्का होईल आणि ते त्याचे खूनी होते असें जाहीर होईल. जेव्हा ते आवेशाने ओरडले होते कीं, त्याचे रक्त आमच्यावर असो आणि आमच्या मुलांबाळांवर असो, तेव्हा त्यांनी जितकी तयारी दाखविली होती तितके ते येशूच्या रक्ताचा दोष स्वीकारायला तयार नव्हते.

प्रेषितांनी धीटपणे जाहीर केले कीं त्यांनी मनुष्यांपेक्षा देवाचे आज्ञापालन करणे हें त्यांचे कर्तव्य आहे. पेत्र म्हणाला: ज्या येशूला तुम्ही खांबावर टांगून मारले त्याला आपल्या पूर्वजांच्या देवाने उठविले; त्याने इस्राएलाला पश्चात्ताप व पापांची क्षमा ही देणगी देण्याकरिता देवाने त्याला आपल्या उजव्या हाताशीं अधिपति व तारणारा असें उच्च पद दिले. ह्या गोष्टींविषयीं आम्ही साक्षी आहो आणि देवाने आपल्या आज्ञा पाळणाऱ्यांना जो पवित्र आत्मा दिला आहे तोही साक्षी आहे. हें ऐकून ते खूनी चिडून गेले. प्रेषितांना ठार करून त्यांचे हात परत रक्ताने माखण्याची त्यांची इच्छा होती. ते हें कसें करावे याकरिता योजना करीत असतांना, देवाकडून एक देवदूत गमलिएलाच्या हृदयावर कार्य करण्यास पाठविला गेला कीं त्याने मुख्य याजकाला आणि शास्त्र्यांना सल्लामसलत द्यावी. गमलिएल म्हणाला: ह्या माणसांपासून दूर राहा व त्यांना जाऊ द्या; कारण हा बेत किंवा हें कार्य मनुष्यांचे असल्यास नष्ट होईल; परंतु

तें देवाचे असल्यास तुम्हांला तें नष्ट करता यावयाचे नाही; तुम्ही मात्र देवाचे विरोधी ठराल. याजकांच्या आणि वडिलजनांच्या मनांवर वाईट दूत कार्य करीत होते, यासाठीं कीं त्यांनी प्रेषितांचा वध करावा; परंतु देवाने त्याचा देवदूत पाठवून अशा प्रकारें त्यांस प्रतिबंध केला कीं त्यांच्यातल्याच एकाने शिष्यांच्या बाजूने आवाज उठविला.

प्रेषितांचे सेवाकार्य संपले नव्हते. त्यांना येशूच्या नामाची साक्ष देण्याकरिता आणि त्यांनी ज्या गोष्टी पाहिल्या व ऐकल्या होत्या त्यांची साक्ष देण्याकरिता राजांपुढे आणले जावयाचे होते. परंतु या मुख्य याजकांनी व वडिलजनांनी त्यांना जाऊ देण्यापूर्वी त्यांना मारहाण केली आणि येशूच्या नांवात इतःपर त्यांनी बोलू नये अशी ताकीद दिली. ते तर त्या प्रिय नांवासाठीं आपण अपमानास पात्र ठरविले गेलो म्हणून देवाची स्तुति करीत न्यायसभेपुढून निघून गेले. त्यांनी त्यांचे कार्य चालूच ठेवले, ते मंदिरात उपदेश देत राहिले आणि ज्या कोणत्या घरीं त्यांना निमंत्रण केले गेले तेथे शिकवीत गेले. देवाचे वचन वाढले व बहुगुणित झाले. सैतानाने मुख्य याजकांना व वडिलजनांना रोमी पहारेकऱ्यांना लाच देऊन खोटेपणाने बोलायला प्रवृत्त केले होते कीं ते झोपले असतांना शिष्यांनी येशूला चोरून नेले. ह्या लबाडीने सत्य लपविले जावे अशी त्यांनी आशा केली होती; परंतु, पहा, त्यांच्याभोवती सगळीकडे येशूच्या पुनरुत्थानाचे पुरावे उत्पन्न होत होते. शिष्य धैर्याने त्याची जाहीर घोषणा करीत होते, आणि त्यांनी पाहिलेल्या व ऐकलेल्या गोष्टींची साक्ष देत होते, आणि येशूच्या नामाने ते मोठमोठे चमत्कार करीत होते. जेव्हा लोकांना देवाच्या पुत्रावर त्यांचे सामर्थ्य दाखवू दिले होते तेव्हा ज्यांनी येशूचे रक्त स्वीकारण्याची इतकी तयारी दाखविली होती त्यांच्यावर येशूच्या रक्ताचा दोष त्यांनी धीटपणे लादला.

मी पाहिले कीं देवाच्या देवदूतांना खास सेवाकार्य दिले गेले कीं त्यांनी त्या पवित्र, महत्त्वाच्या सत्यांचे विशेष काळजीने रक्षण करावे, जीं सत्ये प्रत्येक पिढीत ख्रिस्ताच्या शिष्यांना धीर देण्याकरिता जिवाचा नांगर अशी बनणार होती.

पवित्र आत्मा विशेष रित्या प्रेषितांवर विसावला, जे येशूच्या वधस्तंभीं खिळले जाण्याचे, त्याच्या पुनरुत्थानाचे व स्वर्गारोहणाचे साक्षीदार होते - महत्त्वाची सत्ये जीं इस्राएलाकरिता आशा होती. सर्वांनी जगाच्या उद्धारकाकडेच त्यांची एकमेव आशा म्हणून नजर लावावयाची होती, आणि येशूने त्याच्या स्वतःच्या जीवाचे बलिदान करून जो मार्ग तयार केला होता त्यात चालावयाचे होते व देवाच्या आज्ञा पाळून जगावयाचे होते. ज्या कार्यामुळें यहूद्यांनी येशूचा द्वेष केला होता व त्याला ठार केले होते, तेंच कार्य पुढे चालू ठेवण्यासाठीं शिष्यांना सामर्थ्य देण्यात येशूचे शहाणपण व चांगुलपण मी पाहिले. त्यांना सैतानाच्या कामांवर सामर्थ्य देण्यात आले. त्यांनी ज्या येशूला तुच्छ लेखले होते व दुष्ट हातांनी वधले होते, त्या येशूच्या नांवे त्यांनी चिन्हे आणि अद्भुते केली. येशूच्या मरणाच्या व पुनरुत्थानाच्या काळाभोवती प्रकाशाची व गौरवाची वर्तुळे रेखाटली गेली, व तो जगाचा उद्धारक असल्याची पवित्र वस्तुस्थिति अमर करण्यात आली. … … … पहाः *प्रेषितांची कृत्ये,* अध्याय ३-५.

# अध्याय १३
# स्तेफनाचा मृत्यु

यरुशलेमेत शिष्यांची संख्या मोठ्या प्रमाणात बहुगुणित झाली. देवाचे वचन वाढले, आणि पुष्कळ याजकलोक या श्रद्धेचे पालन करू लागले. स्तेफन, विश्वासाने ओतप्रोत भरलेला, लोकांमध्ये मोठमोठी अद्‌भुते व चमत्कार करीत होता. अनेकांना राग आला; कारण कीं याजक त्यांच्या रूढिरिवाजांपासून आणि यज्ञार्पणांपासून व इतर अर्पणांपासून वळत होते आणि येशूला एक महान बलिदान म्हणून स्वीकारत होते. स्तेफन, वरून सामर्थ्य मिळून, याजकलोक आणि वडिलजनांचा निषेध करीत होता, आणि त्यांच्यापुढे येशूला उच्च करीत होता. ज्या सुज्ञतेने आणि सामर्थ्याने तो बोलत असे त्याचा प्रतिकार ते करू शकत नव्हते, आणि जेव्हा त्यांना आढळले कीं त्यांचे त्याच्याविरुद्ध काहीच चालत नव्हते, तेव्हा त्यांनी माणसांना लाच देऊन शपथेवारीं असें खोटे सांगायला लावले कीं त्यांनी त्याला मोशेविरुद्ध आणि देवाविरुद्ध देवनिंदात्मक शब्द बोलतांना ऐकले होते. त्यांनी लोकांना चेतविले, आणि स्तेफनाला पकडून, आणि खोटे साक्षीदार मिळवून, त्याच्यावर आरोप केले कीं तो मंदिराविरुद्ध व नियमशास्त्राविरुद्ध बोलला होता. त्यांनी साक्ष दिली कीं त्यांनी त्याला असें बोलतांना ऐकले होते कीं हा नासरेथचा येशू मोशेने त्यांना दिलेले रिवाज नष्ट करणार होता.

स्तेफनाविरुद्ध जे न्यायदानाकरिता बसले होते त्यांनी त्याच्या चेहऱ्यावर देवाचा प्रकाश व देवाचे गौरव पाहिले. त्याचे मुख देवदूताच्या मुखाप्रमाणे तेजस्वी झाले होते. तो पूर्ण विश्वासाने व पवित्र आत्म्याने उठून उभा राहिला, आणि संदेष्ट्यांपासून सुरुवात करून, त्याने त्यांना येशूच्या आगमनापर्यंतची कहाणी सांगितली, त्याच्या वधस्तंभीं खिळले जाण्याविषयीं, त्याच्या पुनरुत्थानाविषयीं आणि स्वर्गारोहणाविषयीं सांगितले, आणि त्यांना दाखवून दिले कीं देव हातांनी बनविलेल्या मंदिरात राहत नसतो. ते मंदिराची भक्ति करीत होते. देवाविरुद्ध काही बोलले गेले तर त्यांना त्याचे विशेष काही वाटत नसे, पण मंदिराविरुद्ध काही बोलले गेल्यास संतापाने त्यांचा जळफळाट होई. स्तेफनाचा आत्मा स्वर्गीय उद्विग्नतेने हेलावला गेला व ते दुष्ट असल्याबद्दल व अंतःकरणांत बेसुंती असल्याबद्दल त्याने त्यांचा तीव्र निषेध केला: तुम्ही तर पवित्र आत्म्याचा सर्वदा विरोध करता. ते बाह्य कर्मकांडे पाळीत, परंतु त्यांची हृदये भ्रष्ट होती व जहाल वाईटाने भरलेली होती. त्यांच्या वाडवडिलांनी संदेष्ट्यांच्या केलेल्या छळाकडे स्तेफनाने त्यांचे लक्ष वेधले, आणि तो असें म्हणाला: ज्यांनी त्या नीतिमान पुरुषाच्या आगमनाविषयीं पूर्वी सांगितले त्यांना त्यांनी जिवे मारले; आणि आता त्याला धरून देणारे व जिवे मारणारे तुम्ही निघाला आहा.

बोलल्या गेलेल्या या धारदार, सरळ सत्यांनी मुख्य याजक आणि शास्ते अतिशय चिडले आणि ते स्तेफनावर धावून गेले. त्याच्यावर स्वर्गाचा प्रकाश प्रकाशत होता, आणि तो एकटक वर स्वर्गाकडे पाहत असतांना त्याला देवाच्या गौरवाचा एक दृष्टांत दिला गेला, आणि त्याच्याभोवती देवदूतांनी पाखर घातली. तो आरोळी मारून म्हणाला: पाहा, आकाश उघडलेले व मनुष्याचा पुत्र देवाच्या उजवीकडे उभा असलेला मला दिसत आहे. लोक त्याचे ऐकेनात. त्यांनी मोठ्या आवाजात आरोळ्या ठोकल्या आणि कान बंद केले, आणि एकजुटीने ते त्याच्यावर धावून गेले, आणि त्याला नगराबाहेर ओढत नेऊन त्यांनी त्याला दगडमार केला. आणि स्तेफनाने गुडघे टेकले आणि मोठ्या वाणीने तो म्हणाला: हे प्रभू, हें पाप त्यांच्याकडे मोजू नको.

मी पाहिले कीं स्तेफन देवाचा एक सामर्थ्यशाली शिष्य होता, मंडळीत एक महत्त्वाचे स्थान भूषविण्याकरिता त्याला खास रित्या नियोजित केले गेले होते. त्याला दगडमार करून ठार केल्यावर सैतानाला आसुरी आनंद झाला, कारण कीं त्याला माहीत होते कीं शिष्यांना त्याची उणीव तीव्रतेने भासेल. परंतु सैतानाचा विजय अल्पकाळापुरताच होता; कारण त्याच लोकांमध्ये एकजण स्तेफनाचा मृत्यु पाहत होता ज्याला येशू स्वतःस प्रगट करणार होता. जरी त्याने स्तेफनावर दगड फेकण्यात काही भाग घेतला नव्हता, तरी त्याच्या मरणाला त्याची संमति होती. शौल देवाच्या मंडळीचा छळ करण्यात त्वेषाने भाग घेत होता; तो त्यांना हुडकून काढी, त्यांच्याच घरांतून त्यांना पकडून आणी, आणि जे त्यांना ठार करतील अशांच्या हवालीं त्यांना करी. सैतान शौलाचा फार प्रभावीपणे उपयोग करून घेत होता. परंतु देवाला सैतानाचे सामर्थ्य मोडून काढता येते, आणि त्याने ज्यांना त्याचे बंदिवान केलेले आहेत त्यांना मुक्त करता येते. शौल एक विद्वान पुरुष होता, आणि सैतान देवाच्या पुत्राविरुद्धचे त्याचे बंड पुढे चालू ठेवण्याकरिता आणि जे त्याच्यावर विश्वास ठेवीत होते त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याकरिता विजयाच्या मोठ्या आनंदात त्याचा उपयोग करून घेत होता, त्याच्या पात्रतांना त्याच्या कामीं आणत होता. पण येशूने त्याच्या नामाची घोषणा करण्याकरिता, त्याच्या शिष्यांना त्यांच्या कामांत बळ देण्याकरिता, आणि स्तेफनाची जागा उत्कृष्ट रित्या भरून काढण्याकरिता शौलाची एक खास निवडलेले पात्र म्हणून निवड केली. शौलाला यहूदी लोक फार मान देत. त्याचा उत्साह आणि त्याची विद्वत्ता त्यांना संतोषवी, आणि पुष्कळ शिष्यांना कमालीचे घाबरवी.

पहा: *प्रेषितांची कृत्ये,* अध्याय ६ व ७.

# अध्याय १४
# शौलाचा पालट

शौल अधिकाराची पत्रे घेऊन दिमिष्काला येशूची सुवार्ता गाजविणाऱ्या स्त्रीपुरुषांना अटक करण्यासाठीं आणि त्यांना बांधून यरुशलेमला आणण्यासाठीं प्रवास करीत असतांना, वाईट दूत विजयानंदाने त्याच्याभोवती राहिले. परंतु तो प्रवास करीत असतांना, एकाएकीं स्वर्गातून एक प्रकाश त्याच्याभोवती चमकला, ज्यामुळें वाईट दूतांनी पलायन केले, आणि शौल त्वरित जमिनीवर कोसळला. त्याने एक वाणी असें बोलतांना ऐकली कीं: शौला, शौला, माझा छळ कां करतोस? शौलाने विचारणा केली: प्रभो, तूं कोण आहेस? प्रभू म्हणाला: ज्या येशूचा तूं छळ करतोस तोच मी आहे. काट्यांवर लाथ मारणे तुझ्याकरिता कठीण आहे. आणि शौल थरथर कापत व आश्चर्यचकित होऊन म्हणाला: प्रभू, मी काय करावे अशी तुझी इच्छा आहे? आणि प्रभू म्हणाला: ऊठ आणि नगरात जा, आणि तिथे तुला सांगण्यात येईल कीं तूं काय केले पाहिजेस.

त्याच्यासोबत जीं माणसे होती तीं स्तब्ध उभी राहिली; त्यांनी वाणी ऐकली पण त्यांच्या दृष्टिस कोणी पडले नाही. प्रकाश दूर झाल्यावर शौल भूमिवरून उठला, आणि त्याने त्याचे डोळे उघडले, पण त्याला कोणी मनुष्य दिसेना. स्वर्गाच्या प्रकाशाच्या तेजाने त्याचे डोळे दिपविले होते व तो अंध झाला. त्यांनी त्याला हाताला धरून दिमिष्काला आणले, आणि तीन दिवस तो दृष्टिवाचून होता व त्याने काही अन्नपाणी घेतले नाही. मग देवाने त्याचा देवदूत नेमक्या अशा एका माणसाकडे पाठविला ज्याला बंदिवान करून नेण्याचा शौलाचा इरादा होता, आणि त्याने त्याला दृष्टांतात प्रगट केले कीं त्याने नीट म्हटलेल्या रस्त्यावर जावे, आणि यहूदाच्या घरीं तार्सकर शौल नांवाच्या मनुष्याचा शोध करावा; कारण, पाहा, तो प्रार्थना करीत आहे; आणि आपल्याला पुन्हा दिसावे म्हणून हनन्या नांवाचा एक मनुष्य आपणावर हात ठेवीत आहे असें त्याने पाहिले आहे.

हनन्याला भय वाटले कीं येथे कोठेतरी काहीतरी चूक झाली असावी, आणि तो त्याने शौलाविषयीं काय ऐकले होते तें देवाला सांगू लागला. पण देव हनन्याला म्हणाला: जा; कारण परराष्ट्रीय, राजे व इस्राएलाची संतति ह्यांच्यासमोर माझे नांव घेऊन जाण्याकरिता तो माझे निवडलेले पात्र आहे. आणि त्याला माझ्या नांवासाठीं किती दुःख सोसावे लागेल हें मी त्याला दाखवीन. तेव्हा हनन्याने देवाच्या सूचना मानल्या आणि तो त्या घरीं गेला; आणि त्याच्यावर हात ठेवून म्हणाला: शौल भाऊ, तूं वाटेने येत असता

ज्या प्रभूने म्हणजे येशूने तुला दर्शन दिले त्याने, तुला पुन्हा दृष्टि यावी व तूं पवित्र आत्म्याने परिपूर्ण व्हावे म्हणून मला पाठविले आहे.

तत्क्षणीं त्याला दृष्टि आली आणि त्याने उठून बाप्तिस्मा घेतला. मग त्याने सभास्थानांमध्ये ख्रिस्ताची घोषणा केली कीं, तो देवाचा पुत्र होता. तेव्हा सर्व ऐकणारे विस्मित होऊन म्हणू लागले: हें नांव घेणाऱ्यांचा ज्याने यरुशलेमेत नाश केला तोच हा नव्हे काय? आणि त्यांना बांधून मुख्य याजकांकडे न्यावे म्हणूनच हा येथे आला होता ना? पण शौलाला तर अधिकाधिक सामर्थ्य प्राप्त होत गेले आणि तो यहूदी लोकांना कुंठित करीत राहिला. ते पुन्हा अडचणीत सापडले. शौलाने त्याचा अनुभव पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यात सांगितला. येशूला शौलाचा किती विरोध होता हें सर्वांनाच माहीत होते, आणि त्याच्या नांवावर जे विश्वास ठेवीत होते त्या सर्वांना शोधून काढून मृत्युमुखीं घालण्याच्या त्याच्या उत्साहाबाबत ते परिचित होते. त्याच्या अद्भुत पालटाद्वारें अनेकांना खात्री पटली कीं येशू देवाचा पुत्र आहे. शौलाने त्याचा अनुभव विदित केला, कीं तो सर्वांना, पुरुष आणि स्त्रियांनाही, बांधून तुरुंगात पाठवीत असे व त्यांना मरण येईपर्यंत त्यांचा छळ करीत असे; असें असतांना तो दिमिष्काला प्रवास करीत असतांना अकस्मात स्वर्गातून एक मोठा प्रकाश त्याच्या सभोवताली पडला, आणि प्रत्यक्ष येशू त्याला प्रगट झाला, आणि त्याने त्याला दाखवून दिले कीं तो देवाचा पुत्र होता. शौल धीटपणे येशूची घोषणा करीत असतांना त्याचा लोकांवर मोठा प्रभाव पडत होता. त्याला पवित्रशास्त्राचे ज्ञान होते, आणि त्याच्या पालटानंतर येशूविषयींच्या भविष्यलेखांवर त्याच्या मनात दैवी प्रकाश प्रकाशला, ज्यामुळें त्याला सत्य स्पष्टपणे समजले व धैर्याने सादर करता आले, आणि पवित्रशास्त्राचा जो काही विपर्यास केला जात होता त्या चुका त्याला दुरुस्त करता आल्या. देवाचा पवित्र आत्मा त्याच्यावर विसावत असल्यामुळें, तो त्याच्या श्रोत्यांना स्पष्ट व सामर्थ्यानिशीं भविष्यलेखांचा अभ्यास देत त्यांना ख्रिस्ताच्या पहिल्या आगमनापर्यंत आणीत असे, व त्यांना दाखवून देत असे कीं ख्रिस्ताच्या दुःखभोगासंबंधीचे, त्याच्या मृत्युसंबंधीचे व पुनरुत्थानासंबंधीचे भविष्यलेख पूर्ण झाले होते.

पहा: *प्रेषितांची कृत्ये,* अध्याय ९.

# अध्याय १५
# यहूद्यांनी पौलाला ठार करण्याचे ठरविले

पौल त्याच्या अनुभवाचे वर्णन करीत असतांना जो जोरदार प्रभाव पडत असे तो जेव्हा मुख्य याजकांनी आणि शास्त्र्यांनी पाहिला तेव्हा त्यांना पौलाविरुद्ध भयंकर द्वेष वाटू लागला. त्यांनी पाहिले कीं तो येशूची घोषणा धीटाईने करीत होता आणि त्याच्या नामात चमत्कार करीत होता, आणि लोकांच्या झुंडींच्या झुंडी त्याचे ऐकण्यास थांबत व त्यांच्या रूढींपासून वळत, आणि ते देवाच्या पुत्राचे खूनी आहेत अशा नजरेने त्यांच्याकडे पाहत. याजकांचा क्रोध चेतविला गेला, आणि लोकांमध्ये उत्पन्न झालेला हा उत्साह काढून टाकण्याकरिता काय करणे सर्वांत उत्तम होईल यासंबंधी विचारविनिमय करण्याकरिता ते एकत्र जमले. त्यांच्यात एकमत झाले कीं त्यांच्याकरिता एकच सुरक्षित मार्ग पौलाला ठार करण्याचा होता. पण देवाला त्यांचा इरादा माहीत होता, आणि त्याचे रक्षण करण्यासाठीं देवदूतांना धाडले गेले, कीं त्याचे सेवाकार्य पूर्ण होईपर्यंत व येशूच्या नामाकरिता दुःख भोगेपर्यंत त्याने जगावे.

पौलाला माहिती दिली गेली कीं यहूदी त्याचा जीव घेऊ पाहत आहेत. सैतानाने विश्वास न ठेवणाऱ्या यहूद्यांना दिमिष्काच्या वेशींवर रात्रंदिवस पहारा ठेवण्यास उद्युक्त केले कीं पौल वेशींतून बाहेर पडू लागला कीं त्यांनी त्याला ताबडतोब ठार करावे. पण शिष्यांनी रात्रीतून त्याला टोपलीत बसवून भिंतीवरून खाली सोडले. येथे त्यांची योजना फोल झाली म्हणून यहूदी फजित झाले, आणि सैतानाचे उद्दिष्ट पार पडू शकले नाही. आणि पौल यरुशलेमला शिष्यांना भेटायला गेला, परंतु त्या सर्वांना त्याची भीति वाटत होती. त्यांचा विश्वास बसेना कीं तो एक शिष्य आहे. दिमिष्कामध्ये यहूदी त्याचा जीव घेण्याची पराकाष्ठा करीत होते, आणि त्याचे स्वतःचे बांधव त्याचा स्वीकार करीनात; परंतु बर्णबाने त्याला घेतले, आणि त्याला प्रेषितांकडे आणले, आणि त्यांना विदित केले कीं त्याने कसें वाटेवर प्रभूला पाहिले होते, आणि येशूच्या नांवाने त्याने दिमिष्कात येशूची घोषणा धैर्याने केली होती.

परंतु सैतान यहूद्यांना त्यांनी पौलाला नष्ट करावे म्हणून चेतवीत होता, आणि येशूने त्याला यरुशलेम सोडून जावयास सांगितले. आणि तो येशूची घोषणा करीत दुसऱ्या नगरांत गेला असता, तो चमत्कार करीत असे, आणि अनेकांचा पालट होई. जन्मतः पंगु असलेल्या एका मनुष्याला जेव्हा बरे केले गेले, तेव्हा लोक, जे मूर्तिपूजक होते, ते शिष्यांची पूजा करण्यासाठीं त्यांच्यापुढे यज्ञ करायला सरसावले याचे पौलाला अतिशय दुःख झाले, आणि त्याने त्यांना सांगितले कीं ते स्वतः केवळ माणसेच होती, आणि त्यांनी स्वर्ग व पृथ्वी आणि समुद्र आणि त्यांतल्या सर्व गोष्टी ज्याने उत्पन्न केल्या त्या देवाचीच भक्ति करायला पाहिजे.

पौलाने त्यांच्यापुढे देवाला सर्वोच्च केले, तरी त्याला लोकांना आवरता आवरता मुश्किल झाले होते. त्यांच्या मनांत खऱ्या देवावर विश्वास ठेवण्याचे पहिले ज्ञान, व त्याला जी भक्ति व सन्मान देणे योग्य आहे त्यासंबंधीचे ज्ञान होऊ लागले; आणि ते पौलाचे ऐकत असतांना, सैतान दुसऱ्या नगरांतल्या विश्वास न ठेवणाऱ्या यहूद्यांना पौलाच्या मागेमागे जाण्यास उद्युक्त करू लागला कीं त्याच्याकडून करण्यात आलेले चांगले काम नष्ट करण्यात यावे. यहूद्यांनी चिथाविले व त्या मूर्तिपूजकांची मने पौलाविरुद्धच्या खोट्या अहवालांनी भडकावली. आता लोकांच्या मनांतील नवल व आकर्षण नष्ट होऊन त्याऐवजी ते शिष्यांचा द्वेष करू लागले ज्यांना थोड्या अवधीपूर्वीच ते पूजायला तयार होते; त्यांनी पौलाला धोंडमार केला व तो मेला आहे असें समजून त्याला ओढतओढत नेऊन नगराबाहेर टाकून दिले. पण पौलाभोवती जमा होऊन शिष्य त्याच्याकरिता शोक करीत असतांना जेव्हा तो उठून उभा राहिला तेव्हा त्यांना आत्यंतिक हर्ष झाला, आणि त्यांच्यासोबत तो नगरात गेला.

पौल येशूविषयींची सुवार्ता सांगत असतांना, एक चेटकीण, जिच्या अंगात भूत येत असे, ती त्यांच्या मागेमागे जाऊन ओरडत राहिली कीं: हे लोक परात्पर देवाचे दास आहेत; हे तुम्हांला तारणाचा मार्ग कळवितात. अशा प्रकारें ती अनेक दिवस शिष्यांच्या मागेमागे जात राहिली. परंतु पौलाला खेद झाला, कारण कीं अशा प्रकारें त्यांच्या मागेमागे ओरडत जाण्याने लोकांची मने सत्यापासून इतरत्र वळत होती. सैतान तिला अशा प्रकारें वागायला प्रवृत्त करीत होता - यात त्याचा हेतु लोकांना तिटकारा आणावा व शिष्यांचा प्रभाव नष्ट करावा हा होता. परंतु पौलाचा आत्मा आतल्या आत हेलावला गेला, आणि तो त्या स्त्रीकडे वळून तिच्यातल्या पिशाच्चाला म्हणाला: येशू ख्रिस्ताच्या नांवाने मी तुला आज्ञा करतो कीं तूं हिच्यामधून निघून जा; आणि त्याचा निषेध होऊन तें तत्काळ निघून गेले.

ती शिष्यांच्या मागून ओरडत असायची तेव्हा तिच्या धन्यांना आनंद वाटत असे; पण जेव्हा तिला पिशाच्चाने सोडले, आणि ती ख्रिस्ताची लीन अनुयायी बनल्याचे त्यांनी पाहिले, तेव्हा ते खवळले. तिच्या दैवप्रश्न सांगण्याने त्यांना पुष्कळ मिळकत झाली होती, आणि आता त्यांच्या मिळकतीची आशा नष्ट झाली. सैतानाचे उद्दिष्ट फोल झाले; पण त्याच्या चाकरांनी पौलाला व सीलाला धरले, आणि त्यांना बाजारपेठेत ओढून आणून शासकांपुढे व अधिकाऱ्यांपुढे उभे केले आणि म्हटले: हीं माणसे यहूदी असून आपल्या नगराला फारच फार त्रास देत आहेत. आणि जमाव एकत्रितपणे त्यांच्याविरुद्ध उठला, व अधिकाऱ्यांनी त्यांची वस्त्रे फाडून काढली व त्यांना छड्या मारण्याची आज्ञा दिली. जेव्हा त्यांनी त्यांना अनेक फटके मारले तेव्हा त्यांनी त्यांना तुरुंगात टाकले आणि बंदिशाळेच्या नायकाला त्यांना बंदोबस्तात ठेवण्याचा हुकूम केला. त्याला असा हुकूम मिळाल्यावर त्याने त्यांना आतल्या बंदिखान्यांत घालून त्यांचे पाय खोड्यांत अडकविले. पण देवाचे देवदूत त्यांच्यासोबत तुरुंगामध्ये गेले. त्यांचा तुरुंगवास देवाच्या गौरवार्थ झाला, आणि लोकांना दाखवून दिले गेले कीं देव त्याच्या निवडलेल्या सेवकांसोबत व त्यांच्या सेवाकार्यात असतो, आणि तुरुंगाच्या भिंती त्याला हादरवून टाकता येत होत्या व भक्कम लोखंडी कड्या त्याला सहज उघडता येत होत्या.

मध्यरात्रीं पौल व सीला प्रार्थना करीत होते व देवाप्रीत्यर्थ स्तुतिगायने गात होते, आणि एकाएकीं एक मोठा भूकंप झाला, इतका मोठा कीं तुरुंगाचे पाये डगमगले; आणि मी पाहिले कीं ताबडतोब देवाच्या देवदूताने प्रत्येकाची बंधने सैल केली. बंदिशाळेच्या नायकाने जागे होऊन बंदिशाळेचे दरवाजे उघडे पाहिले तेव्हा तो भ्याला. त्याला वाटले कीं कैदी निसटून गेले आहेत आणि आता त्याला मरणदंडाची शिक्षा भोगावी लागणार. तो आपला घात करणार होता तोच पौल मोठ्या वाणीने त्याला म्हणाला: तूं स्वत:ला काही अपाय करून घेऊ नकोस; कारण आम्ही सर्वजण येथेच आहोत. देवाच्या सामर्थ्याने नायकाची सत्याबद्दल खात्री पटली. त्याने दिवा आणविला आणि आत धावत जाऊन तो थरथर कापत पौल व सीला ह्यांच्या पाया पडला, व त्यांना बाहेर आणून म्हणाला: महाराज, माझे तारण व्हावे म्हणून मला काय केले पाहिजे? आणि ते म्हणाले: प्रभू येशूवर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल. मग नायकाने त्याच्या सबंध कुटुंबाला जमा केले, आणि पौलाने त्यांना येशूची सुवार्ता सांगितली. नायकाचे अंत:करण त्या बांधवांशीं जुळले; त्याने त्यांच्या जखमा धुतल्या, आणि त्याने व त्याच्या घरच्या सर्व माणसांनी त्या रात्रीं बाप्तिस्मा घेतला. मग त्याने त्यांस जेवू घातले, व देवावर विश्वास ठेवून त्याने व त्याच्या घरच्या सर्व मंडळीने आनंदोत्सव केला.

तुरुंगाची द्वारे उघडण्यात, आणि तुरुंगाच्या नायकाचा व त्याच्या कुटुंबियांचा पालट होण्यात व त्यांनी बाप्तिस्मा घेण्यात देवाचे जें गौरवी सामर्थ्य प्रगट झाले होते तें अद्‌भुत वृत्त सर्वत्र पसरले. शासकांनी ह्या गोष्टी ऐकल्या तेव्हा त्यांना भय वाटले, व त्यांनी तुरुंगाच्या नायकाला बोलाविले, व त्याला सांगितले कीं त्याने पौल आणि सीला ह्यांना जाऊ द्यावे. पण पौल अशा प्रकारें गुप्तपणे तुरुंग सोडणार नव्हता. तो त्यांना म्हणाला: आम्ही रोमन माणसे असता अपराधी ठरविल्यावाचून त्यांनी आम्हांला उघडपणे फटके मारून बंदिशाळेत टाकले आणि आता ते आम्हांस गुप्तपणे घालवितात काय? हें चालणार नाही; तर त्यांनी स्वत: येऊन आम्हांस बाहेर काढावे. देवाच्या सामर्थ्याचे प्रगटीकरण लपविले जाण्यास पौल व सीला तयार नव्हते. चोपदारांनी हें शब्द अधिकाऱ्यांना सांगितले; आणि जेव्हा त्यांनी ऐकले कीं ते रोमन आहेत तेव्हा त्यांस भय वाटले. मग त्यांनी येऊन त्यांची समजूत घातली; मग त्यांना बाहेर आणून नगरातून निघून जाण्याची विनंती केली.

पहा: *प्रेषितांची कृत्ये*, अध्याय १४ व १६.

# अध्याय १६
# पौलाने यरुशलेमला भेट दिली

पौलाच्या पालटानंतर लवकरच त्याने यरुशलेमला भेट दिली आणि तेथे येशूची घोषणा केली व त्याच्या कृपेचे नवल वर्णिले. त्याने चमत्काराद्धारां झालेल्या त्याच्या पालटासंबंधी सांगितले, ज्यामुळें याजकलोक व शास्ते संतापले, व त्यांनी त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केला. परंतु तो प्रार्थना करीत असतांना येशूने त्याचा जीव वाचावा म्हणून त्याला दृष्टांतात पुन्हा दर्शन दिले आणि त्याला म्हटले: यरुशलेमेतून निघून जाण्याची त्वरा कर, कारण माझ्यासंबंधीची तुझी साक्ष ते स्वीकारणार नाहीत. पौलाने कळकळीने येशूची विनवणी केली कीं: प्रभो, त्यांना माहीत आहे कीं जे कोणी तुझ्यावर विश्वास ठेवीत त्यांना प्रत्येक सभास्थानातून पकडून तुरुंगात टाकण्यास व त्यांना मारहाण करण्यास मी कारणीभूत झालेलो आहे. आणि जेव्हा तुझ्या हुतात्म्याचे, स्तेफनाचे, रक्त पाडले जात होते, तेव्हा मीसुद्धा जवळ उभा होतो आणि त्याच्या मृत्युला माझी संमति होती, आणि त्याला ठार करणाऱ्यांची वस्त्रे मी सांभाळीत होतो. पौलाला वाटत होते कीं यरुशलेमेतील यहूदी त्याच्या साक्षीला प्रतिकार करू शकणार नाहीत; ते विचार करतील कीं त्याच्यामध्ये जो मोठा बदल घडून आला होता तो देवाच्या सामर्थ्याद्वारेंच घडून येऊ शकत होता. पण येशू त्याला म्हणाला: येथून जा, आणि मी तुला दूर विधर्मियांकडे पाठवीन.

पौल यरुशलेमेत हजर नसतांना, त्याने वेगवेगळ्या ठिकाणांहून अनेक पत्रे लिहिली, आणि त्याचा अनुभव सांगितला, व सामर्थ्यशाली साक्ष दिली. परंतु काहींनी त्या पत्रांचा प्रभाव नष्ट करण्यास पाहिले. त्यांना कबूल करावे लागत होते कीं त्याची पत्रे वजनदार व सामर्थ्यशाली होती; पण त्यांनी म्हटले कीं त्याचे शारीरिक रूप कमकुंवत होते, आणि त्याचे बोलणे तुच्छ मानण्याजोगे होते.

मी पाहिले कीं पौल फार शिकलेला मनुष्य होता, आणि त्याची सुज्ञता व त्याच्या वागण्याच्या पद्धतिने त्याचे श्रोते जणू मंत्रमुग्ध होत. शिकलेले पंडित लोक त्याच्या ज्ञानावर खूष होत, आणि त्यांच्यापैकीं अनेकांनी येशूवर विश्वास ठेवला. राजांपुढे आणि मोठ्या जमावांपुढे उभे असतांना तो आपल्या वक्तृत्वाने ज्ञानाचा प्रवाह असा वाहवीत असे कीं त्याच्यापुढे कोणाचेच काही चालत नसे. ह्यामुळें याजकलोक आणि वडिलजन अतिशय संतापत. पौल सहजपणे खोल तत्वज्ञानात शिरू शके आणि तिथून उच्च उड्डाण करून त्याच्यासोबत लोकांना विचाराच्या उच्च पातळीवर घेऊन जाऊ शके आणि त्यांच्यापुढे देवाच्या कृपेची सखोल समृद्धि दाखवू शके व ख्रिस्ताच्या आश्चर्यजनक प्रीतिचे चित्रण दाखवू शके. आणि मग साधेपणाने तो सामान्य लोकांच्या बुद्धिच्या समजाकडे खाली येत असे आणि सर्वांत सामर्थ्यशाली पद्धतिने त्याचा अनुभव विदित करी, ज्यामुळें ख्रिस्ताचे शिष्य बनण्याकरिता त्यांच्या मनांत तीव्र कळकळ व इच्छा

उत्पन्न होत असे.

देवाने पौलाला प्रगट केले कीं त्याने पुन्हा यरुशलेमला गेले पाहिजे; कीं तेथे त्याला अटक करतील व त्याच्या नामाखातर त्याला दु:ख भोगावे लागेल. आणि जरी तो बराच काळ तुरुंगात कैदी म्हणून राहिला, तरी देव त्याच्यामार्फत त्याचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य पुढे चालवीत राहिला. पौलाच्या बेड्या ख्रिस्ताविषयींचे ज्ञान पसरविण्याकरिता साधन बनल्या व अशा प्रकारें देवाला गौरविण्यात आले. त्याच्या न्यायालयीन चौकशीसाठीं त्याला एका नगरातून दुसऱ्या नगरीं असें नगरोंनगरीं पाठविले जात असतांना येशूविषयींची साक्ष आणि त्याच्या पालटाची मनोरंजक घटना सम्राटांपुढे व राज्यपालांपुढे विदित केली गेली, कीं ते येशूच्या साक्षीवाचून राहू नयेत. हजारोंनी त्याच्यावर विश्वास ठेवला व त्याच्या नामात हर्ष केला. मी पाहिले कीं पौल जलांवरून जात असतांना त्याच्या जलयात्रेत असलेला देवाचा खास हेतु पूर्ण झाला होता, कीं पौलामार्फत जहाजातल्या खलाशांनी देवाचे सामर्थ्य पाहावे, आणि विधर्म्यांनीसुद्धा येशूचे नाम ऐकावे आणि त्याच्या शिकवणीद्वारें व त्याने केलेले चमत्कार पाहून अनेकांचा पालट व्हावा. तो उत्साहाने व पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने येशूची घोषणा करीत असतांना, आणि त्याच्या अनुभवाच्या मनोरंजक घटना सांगत असतांना राजे आणि राज्यशासक त्याच्या युक्तिवादाने जणू मंत्रमुग्ध होत, आणि येशू देवाचा पुत्र असल्याची त्यांना खात्री पटे; आणि काही नवल करीत पौलाचे आश्चर्याने ऐकत असतांना एकजण ओरडून म्हणाला: तूं तर मी ख्रिस्ती बनायला माझे मन जवळजवळ वळवीत आहेस. तरी त्यांनी जें ऐकले त्याबद्दल भविष्यकाळीं कधींतरी विचार करायचे त्यांनी ठरविले. सैतानाने विलंबाचा फायदा घेतला, आणि त्यांची हृदये मृदु करण्यात आली त्या संधीकडे जेव्हा त्यांनी दुर्लक्ष केले, तेव्हा ती कायमची गमावली गेली. त्यांची मने कठीण बनली.

मला सैतानाचे काम दाखविण्यात आले कीं येशूला त्यांचा उद्धारक म्हणून यहूद्यांनी स्वीकारू नये म्हणून त्याने प्रथम त्यांचे डोळे अंध केले; आणि मग त्याच्या अद्‌भुत कृत्यांमुळें त्याचा हेवा वाटून त्याचा जीव घेण्याची इच्छा त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावी अशा प्रकारें त्यांना उद्युक्त केले. सैतान प्रत्यक्ष येशूच्याच एका अनुयायामध्ये शिरला, आणि त्याने विश्वासघात करून त्याला त्यांच्या हातीं देण्यास प्रवृत्त केले, आणि त्यांनी जीवनाच्या व गौरवाच्या प्रभूला क्रूसखांबीं खिळले. येशू मेलेल्यांतून उठल्यानंतर, त्याच्या पुनरुत्थानाचे सत्य झाकून टाकण्याच्या प्रयत्नांत यहूद्यांनी रोमी पहारेकऱ्यांना पैशांची लाच देऊन खोटेपणाचे साक्षीदार होण्याकरिता पापांवर पापे केली. परंतु येशूच्या पुनरुत्थानाचे सत्य दुहेरी पुराव्यानिशीं पक्के करण्यात आले कीं त्याच्यासोबत साक्षीदारांचा मोठा जमावच पुनरुत्थित झाला जे त्याच्यासोबत मेलेल्यांतून जिवंत होऊन उठले. येशूने त्याच्या शिष्यांना दर्शन दिले, आणि एके वेळीं एकाच वेळीं पाचशेंहून अधिक लोकांना दर्शन दिले, आणि येशू लोकांना दर्शन देत असतांना ज्यांना त्याने त्याच्यासोबत जिवंतांच्या भूमित आणले होते त्यांनीसुद्धा अनेकांना दर्शन देऊन जाहीर केले कीं येशू मेलेल्यांतून उठला होता.

यहूद्यांनी देवाच्या पुत्राचा स्वीकार करण्यास नकार देऊन आणि त्याला वधस्तंभीं खिळून, त्याच्या सर्वांत मौल्यवान रक्तात त्यांचे हात माखून, सैतानाने त्यांना देवाविरुद्ध बंड करायला लावले होते. येशू

देवाचा पुत्र होता, जगाचा उद्धारक होता, याचे कितीतरी सामर्थ्यपूर्ण पुरावे दिले गेले होते, तरी त्यांनी त्याचा खून केला, आणि आता त्याच्या बाजूचा कोठलाही पुरावा त्यांना स्वीकारता येईना. त्यांची एकमेव आशा व सांत्वन - जसें सैतानाच्या पतनानंतर सैतानाच्या बाबतीत घडले - देवाच्या पुत्राविरुद्ध कार्य करीत राहून त्याच्यावर विजय पावण्याचा प्रयत्न करीत राहणे यातच होते. ख्रिस्ताच्या शिष्यांचा छळ करण्यात व त्यांना ठार करण्यात त्यांनी त्यांचे बंड चालूच ठेवले. क्रूसखांबीं वधलेल्या येशूच्या नांवाइतके कटु व कर्कश त्यांच्या कानांवर दुसरे काही पडत नव्हते; आणि त्याच्या बाजूचा कोठलाही पुरावा न ऐकण्याचा त्यांनी निर्धार केला होता. स्तेफनाच्या बाबतीत घडले तसें, जेव्हा पवित्र आत्मा त्याच्यातून येशू देवाचा पुत्र असल्याबद्दलचा सामर्थ्यशाली पुरावा देत होता, तेव्हा त्यांनी एखादे वेळीं त्यांची खात्री पटेल या भीतिने त्यांचे कान बंद केले होते. आणि देवाच्या गौरवात स्तेफन आच्छादिला गेला असतांना त्यांनी त्याला दगडमार करून ठार केले. येशूचे खूनी सैतानाच्या पक्क्या कब्जात होते. दुष्ट कृत्ये करून त्यांनी त्याची प्रजा म्हणून स्वेच्छेने स्वतःस सैतानाच्या हवालीं केले होते, आणि त्यांच्यामार्फत तो ख्रिस्तावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्रास देण्यात व त्यांचा छळ करण्यात गुंतला होता. यहूद्यांमार्फत काम करून त्याने येशूच्या नामाविरुद्ध व जे त्याचे अनुसरण करीत होते व त्याच्या नांवावर विश्वास ठेवीत होते त्यांच्याविरुद्ध विधर्मियांस चेतविले होते. परंतु देवाने शिष्यांना त्यांच्या कार्यात सबळ करण्यासाठीं त्याच्या देवदूतांना पाठविले, कीं त्यांनी ज्या गोष्टी पाहिल्या व ऐकल्या त्यासंबंधीची त्यांनी साक्ष द्यावी आणि सरतेशेवटीं त्यांच्या खंबीर एकनिष्ठतेत त्यांच्या साक्षीवर त्यांच्या स्वरक्ताद्वारें शिक्का मारला जावा.

यहूदी त्याच्या जाळ्यातून निसटू शकणार नाहीत इतके त्याच्या कब्जात आले म्हणून सैतानाला हर्ष वाटला. ते अजूनही त्यांची निरुपयोगी कर्मकांडे, त्यांचे नियम आणि यज्ञयाग करीतच राहिले. येशू क्रूसावर टांगलेला असतांना जेव्हा त्याने आरोळी मारली होती कीं: *पूर्ण झाले आहे,* तेव्हा मंदिरातला पडदा दोन भागांत फाडला गेला होता, वरून खालपर्यंत फाडला गेला होता, तें असें दर्शविण्याकरिता कीं देव याउप्पर मंदिरात यज्ञयाग व कर्मकांडे स्वीकारण्याकरिता याजकांना भेटणार नाही; आणि असेंसुद्धा दर्शविण्याकरिता कीं यहूदी आणि विधर्मी यांना विभागणारी भिंत आता तोडून टाकण्यात आली आहे. येशूने दोहोंकरिता स्वबलिदान केले होते, आणि जर कोणाचे तारण व्हावयाचे असेल, तर दोहोंनी येशूवरच विश्वास ठेवला पाहिजे, कारण कीं पापाकरिता त्याचेच एकट्याचे बलिदान कामीं येते आणि तोच जगाचा उद्धारक आहे.

जेव्हा येशू वधस्तंभावर टांगलेला होता, तेव्हा एका सैनिकाने जेव्हा त्याच्या कुशीत भाला भोसकला होता, तेव्हा रक्त आणि पाणी बाहेर आले होते: दोन वेगवेगळे प्रवाह - एक रक्ताचा आणि दुसरा नितळ पाण्याचा. जे त्याच्या नांवावर विश्वास ठेवतील त्यांची पातके त्या रक्ताने धुवून टाकली जावयाची होती. आणि पाणी येशूकडून मिळणाऱ्या जीवनी पाण्याचे प्रतीक आहे, जो विश्वास ठेवणाऱ्या भक्ताला जीवन देतो. … … … पहा: *मत्तय* २७:५१; *योहान* १९:३४; *प्रेषितांची कृत्ये,* अध्याय २४ व २६.

# अध्याय १७
# घोर धर्मभ्रष्टता

विधर्मी मूर्तिपूजक जेव्हा ख्रिश्चनांचा क्रूरपणे छळ करीत होते व त्यांना ठार करीत होते तेव्हाचा काळ मला दाखविण्यात आला. रक्त पाण्याच्या प्रवाहांप्रमाणे वाहिले. उमदे लोक, विद्वान माणसे, आणि सामान्य लोक, अशा सर्वांना दयामाया न दाखविली जाता वधले गेले. श्रीमंत खानदानांना दारिद्र स्वीकारावे लागले कारण ते त्यांचा धर्म सोडून देत नव्हते. त्या ख्रिस्ती भक्तांनी जरी इतका जास्त छळ सोसला व दु:ख भोगले, तरी त्यांनी त्यांचा ध्वज खाली उतरविला नाही. त्यांनी त्यांचा धर्म शुद्ध ठेवला. मी पाहिले कीं देवाच्या लोकांच्या यातना बघून सैतान आनंद करीत होता व आपला विजय झाल्याच्या भ्रमात होता. परंतु देव त्याच्या विश्वासू हुतात्म्यांकडे मोठ्या संतोषाने पाहत होता, व त्या भीतिप्रद काळात जे ख्रिस्ती भक्त होऊन गेले ते त्याला फार प्रिय होते; कारण ते त्याच्याखातर क्लेश भोगायला तयार होते. त्यांनी सहन केलेले प्रत्येक दु:ख त्यांचे स्वर्गातील पारितोषिक वाढवीत होते. परंतु जरी पवित्रजन क्लेश भोगत होते म्हणून सैतान हर्ष करीत होता, तरी तो समाधान पावला नव्हता. त्याला शरीराप्रमाणे मनाचासुद्धा ताबा हवा होता. त्या ख्रिस्तीजनांनी जें क्लेश भोगले त्यामुळें ते प्रभूच्या जास्त जवळ गेले आणि एकमेकांवर प्रीति करण्यास प्रवृत्त झाले, आणि पूर्वी कधीं नाही इतके देवाला नाराज करण्यास कचरू लागले. त्यांनी देवाचा रोष ओढवून घ्यावा अशा प्रकारें त्यांना प्रवृत्त करण्याची सैतानाची इच्छा होती. जरी हजारोंचा वध केला गेला, तरी त्यांची जागा भरून काढण्यास इतर लोक मंडळीत येऊ लागले. सैतानाने पाहिले कीं तो त्याची प्रजा गमवीत आहे, आणि जरी ते छळ व मरण सहन करीत होते, तरी ते येशू ख्रिस्ताच्या राज्याची प्रजा बनण्याकरिता ख्रिस्ताकडे सुरक्षित होत होते; तेव्हा त्याने देवाच्या शासनाविरुद्ध व मंडळीला उद्ध्वस्त करण्याकरिता अधिक यशस्वी होतील अशा योजना तयार केल्या. त्याने त्या विधर्मी मूर्तिपूजकांना ख्रिस्ती श्रद्धेचा काही भाग स्वीकारण्यास प्रवृत्त केले. ख्रिस्ताच्या वधस्तंभीं खिळले जाण्यावर व त्याच्या पुनरुत्थानावर आपला विश्वास आहे असा ते दावा करू लागले, परंतु त्यांच्या मनाचा पालट झालेला नव्हता, आणि तरी येशूच्या अनुयायांना जाऊन मिळण्याचा प्रस्ताव त्यांनी मांडला. अरेरे, मंडळीकरिता उत्पन्न झालेला भयंकर धोका! हा मानसिक क्लेशांचा काळ होता. काहींना वाटले कीं जर त्यांनी त्यांचा दर्जा जरा कमी केला आणि त्या मूर्तिपूजकांशीं ते जाऊन मिळाले ज्यांनी ख्रिस्ती धर्मश्रद्धेच्या काही भागांसच आलिंगले होते, तर त्यामुळें त्यांच्या पालटाकरिता मार्ग उघडला जाईल. सैतान पवित्रशास्त्राची तत्वे भ्रष्ट करण्यास पाहत

होता. सरतेशेवटीं मी पाहिले कीं ध्वज खाली केला गेला, आणि विधर्मी लोकांना ख्रिस्ती मंडळीत सामावून घेतले गेले. ते मूर्तिपूजकच राहिले होते, आणि जरी त्यांनी ते ख्रिस्ती झाल्याचा दावा केला होता, तरी त्यांनी त्यांच्यासोबत त्यांची मूर्तिपूजा आणली. त्यांनी फक्त त्यांच्या पूजेच्या वस्तु तेवढ्या बदलल्या आणि पवित्रजनांच्या मूर्त्या केल्या, आणि ख्रिस्ताचीसुद्धा, आणि येशूची आई मरीया हिचीसुद्धा प्रतिमा केली. ख्रिस्ती भक्त क्रमाक्रमाने त्यांना जाऊन मिळाले, आणि ख्रिस्ती धर्म भ्रष्ट झाला, व मंडळीने तिची शुद्धता आणि सामर्थ्य गमावले. काहींनी त्यांच्यासोबत जाऊन मिळण्याला नकार दिला आणि त्यांनी त्यांची शुद्धता राखून ठेवली, व ते केवळ देवाची भक्ति करीत राहिले. वर आकाशांतल्या किंवा खाली पृथ्वीवरल्या कोठल्याही गोष्टीच्या प्रतिमेपुढे नमण्यास त्यांनी नकार दिला.

इतक्या जास्त संख्येने ख्रिश्चनांचे पतन झाले म्हणून सैतान खूष झाला, आणि त्याने पतन झालेल्या मंडळीला चेतविले कीं जे त्यांच्या धर्माची शुद्धता राखतील त्यांना एकतर त्यांच्या विधिंपुढे व मूर्त्यांच्या भक्तिपुढे नमण्यास भाग पाडावे, नाहीतर त्यांना ठार करावे. येशू ख्रिस्ताच्या खऱ्या मंडळीविरुद्ध पुन्हा छळाचा अग्नि पेटविला गेला आणि लाखोंचा निर्दयपणे वध केला गेला.

माझ्यापुढे हें चित्र पुढील प्रकारें सादर करण्यात आले:- विधर्मी मूर्तिपूजकांचा एक मोठा गट एक काळा झेंडा मिरवीत चालले होते ज्याच्यावर सूर्य, चंद्र आणि ताऱ्यांची प्रतिके होती. हा गट फार क्रूर व संतापलेला दिसत होता. मग मला दुसरा एक गट दाखविण्यात आला जे शुद्ध शुभ्र ध्वज घेऊन चालले होते, व त्यावर लिहिले होते: शुद्धता व प्रभूकरिता पावित्र्य. त्यांचे चेहरे खंबीर व स्वर्गीय समर्पण केलेले दिसत होते. मी पाहिले कीं विधर्मी मूर्तिपूजक त्यांच्याजवळ गेले आणि तेथे मोठी कत्तल झाली. त्यांच्यापुढे ख्रिस्ती भक्त डळमळीत झाले; आणि तरी ख्रिस्ती भक्तांचा गट एकमेकांच्या अधिकाधिक निकट जात राहिला व त्यांचा ध्वज अधिक खंबीरपणे हातीं धरून राहिला. जेव्हा अनेकांचा वध झाला तेव्हा ध्वजाभोवती दुसरे जमा झाले व त्यांनी त्यांच्या जागा भरून काढल्या.

मी मूर्तिपूजकांच्या गटाला एकत्र विचारविनिमय करतांना पाहिले. ख्रिस्ती भक्तांना नमविण्यात ते निष्फळ झाले, म्हणून त्यांनी दुसरी योजना करण्याचे एकमताने ठरविले. मी त्यांना त्यांचा झेंडा खाली करतांना पाहिले, आणि ते त्या खंबीर ख्रिस्ती गटाकडे गेले आणि त्यांनी त्यांच्यापुढे काही प्रस्ताव मांडले. सुरुवातीला त्यांचे प्रस्ताव पूर्णपणे नाकारले गेले. मग मी ख्रिस्ती गटाला एकत्र विचारविनिमय करतांना पाहिले. काही म्हणाले कीं ते त्यांचा ध्वज थोडा खाली करतील, त्यांचे प्रस्ताव स्वीकारतील, व त्यांचे प्राण वाचवितील, आणि सरतेशेवटीं विधर्मी मूर्तिपूजकांमध्ये त्यांचा ध्वज उंच करण्याकरिता ते सबळ होतील. परंतु काहीजण ही योजना स्वीकारीनात, तर त्यांचा ध्वज खंबीरपणे हातीं धरून त्यांनी मरणसुद्धा पत्करायचा निर्णय घेतला. मग मी ख्रिस्ती गटातल्या अनेकांना ध्वज खाली करतांना व विधर्मियांशीं जाऊन मिळतांना पाहिले; परंतु खंबीर व एकनिष्ठ असलेल्यांनी ध्वज पुन्हा काबीज केला व पुन्हा त्यास उंच धरले. मी पाहिले कीं अनेक माणसे सतत शुद्ध ध्वज वाहणारांच्या गटातून बाहेर पडत होते आणि मूर्तिपूजकांना जाऊन मिळत होते, आणि ते काळ्या झेंड्याखाली त्यांच्यासोबत जाऊन उभे राहिले आणि जे शुभ्र ध्वज वाहत होते त्यांचा

छळ करू लागले, आणि अनेकांचा वध झाला; तरी शुभ्र ध्वज उंच धरला गेला, आणि त्याच्याभोवती त्याच्या समर्थनार्थ उभे राहतील अशी माणसे उभी केली गेली.

ज्या यहूद्यांनी पहिल्यांदा विधर्मियांचा राग येशूविरुद्ध चेतविला होता ते सुटणार नव्हते. न्यायालयीन दालनात पिलात येशूला दोषी ठरवायला धजत नव्हता तेव्हा संतप्त यहूद्यांनी ओरड केली होती कीं: त्याचे रक्त आम्हांवर व आमच्या मुलांबाळांवर असो. त्यांनी स्वतःच्या मस्तकांवर जो भयंकर शाप ओढवून घेतला होता त्याची पूर्तता यहूद्यांच्या जमातिने पूरेपूर अनुभवली आहे. विधर्मी लोक आणि स्वतःला ख्रिस्ती म्हणविणारे लोक सारख्याच प्रमाणात त्यांचे शत्रु बनले. स्वतःला ख्रिस्ती म्हणविणारांनी ख्रिस्ताच्या क्रूसाकरिता असलेल्या त्यांच्या उत्साहात, यहूद्यांनी येशूला क्रूसावर खिळलेले असल्यामुळें, असा विचार केला कीं ते त्यांच्यावर जितक्या यातना आणू शकतील तितका देव त्यांच्यावर अधिक संतुष्ट होईल; आणि त्या विश्वास न ठेवणाऱ्या यहूद्यापैकी अनेकांना ठार केले गेले, इतरांना ठिकठिकाणीं हाकलले गेले, आणि जवळजवळ हरएक पद्धतिने त्यांना शिक्षा केल्या गेल्या.

त्यांच्यावर ख्रिस्ताचे व त्याच्या शिष्यांचे रक्त होते, ज्यांना त्यांनी ठार केले होते, आणि त्यांच्यावर त्यामुळें भयंकर पीडा आल्या. देवाचा शाप त्यांच्या मागोमाग गेला, आणि ते विधर्मियांकरिता आणि ख्रिश्चनांकरिता तुच्छतेचे व उपहासाचे लोक बनले. लोक त्यांना टाळू लागले, त्यांची अवनति झाली व लोक त्यांना तुच्छ लेखू लागले, जणू काईनाची खूण त्यांच्यावर होती. तरी मी पाहिले कीं देवाने ह्या लोकांना अद्‌भुत रित्या रक्षिले होते, व त्यांना जगभर पांगविले होते, तें यासाठीं कीं, त्यांच्यावर देवाचा खास शाप आहे अशा अर्थी त्यांच्याकडे बघितले जावे. मी पाहिले कीं राष्ट्र या नात्याने देवाने यहूद्यांना सोडले होते; तरी त्यांच्यामध्ये काही लोक असें आहेत कीं ज्यांना त्यांच्या अंतःकरणातून पडदा फाडून काढण्यास सबळ करण्यात येईल. काहीजण अजूनही पाहतील कीं त्यांच्या संबंधातले भविष्यलेख पूर्ण झाले आहेत, आणि ते येशूला जगाचा उद्धारक म्हणून स्वीकारतील, आणि येशूचा अव्हेर करण्यात व त्याला वधस्तंभीं वधण्यात त्यांच्या राष्ट्राने केलेले मोठे पातक पाहतील. यहूद्यांमध्ये काही व्यक्तिंचा वैयक्तिक रित्या पालट होईल; परंतु राष्ट्र या नात्याने देवाने त्यांना सदासर्वकाळाकरिता सोडलेले आहे.

# अध्याय १८
# अनीतिचे रहस्य

लोकांची मने येशूपासून काढून घेऊन मनुष्याकडे वेधणे, व माणसांच्या मनांतून वैयक्तिक जबाबदाऱ्यांची जाणीव नष्ट करणे हा सैतानाचा नेहमीच बेत राहिलेला आहे. जेव्हा सैतानाने देवाच्या पुत्राला मोहपाश टाकले होते तेव्हा तो त्याचे उद्दिष्ट गाठण्यात फोल झाला होता. पतित मानवाकडे तो आला तेव्हा त्याला बरेच यश आले. ख्रिस्ती धर्मश्रद्धेचे तत्व भ्रष्ट करण्यात आले. पोप लोकांनी आणि याजकांनी उच्च स्थान घेण्याचे फाजील धैर्य केले, आणि लोकांनी त्यांच्या पापांची क्षमा मिळविण्याकरिता ख्रिस्ताकडे पाहण्याऐवजी त्यांच्याकडे पाहावे असें लोकांना शिकविले. त्यांच्यापासून पवित्रशास्त्र दूर ठेवण्यात आले, यासाठीं कीं जीं सत्ये त्यांना दंडपात्र ठरवितील तीं लपवून ठेवण्यात यावी.

लोक पूर्णपणे फसविले गेले. त्यांना शिकविण्यात आले कीं पोपलोक व याजक ख्रिस्ताचे प्रतिनिधी होते, जेव्हा खरे तर ते सैतानाचे प्रतिनिधी होते; आणि जेव्हा ते त्यांच्यापुढे नमन करीत, तेव्हा ते सैतानास भजत होते. लोकांनी पवित्रशास्त्राची मागणी केली; पण याजकांना वाटले कीं त्यांना स्वतःकरिता देवाचे वचन वाचू दिले तर तें धोक्याचे होईल, कारण कीं एखादे वेळीं त्यांना सत्याचा प्रकाश दिसू लागेल व मग त्यांची पातके उघड केली जातील. लोकांना या फसव्या लोकांकडे पाहायला शिकविले गेले होते, व त्यांच्याकडून आलेला प्रत्येक शब्द देवाच्या मुखातून आलेला आहे अशा प्रकारें स्वीकारण्यास शिकविले गेले होते. मनावर जें सामर्थ्य केवळ एकट्या देवाकडेच असावयास पाहिजे तें ते स्वतःच्या हातीं ठेवीत होते. आणि जर कोणी स्वतःच्या मनाच्या खात्रीनुसार वागण्याचे धाडस केले, तर येशूचा जो द्वेष सैतान व यहूदी करीत तोच त्यांच्याविरुद्ध चेतविला जाई, व जे अधिकाराच्या पदांवर असत ते त्यांच्या रक्ताकरिता आसुसत. मला दाखविण्यात आले कीं असा एक काळ होता जेव्हा सैतानाचा विशेष विजय झाला होता. ख्रिस्ती भक्त झुंडींच्या झुंडींनी भयंकर रित्या वधले गेले कारण कीं ते त्यांच्या धर्माच्या शुद्धतेचे रक्षण करीत होते.

पवित्रशास्त्राचा द्वेष केला गेला, आणि पृथ्वीवरून देवाचे मौल्यवान वचन नष्ट करण्याकरिता प्रयत्न केले गेले. मरणदंडाची शिक्षा ठोठावून पवित्रशास्त्र वाचण्यास मनाई केली गेली, आणि त्या पवित्र पुस्तकाच्या जेवढ्या प्रति सापडू शकतील तेवढ्या जाळण्यात आल्या. पण मी पाहिले कीं देव त्याच्या वचनाची खास काळजी घेत होता. त्याने त्याचे रक्षण केले. जगाच्या वेगवेगळ्या काळांत पवित्रशास्त्राच्या फारच थोड्या प्रति अस्तित्वात होत्या, तरी देव त्याचे वचन गमावले जाऊ देणार नव्हता. आणि शेवटल्या

काळात पवित्रशास्त्राच्या प्रति इतक्या मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिल्या जाणार होत्या कीं प्रत्येक कुटुंबाला आपल्या मालकीची प्रत ठेवता येईल. मी पाहिले कीं जेव्हा पवित्रशास्त्राच्या फारच थोड्या प्रति उपलब्ध होत्या तेव्हा येशूच्या छळ होणाऱ्या अनुयायांकरिता तें फार मौल्यवान व सांत्वनदायीं होते. तें अगदी गुप्त रित्या वाचले जात असे, आणि ज्यांना हें उच्च सुभाग्य मिळत असे त्यांना वाटे कीं त्यांची देवाबरोबर, व त्याचा पुत्र येशू याच्याबरोबर, व त्याच्या शिष्यांबरोबर, मुलाखत झाली आहे. आणि ह्या धन्य भाग्याकरिता अनेकांना त्यांच्या प्राणांची आहुति द्यावी लागली. जर त्यांना पवित्र शास्त्रवचने वाचतांना पकडले गेले, तर त्यांना पकडून कुऱ्हाडीने मारण्याकरिता, किंवा खांबाला बांधून अग्निने जाळण्याकरिता, किंवा उपासमारीने अंधारकोठडीत मरण्याकरिता घेऊन जात.

सैतान उद्धाराच्या योजनेस अडथळण करू शकत नव्हता. येशूला क्रूसखांबीं वधले गेले होते, व तो तिसऱ्या दिवशीं पुन्हा उठला होता. सैतानाने त्याच्या दूतांना सांगितले कीं तो क्रूसखांबावरील वध आणि पुनरुत्थान यांचासुद्धा स्वतःच्या फायद्याकरिता उपयोग करून घेईल. येशूवर विश्वास ठेवण्याचा जे दावा करीत त्यांनी ख्रिस्ताच्या मृत्युसमयीं यहूदी यज्ञयाग व कर्मकांडे यांना लागू केलेल्या देवाच्या सूचना रद्द केल्या गेल्या आहेत असें मानले तरी त्याकरिता तो तयार होता जर तो त्यांना थोडे अधिक बहकवू शकला व ख्रिस्तासोबत देवाच्या दहा आज्ञांचे नियमशास्त्रसुद्धा रद्द झाले आहे असा विश्वास त्यांनी ठेवावा असें करू शकला.

मी पाहिले कीं अनेकजण सैतानाच्या या युक्तिपुढे सहजगत्या झुकले. देवाच्या पवित्र आज्ञा पायतळीं तुडवल्या जातांना पाहून सबंध स्वर्गाला अत्यंत संताप आला. येशू आणि सर्व स्वर्गीय दूतजमाव देवाच्या आज्ञांच्या स्वरूपाशीं परिचित होते, आणि त्यांना माहीत होते कीं तो त्यांना बदलणार नाही किंवा रद्द करणार नाही. मानवाच्या असहाय्य स्थितीमुळें स्वर्गात अत्यंत दुःख उत्पन्न झाले होते, आणि कळवळा येऊन देवाच्या पवित्र आज्ञा मोडणाऱ्या अपराध्यांकरिता येशू मरण्यास तयार झाला. जर त्याच्या आज्ञा रद्द करता आल्या असत्या, तर मानवाला येशूच्या मृत्युवाचून वाचविता आले असते. ख्रिस्ताच्या मरणाने त्याच्या पित्याच्या आज्ञा नष्ट करण्यात आल्या नाहीत, तर उच्च व सन्माननीय करण्यात आल्या आणि त्या आज्ञांच्या पवित्र सूचना पाळणे सर्वांवर बंधनकारक करण्यात आले. जर ख्रिस्ती मंडळी शुद्ध व खंबीर राहिली असती, तर सैतान त्यांना फसवू शकला नसता, आणि देवाच्या आज्ञा पायतळीं तुडविण्यास तो त्यांना उद्युक्त करू शकला नसता. या धीट कारवाईत, सैतान सरळसरळपणे देवाच्या स्वर्गातील व पृथ्वीवरील शासनाच्या पायावर हल्ला करतो. त्याच्या बंडामुळें त्याला स्वर्गातून हद्दपार करण्यात आले. त्याच्या बंडाळीनंतर, स्वतःस वाचविण्याकरिता, देवाने त्याच्या आज्ञा बदलाव्या अशी त्याची इच्छा होती; परंतु देवाने सैतानाला अखिल स्वर्गीय दूतजमावांपुढे सांगितले कीं त्याच्या आज्ञा अबदल होत्या. सैतानाला ठाऊक आहे कीं जर तो दुसऱ्यांना देवाच्या आज्ञांचे उल्लंघन करण्यास प्रवृत्त करू शकला तर त्याला त्यांच्या नाशाबद्दल खात्री आहे; कारण कीं देवाचा आज्ञाभंग करणाऱ्या प्रत्येक अपराध्याला मरण भोगणे भाग आहे.

सैतानाने अजूनही पुढे जाण्याचे ठरविले. त्याने त्याच्या दूतांना सांगितले कीं काहीजण देवाच्या

आज्ञांसंबंधी इतके ईर्षावान असतील कीं या जाळ्यात त्यांना पकडले जाऊ शकणार नाही; कारण कीं दहा आज्ञा इतक्या साध्यासोप्या आहेत कीं त्या अजूनही बंधनकारक आहेत असा विश्वास अनेकजण ठेवतील; म्हणून जिवंत देवाला दृष्टोत्पतिस आणणारी चौथी आज्ञा भ्रष्ट करण्यास त्याने प्रयत्न केले पाहिजेत. त्याने त्याच्या प्रतिनिधींना मार्गदर्शन केले कीं त्यांनी शब्बाथात बदल करण्याचा प्रयत्न करावा, आणि दहांमधील जी एकमेव आज्ञा खऱ्या देवाला, आकाशाच्या आणि पृथ्वीच्या उत्पन्नकर्त्याला, दृष्टिपुढे आणते तिच्यात बदल करावा. सैतानाने त्यांच्यापुढे येशूचे गौरवी पुनरुत्थान सादर केले, आणि त्यांना सांगितले कीं आठवड्याच्या पहिल्या दिवशीं तो उठला असल्याने त्याने शब्बाथाचा बदल सातव्या दिवसावरून आठवड्याच्या पहिल्या दिवसात केला. अशा प्रकारें सैतानाने पुनरुत्थानाचे सत्य त्याचे उद्दिष्ट साधण्याकरिता वापरले. त्याला आणि त्याच्या दूतांना हर्ष वाटला कीं त्यांनी तयार केलेल्या चुकीच्या गोष्टी ख्रिस्ताचे प्रेमी असल्याचा दावा करणारांनी कसें पूर्ण मनाने स्वीकारले. एखादी गोष्ट एखादा भक्त त्याची धर्मभावना दुखावली जात आहे असें समजून भयग्रस्त होईल, तर दुसरा ती आनंदाने स्वीकारील. वेगवेगळी चूक तत्वे स्वीकारली जातील व उत्साहाने त्यांचे समर्थन केले जाईल. देवाच्या वचनात स्पष्टपणे प्रगट केलेली देवाची इच्छा चुकांनी व रूढींनी झाकून टाकली गेली व त्या चुका व रूढी देवाच्या आज्ञा म्हणून शिकविल्या गेल्या. परंतु जरी स्वर्गाला आव्हान देणारी फसवेगिरी येशूच्या द्वितीय आगमनाच्या काळापर्यंत खपवून घेतली जाणार आहे, तरी चुकीच्या तत्वांच्या व फसवेगिरीच्या ह्या सर्व काळात देव साक्षीदारांवाचून राहणार नाही. मंडळीच्या छळाच्या व अंधकाराच्या सबंध कालावधीत देवाच्या सर्व आज्ञा पाळणारे खरे व विश्वासू साक्षीदार होऊन गेले आहेत.

मी पाहिले कीं गौरवाच्या राजाचे क्लेश व मृत्यु देवदूतांच्या दृष्टिस दिसले तेव्हा त्यांना कमालीचे आश्चर्य वाटले. परंतु मी पाहिले कीं जीवनाचा व गौरवाचा प्रभू, ज्याने सर्व स्वर्ग हर्षाने व वैभवाने भरून टाकला होता, त्याने मृत्युची बंधने तोडावी व त्याच्या बंदिशाळेतून विजयी विजेता म्हणून बाहेर पडावे या गोष्टीचे दूतजमावांना काहीच नवल वाटले नाही. आणि जर या घटनांपैकी एखाद्या घटनेच्या स्मरणार्थ विश्रामवार नेमला गेला पाहिजे असेल, तर ती घटना क्रूसखांबीं येशूच्या वधले जाण्याची घटना आहे. परंतु, मी पाहिले कीं यापैकीं कोणतीही घटना देवाच्या आज्ञांत बदल करण्याकरिता किंवा त्या रद्द करण्याकरिता नियोजिली गेली नव्हती; उलट देवाच्या आज्ञा अबदल आहेत याचा सर्वांत भक्कम पुरावा या घटनांद्वारें मिळतो.

या दोन्ही महत्त्वाच्या घटनांच्या स्मरणार्थ त्यांचीत्यांची स्मारके आहेत. प्रभूभोजनात भाग घेण्याने, मोडलेल्या भाकरीने आणि द्राक्षवेलींच्या फळाने, आपण प्रभू येईपर्यंत त्याच्या मृत्युचे चित्र दाखवितो. स्मारक म्हणून हा विधी पाळल्याने, आपल्या मनांपुढे त्याच्या दुःखभोगाची व मरणाची दृश्ये नव्याने आणली जातात. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे स्मारक आपण त्याच्यासोबत बाप्तिस्म्यात पुरले जातो, व त्याच्या पुनरुत्थानाच्या सारखेपणात नवजीवन जगू लागण्याकरिता जलमय कबरेतून उठविले जातो हें आहे.

मला दाखविले गेले कीं देवाच्या आज्ञा सदासर्वकाळ टिकणाऱ्या आहेत, आणि नव्या पृथ्वीत त्या

चिरकालीन युगांयुगांत अस्तित्वात असतील. सृष्टिनिर्मितीच्या वेळीं, जेव्हा पृथ्वीचे पाये घातले गेले होते, तेव्हा देवपुत्रांनी भाळून जाऊन निर्माणकर्त्याचे कार्य पाहिले होते, आणि सर्व स्वर्गीय दूतजमावांनी हर्षाने आरोळ्या ठोकल्या होत्या. त्यावेळीं शब्बाथाचा पाया घातला गेला होता. सृष्टिनिर्मितीच्या सहा दिवसांच्या कार्याच्या शेवटीं त्याने केलेल्या सर्व कामानंतर देवाने सातव्या दिवशीं विसावा घेतला; आणि त्याने सातव्या दिवसास आशीर्वाद दिला व तो पवित्र केला, कारण कीं त्या दिवशीं तो त्याच्या सर्व कामापासून विश्राम पावला होता. शब्बाथाची स्थापना एदेन बागेत माणसाच्या पतनापूर्वी करण्यात आली होती, आणि आदाम आणि हवाबाई, आणि सर्व स्वर्गीय दूतजमाव तो पाळत असत. देवाने सातव्या दिवशीं विसावा घेतला, आणि त्यास आशीर्वाद देऊन पवित्र केले; आणि मी पाहिले कीं शब्बाथ कधींच रद्द केला जाणार नाही; उद्धार पावलेले पवित्रजन, आणि सर्व स्वर्गीय दूतजमाव, थोर निर्माणकर्त्याच्या सन्मानार्थ चिरकालीन युगांयुगांत शब्बाथ नेहमी पाळतील.

पहा: *दानिएल,* अध्याय ७; *२थेस्सल.*, अध्याय २.

# अध्याय १९

# मरण, दुर्दशेत सार्वकालीन जीवन नव्हे

सैतानाने त्याच्या फसवेगिरीस सुरुवात एदेन बागेपासून केली. तो हवाबाईला म्हणाला: तूं खात्रीने मरणार नाहीस. आत्म्याच्या अमरत्वाचा हा सैतानाचा पहिला धडा होता; आणि त्याने ही फसवेगिरी त्या काळापासून तें आजवर चालू ठेवलेली आहे, आणि जोंवर देवाच्या लेकरांचा बंदिवास नष्ट होत नाही तोंवर तो ती पुढे चालू ठेवणार आहे. एदेन बागेत वास्तव्य असतांनाच्या काळातल्या आदामाकडे आणि हवाबाईकडे मला निर्देश करण्यात आला. मनाई केलेल्या झाडाचे फळ त्यांनी खाल्ले, आणि म्हणून जीवनाच्या वृक्षाभोवती ज्वालारुपीं तलवार ठेवण्यात आली, आणि त्यांना बागेतून घालवून देण्यात आले; नाहीतर एखादे वेळीं त्यांनी जीवनाच्या झाडाचे फळ खाल्ले असते आणि ते अमर पातकी बनले असते. जीवनाच्या झाडाने अमरत्व सदासर्वकाळाकरिता प्रदान करायचे होते. मी एका देवदूताला असें विचारतांना ऐकले कीं: आदामाच्या खानदानातल्या कोणी तरी ज्वालारुपीं तलवार ओलांडून जीवनाच्या झाडाचे फळ खाल्ले आहे कां? मी दुसऱ्या एका देवदूताला उत्तर देतांना ऐकले: आदामाच्या खानदानातल्या एकानेही ज्वालारुपीं तलवार ओलांडून त्या झाडाचे फळ खाल्लेले नाही, आणि म्हणून जगात कोणी अमर पातकी नाही. जो जिवात्मा पाप करतो, तो सार्वकालिक मृत्यु भोगेल - असा मृत्यु कीं जो सदासर्वकाळ टिकून राहील, ज्यात पुनरुत्थानाची मुळींच आशा असणार नाही; आणि मग देवाचा कोप शमेल.

मला अतिशय नवल वाटले कीं सैतान माणसांना देवाचे शब्द, कीं: जो जिवात्मा पाप करील तो मरेल, याचा, जो जिवात्मा पाप करील तो मरणार नाही तर सदासर्वकाळ दु:ख भोगत जगेल, असा अर्थ लावण्यात व त्यावर विश्वास ठेवण्यात इतका यशस्वी झाला आहे. देवदूत म्हणाला: जीवन हें जीवन आहे, मग तें दु:खात असो किंवा सुखात असो. मरणात दु:ख नसते, आनंद नसतो, हेवादावा नसतो.

सैतानाने त्याच्या दूतांना ही फसवेगिरी आणि हें खोटेपण, प्रथम एदेन बागेत हवाबाईपुढे केलेले, कीं तूं खरोखरी मरणार नाहीस, तें पसरविण्यास खास प्रयत्न करण्यास सांगितले. आणि हें चुकीचे तत्व लोकांनी स्वीकारले, आणि मनुष्य अमर असतो असा त्यांनी विश्वास ठेवला, तेव्हा मग सैतान त्यांना फसवेगिरीत आणखी पुढे घेऊन गेला आणि पातकी सदासर्वकाळ दुर्दशेत राहतील असा विश्वास ठेवण्यास त्यांना प्रवृत्त केले. मग सैतानाकरिता त्याच्या प्रतिनिधींद्वारें कारवाई करण्यास मार्ग तयार झाला, आणि

लोकांपुढे देव सूड घेणारा जुलमी देव आहे असें देवाचे चित्रण त्यांनी केले: कीं जे त्याला आवडत नाहीत त्यांना तो नरकात लोटील आणि सदासर्वकाळ त्याचा कोप त्यांना जाणवेल असें करील, आणि ते शब्दांत व्यक्त करता येणार नाहीत इतके क्लेश सहन करतील, आणि तो मात्र स्वर्गातून त्यांच्याकडे समाधानाने पाहील कीं ते कसें भयंकर वेदनांत व सार्वकालीन ज्वाळांत जळत तडफडत आहेत. सैतानाला माहीत होते कीं जर हें चुकीचे चित्रण स्वीकारले गेले, तर अनेकांना देवाविषयीं प्रेम व आकर्षण वाटण्याऐवजी त्यांना देवाचा भयंकर दरारा वाटेल व ते त्याचा द्वेष करतील; आणि अनेकजण असा विश्वास बाळगायला प्रवृत्त होतील कीं देवाच्या वचनातील धमक्या शब्दशः पार पाडल्या जाणार नाहीत; कारण त्याने उत्पन्न केलेल्या जिवांना सार्वकालीन दुर्दशेत टाकणे त्याच्या उदार व प्रेमळ स्वभावाविरुद्ध होईल. सैतानाने त्यांना अगदीच दुसऱ्या टोकाला नेले, आणि देवाच्या न्याय्यत्वाकडे डोळेझाक करायला व त्याच्या वचनातील धमक्यांकडे दुर्लक्ष करायला शिकविले, आणि तो सर्वस्वी दया आहे असें त्याचे चित्रण केले, आणि त्यामुळें एकाही जिवाचा नाश होणार नाही, तर सर्वांचा, पवित्रजनांचा आणि पातक्यांचा, सरतेशेवटीं त्याच्या राज्यात उद्धार होईल असें शिकविले. आत्म्याचे अमरत्व आणि कधीं न सरणारी दुर्दशा या चुकीच्या लोकप्रिय तत्वाचा परिणाम म्हणून, सैतान दुसऱ्या एका वर्गाचा गैरफायदा घेतो आणि पवित्रशास्त्र ईश्वरप्रेरित पुस्तक नाही असें मानायला त्यांना प्रवृत्त करतो. त्यांना वाटते कीं तें अनेक चांगल्या गोष्टी शिकविते, परंतु त्यांना त्याच्यावर भिस्त टाकता येत नाही कीं त्याबद्दल आवड उत्पन्न होऊ शकत नाही, कारण कीं त्यांना शिकविले गेले आहे कीं तें सार्वकालीन दुर्दशेचे तत्व जाहीर करते.

सैतान आणखी दुसऱ्या एका वर्गाचा गैरफायदा घेतो आणि त्यांनी देवाचे अस्तित्वच नाकारावे अशा प्रकारें त्यांचे मार्गदर्शन करतो. पवित्रशास्त्राच्या देवाच्या स्वभावात त्यांना सुसंगतपणा दिसत नाही जर तो मानवी कुटुंबातील काहींना सदासर्वकाळाकरिता भयंकर दुःखात लोटत असेल; आणि ते पवित्रशास्त्राला आणि त्याच्या दैवी लेखकाला नाकारतात, आणि मृत्यु म्हणजे सार्वकालीन निद्रा आहे असें समजतात.

मग सैतान आणखी एका वर्गाला त्याच्या मार्गात नेतो जे भित्रे असतात व पाप करायला घाबरतात; आणि त्यांनी पाप केल्यानंतर तो त्यांच्यापुढे चित्र उभे करतो कीं पापाचे वेतन मरण नसून भयंकर त्रा ससंकटांत चिरकालीन जीवन जगणे आहे, व हा छळ त्यांना सार्वकालीन युगांयुगांच्या न सरणाऱ्या काळात नेहमी सहन करणे भाग पडेल. सैतान ही संधी दवडत नाही, तर त्यांच्या कमकुंवत मनांपुढे कधीं न सरणाऱ्या नरकाच्या भयंकर विपदांचे चित्र अधिकाधिक मोठे करतो आणि त्यांच्या मनांवर नियंत्रण करू लागतो, व ते त्यांची सारासार बुद्धि गमवून वेडे बनतात. मग सैतानाला व त्याच्या दूतांना आसुरी आनंद होतो, आणि नास्तिक लोक व धर्मभ्रष्ट झालेले लोक ख्रिस्ती धर्मावर उपहासाचे शिंतोडे उडवितात. ते असें समजतात कीं चुकीचे लोकप्रिय तत्व स्वीकारण्याने होणारे वाईट परिणाम पवित्रशास्त्रावर व त्याच्या दैवी लेखकावर विश्वास ठेवण्याचे नैसर्गिक परिणाम आहेत.

मी पाहिले कीं स्वर्गीय दूतजमावांना सैतानाच्या या फाजील धीटाईच्या कामामुळें खूप संताप येत

होता. मी विचारणा केली कीं देवाचे देवदूत सामर्थ्यशाली असतांना, आणि जर त्यांना नेमले गेले तर ते शत्रुच्या सामर्थ्याचा सहजपणे बिमोड करू शकतील असें असतांना, मग या सर्व फसवेगिरीस माणसांच्या मनांवर प्रभावी कां होऊ दिले जाते. तेव्हा मी पाहिले कीं सैतान मनुष्याला नष्ट करण्याकरिता हरएक कौशल्याचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न करील हें देवाला माहीत होते; आणि म्हणूनच त्याने त्याचे वचन लिहून काढविले, आणि सैतानाच्या युक्त्या माणसाकरिता इतक्या साधेपणे स्पष्ट केल्या कीं सर्वांत कमकुवत माणसानेसुद्धा त्याबाबत चूक करण्याची गरज नाही. आणि मग, मनुष्याला त्याचे वचन दिल्यानंतर त्याने त्या वचनाचे काळजीपूर्वक रक्षण केले, म्हणून सैतानाला व त्याच्या दूतांना, त्यांच्या कोठल्याही हस्तकाकरवीं किंवा प्रतिनिधीकरवीं, तें नष्ट करता आले नाही. दुसरी पुस्तके नष्ट केली जाऊ शकतील, परंतु हें पवित्र पुस्तक अमर व्हावयाचे होते. आणि जगाचा शेवटचा काळ नजीक येतांना, जेव्हा सैतानाच्या फसवेगिरीच्या युक्त्यांमध्ये भरमसाठ वाढ होणार आहे, तेव्हा ह्या पवित्र पुस्तकाच्या प्रति इतक्या बहुगुणित होणार आहेत कीं ज्या कोणाला हवे असेल त्याला मानवाला प्रगट केलेल्या देवाच्या इच्छेची प्रत स्वतःकरिता मिळू शकेल, आणि, त्यांनी प्रयत्न केल्यास, त्यांना सैतानाच्या फसवेगिरीविरुद्ध व खोटेपणाच्या अद्‌भुत करामतींविरुद्ध संरक्षण मिळणारी अस्त्रे मिळू शकतील.

मी पाहिले कीं देवाने पवित्रशास्त्राचे विशेष रित्या संरक्षण केले, तरी जेव्हा प्रति थोड्या होत्या तेव्हा विद्वानांनी काही बाबतींत शब्द बदलले होते, आणि त्यांना वाटले होते कीं ते तें अधिक स्पष्ट करीत आहेत, परंतु खरे तर जें स्पष्ट होते तें ते गूढ करीत होते, सर्वसामान्यपणे जीं मते मानली जात होती त्या रूढींच्या समर्थनार्थ ते हीं वचने झुकवीत होते. परंतु मी पाहिले कीं देवाचे वचन एकत्रितपणे अभ्यासल्यास ती एक परिपूर्ण साखळी आहे, आणि एक शास्त्रलेख दुसऱ्याचे स्पष्टिकरण देतो. जे सत्याचे खरे शोधक असतील त्यांनी चूक करण्याची गरज नाही; कारण देवाचे वचन जीवनाचा मार्ग दाखवून देण्यात स्पष्ट आणि साधेसोपे तर आहेच, परंतु देवाच्या वचनात प्रगट केलेला जीवनाचा मार्ग समजण्याकरिता मार्गदर्शक म्हणून पवित्र आत्मा दिला जातो.

मी पाहिले कीं देवाच्या देवदूतांनी कधींच कोणाच्या इच्छाशक्तिवर नियंत्रण करावयाचे नाही. देव माणसापुढे जीवन आणि मरण ठेवतो. त्याने त्याची निवड स्वतः करावयाची आहे. पुष्कळांना जीवन हवे असते, पण ते रूंद मार्गातच चालणे चालू ठेवतात, कारण त्यांनी जीवनाची निवड केलेली नसते.

दोषी, पापी मानवाकरिता त्याच्या पुत्राला मरावयास देण्यात मी देवाची दया व करूणा पाहिली. ज्यांच्याकरिता इतक्या मोलाने उद्धार विकत घेऊन दिला आहे तो न स्वीकारण्याचा निर्णय जे घेतात त्यांना शिक्षा झालीच पाहिजे. देवाने निर्माण केलेल्या जिवांनी त्याच्या शासनाविरुद्ध बंड करण्याची निवड केली; पण मी पाहिले कीं देवाने त्यांना कधीं न संपणारी दुर्दशा भोगण्याकरिता नरकात बंद करून ठेवले नाही. तो त्यांना स्वर्गाला घेऊन जाऊ शकत नव्हता, कारण कीं त्यांना पवित्र व शुद्ध जिवांच्या संगतीत ठेवण्याने ते अगदीच दुःखी होतील. देव त्यांना स्वर्गाला नेणार नाही, आणि तो त्यांना सर्वकाळाकरिता दुःख भोगण्याकरितासुद्धा जिवंत ठेवणार नाही. तो त्यांना पूर्णपणे नष्ट करून टाकील, आणि जणू ते कधीं

अस्तित्वातच नव्हते असें करील, आणि मग त्याचे न्यायीपण समाधान पावेल. त्याने मानवाला पृथ्वीच्या धुळीपासून घडविले, आणि आज्ञाभंग करणारे व अपवित्र जन अग्निने खाक होतील, आणि पुन्हा धुळीस जाऊन मिळतील. मी पाहिले कीं असें करण्यात देवाचे जें औदार्य व करूणा दिसून येते, त्यामुळें सर्वांना त्याच्या स्वभावाचे आकर्षण वाटावयास पाहिजे व त्याच्याकरिता मनात भक्तिभाव उत्पन्न व्हावयास पाहिजे; आणि दुष्टांना जेव्हा पृथ्वीवरून नष्ट केले जाईल, तेव्हा स्वर्गीय जमाव म्हणतील, आमेन!

ख्रिस्ताचे नांव धारण करणारे, पण सैतानाने तयार केलेल्या फसव्या युक्त्यांना धरून राहणारे लोक पाहून सैतानाला मोठे समाधान झाले. तो आणखीसुद्धा नवनव्या फसव्या युक्त्या शोधून काढणार आहे. त्याचे सामर्थ्य वाढत चालले आहे आणि त्याचे कसब जास्तजास्त वाढत आहे. त्याने त्याच्या प्रतिनिधींना - पोपलोकांना आणि याजकलोकांना - स्वतःस उच्च करण्यास प्रवृत्त केले, आणि जे देवावर प्रीति करीत होते आणि त्यांच्यामार्फत त्याने लोकांमध्ये पसरविलेल्या फसव्या गोष्टींपुढे नमत नव्हते, अशांविरुद्ध त्यांनी समाजाला चेतवून त्यांचा खूप छळ केला. ख्रिस्ताच्या समर्पित अनुयायांना नष्ट करण्यास सैतानाने त्याच्या हस्तकांना उद्युक्त केले. त्यांनी देवाच्या बहुमोल जनांना कितीतरी यातना व क्लेश सहन करायला लावले! देवदूतांनी ह्या सर्व गोष्टींची विश्वासूपणे नोंद ठेवली आहे. परंतु सैतान व त्याचे वाईट दूत विजयानंद करू लागले, आणि त्यांनी त्या यातना भोगणाऱ्या पवित्रजनांची सेवा करणाऱ्या व त्यांना बळ देणाऱ्या देवदूतांना म्हटले कीं ते त्यांना ठार करतील, तेणेंकरून पृथ्वीवर एकही खरा ख्रिस्ती भक्त उरणार नाही. मी पाहिले कीं तेव्हा देवाची मंडळी शुद्ध होती. तेव्हा देवाच्या मंडळीत भ्रष्ट हृदयाचे कोणी येण्याचा धोका नव्हता, कारण कीं खऱ्या ख्रिस्ती भक्ताला - जो त्याची श्रद्धा जाहीर करण्याचे धाडस करी त्याला - मुंडके छाटले जाण्याचे, अग्निकुंडात बांधून जाळून ठार केले जाण्याचे, आणि सैतान व त्याचे दुष्ट दूत जो कोणता छळ शोधून काढू शकतील व मनुष्यांच्या मनांत घालू शकतील, त्यांस सामोरे जाण्याचे धोके होते.

पहा:
*उत्पत्ति*, अध्याय ३; *उपदेशक* ९:५; १२:७; *लूक* २१:३३;
*योहान* ३:१६; २*तिमथ्य*. ३:१६;
*प्रगटीकरण* २०:१४-१५; २१:१; २२:१२-१९.

# अध्याय २०
# धर्मसुधारणेचा काळ

परंतु सर्व छळ होऊनही आणि पवित्रजनांना ठार केले जाऊनही, जिवंत साक्षीदार पाहाल तेथे उभे करण्यात आले. देवाचे देवदूत त्यांच्यावर सोपविलेले मोलाचे कार्य करीत होते. ते सर्वांत अंधाऱ्या जागीं शोध घेत होते आणि अंधकारातून प्रामाणिक हृदयाच्या माणसांची निवड करीत होते. ते सर्व चुकीच्या तत्वांत गुरफटलेले होते, तरी जसें देवाने शौलाला निवडले होते तसें देवाने त्याचे सत्य वाहण्याकरिता निवडलेली पात्रे होण्याकरिता त्यांची निवड केली; त्यांनी त्याचे लोक म्हणवून घेणारांच्या पातकांविरुद्ध त्यांचे आवाज उठवायचे होते. देवाच्या देवदूतांनी मार्टिन लूथर, मेलांक्थॉन, आणि वेगवेगळ्या ठिकाणांतील इतरांना देवाच्या वचनाच्या ज्वलंत साक्षीकरिता तहानेले केले. शत्रु लोंढ्याप्रमाणे आला होता, आणि त्याच्याविरुद्ध ध्वज उभारला जाणे अवश्य होते. वादळाला सामोरे जाण्यास लूथरची निवड केली गेली; त्याला पतन पावलेल्या मंडळीच्या क्रोधापुढे उभे राहावयाचे होते, आणि जे थोडके त्यांच्या पवित्र सेवाकार्यात विश्वासू होते त्यांना त्याने सबळ करावयाचे होते. देवाचा कोप ओढवून घेण्यास तो नेहमीच घाबरत असे. त्याने कर्मांनी देवाची कृपा मिळविण्याचा प्रयत्न केला; पण त्याचे तोंवर समाधान झाले नाही जोंवर स्वर्गातून प्रकाशाचा किरण येऊन त्याच्या मनातील अंधकारास त्याने घालवून दिले नाही; आणि त्याला पुण्यकर्मांवर नव्हे, तर ख्रिस्ताच्या रक्ताच्या पुण्याईवर भिस्त ठेवण्यास शिकविले; देवाकडे पोपलोकां मार्फत नव्हे किंवा पापकबुली ऐकणाऱ्या याजकलोकांमार्फत नव्हे, तर केवळ येशू ख्रिस्तामार्फत येण्यास तो शिकला. हें ज्ञान लूथरकरिता किती मौल्यवान होते! हा नवा आणि मौल्यवान प्रकाश, जो त्याच्या अंधाऱ्या बुद्धिवर प्रकाशला होता व त्याची अंधश्रद्धा त्याने घालवून दिली होती, त्याचे त्याला अत्यंत मोल वाटत होते - पृथ्वीवरील सर्वांत समृद्ध खजिन्यांपेक्षासुद्धा जास्त. देवाचे वचन नवे झाले होते. सर्वकाही बदलून गेले होते. ज्या पुस्तकाची त्याला धास्ती वाटत होती कारण त्याला त्यातले सौंदर्य दिसले नव्हते, तें त्याच्याकरिता *जीवन*, **जीवन** बनले. तें त्याचा आनंद, त्याचे सांत्वन, त्याचा धन्य शिक्षक बनले. त्याच्या अध्ययनापासून त्याला काहीही दूर करू शकत नव्हते. त्याला मृत्युची भीति वाटत असे; परंतु त्याने देवाचे वचन वाचले तसतशा त्याच्या सर्व भित्या दूर झाल्या, आणि त्याला देवाच्या स्वभावाचे आकर्षण वाटू लागले व तो त्याच्यावर प्रीति करू लागला. तो देवाच्या वचनाचा स्वतःकरिता स्वतः शोध घेऊ लागला. त्यातील समृद्ध खजिन्यांवर तो मेजवानी करू लागला, आणि मग तो मंडळीकरिता त्याचा शोध घेऊ लागला. ज्यांच्यावर त्याने उद्धाराकरिता भिस्त ठेवली होती त्यांच्या पातकांचा त्याला अत्यंत वीट आला. ज्या अंधकाराने

त्याला ग्रासले होते, त्याच अंधकारात इतर अनेकजण लपेटले गेलेले असल्याचे त्याने पाहिले. जगाचे पातक एकट्याने वाहून नेणाऱ्या देवाच्या कोंकऱ्याकडे त्यांचे लक्ष वेधावे म्हणून तो आतुरतेने संधी शोधू लागला. त्याने पोपच्या चर्चच्या चुकांविरुद्ध व पातकांविरुद्ध त्याचा आवाज उठविला, आणि हजारोंना अंधकारात डांबून ठेवणारी शृंखला - जी त्यांना उद्धाराकरिता कर्मांवर भिस्त ठेवायला लावीत होती ती - तोडून टाकण्याची त्याला मोठी आस्था व कळकळ होती. त्यांची मने देवाच्या कृपेच्या खऱ्या समृद्धिकरिता उघडी करण्याकरिता, व येशू ख्रिस्ताद्वारें जो उत्कृष्ट उद्धार मिळू शकत होता त्याकडे त्यांचे लक्ष वेधण्याकरिता त्याला उत्कंठा लागली होती. त्याने त्याचा आवाज उत्साहाने उंचावला, आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यात चर्चच्या नेत्यांच्या त्या काळच्या पातकांविरुद्ध ओरड केली; आणि त्याला याजकांच्या विरोधाच्या वादळाला तोंड द्यावे लागले, तेव्हा त्याचे धैर्य खचले नाही; कारण तो खंबीरपणे देवाच्या बलाढ्य बाहूवर विसंबत होता, आणि त्याने त्याला विजय द्यावा म्हणून त्याच्यावर पूर्ण विश्वासाने भरवसा ठेवीत होता. आणि त्याने लढा जितका अधिकाधिक जवळ जवळ आणला, तितका याजकांचा क्रोध त्याच्याविरुद्ध चेतविला गेला. त्यांना स्वतःत सुधारणा घडवून आणण्याची इच्छा नव्हती. त्यांनी आरामातच राहण्याची, फाजील सुखात, आणि दुष्टाईत राहण्याची निवड केली. चर्चला अंधकारातच राहू देण्याची त्यांची इच्छा होती.

मी पाहिले कीं लूथर पापाचा निषेध करण्यात व सत्यास पुढे करण्यात उत्साही, निष्ठावान, निर्भीड, आणि धीट होता. त्याने दुष्ट माणसांची आणि दुष्टात्म्यांची कदर केली नाही. त्याला माहीत होते कीं त्या सर्वांहून अधिक बलाढ्य असलेला एक, प्रत्यक्ष देव, त्याच्यासोबत होता. लूथरमध्ये ज्वलंत अग्नि, उत्साह, धैर्य आणि धीटाई होती, आणि काही काही वेळा तो योग्य मर्यादेपलिकडे जाण्याचे भय होते; परंतु देवाने मेलांक्थॉनला लूथरला मदत करण्यासाठीं व धर्मसुधारणेच्या क्रांतिचे काम पुढे नेण्यासाठीं उभे केले; त्याचा स्वभाव अगदीच लूथरच्या उलट होता. मेलांक्थॉन भित्रा, घाबरट, सावधानता बाळगणारा आणि मोठा धीर धरणारा मनुष्य होता. तो देवाचा अत्यंत प्रिय होता. त्याचे पवित्रशास्त्राचे ज्ञान खूप होते, आणि त्याची परिस्थितीबाबतची सतर्कता व सुज्ञता उत्कृष्ट होती. देवाच्या कार्याकरिता त्याला लूथरच्याच तोडीचे प्रेम होते. या हृदयांना देवाने एकत्र जुळविले; ते कधीं विभक्त होणार नव्हते अशा प्रकारचे मित्र बनले. जेव्हा मेलांक्थॉन घाबरण्याच्या व कामाची गति संथ करण्याच्या धोक्यात असे तेव्हा लूथरची त्याला मोठी मदत होत असे, आणि जेव्हा लूथर वाजवीपेक्षा उतावीळपणे कार्य करीत असे तेव्हा मेलांक्थॉनसुद्धा त्याला आवरण्यात मोठी मदत करीत असे. मेलांक्थॉनच्या दूरदृष्टिच्या सावधानतेमुळें अनेकदा संकट टळले जात असे, एरव्ही जें कार्य एकट्या लूथरवर सोपविले गेले असते तर देवाच्या कार्यावर संकट आले असते; आणि अनेकदा कार्याची प्रगति झालीच नसती जर तें एकट्या मेलांक्थॉनवर सोपविले गेले असते. धर्मसुधारणेच्या क्रांतिचे काम पुढे प्रगत करण्याकरिता देवाने या वेगवेगळ्या स्वभावाच्या दोन माणसांची निवड केली यांत देवाची सुज्ञता मला दाखविली गेली.

मग मला प्रेषितांच्या काळात मागे नेण्यात आले, आणि मी पाहिले कीं सोबती म्हणून देवाने उत्साही व एकनिष्ठ पेत्राची आणि सौम्य, धीर धरणाऱ्या, लीन स्वभावाच्या योहानाची जोडी जमविली.

कधींकधीं पेत्र अधीर होत असे. आणि जेव्हा त्याच्या उत्साहात आणि निष्ठेत तो फार घाई करी, तेव्हा प्रिय शिष्य अनेकदा पेत्राला रोखत असे, पण त्यामुळें त्याच्यात सुधारणा झाली नव्हती. परंतु पेत्राने त्याच्या प्रभूचा नकार केल्यानंतर, व पश्चात्ताप केल्यानंतर, व त्याचा पालट झाल्यानंतर, त्याच्या निष्ठेवर व उत्साहावर ताबा ठेवण्यास योहानाकडून सावधानीचा सौम्य इशारा पुरेसा होऊ लागला. जर ख्रिस्ताचे कार्य एकट्या योहानावर सोडले गेले असते, तर अनेकदा कार्यावर संकट आले असते. पेत्राच्या उत्साहाची गरज होती. त्याच्या धीटाईने आणि शक्तिशाली प्रतिसादाने अनेकदा त्यांची अडचणीतून सुटका होत असे आणि त्यांचे शत्रु गप्प होत असत. योहान मनमिळाऊ होता. त्याने त्याच्या धीरोदात्त सहनशीलतेने आणि सखोल समर्पणाने अनेकांना ख्रिस्ताच्या कार्याकरिता मिळविले.

देवाने पोपच्या चर्चमध्ये अस्तित्वात असलेल्या पातकांविरुद्ध ओरड करण्यास व धर्मसुधारणेचे कार्य पुढे नेण्यास माणसे उभी केली. सैतानाने ह्या जिवंत साक्षीदारांना नष्ट करण्यास पाहिले; परंतु देवाने त्यांच्याभोवती संरक्षणाचे कुंपण घातले. काहींना, त्याच्या नामाच्या गौरवाखातर, त्यांनी दिलेली साक्ष त्यांच्या रक्ताने शिक्कामोर्तब करू दिली गेली; परंतु इतर काही शक्तिशाली माणसे होती, लूथर व मेलांक्थॉनप्रमाणे, जे देवाचे सर्वोत्कृष्ट गौरव जिवंत राहून व पोपलोकांच्या, याजकांच्या आणि राजांच्या पातकांविरुद्ध मोठ्याने ओरड करून करू शकत होती. ते लूथरच्या वाणीपुढे थरथर कापत. त्या निवडलेल्या माणसांद्वारें प्रकाशाची किरणे अंधकाराला घालवून देऊ लागली, आणि अनेकांनी हर्षाने प्रकाश स्वीकारला व ते त्यात चालू लागले. आणि जेव्हा एका साक्षीदाराचा वध होई, तेव्हा दोन किंवा अधिक त्याची जागा भरून काढण्याकरिता तयार केले जात.

परंतु सैतान समाधान पावला नाही. त्याला फक्त शरीरावर कब्जा मिळत होता. तो विश्वासी भक्तांना त्यांची श्रद्धा व आशा सोडून द्यायला भाग पाडू शकला नाही. आणि मृत्युतसुद्धा त्यांचा विजय झाला कारण कीं नीतिमानांच्या पुनरुत्थानाचे वेळीं त्यांच्यापुढे अमरत्वाची तेजस्वी आशा होती. त्यांच्यात मानवी शक्तिपेक्षा अधिक सामर्थ्य होते. क्षणभरसुद्धा झोपण्याचे धारिष्ट ते करू शकत नव्हते. ते त्यांची ख्रिस्ती अस्त्रे त्यांच्यासभोवताली ठेवीत, संघर्षाकरिता तयार असत, केवळ आध्यात्मिक वैऱ्यांकरिताच नव्हे, तर माणसांच्या रुपातल्या सैतानाकरिता, ज्यांची सततची मागणी असे कीं: तुमची श्रद्धा सोडून द्या, नाहीतर मरा. ते थोडके ख्रिस्ती भक्त देवामध्ये बळकट होते, आणि त्याच्या दृष्टित ख्रिस्ताचे नाम धारण करणाऱ्या परंतु ख्रिस्ताच्या कार्यात डरपोक असणाऱ्या निम्म्या जगापेक्षा अधिक मौल्यवान होते. मंडळीचा छळ होत असतांना त्यांच्यात ऐक्य होते व ते एकमेकांवर प्रेम करीत असत. ते देवामध्ये भक्कम होते. त्यांच्यात पातक्यांना मिसळू दिले जात नव्हते; तसेंच फसविणाऱ्याला आणि फसल्या गेलेल्यांना त्यांच्यात मिसळू दिले जात नव्हते. केवळ जे ख्रिस्ताखातर सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार होते, तेच त्याचे शिष्य बनू शकत होते. त्यांना गरीबी आवडे, नम्रता आवडे, आणि ख्रिस्तासारखे असण्यास आवडे.

पहा: *लूक* २२:६१-६२; *योहान* १८:१०; *प्रेषितांची कृत्ये,* अध्याय ३ व ४. आणखी अध्ययनाकरिता कोणत्याही ज्ञानकोशातून "धर्मसुधारणेची क्रांति" पहा.

# अध्याय २१
# चर्चची आणि जगाची युति

मग सैतानाने त्याच्या दूतांशीं विचारविनिमय केला, आणि त्यावेळीं त्यांनी काय मिळविले होते याचा आढावा घेतला. त्यांनी मरणाच्या भीतिने काही भित्र्या जिवात्म्यांना त्यांच्या बाजूला ठेवले होते, सत्याला आलिंगन देण्यापासून राखले होते, ही गोष्ट खरी होती; परंतु पुष्कळजणांनी, ते सर्वांत डरपोक असूनसुद्धा, सत्य स्वीकारले, आणि ताबडतोब त्यांच्या भित्या व घाबरटपणा त्यांना सोडून गेला, आणि त्यांनी जेव्हा त्यांच्या बांधवांचा मृत्यु पाहिला, आणि त्यांचा खंबीरपणा व धीर पाहिला, तेव्हा त्यांना माहीत पडले कीं हें क्लेश सहन करण्याकरिता त्यांना देव व देवदूत मदत करीत होते, आणि ते धीट व निर्भीड बनले. आणि जेव्हा त्यांचे प्राण देण्याचे त्यांना पाचारण करण्यात आले, तेव्हा त्यांनी त्यांची श्रद्धा इतक्या धीराने व खंबीरपणे टिकविली कीं त्यांच्या खून्यांचासुद्धा थरकाप झाला. सैतानाने व त्याच्या दूतांनी निर्णय घेतला कीं जिवात्म्यांना नष्ट करण्याचा दुसरा एक अधिक यशस्वी मार्ग आहे, आणि शेवटीं तो जास्त खात्रीचा ठरेल. त्यांनी पाहिले कीं जरी त्यांनी ख्रिश्चनांना क्लेश भोगायला लावले, तरी त्यांच्या खंबीरपणाने, आणि त्यांना आनंदी ठेवणाऱ्या तेजस्वी आशेमुळें, सर्वांत कमकुंवत भक्तसुद्धा बळकट होत होते, आणि कुऱ्हाड आणि अग्नि त्यांना घाबरवू शकत नव्हते. त्यांच्या खून्यांपुढे उभे असतांना ते ख्रिस्ताच्या उमद्या वागणुकीचे अनुसरण करीत, आणि त्यांची निष्ठा पाहून, व त्यांच्यावर देवाचे गौरव विसावलेले पाहून अनेकांची सत्याबद्दल खात्री होई. सैतानाने ठरविले कीं त्याने जरा सौम्य रुपात आले पाहिजे. त्याने पवित्रशास्त्राची तत्वे भ्रष्ट केली होती; आणि लाखोंचा नाश करतील अशा रूढि खोलवर रुजवल्या होत्या. त्याने त्याचा द्वेष आवरला, आणि त्याच्या प्रजाजनांनी इतका कटु छळ करण्याचा आग्रह न धरण्याचा निर्णय घेतला; एकेकाळीं पवित्रजनांकडे सोपविलेल्या श्रद्धेकरिता ख्रिस्ती मंडळीने भांडू नये, तर वेगवेगळ्या रीतिरिवाजांसंबंधाने भांडावे म्हणून त्यांना उद्युक्त करण्याचे ठरविले. जगापासून वरदाने व मानसन्मान मिळविण्यास त्याने मंडळीला प्रवृत्त केले, अशा खोट्या सबबीखाली कीं ते त्यांचा फायदा करून देत आहेत; तेव्हा मंडळीने देवाची कृपा गमवायला सुरुवात केली. सुखाची आवड धरणाऱ्यांना आणि जगाच्या मित्रांना दूर ठेवण्यात येणारी सत्ये सरळसरळ जाहीर करण्याची टाळाटाळ करण्याने हळूहळू मंडळीने तिचे सामर्थ्य गमविले.

जेव्हा छळाचे सत्र मंडळीविरुद्ध चालू केले गेले होते तेव्हा ती जशी निराळी व विशिष्ट लोकांची होती, तशी ती राहिली नाही. सोन्याचे तेज कसें मंदावले आहे? अत्युत्कृष्ट सोने कसें बदलले आहे? मी

पाहिले कीं जर मंडळीने तिचे पवित्र व वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप नेहमी टिकवून ठेवले असते, तर शिष्यांना जें पवित्र आत्म्याचे सामर्थ्य प्रदान करण्यात आले होते तें तिच्याकडे राहिले असते. आजारी बरे झाले असते, दुष्टात्म्यांचा निषेध करण्यात येऊन त्यांना घालवून देण्यात आले असते, आणि ती बलाढ्य राहिली असती, व तिच्या शत्रुंना तिचे भय वाटले असते.

मी पाहिले कीं माणसांचा भलामोठा गट ख्रिस्ताचे नांव धारण करतो, परंतु देव त्यांना त्याचे म्हणून ओळखत नाही. त्याला त्यांच्यात काही संतोष वाटत नाही. सैतानाने धार्मिक स्वरूप धारण केल्याचे दिसते, आणि लोकांनी स्वतःला ख्रिस्ती भक्त समजावे याकरिता तो अगदी तयार आहे. त्यांनी येशूवर, येशूच्या वधस्तंभीं वधले जाण्यावर, आणि त्याच्या पुनरुत्थानावर विश्वास ठेवला तर त्याकरिता तो अगदीच तयार आहे. या सर्व गोष्टींवर सैतान व त्याचे दूत स्वतः पूर्ण विश्वास ठेवतात, व भीतिने थरथर कापतात. परंतु ह्या विश्वासाने जर ते चांगली कृत्ये करण्यास प्रवृत्त होत नसतील, आणि जर हा विश्वास त्यांना ख्रिस्ताच्या स्वार्थत्यागी जीवनाचे अनुसरण करण्यास मार्गदर्शन करीत नसेल, तर त्याला त्याचे काहीच वाटत नाही; कारण ते केवळ ख्रिस्ती नांव धारण करतात, परंतु त्यांची हृदये तरीही जगिक वृत्तिची असतात; आणि तो त्यांचा त्याच्या सेवेत अधिक चांगला उपयोग करून घेऊ शकतो. जर त्यांनी ख्रिस्ती असण्याचा दावा केला नसता तर त्यांचा तो इतका उपयोग करून घेऊ शकला नसता. ख्रिस्ती नांवाखाली ते त्यांच्या स्वभावाची व्यंगे लपवितात. त्यांच्या अपवित्र स्वभावगुणांसह आणि त्यांच्या वासना काबूत न ठेवता ते वावरतात. त्यांचे दोष अविश्वासी लोक येशू ख्रिस्ताच्या तोंडावर मारतात आणि त्याचा उपहास करतात, आणि जे पवित्र, भ्रष्ट न झालेला, धर्म पाळतात त्यांचे नांव बदनाम करण्यास त्यांना कारण मिळते.

पाळक जगिक वृत्तिच्या नामधारी ख्रिश्चनांकरिता गुळगुळीत गोष्टींचे उपदेश देतात. सैतानाला हें असेंच हवे असते. त्यांना येशूची जाहीर शिकवण व पवित्रशास्त्राची झोंबणारी सत्ये सांगण्याचे धाडस होत नाही; कारण जर त्यांनी तसें केले, तर हे जगिक वृत्तिचे नामधारी लोक त्यांचे ऐकणार नाहीत. त्यांच्यापैकीं अनेकजण श्रीमंत असतात आणि त्यांना मंडळीत राखणे आवश्यक असते, जरी ते तेथे असण्यास सैतान व त्याच्या दूतांपेक्षा अधिक लायक मुळींच नसतात. येशूचा धर्म जगाच्या नजरेत लोकप्रिय व सन्मानाचा असल्याचे दाखविले जाते. लोकांना सांगितले जाते कीं जे धर्म मानतात त्यांना जग जास्त मान देते. ख्रिस्ताच्या शिकवणींपासून ह्या असल्या शिकवणी अगदीच भिन्न असतात. त्याची शिकवण आणि जग शांतीने एकत्र राहू शकत नव्हते. जे त्याचे अनुसरण करीत त्यांना जगाला सोडून द्यावे लागत होते. ह्या मुलायम गोष्टी सैतानापासून व त्याच्या दूतांपासून उगम पावल्या. त्यांनी योजना केल्या, आणि नामधारी ख्रिश्चनांनी त्या पार पाडल्या. ढोंगी लोक आणि पातकी चर्चला येऊन मिळाले. मनाला संतोष देणाऱ्या कल्पक कथा शिकविल्या गेल्या व सहजपणे स्वीकारल्या गेल्या. परंतु जर सत्य त्याच्या शुद्धतेत जाहीर केले गेले, तर तें ढोंग्यांना आणि पातक्यांना लवकरच मंडळीच्या बाहेर ठेवील. परंतु ख्रिस्ताचे नामधारी अनुयायी आणि जग यांच्यात काही फरक राहिलेला नाही. मी पाहिले कीं जर मंडळ्यांच्या सभासदांपासून हें फसवे आच्छादन फाडून टाकले गेले, तर त्यांच्यात इतकी अनीति, भ्रष्टता व घाणेरडेपण प्रगट होईल कीं देवाच्या

सर्वांत लाजाळू लेकरालासुद्धा त्यांना त्यांच्या खऱ्या नांवाने पुकारण्यात संकोच वाटणार नाही, कीं ते त्यांचा बाप जो सैतान, त्याची अपत्ये आहेत, कारण ते त्याची कृत्ये करतात. येशूने आणि सर्व स्वर्गीय दूतजमावांनी या दृश्याकडे तिटकाऱ्याने पाहिले; तरी या मंडळीकरिता देवाकडे एक संदेश होता, जो पवित्र व महत्त्वाचा होता. जर तो स्वीकारला गेला, तर त्याने मंडळीत पूर्ण सुधारणा घडून येईल, ज्वलंत साक्षी पुनर्जीवित होतील ज्यामुळें ढोंगी व पातकी मंडळीतून काढून टाकले जाऊन मंडळी शुद्ध होईल, आणि तिला देवाची कृपा पुन्हा मिळू लागेल.

पहा:
*यशया* ३०:८-२१; *याकोब.* २:१९; *प्रगटीकरण,* अध्याय ३.

# अध्याय २२
# विलियम मिलर

मी पाहिले कीं देवाने त्याच्या देवदूताला एका शेतकऱ्याच्या अंतःकरणावर कार्य करायला पाठविले, जो पवित्रशास्त्रावर विश्वास ठेवीत नव्हता; देवदूताने त्याला भविष्यलेखांचा अभ्यास करायला प्रवृत्त केले. या निवडलेल्या भक्ताकडे देवाचे देवदूत पुन्हापुन्हा येऊ लागले आणि त्याच्या मनाचे मार्गदर्शन करू लागले, आणि त्याच्या बुद्धिला भविष्यलेख समजावू लागले जें भविष्यलेख देवाच्या लोकांपासून नेहमी अंधारात राहिले होते. सत्याच्या साखळीची सुरुवात कशी करावयाची तें त्याला दाखविले गेले, आणि साखळीच्या एक एक कडीचा शोध घेण्यास त्याला प्रवृत्त केले गेले. अशा प्रकारें अभ्यास करायला लागल्यावर शेवटीं त्याला देवाच्या वचनाचे नवल व आकर्षण वाटू लागले. त्यात त्याने सत्याची परिपूर्ण शृंखला पाहिली. ज्या वचनाला तो ईश्वरप्रेरित नसल्याचे मानत होता, तें आता त्याच्या दृष्टिपुढे त्याच्या सौंदर्यात व गौरवात उकलले गेले. त्याने पाहिले कीं शास्त्रलेखांच्या एका भागात दुसऱ्या भागाचे स्पष्टिकरण होते, आणि जेव्हा एखादा भाग त्याच्या बुद्धिला समजत नव्हता, तेव्हा त्याचे स्पष्टिकरण त्याला देवाच्या वचनाच्या दुसऱ्या भागात मिळू लागले. तो देवाच्या पवित्र वचनाकडे हर्षाने पाहू लागला, आणि त्याच्याकरिता त्याच्या मनात अमाप आदर व दरारा उत्पन्न झाला.

भविष्यलेखांचा क्रमाक्रमाने अभ्यास करतांना त्याने पाहिले कीं पृथ्वीचे निवासी या जगाच्या इतिहासाच्या शेवटल्या काळात जगत होते, आणि त्यांना तें माहीत नव्हते. त्याने मंडळ्यांतील भ्रष्टतेकडे नजर टाकली आणि पाहिले कीं त्यांची प्रीति येशूवरून जाऊन जगावर ठेवली गेली होती, आणि ते वरून येणाऱ्या सन्मानाऐवजी जगिक मानाकरिता हपापलेले होते; त्यांचा खजिना स्वर्गात ठेवण्याऐवजी ते जगिक श्रीमंतीकरिता महत्त्वाकांक्षा बाळगून होते. सर्वत्र त्याला ढोंग, अंधार आणि मरण दिसत होते. त्याचा आत्मा बेचैन झाला. देवाने त्याला त्याची शेतीवाडी सोडण्याचे पाचारण केले, जसें त्याने अलीशाला त्याचे बैल व तो नांगरत असलेले शेत सोडून एलीयाच्या मागेमागे जाण्यास पाचारण केले होते. घाबरत घाबरत विलियम मिलरने देवाच्या राज्याची रहस्ये लोकांना उकलून सांगण्यास सुरुवात केली. प्रत्येक प्रयत्नानिशीं त्याला बळ मिळत गेले. तो लोकांना भविष्यलेखांतून पार ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनापर्यंतचा अभ्यास देऊ लागला. जसें बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाने येशूच्या पहिल्या आगमनाची घोषणा केली होती आणि त्याच्या येण्याकरिता मार्ग तयार केला होता, अगदी तसेंच विलियम मिलरने व जे त्याला जाऊन मिळाले त्यांनी देवाच्या पुत्राच्या दुसऱ्या आगमनाची घोषणा केली.

मला शिष्यांच्या काळात माघारे नेण्यात आले आणि मला प्रिय योहान दाखविण्यात आला; त्याने सिद्धिस नेण्याकरिता देवाने त्याच्यासाठीं खास कार्य नेमले होते. सैतानाने ह्या कार्यात अडथळा आणण्याचा निर्धार केला होता, आणि त्याने त्याच्या चाकरांना योहानाला नष्ट करावे अशा हेतुने प्रवृत्त केले होते. परंतु देवाने त्याचा देवदूत पाठवून त्याचे अद्‍भुत रित्या रक्षण केले होते. ज्यांनीज्यांनी योहानाच्या मुक्ततेत देवाचे महान सामर्थ्य प्रगट झालेले पाहिले होते, त्या सर्वांना अत्यंत आश्चर्य वाटले होते, आणि अनेकांची खात्री पटली होती कीं त्याच्याबरोबर देव होता, आणि येशूविषयीं त्याने जी साक्ष दिली होती ती खरी होती. ज्यांनी त्याला नष्ट करण्यास पाहिले होते त्यांना त्याचा जीव घेण्याचा पुन्हा प्रयत्न करण्याची भीति वाटली, आणि त्याला येशूखातर यातना भोगू दिल्या गेल्या. त्याच्या शत्रूंनी त्याच्याविरुद्ध खोटे आरोप केले, आणि लवकरच त्याला निर्जन बेटावर हद्दपार केले गेले, जेथे देवाने त्याचा देवदूत पाठवून त्याला पृथ्वीवर जें काही घडणार होते त्या गोष्टी आणि शेवटापर्यंत मंडळीची स्थिती कशी राहील तें प्रगट केले; मंडळीची धर्मभ्रष्टता त्याला दाखवून दिली गेली व जर मंडळीला देवाला संतोषवायचे असेल आणि शेवटीं विजयी व्हायचे असेल तर मंडळीने कोठले पद भूषविले पाहिजे तें सर्व विदित केले गेले. स्वर्गातून देवदूत योहानाकडे गौरवात आला होता. त्याचे मुख स्वर्गाच्या उत्तम तेजाने चमकत होते. त्याने योहानापुढे देवाच्या मंडळीसंबंधाची गहन व मनाला थरारविणारी दृश्ये प्रगट केली, आणि भक्तांना किती धोक्याचे संघर्ष सहन करावे लागणार आहेत तें चित्र त्याच्यापुढे आणले. योहानाने त्यांना अग्निसम संकटांतून पार होतांना पाहिले, शुभ्र व पारखलेले असें पाहिले, आणि, सरतेशेवटीं, विजयी विजेते झालेले पाहिले, देवाच्या राज्यात गौरवाने उद्धार झालेले पाहिले. योहानाला देवाच्या मंडळीचा शेवटला विजय दाखवितांना देवदूताचे मुख हर्षाने तेजोमय झाले होते आणि कल्पनेपलिकडे तेजस्वी झालेले दिसले. जेव्हा योहानाने मंडळीची अखेरची सुटका पाहिली तेव्हा तो मंत्रमुग्ध झाला, आणि त्या गौरवी दृश्याकडे पाहत असतांना तो इतका भारावला कीं अत्यंत आदराने व दराऱ्याने तो देवदूताला नमण्यास त्याच्या पायां पडला. देवदूताने त्याला तत्क्षणींच वर उठविले, आणि सौम्यपणे असें म्हणत त्याचा निषेध केला कीं: पहा, तूं असें करू नकोस; मी तुझा आणि ज्या तुझ्या बांधवांकडे येशूची साक्ष आहे त्यांचा सोबतीचा सेवक आहे; देवाला नमन कर; कारण येशूची साक्ष भविष्यलेखाचा आत्मा आहे. मग देवदूताने योहानाला स्वर्गीय नगर, त्याच्या सर्व वैभवात व डोळे दिपविणाऱ्या गौरवात दाखविले. नगरीचे गौरव पाहून योहान भारावून गेला आणि पुन्हा मंत्रमुग्ध झाला. देवदूताने अगोदर केलेला निषेध त्याच्या लक्षात राहिला नाही, तर तो देवदूताला नमन करायला पुन्हा त्याच्या पायां पडला; देवदूताने पुन्हा त्याचा सौम्य निषेध केला: पहा, तूं असें करू नको; कारण मी तुझा, आणि तुझे बांधव जे संदेष्टे त्यांचा, आणि जे या पुस्तकाच्या शिकवणी पाळतील त्या सर्वांचा, सोबतीचा सेवक आहे. देवाला नमन कर.

प्रवचक आणि लोक *प्रगटीकरणाचे* पुस्तक गूढ असल्याचे समजतात, आणि पवित्र शास्त्रलेखांच्या इतर भागांपेक्षा कमी महत्त्वाचे मानतात. परंतु मी पाहिले कीं हें पुस्तक खरोखरी खास त्या भक्तांच्या विशेष लाभाकरिता दिलेले प्रगटीकरण आहे जे भक्त या शेवटल्या काळात राहत असतील; त्यांना त्यांचे

खरे स्थान कोणते आहे आणि त्यांचे कर्तव्य काय आहे याबाबतचे मार्गदर्शन करण्याकरिता तें दिले गेले आहे. देवाने विलियम मिलरच्या मनाचे भविष्यलेखांमध्ये मार्गदर्शन केले आणि त्याला *प्रगटीकरणाच्या* पुस्तकातून मोठा प्रकाश दिला.

जर दानिएलाचे दृष्टांत समजले गेले असते, तर लोकांना योहानाचे दृष्टांत अधिक चांगले समजले असते. परंतु योग्य वेळीं, देवाने त्याच्या निवडलेल्या सेवकाच्या मनाला चेतविले, ज्याने स्पष्टपणे व पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यात भविष्यलेख उकलून सांगितले, आणि दानिएलाच्या व योहानाच्या दृष्टांतांत, आणि पवित्रशास्त्राच्या इतर भागांत, असलेली सुसंगति दाखविली आणि देवाच्या वचनातील पवित्र, भीतिप्रद इशारे लोकांच्या हृदयांत खोलवर शिरतील असें केले व मनुष्याच्या पुत्राच्या येण्याकरिता त्यांची तयारी करून घेतली. ज्यांनी त्याचे ऐकले, पाळक आणि लोक, पातकी आणि नास्तिक, त्यांच्या मनांची खोलवर व गंभीर खात्री पटली व ते देवाकडे वळले व न्यायनिवाड्यातून पार होऊ शकण्याकरिता तयारी कशी करावी त्याचा शोध घेऊ लागले.

विलियम मिलरच्या सेवाकार्यात त्याच्यासोबत देवाचे देवदूत असत. तो खंबीर व निडर होता. त्याच्यावर सोपविण्यात आलेल्या संदेशाची त्याने न घाबरता घोषणा केली. दुष्टपणात निद्रिस्त असलेले जग, आणि गारथंड, जगिक चर्च त्याने त्याच्या सर्व सामर्थ्यानिशीं कृति करण्यास त्याला पाचारण करायला पुरेसे होते, आणि त्याने स्वेच्छेने कष्ट व उपासतापास सहन केले, व क्लेश भोगले. जरी त्याला नामधारी ख्रिश्चनांनी व जगाने विरोध केला, आणि सैतानाने व त्याच्या दूतांनी त्याच्यावर प्रहार केले, तरी जेथे कोठे त्याला जेव्हाजेव्हा निमंत्रण मिळे तेव्हातेव्हा मोठमोठ्या जमावांनासुद्धा सार्वकालीन सुवार्तेची घोषणा करण्याचे त्याने बंद केले नाही, व तो मोठ्या आरोळीने संदेश देत राहिला कीं: देवाचे भय धरा व त्याला गौरव द्या; कारण त्याची न्यायनिवाड्याची घटका आली आहे.

पहा:
*१राजे* १९:१६-२१; *दानिएल,* अध्याय ७-१२;
*प्रगटीकरण,* अध्याय १; १४:७; १९:८-१०; २२:६-१०.

# अध्याय २३
# पहिल्या देवदूताचा संदेश

मी पाहिले कीं १८४३सालची वेळेबाबतची घोषणा देवापासून होती. लोकांना जागृत करून त्यांनी खास निर्णय घ्यावा अशी कसोटी त्यांच्यावर आणण्याकरिता ती नियोजिली गेली होती. पाळकलोकांची खात्री पटली आणि भविष्यलेखांतील कालसमयाच्या बाबतीत शिकविली गेलेली सत्ये बरोबर असल्याचे त्यांना जाणवले, आणि त्यांनी त्यांचा गर्व, त्यांचे पगार, आणि त्यांच्या मंडळ्या, सर्वसर्वकाही सोडून दिले व ते ठिकठिकाणीं या संदेशाची घोषणा करायला बाहेर पडले. परंतु स्वर्गापासून आलेल्या संदेशाला ख्रिस्ताचे पाळक म्हणविणाऱ्या फारच थोड्या माणसांच्या हृदयांत जागा मिळू शकल्याने, हें काम अनेक अशा लोकांवर लादले गेले कीं जे प्रवचक, पाळक नव्हते. संदेशाची घोषणा करण्याकरिता काहींनी त्यांची शेते सोडली, इतरांना त्यांच्या दुकानांपासून आणि त्यांच्या व्यापारी व्यवसायांपासून पाचारण केले गेले. आणि काही नोकऱ्या करणाऱ्या लोकांनासुद्धा त्यांनी त्यांच्या नोकऱ्या सोडून पहिल्या देवदूताच्या संदेशाची घोषणा करण्याचे लोकांना न आवडणारे काम करण्यास बाहेर पडणे भाग पडले. पाळकांनी त्यांच्यात्यांच्या पंथांची खास मते आणि भावना बाजूला केल्या आणि येशूच्या येण्याची घोषणा करण्यात ते एक झाले. जेथेकोठे लोकांप्रत हा संदेश गेला तेथेतेथे सर्वत्र लोकांची मने हेलावली गेली. पातक्यांनी पश्चात्ताप केला, त्यांनी रडूनरडून क्षमेकरिता प्रार्थना केल्या, आणि जे अगदीच अप्रामाणिक आयुष्य जगले होते, त्यांनी केलेल्या अप्रामाणिकपणाची भरपाई करण्याची त्यांना चिंता लागली.

आईबापांना त्यांच्या मुलांकरिता घोर काळजी वाटू लागली. ज्यांनी संदेश स्वीकारला होता, ते त्यांच्या पालट न झालेल्या मित्रमंडळीकरिता आणि नातलगांकरिता कष्ट करू लागले, आणि त्या गंभीर संदेशाच्या दडपणाखाली त्यांचे जिवात्मे नम्र होऊन त्यांनी मनुष्याच्या पुत्राच्या येण्याकरिता तयारी करण्यासाठीं मित्रमंडळींना व नातेवाईकांना इशारे दिले व विनवण्या केल्या. अंतःकरणापासून कळकळीने पटवून दिल्या गेलेल्या पुराव्यांच्या भारदस्तपणापुढे ज्यांनी स्वतःचे समर्पण केले नाही, त्यांची मने सर्वांत कठीण बनली. अंतःकरण-शुद्धिच्या या कामाने जगिक गोष्टींपासून मन दूर केले गेले, व पूर्वी कधीं अनुभवास आले नाही अशा प्रकारचे समर्पण केले गेले. विलियम मिलरने व संदेशाची घोषणा करण्याकरिता एलीयाच्या आत्म्यात व सामर्थ्यात उभे केलेल्या देवाच्या सेवकांनी सांगितलेले सत्य स्वीकारावयास हजारों लोक प्रवृत्त झाले. ज्यांनी ह्या गंभीर संदेशाची घोषणा केली, त्यांनी, येशूचा म्होरक्या असलेल्या योहानाप्रमाणे (बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाप्रमाणे), झाडाच्या मुळाशींच कुऱ्हाड घातली व माणसांनी पश्चात्तापास योग्य अशी फळे उपजविण्याचे माणसांना पाचारण केले. अशा प्रकारें संदेश देणे त्यांना भाग पडत आहे असें त्यांना

वाटले. त्यांच्या साक्षी मंडळ्यांना जागृत करण्याच्या व त्यांच्यावर जबरदस्त प्रभाव पाडण्याच्या स्वरूपाच्या होत्या, व त्यांचे खरे स्वरूप प्रगट होणे भाग पडले. आणि येणाऱ्या कोपापासून पळण्याचा गंभीर इशारा ते देऊ लागले तसतसें, मंडळ्यांशीं जुळलेल्या अनेकांनी आध्यात्मिक आरोग्यप्रदान करणारा संदेश स्वीकारला; त्यांनी त्यांची धर्मभ्रष्टता पाहिली, आणि, पश्चात्तापाच्या दुःखी अश्रुंनी, आणि अंतःकरणाच्या घोर यातनांनी, त्यांनी स्वतःला देवापुढे नम्र केले. आणि जसजसा देवाचा पवित्र आत्मा त्यांच्यावर विसावू लागला, तसतसें त्यांनी मोठ्या आरोळीचा संदेश गाजविण्यात त्यांची भर टाकली, कीं: देवाचे भय धरा, आणि त्याला गौरव द्या, कारण त्याची न्यायनिवाड्याची घटका आली आहे.

निश्चित वेळेच्या घोषणेस सर्व स्तरांवरील लोकांपासून कडवा विरोध होऊ लागला - व्यासपीठावरील पाळकापासून तें सर्वांत बेदरकार, स्वर्गाला आव्हान देणाऱ्या पाप्यापर्यंतचे लोक विरोध करू लागले. कोणा माणसाला त्या घटनेचा दिवस किंवा घटका ठाऊक नाही, असें ढोंगी पाळकाच्या आणि धीटाईने उपहास करणाऱ्याच्या तोंडून ऐकू येऊ लागले. असें लोक शिकून घेईनात व त्यांची चूक सुधारण्यास ते उदासीन होते, कीं ज्यांनी भविष्यलेखांतील कालावधी ज्या नेमक्या वर्षी संपतात आणि ख्रिस्ताचे येणे नजीक आहे, अगदी दाराशींच आहे, असें दाखविणारी जीं चिन्हे घडून आली आहेत त्यांकडे निर्देश केलेले आहे. कळपाचे अनेक मेंढपाळ, जे येशूवर प्रीति करण्याचा दावा करीत होते, ते म्हणू लागले कीं ख्रिस्ताच्या येण्याच्या घोषणेला त्यांचा विरोध नव्हता, तर निश्चित वेळ जाहीर करण्याला त्यांचा विरोध होता. देवाच्या सर्वकाही-बघणाऱ्या नजरेने त्यांची हृदये वाचली. येशूचे लवकर येणे त्यांना नको होते. त्यांना ठाऊक होते कीं ख्रिस्ताच्या नांवाला बट्टा लावणारे जीव त्या कसोटीतून उतरणार नाहीत; कारण ते त्याने आखून दिलेल्या नम्र पथात चालत नव्हते. हे खोटे मेंढपाळ देवाच्या कामात आडवे आले. खात्री पटवून देण्याच्या सामर्थ्याद्वारें बोलले गेलेले सत्य लोकांमध्ये जागृति करीत गेले, आणि तुरुंगाच्या नायकाप्रमाणे, ते विचारणा करू लागले कीं: तारण होण्याकरिता मी काय करावे. परंतु हे मेंढपाळ सत्यात व लोकांत आडवे आले, आणि लोकांना सत्यापासून बहकविण्याकरिता त्यांना गुळगुळीत गोष्टी सांगू लागले. ते सैतान व त्याच्या दूतांना जाऊन मिळाले, आणि जेथे शांती नव्हती, तेथे ओरड करू लागलेः शांती, शांती. मी पाहिले कीं देवाच्या देवदूतांनी ह्या सगळ्या गोष्टींची नोंद ठेवली आहे, आणि त्या असमर्पित मेंढपाळांची वस्त्रे जिवात्म्यांच्या रक्ताने माखली आहेत. ज्यांना त्यांचा ऐषआराम हवा होता, आणि देवापासून दूर राहण्यात त्यांना समाधान वाटत होते, ते त्यांच्या ऐहिक सुरक्षिततेतून जागृत व्हायलाच तयार नव्हते.

अनेक पाळक स्वतः हा उद्धार करणारा संदेश स्वीकारीनात, आणि जे तो स्वीकारण्याच्या बेतात होते, त्यांना ते अडथळे निर्माण करू लागले. त्यांच्यावर जिवात्म्यांचे रक्त आहे. सुवार्तिक व इतर लोक स्वर्गातून येणाऱ्या ह्या संदेशास विरोध करण्यास एक झाले. त्यांनी विलियम मिलरचा व त्याच्या कार्यात त्याला जे जाऊन मिळाले होते त्यांचा छळ केला. त्याचा प्रभाव नष्ट करण्याकरिता खोटेपणाच्या गोष्टी ते लोकांत पसरवू लागले, आणि वेगवेगळ्या वेळीं त्याने देवाच्या सूचना स्पष्टपणे सांगितल्यानंतर व त्याच्या श्रोत्यांच्या हृदयांना भेदतील अशी धारदार सत्ये प्रगट केल्यानंतर, त्याच्याविरुद्ध मोठा क्रोध चेतविला

गेला, आणि तो सभागृह सोडून जातांना, काहींनी त्याचा जीव घेण्याकरिता मार्गात त्याच्यावर हात टाकण्यास पाहिले. परंतु देवाने त्याच्या जिवाचे रक्षण करण्यास देवदूत पाठविले आणि ते त्याला संतप्त जमावापासून दूर सुरक्षित ठिकाणीं घेऊन गेले. त्याचे कार्य अद्यापि संपले नव्हते.

सर्वांत समर्पित लोकांनी संदेश आनंदाने स्वीकारला. तो देवापासून होता आणि योग्य वेळीं दिला गेला होता हें त्यांना माहीत होते. स्वर्गीय संदेशाचा परिणाम काय होतो तें देवदूत अत्यंत काळजीने, अत्यंत जिज्ञासेने पाहत होते, आणि जेव्हा मंडळ्या त्यापासून वळल्या व त्याचा त्यांनी अव्हेर केला, तेव्हा दुःखाने त्यांनी येशूचा सल्ला घेतला. त्याने त्याचे मुख मंडळ्यांपासून फिरविले, आणि त्याच्या देवदूतांना आदेश दिला कीं त्यांनी साक्ष स्वीकारलेल्या अमोल जिवांवर विश्वासूपणे लक्ष ठेवावे, कारण कीं त्यांच्यावर आणखी एक प्रकाश अद्यापि प्रकाशणार होता.

मी पाहिले कीं ख्रिस्ती असल्याचा दावा करणाऱ्यांना जर त्यांच्या उद्धारकाचे आगमन प्रिय वाटले असते, जर त्यांची भक्ति त्याच्यावर असती, पृथ्वीवर त्याच्याशीं तुलना होऊ शकणारे कोणी नाहीत असें जर त्यांना वाटले असते, तर त्याच्या येण्याच्या पहिल्याच बातमीचे त्यांनी हर्षाने स्वागत केले असते. परंतु त्यांच्या प्रभूच्या येण्याविषयीं जेव्हा त्यांनी ऐकले तेव्हा त्यांनी जो असंतोष प्रगट केला, तोच एक ठळक पुरावा होता कीं त्यांची त्याच्यावर प्रीति नव्हती. सैतानाला आणि त्याच्या दूतांना आसुरी आनंद झाला, आणि त्यांनी येशू ख्रिस्ताच्या व त्याच्या पवित्र देवदूतांच्या तोंडावर उपहासाने म्हटले कीं, त्याचे नांव धारण करणाऱ्या लोकांना येशूविषयीं इतके कमी प्रेम होते कीं त्यांना त्याचे द्वितीय आगमन नको होते.

मी देवाच्या लोकांना हर्षाने त्यांच्या प्रभूच्या आगमनाची प्रतीक्षा करीत असल्याचे पाहिले. परंतु देवाने त्यांच्याकरिता एक कसोटी योजिली होती. भविष्यलेखांतील कालगणनेच्या बाबतीत झालेली एक चूक त्याच्या हाताने झाकून ठेवली. जे त्यांच्या प्रभूची अपेक्षा करीत होते त्यांना ती दिसली नाही, आणि वेळेच्या घोषणेस विरोध करणाऱ्या त्या काळच्या सर्वांत ज्ञानी माणसांनासुद्धा ती चूक आढळली नाही. देवाची योजना होती कीं त्याच्या लोकांची निराशा व्हावी. वेळ सरली, आणि त्यांच्या उद्धारकाची हर्षाने अपेक्षा करणारे दुःखी व हताश झाले, आणि ज्यांना येशूचे आगमन नको होते, परंतु ज्यांनी केवळ भीतिमुळें संदेश स्वीकारला होता, त्यांना तो अपेक्षिलेल्या वेळीं आला नाही म्हणून आनंद वाटला. धर्मनिष्ठ असल्याच्या त्यांच्या दाव्याचा त्यांच्या हृदयांवर काही परिणाम झालेला नव्हता, व त्यांचे आयुष्य शुद्ध केले जात नव्हते. अशी अंतःकरणे जगापुढे उघड करण्यासाठीं अपेक्षिलेली वेळ सरणे आवश्यक होते. ज्यांना त्यांच्या उद्धारकाचे आगमन खरोखरी हवे होते, त्या दुःखी व हताश झालेल्या भक्तांविरुद्ध उलटण्यात आणि त्यांचा उपहास करण्यात ते सर्वांत पुढे होते. त्याच्या लोकांची कसोटी घेण्यात, आणि संकटाच्या घटकेला कोण माघार घेतील व पळ काढतील तें उघड होण्यासाठीं त्यांची एक चाचणी घेण्यात मी देवाची सुज्ञता पाहिली.

ज्याच्यावर त्यांची जिवापाड प्रीति होती व ज्याला भेटण्याकरिता त्यांच्या मनांत गोड आशा होती त्यांच्याकडे येशू आणि सबंध स्वर्गीय दूतजमाव सहानुभूतिने व प्रेमाने पाहत होते. त्यांच्या संकटकाळात त्यांना टिकवून ठेवण्याकरिता देवदूत त्यांच्याभोवती पाखर घालीत होते. ज्यांनी स्वर्गीय संदेशाकडे दुर्लक्ष

केले होते त्यांना आध्यात्मिक अंधारात सोडून देण्यात आले, आणि देवाने स्वर्गातून त्यांच्याकडे पाठविलेला प्रकाश त्यांनी न स्वीकारल्यामुळें देवाचा त्यांच्यावर कोप भडकला. ते विश्वासू, निराश झालेले भक्त, ज्यांना समजत नव्हते कीं त्यांचा प्रभू कां आला नाही, त्यांना अंधारात ठेवले गेले नाही. भविष्यलेखांच्या कालावधींचा पुन्हा शोध घेण्यासाठीं पवित्रशास्त्राचा परत अभ्यास करण्यास ते प्रवृत्त झाले. कालगणनेच्या संख्यांवरून देवाचा हात काढून घेतला गेला, आणि त्यांच्या चुकीचे त्यांना स्पष्टिकरण मिळाले. त्यांनी पाहिले कीं भविष्यलेखांचे कालावधी १८४४मध्ये संपतात, आणि हें कालावधी १८४३मध्ये संपतात असें दाखविण्याकरिता त्यांचे जें पुरावे होते, त्याच पुराव्यांवरून सिद्ध होत होते कीं तें १८४४मध्ये संपत होते. देवाच्या वचनातून त्यांच्या अभ्यासावर प्रकाश पाडण्यात आला, आणि त्यांना विलंबाच्या काळाचा शोध लागला: "जर दृष्टांतास विलंब होत असेल, तर त्याची वाट पाहा." येशूच्या त्वरित येण्याच्या त्यांच्या प्रेमामुळें त्यांनी दृष्टांतात दाखविलेल्या विलंबाकडे लक्ष दिले नव्हते, ज्या विलंबामुळें देवाची खऱ्या अंतःकरणाने प्रतीक्षा करणारे कोण तें उघड व्हावयाचे होते. पुन्हा त्यांच्यापुढे निश्चित कालघटका आली. तरी त्यांच्यातले अनेकजण त्यांची तीव्र निराशा विसरू शकले नाहीत, आणि १८४३मध्ये त्यांच्या विश्वासात जो उत्साह होता व चैतन्य होते, तें आता त्या प्रमाणात राहिले नव्हते.

सैतानाला आणि त्याच्या दूतांना त्यांचा त्यांच्यावर विजय झाला आहे असें वाटले, आणि ज्यांनी संदेश स्वीकारण्यास नकार दिला होता ते स्वतःचे अभिनंदन करू लागले कीं फसवेगिरीत गोवले न जाण्याची दूरदृष्टि आणि सुज्ञता त्यांच्यामध्ये होती; त्यांच्या हुशारीला त्यांनी अशी नांवे दिली. त्यांना जाणीव होती कीं ते देवाचा संदेश अव्हेरून स्वतःविरुद्धच कार्यवाही करीत होते, आणि जे स्वर्गातून उगम पावलेल्या संदेशानुसार आयुष्य कंठत होते त्या देवाच्या लोकांना गोंधळात टाकण्याच्या कामीं ते सैतान व त्याच्या दूतांच्या बरोबरीने काम करीत होते.

या संदेशावर विश्वास ठेवणाऱ्या भक्तांचा मंडळ्यांनी छळ केला. भीतिमुळें काही काळ ते रोखले गेले होते, म्हणून त्यांना त्यांच्या भावना कृतित आणता आल्या नव्हत्या, परंतु निश्चित घटका सरल्यानंतर त्यांच्या खऱ्या भावना प्रगट झाल्या. भविष्यलेखांतील कालावधी १८४४पर्यंत लागू आहेत ही साक्ष विश्वासी भक्तांना देणे भाग पडत होते, परंतु ती गप्प करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांनी त्यांची चूक स्पष्टपणे समजावून सांगितली, आणि ते त्यांच्या प्रभूची अपेक्षा १८४४मध्ये कां करीत होते त्याची त्यांनी कारणे दिली. त्यांच्या सामर्थ्यशाली कारणांविरुद्ध त्यांचे विरोधक कोठलेच वादविवाद पुढे करू शकले नाहीत. मंडळ्यांचा त्यांच्याविरुद्ध क्रोध भडकला. कोठलाही पुरावा ऐकावयाचा नाही असा त्यांनी निर्धार केला, आणि दुसऱ्यांना त्यांची साक्ष ऐकता येऊ नये म्हणून त्यांनी त्यांच्या आराधनागृहांत ती साक्ष देण्यावर मनाई घातली. देवाने त्यांना दिलेला प्रकाश दुसऱ्यांपासून रोखण्याचे धैर्य जे करीत नव्हते त्यांना मंडळ्यांतून बाहेर टाकण्यात आले; परंतु येशू त्यांच्यासोबत होता, आणि त्याच्या मुखप्रकाशात ते आनंदी होते. दुसऱ्या देवदूताचा संदेश ग्रहण करण्याकरिता त्यांची तयारी करण्यात आली होती. ... पहा: *दानिएल* ८:१४; *हबक्कूक* २:१-४; *मलाखी*, अध्याय ३ व ४; *मत्तय* २४:३६; *प्रगटीकरण* १४:६-७.

# अध्याय २४
# दुसऱ्या देवदूताचा संदेश

मंडळ्या पहिल्या देवदूताचा संदेश स्वीकारीनात, आणि जसजशा त्या स्वर्गातून आलेला प्रकाश अव्हेरीत गेल्या, तसतशा त्या देवाच्या कृपेला दुरावल्या. त्या स्वतःच्याच बळावर भिस्त ठेवीत राहिल्या, आणि पहिल्या संदेशास विरोध करण्याद्वारें त्यांनी स्वतःला अशा परिस्थितीत घातले कीं त्यांना दुसऱ्या देवदूताचा संदेश दिसू शकला नाही. परंतु देवाचे प्रियजन, ज्यांचा छळ होत होता, त्यांनी, “बाबेल पडले आहे”, या संदेशास प्रत्युत्तर दिले आणि पतन पावलेल्या मंडळ्या त्यांनी सोडल्या.

दुसऱ्या देवदूताच्या संदेशाच्या शेवटींशेवटीं मी देवाच्या लोकांवर स्वर्गातून एक मोठा प्रकाश प्रकाशतांना पाहिला. या प्रकाशाची किरणे सूर्याप्रमाणे तेजस्वी दिसत होती. आणि मी देवदूतांचे आवाज अशी आरोळी देतांना ऐकले कीं: पहा, वर येत आहे, त्याला भेटायला सामोरे जा!

मध्यरात्रीची आरोळी दुसऱ्या देवदूताच्या संदेशाला सामर्थ्य देण्याकरिता दिली गेली होती. हताश झालेल्या पवित्रजनांना उत्तेजन द्यायला, आणि त्यांच्यापुढे असलेल्या थोर कार्याकरिता त्यांना तयार करायला स्वर्गातून देवदूतांना पाठविले गेले. हा संदेश सर्वांत जास्त पात्रता असलेल्या माणसांनी प्रथम स्वीकारला नाही. तेव्हा देवदूतांना लीन, समर्पित भक्तांकडे पाठविण्यात आले, आणि त्यांना ती आरोळी ठोकण्यास भाग पाडले कीं: पहा, वर येत आहे, त्याला भेटण्यास तुम्ही सामोरे जा. ज्यांच्याकडे मोठ्या आरोळीचा संदेश सोपविला होता त्यांनी त्वरा केली, आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यात आरोळी सगळीकडे पसरविली, आणि त्यांच्या निराश झालेल्या बांधवांना जागृत केले. हा मोठ्या आरोळीचा संदेश माणसांच्या सुज्ञतेने किंवा पांडित्याने दिला गेला नाही, तर देवाच्या सामर्थ्याने दिला गेला, आणि त्याच्या ज्या पवित्रजनांनी तो ऐकला त्यांना त्यास विरोध करता आला नाही. सर्वांत जास्त आध्यात्मिकता असलेल्यांनी हा संदेश पहिल्यांदा स्वीकारला, आणि ज्यांनी पूर्वीच्या कार्यात नेतृत्व केले होते त्यांनी सर्वांच्या शेवटीं स्वीकारला व त्यात आपले आवाज मिसळले कीं: पहा, वर येत आहे, त्याला भेटण्यास सामोरे जा.

देशाच्या (अमेरिकेच्या) प्रत्येक भागात दुसऱ्या देवदूताच्या संदेशाचा प्रकाश दिला गेला, आणि हजारोंची अंतःकरणे त्या आरोळीने विरघळली. तो नगरोनगरीं, आणि गांवोगांवीं गेला, व देवाचे प्रतीक्षा करणारे लोक पूर्णपणे जागृत झाले. अनेकजण ह्या संदेशास आराधनागृहांत प्रवेश मिळू देत नव्हते, त्यामुळें ज्वलंत साक्ष ज्यांच्यामध्ये होती अशा भक्तांच्या मोठ्या गटाने पतन पावलेल्या मंडळ्या सोडल्या. मध्यरात्रीच्या

आरोळीने एक पराक्रमी कार्य सिद्धिस नेले. संदेश हृदये तपासणारा होता, आणि विश्वासी जनांना स्वत:करिता ज्वलंत अनुभव मिळविण्यास प्रवृत्त करीत होता. त्यांना माहीत होते कीं ते एकमेकांवर विसंबू शकत नव्हते.

पवित्रजन काळजी घेऊन त्यांच्या प्रभूसाठीं उपवासाने, जागृत राहण्याने, आणि जवळजवळ नित्य प्रार्थनेत राहण्याने वाट पाहत राहिले. काही पातकीसुद्धा त्या काळाकडे भयभीत होऊन पाहत होते, परंतु जनसमाजाला या संदेशाविरुद्ध चेतविण्यात आल्याचे दिसले, आणि त्यांनी सैतानाची वृत्ति जाहीर केली. त्यांनी टिंगलबाजी केली, उपहास केला, आणि सर्वत्र असें शब्द ऐकू येऊ लागले कीं: कोणा माणसाला तो दिवस किंवा ती घटका माहीत नाही. त्यांच्याभोवती वाईट दूत विजयानंद करीत होते, आणि त्यांनी त्यांची हृदये कठीण करण्याकरिता, आणि स्वर्गातून येणाऱ्या प्रकाशाच्या प्रत्येक किरणाचा अव्हेर करण्याकरिता त्यांना भरीस पाडत होते, कीं मग ते त्यांना त्यांच्या मोहजालात घट्ट पकडू शकतील. प्रभूच्या येण्याची वाट पाहत आहोत असा खोटा दावा करणारे अनेकजण होते, ज्यांना त्याबाबतीत काही भाग किंवा आशीर्वाद नव्हता. त्यांनी देवाचे तेज पाहिले होते, आणि प्रतीक्षा करणाऱ्या भक्तांची नम्रता आणि सखोल समर्पण पाहिले होते, आणि कल्पनेपेक्षा भक्कम पुरावा पाहून सत्य स्वीकारतो असें म्हणण्यास ते प्रवृत्त झाले होते. परंतु त्यांचा पालट झालेला नव्हता. त्यांची तयारी झालेली नव्हती. पवित्रजनांची गंभीर व कळकळीच्या प्रार्थनेची वृत्ति सर्वत्र जाणवत होती. त्यांच्यावर एक पवित्र गांभीर्य विसावत होते. देवदूतांनी अत्यंत काळजीने परिणाम निरखले होते, आणि स्वर्गीय संदेश स्वीकारलेल्यांना ते वर उंचावीत होते आणि पृथ्वीच्या गोष्टींमधून त्यांचे आकर्षण काढून घेऊन त्यांनी उद्धाराच्या विहिरीतून (उगमापासून) भरपूर पुरवठा मिळवावा असें करीत होते. तेव्हा देवाच्या लोकांना त्याची मान्यता होती. येशू त्यांच्याकडे संतोषाने पाहत होता. त्याची प्रतिमा त्यांच्यात प्रतिबिंबीत झाली होती. त्यांनी संपूर्ण त्याग केला होता, पूर्ण समर्पण केले होते, आणि अमरत्वात बदलले जाण्याची अपेक्षा केली होती. परंतु पुन्हा त्यांच्याकरिता दु:खद निराशा योजिलेली होती. मुक्तता होण्याची अपेक्षा करीत त्यांनी ज्या वेळेकडे नजर लावली होती, ती आली आणि पार झाली. ते अजूनही पृथ्वीवरच होते, आणि आणखी दृश्य रुपात शापाचे प्रभाव यापूर्वी त्यांना कधीं दिसले नव्हते. त्यांनी त्यांच्या प्रीतिच्या सर्व भावना स्वर्गावर ठेवल्या होत्या, आणि गोड अपेक्षेत, अमर मुक्ततेची चव घेतली होती; परंतु त्यांच्या आशा फोल ठरल्या.

अनेक लोकांना ज्या भीतिने ग्रासले होते, ती त्यांना एकदमच सोडून गेली नाही. निराशा झालेल्यांवर आपला विजय झाल्याचे त्यांनी तावडतोब दाखविले नाही. परंतु जेव्हा त्यांना देवाच्या कोपाची काही चिन्हे जाणवली नाहीत, तेव्हा त्यांची भीति दूर झाली, आणि त्यांनी त्यांचा उपहास व त्यांची टिंगलबाजी करायला सुरुवात केली व ते त्यांना तुच्छतेने हंसू लागले. देवाच्या लोकांची पुन्हा कसोटी झाली व त्यांना चाचणीतून पार जावे लागले. जग हंसत होते, उपहास करीत होते, आणि तुच्छतेने त्यांचा निषेध करीत होते; आणि ज्यांनी निस्संशय विश्वास ठेवला होता कीं येशू तेव्हा येईल आणि मृतांना जिवंत करील, आणि जिवंत पवित्रजनांना बदलून टाकील, आणि त्याचे राज्य घेईल व सदासर्वकाळ तें त्याचे राहील, त्यांना

येशूच्या शिष्यांप्रमाणे वाटू लागले कीं: त्यांनी माझ्या प्रभूला नेले आहे, आणि त्यांनी त्याला कोठे ठेवले आहे तें मला माहीत नाही.

पहा:
*मत्तय* २४:३६; २५:६; *योहान* २०:१३; *प्रगटीकरण* १४:८.

# अध्याय २५
# द्वितीय आगमनाच्या चळवळीचे चित्र

मी कैक गट पाहिले जें एकमेकांशीं दोऱ्यांनी एकत्र बांधलेले दिसत होते. या गटांतील अनेकजण पूर्ण अंधारात होते. त्यांच्या नजरा खाली पृथ्वीवर रोखल्या होत्या, आणि त्यांच्यामध्ये आणि येशूमध्ये काहीच संबंध असल्याचे दिसत नव्हते. या वेगवेगळ्या गटांमध्ये इथेतिथे मी काही व्यक्ति विखुरलेल्या पाहिल्या ज्यांचे चेहरे प्रकाशमय दिसत होते आणि त्यांच्या नजरा वर स्वर्गाकडे उंचावल्या गेल्या होत्या. त्यांना येशूकडून प्रकाशाची किरणे, सूर्याच्या प्रकाशाच्या किरणांप्रमाणे, प्रदान केली गेली होती. एका देवदूताने मला काळजीपूर्वक बघायला सांगितले, आणि मी ज्यांच्याकडे प्रकाशाचे किरण होते त्या प्रत्येकावर देवदूत पहारा ठेवीत असल्याचे पाहिले, परंतु जे अंधकारात होते ते वाईट दूतांनी घेरलेले होते. मी एका देवदूताची वाणी मोठ्याने आरोळी मारतांना ऐकली कीं: देवाची भीति बाळगा, आणि त्याला गौरव द्या, कारण त्याच्या न्यायनिवाड्याची घटका आली आहे.

या गटांवर एक गौरवी प्रकाश विसावला होता कीं जे त्याचा स्वीकार करतील त्या सर्वांनी प्रकाशित व्हावे. अंधकारात असलेल्या काहीजणांनी तो प्रकाश स्वीकारला व हर्ष केला; परंतु इतरांनी स्वर्गापासून आलेला प्रकाश अव्हेरला, आणि ते म्हणाले कीं त्यांना बहकविण्याची ती फसवेगिरी आहे. त्यांच्यापासून प्रकाश दूर झाला, आणि ते अंधारात सोडले गेले. ज्यांनी येशूपासून प्रकाश मिळविला होता, त्यांनी त्यांच्यावर पाडल्या गेलेल्या मौल्यवान, वाढत्या प्रकाशाचे हर्षाने जतन केले. त्यांचे चेहरे प्रज्ज्वलित झाले, व पवित्र हर्षाने चमकू लागले, आणि त्यांच्या नजरा वर सरळ येशूकडे अत्यंत मनापासून वळलेल्या होत्या, आणि त्यांचे आवाज देवदूताच्या वाणीसोबत असें बोलतांना ऐकू येऊ लागले कीं: देवाची भीति बाळगा आणि त्याला गौरव द्या, कारण त्याची न्यायनिवाड्याची घटका आली आहे. ते अशी आरोळी ठोकतांना मी पाहिले कीं अंधारात असलेले लोक त्यांना बाजूने आणि खांद्याने दूर ढकलीत होते. मग पवित्र प्रकाशाचे जतन करणाऱ्यांपैकी अनेकांनी त्यांना बांधलेले दोर तोडून टाकले आणि त्या गटांपासून विभक्त होऊन ते वेगळे झाले. आणि अनेकजण त्यांना बांधून ठेवलेले दोर तोडून टाकत असतांना, या वेगवेगळ्या गटांमध्ये समाविष्ट असलेली माणसे, ज्यांना त्या गटांचा आदरयुक्त मान मिळत होता, ते त्या गटांमधून जाऊ लागले आणि काही आल्हाददायीं शब्द बोलून, तर दुसरे कोपायमान होऊन व धमक्यांचे हातवारे करून कमकुंवत

होत चाललेले दोर परत घट्ट बांधीत होते आणि एकसारखे म्हणत होते कीं: देव आम्हांसोबत आहे; आम्ही प्रकाशात उभे आहो; आमच्याकडे सत्य आहे. हीं कोण माणसे होती अशी मी विचारणा केली. मला सांगण्यात आले कीं ते पाळक आणि पुढारी लोक होते, ज्यांनी स्वतः तर प्रकाशाचा अव्हेर केला होता, आणि दुसऱ्यांनी तो स्वीकारावा अशी त्यांची इच्छा नव्हती. प्रकाश जतन करणारे जे होते ते मोठ्या उत्साहाने आणि मनाच्या तीव्र उत्कंठेने वर पाहत असल्याचे मी पाहिले; येशू येऊन त्यांना त्याच्याकडे घेऊन जाईल अशी त्यांची अपेक्षा होती. लवकरच ज्यांनी प्रकाशात हर्ष केला होता त्यांच्यावरून ढग पार झाला, आणि त्यांचे चेहरे दुःखी दिसू लागले. या ढगाचे कारण काय होते असें मी विचारले. मला दाखविले गेले कीं ती त्यांची निराशा होती. त्यांनी उद्धारकाच्या येण्याची अपेक्षा केली होती ती घटका टळून गेली होती, आणि येशू आला नव्हता. त्यांना निराशेने घेरले, आणि पूर्वी माझे लक्ष ज्या माणसांकडे गेले होते, ते पाळक आणि पुढारी लोक, ते आनंदीआनंद करू लागले. ज्यांनी प्रकाशाचा अव्हेर केला होता ते मोठा विजयानंद करू लागले, आणि सैतान आणि त्याचे वाईट दूतसुद्धा त्यांच्याभोवती हर्ष करू लागले.

मग मी दुसऱ्या एका देवदूताची वाणी असें बोलतांना ऐकली कीं: बाबेल पडली! पडली! हताश झालेल्यांवर एक प्रकाश चमकू लागला, आणि मोठ्या उत्कंठेने ते त्याच्या आगमनाची वाट पाहू लागले, आणि त्यांनी परत त्यांच्या नजरा येशूवर केंद्रित केल्या. मग मी कैक देवदूतांना त्या दुसऱ्या देवदूताशीं संभाषण करतांना पाहिले, ज्याने आरोळी ठोकली होती कीं: बाबेल पडले, पडले; आणि ह्या देवदूतांनी त्यांचे आवाज उंचावले आणि दुसऱ्या देवदूतासोबत त्यांनीसुद्धा आरोळ्या ठोकल्या कीं: पहा, वर येत आहे! त्याला भेटण्यासाठीं सामोरे जा! या देवदूतांचे सुमधूर आवाज सगळीकडे जात असल्याचे दिसले. दिलेला प्रकाश ज्यांनी जतन केला त्यांच्याभोवती एक अतिशय तेजस्वी व गौरवी प्रकाश चमकत होता. त्यांचे चेहरे अत्युत्कृष्ट गौरवाने चमकत होते, आणि ते देवदूतांशीं आरोळीत जाऊन मिळाले व म्हणू लागले: पहा, वर येत आहे! आणि ते एकमेकांच्या आवाजांत आवाज मिसळून या वेगवेगळ्या गटांमध्ये सुमधूर वाणीने आरोळी देत होते, तेव्हा ज्यांनी प्रकाशाचा अव्हेर केला होता ते त्यांना ढकलू लागले आणि रागावलेल्या नजरांनी त्यांच्याकडे पाहत त्यांना तुच्छतेने वागवीत त्यांचा उपहास करू लागले. परंतु देवाचे देवदूत छळ होत असणारांवर त्यांचे पंख फडफडवीत होते, ज्यावेळीं सैतान आणि त्याचे दूत त्यांच्याभोवती त्यांचा अंधकार पसरविण्याचा प्रयत्न करीत होते, कीं त्यांनी स्वर्गाचा प्रकाश अव्हेरण्यास प्रवृत्त व्हावे.

मग ज्यांना ढकलले जात होते व त्यांचा उपहास केला जात होता त्यांना एक वाणी असें बोलतांना मी ऐकली कीं: त्यांच्यामधून बाहेर या, आणि अमंगळ गोष्टींना स्पर्श करू नका. मोठ्या संख्येने भक्तांनी त्यांना बांधलेले दोर तोडले व त्या वाणीचे आज्ञापालन केले, व जे अंधकारात होते त्यांना ते सोडून गेले, व ज्यांनी यापूर्वीच दोर तोडले होते त्यांना ते जाऊन मिळाले, आणि हर्षाने त्यांनी त्यांचे आवाज त्यांच्या सूरात मिसळले. अंधारात असलेल्या गटांमध्येंच जे अजूनही राहिले होते त्या थोडक्या भक्तांच्या कळकळीच्या व दुःखाच्या प्रार्थनांची वाणी मी ऐकली. पाळक आणि नेतेलोक या वेगवेगळ्या गटांमध्ये खालीवर जात होते आणि दोरांना अधिक भक्कम करीत होते; परंतु तरी मी कळकळीच्या प्रार्थनेची ही वाणी ऐकली. मग

मी पाहिले कीं जे प्रार्थना करीत होते त्यांनी मुक्त झालेल्या व देवामध्ये आनंद करीत असलेल्या एकोप्याने नांदत असलेल्या गटाकडे मदतीकरिता त्यांचे हात पसरले. स्वर्गाकडे कळकळीने पाहत त्यांनी वर निर्देश केला व उत्तर दिले: त्यांच्यामधून बाहेर पडा, आणि वेगळे व्हा. मुक्त होण्याकरिता व्यक्तिंना मी संघर्ष करतांना पाहिले, आणि सरतेशेवटीं त्यांना बांधून ठेवलेले दोर त्यांनी तोडले. दोरांना अधिक भक्कम करण्याच्या प्रयत्नांना त्यांनी प्रतिकार केला, आणि पुन्हापुन्हा केलेली विधाने ते जुमानिनात कीं: देव आमच्यासोबत आहे, आमच्याकडे सत्य आहे. अंधारात असलेल्या गटांना व्यक्ति सोडतच राहिल्या, आणि मुक्त झालेल्या गटामध्ये येऊन मिळू लागल्या, जे पृथ्वीवरून उंच जागीं स्थित केलेल्या उघड्या मैदानात असल्याचे दिसत होते. त्यांची नजर वर होती, आणि देवाचे गौरव त्यांच्यावर विसावले होते, आणि ते मोठ्याने देवाची स्तुति करीत होते. त्यांच्यात ऐक्य होते, आणि ते स्वर्गाचा प्रकाश पेहरल्याप्रमाणे दिसत होते. या गटाभोवती काहीजण होते जे प्रकाशाच्या प्रभावाखाली आले होते, परंतु खास रित्या गटाशीं जुळलेले नव्हते. पाडलेल्या प्रकाशाचे जे जतन करीत होते ते सर्वजण मन लावून अत्यंत आवडीने वरच्या दिशेने बघत होते. येशू त्यांच्याकडे आनंदाने पाहत होता. ते येशूच्या येण्याची अपेक्षा करीत होते. त्याच्या आगमनाची त्यांना उत्कंठा होती. ते पृथ्वीच्या दिशेने एकही आसुसलेली नजर टाकीत नव्हते. या प्रतीक्षा करणारांवर पुन्हा एक ढग आल्याचे मी पाहिले. मी त्यांना त्यांचे शिणलेले डोळे खाली वळवितांना पाहिले. या बदलाचे कारण काय अशी मी विचारणा केली. माझ्यासोबत राहणारा देवदूत म्हणाला: पुन्हा एकदा त्यांचा अपेक्षाभंग झाला आहे. येशू अद्यापि पृथ्वीवर येऊ शकत नाही. त्यांनी अद्यापि येशूकरिता क्लेश भोगले पाहिजेत व अधिक मोठी संकटे सहन केली पाहिजेत. मनुष्यांपासून रुळलेल्या रूढी व चुका त्यांनी सोडून दिल्या पाहिजेत, व सर्वस्वी देवाकडे व त्याच्या वचनाकडे वळले पाहिजे. त्यांनी शुद्ध झाले पाहिजे, त्यांना शुभ्र बनविले गेले पाहिजे आणि त्यांनी कसोटीतून पार झाले पाहिजे. जे कटु संकटातून टिकून राहतील त्यांना सार्वकालिक विजय मिळेल.

पृथ्वीचे अग्निने शुद्धिकरण करण्याद्वारें पवित्रस्थानाचे शुद्धिकरण करण्यासाठीं येशू प्रतीक्षा करणाऱ्या आनंदी गटाच्या अपेक्षेप्रमाणे पृथ्वीवर आला नाही. मी पाहिले कीं त्यांच्या भविष्यलेखांच्या कालगणतीत ते बरोबर होते. भविष्यलेखातील काळ १८४४मध्ये संपला. त्यांची चूक पवित्रस्थान काय होते तें न समजण्यात, आणि त्याच्या शुद्धिकरणाचे स्वरूप न समजण्यात झाली होती. भविष्यसंदेशाचा कालावधी संपल्यावर पवित्रस्थानाची शुद्धि करण्याकरिता येशूने परमपवित्रस्थानीं प्रवेश केला. मी पुन्हा त्या वाट पाहणाऱ्या, निराश झालेल्या गटाकडे पाहिले. ते दुःखी दिसत होते. त्यांनी त्यांच्या श्रद्धेचे पुरावे काळजीपूर्वक तपासले, आणि भविष्यलेखांतील कालसमयांची गणति बरोबर असल्याची खात्री करून घेतली; त्यांना त्यात कसलीही चूक आढळली नाही. काळाची पूर्णता झाली होती, पण मग त्यांचा उद्धारक कोठे होता? ते त्याला हरवून बसले होते.

मग मला शिष्यांची निराशा दाखविण्यात आली कीं जेव्हा ते येशूच्या कबरेकडे आले होते तेव्हा त्यांना तिथे येशूचा देह आढळला नाही. मरीया म्हणाली: त्यांनी माझ्या प्रभूला नेले आहे, आणि त्याला

कोठे ठेवले तें मला माहीत नाही. देवदूतांनी दुःखी शिष्यांना सांगितले कीं त्यांचा प्रभू उठला आहे, आणि तो त्यांच्या अगोदर गालीलात जाईल.

मी पाहिले कीं येशू त्या निराश झालेल्या भक्तांकडे अत्यंत करुणेने बघत होता, आणि त्याने त्यांच्या मनांचे मार्गदर्शन करण्यास त्याच्या देवदूतांना पाठविले कीं त्यांना तो सापडावा व तो होता तेथे त्यांनी त्याच्या पाठोपाठ जावे; ही पृथ्वी पवित्रस्थान नाही हें त्यांना समजावे; स्वर्गीय पवित्रस्थानाची शुद्धि करण्याकरिता त्याला परमपवित्रस्थानीं जाणे भाग होते; इस्राएलांकरिता खास प्रायश्चित्त करण्यासाठीं, व त्याच्या पित्यापासून राज्य प्राप्त करून घेण्यासाठीं तो गेला होता, व तेथून तो पृथ्वीवर परतणार होता व त्यांना त्याच्यासोबत सदासर्वकाळ राहण्यासाठीं घेऊन जाणार होता. शिष्यांच्या निराशेवरून ज्यांनी १८४४मध्ये त्यांच्या प्रभूची अपेक्षा केली होती त्यांची निराशा बरोबर चित्रित होते. जेव्हा येशू विजयानंदात गाढवावर बसून यरुशलेमला जात होता तेव्हाचे दृश्य मला दाखविले गेले. हर्षाच्या भरात शिष्यांनी विश्वास ठेवला होता कीं तो तेव्हा त्याचे राज्य घेणार होता आणि जगाच्या अधिपतींप्रमाणे राज्य करणार होता. ते मोठ्यामोठ्या आशा बाळगून त्यांच्या राजाच्या मागेमागे गेले. त्यांनी खजुरीच्या सुंदर झावळ्या तोडल्या, आणि त्यांची बाह्य वस्त्रे काढली, आणि उत्साहाने त्याच्या मार्गात तीं अंथरली; आणि काहीजण त्याच्यापुढे गेले, व इतरजण त्याच्या मागोमाग अशी आरोळी ठोकीत गेले कीं: दाविदाच्या पुत्राला होसान्ना! प्रभूच्या नामाने येणारा धन्यवादित असो! ऊर्ध्वलोकीं होसान्ना! पसरलेल्या चैतन्याने परूशी घाबरले, आणि येशूने त्याच्या शिष्यांचा निषेध करावा अशी त्यांची इच्छा होती. परंतु तो त्यांना म्हणाला कीं, जर हे गप्प राहिले, तर लगेच धोंडे आरोळ्या देतील. *जखर्या* ९:९चे भविष्य पूर्ण झालेच पाहिजे, आणि तरी, मी पाहिले कीं शिष्यांची अतिशय निराशा होणार होती. थोड्या दिवसांतच ते येशूच्या मागोमाग कवटीच्या जागीं गेले व तेथे त्यांनी त्याला क्रूरपणे वधस्तंभावर रक्तबंबाळ, छिन्नविछिन्न झालेले पाहिले. त्यांनी त्याचा क्लेशदायीं मृत्यु पाहिला, व त्याला कबरेत ठेवलेले पाहिले. त्यांची हृदये दुःखात बुडाली. त्यांच्या अपेक्षा एकाही बाबतीत पूर्ण झाल्या नव्हत्या. येशूसोबत त्यांच्या आशा मेल्या. परंतु जेव्हा येशू मेलेल्यांतून उठला आणि त्याच्या दुःखी शिष्यांना त्याने दर्शन दिले, तेव्हा त्यांच्या आशा पुनर्जीवित झाल्या. त्यांनी त्यांच्या उद्धारकाला गमाविले होते, पण त्यांना तो पुन्हा सापडला होता.

मी पाहिले कीं ज्यांनी १८४४मध्ये प्रभूच्या येण्याची अपेक्षा केली होती त्यांची निराशा त्या शिष्यांच्या निराशेच्या तोडीची नव्हती. भविष्यलेख पहिल्या व दुसऱ्या देवदूतांच्या संदेशांत पूर्ण झाले होते. तें योग्य वेळीं दिले गेले होते, आणि देवाने त्या संदेशांकरिता जी कार्यसिद्धी योजिली होती ती सिद्धिस गेली होती.

पहा:
*दानिएल* ८:१४; *मत्तय* २१:४-१६; २५:६; *मार्क* १६:६-७;
*लूक* १९:३५-४०; *योहान* १४:१-३; २०:१३;
*२करिंथ.* ६:१७; *प्रगटीकरण* १०:८-११; १४:७-८.

# अध्याय २६
# दुसरे एक चित्र

पृथ्वीवर जें काम होत आहे त्यात सबंध स्वर्गाने घेतलेली स्फूर्ति मला दाखविण्यात आली. येशूने एका बलवान व पराक्रमी देवदूताला खाली पृथ्वीवर पाठवायचे व पृथ्वीवरच्या रहिवाश्यांना त्याच्या द्वितीय आगमनाकरिता तयारी करण्याचा इशारा देण्याचे सेवाकार्य दिले. मी त्या पराक्रमी देवदूताला स्वर्गातील येशूची समक्षता सोडतांना पाहिले. त्याच्यापुढे एक अत्यंत तेजस्वी व गौरवी प्रकाश जात होता. मला सांगितले गेले कीं त्याचे सेवाकार्य पृथ्वीला त्याच्या गौरवाने प्रकाशित करण्याचे, व मानवाला देवाच्या येणाऱ्या कोपाचा इशारा देण्याचे होते. मोठमोठ्या जमावांनी तो प्रकाश स्वीकारला. काहीजण अत्यंत गंभीर दिसत होते, तर इतर हर्षित झालेले व मंत्रमुग्ध झाल्याचे दिसत होते. प्रकाश सर्वांवर पाडला गेला होता, परंतु काहीजण प्रकाशाच्या फक्त प्रभावाखाली आले; त्यांनी त्यास मनापासून स्वीकारले नाही. ज्या कोणी तो प्रकाश स्वीकारला, त्या सर्वजणांनी त्यांची तोंडे स्वर्गाकडे वळविली आणि देवाचे गौरव केले. अनेकजण मोठ्या क्रोधाने संतप्त झाले. पाळक आणि लोक दुष्टांसोबत जाऊन मिळाले, आणि पराक्रमी देवदूताने पाडलेल्या प्रकाशास जोरदार प्रतिकार करू लागले. परंतु ज्या कोणी तो स्वीकारला ते सर्वजण जगापासून विभक्त झाले, आणि एकमेकांशीं आत्मियतेच्या संबंधात जुळून राहिले.

सैतान आणि त्याचे दूत त्यांना शक्य असलेल्या सर्वांची मने प्रकाशापासून दूर करण्याच्या कामास जोमाने लागले होते. ज्यांनी प्रकाश नाकारला त्या गटाला अंधकारात सोडले गेले. मी पाहिले कीं स्वत:ला देवाचे लोक म्हणवीत असलेल्या लोकांना देवदूत अत्यंत काळजीपूर्वक निरखीत होता, आणि त्यांच्याकडे स्वर्गीय उगमाचा संदेश आणला गेल्यानंतर त्यांचा स्वभाव कसा बनतो त्याची नोंद करीत होता. आणि जेव्हा येशूकरिता प्रीति असल्याचे म्हणविणारे अनेकजण स्वर्गीय संदेशापासून तुच्छतेने, उपहासाने आणि द्वेषाने दूर गेले, तेव्हा एका देवदूताने त्याच्या हातीं असलेल्या नोंदणीपुस्तकात ती लाजिरवाणी नोंद केली. सबंध स्वर्गाला चीड आली, कारण कीं येशूचे अनुयायी म्हणविणाऱ्यांनी त्याचा अवमान केला होता.

मनापासून विश्वास ठेवणाऱ्यांची निराशा मी पाहिली. त्यांनी अपेक्षित वेळीं त्यांच्या प्रभूला पाहिले नाही. यात देवाचा हेतु भविष्यकाळ लपविण्याचा होता, आणि त्याच्या लोकांना निर्णय घेण्याच्या घटकेपर्यंत आणावयाचे असा होता. वेळेच्या ह्या घटकेवाचून देवाने योजिलेले कार्य सिद्धिस गेले नसते. सैतान अनेकांची मने भविष्यकाळात फार पुढे नेत होता. ख्रिस्ताच्या आगमनाची कालघटिका घोषित केल्यावर मनात कळकळीने करण्याच्या तयारीचे विचार आल्याशिवाय राहत नाहीत. ती घटिका सरल्यानंतर,

ज्यांनी देवदूताचा प्रकाश पूर्णपणे स्वीकारला नव्हता, ते स्वर्गीय संदेशास तुच्छ लेखणारांसोबत जाऊन मिळाले, आणि निराशा झालेल्या भक्तांचा उपहास करू लागले. मी पाहिले कीं स्वर्गात देवदूत येशूशीं सल्लामसलत करीत होते. त्यांनी ख्रिस्ताच्या नामधारी अनुयायांची स्थिती जाणून घेतली होती. निश्चित वेळ सरल्यावर त्यांची कसोटी झाली होती आणि त्यांना पारखले गेले होते, आणि अनेकजण तराजूत तोलले गेल्यावर कमी भरले. त्या सर्वांनी मोठ्याने ख्रिस्ती भक्त असल्याचा दावा केला होता, तरी ख्रिस्ताचे अनुसरण करण्याच्या जवळजवळ प्रत्येक बाबतीत ते असफल ठरले होते. ख्रिस्ताच्या नामधारी अनुयायांची स्थिती पाहून सैतानाला हर्ष वाटला. त्यांना त्याने मोहजालात अडकविले होते. त्याने असंख्य लोकांना सरळ मार्ग सोडायला प्रवृत्त केले होते, आणि ते स्वर्गाकडे चुकीच्या मार्गाने चढून जाण्याचा प्रयत्न करीत होते. देवदूतांनी पाहिले कीं सर्व शुद्ध, स्वच्छ, आणि पवित्र जन सीयोनातल्या पातक्यांमध्ये व जगिक-वृत्तिच्या ढोंग्यांमध्ये मिसळलेले होते. त्यांनी येशूच्या खऱ्या प्रेमिकांवर लक्ष ठेवले होते, परंतु भ्रष्ट जन पवित्रजनांवर प्रभाव पाडत होते.

येशूला भेटण्याची उत्कट इच्छा व उत्कंठा असलेल्या भक्तांना त्याच्या आगमनाविषयीं बोलण्यास त्यांचे तथाकथित बांधव मनाई करीत होते. देवदूतांनी सबंध दृश्य पाहिले, आणि येशूचे आगमन प्रिय वाटणाऱ्या उरलेल्या भक्तांकरिता त्यांना सहानुभूति वाटत होती. दुसऱ्या बलाढ्य देवदूताला पृथ्वीकडे येण्याचे सेवाकार्य दिले गेले. येशूने त्याच्या हातीं एक लेख ठेवला, आणि तो पृथ्वीवर येत असतांना आरोळी मारून म्हणू लागला: बाबेल पडली! पडली! मग मी पाहिले कीं निराश झालेले भक्त पुन्हा आनंदी दिसू लागले, आणि त्यांनी त्यांच्या नजरा वर स्वर्गाकडे लावल्या, व त्यांच्या प्रभूच्या आगमनाची प्रतीक्षा ते विश्वासाने व आशेने करू लागले. परंतु अनेकजण बधीर झाल्यासारखे दिसले, जणू झोपेत आहेत; तरी त्यांच्या मुखांवर मी अति दुःखाचे भाव पाहू शकत होते. निराशा झालेल्यांनी त्यांच्या पवित्रशास्त्रातून पाहिले कीं ते विलंबाच्या अवधीत आहेत, आणि दृष्टांताची पूर्णता होण्याकरिता त्यांनी धीराने वाट पाहिली पाहिजे. तोच पुरावा, ज्याच्यामुळें त्यांना १८४३मध्ये त्यांच्या प्रभूची वाट पाहण्यास प्रवृत्त केले होते, तोच त्यांना त्याची प्रतीक्षा १८४४मध्ये करण्यास प्रवृत्त करीत होता. मी पाहिले कीं १८४३मध्ये त्यांच्या विश्वासात जें चैतन्य होते, तें बहुसंख्यांकांमध्ये आता नव्हते. त्यांच्या निराशेने त्यांच्या अढळ विश्वासाचा जोम कमी झाला होता. परंतु जेव्हा निराशा झालेले भक्त दुसऱ्या देवदूताच्या आरोळीत येऊन मिळाले, तेव्हा स्वर्गीय दूतांचे जमाव मोठ्या उत्कंठेने पाहू लागले व संदेशाचा काय प्रभाव होतो त्याची त्यांनी विशेष नोंद घेतली. त्यांनी पाहिले कीं जे ख्रिस्ती नांव धारण करीत होते ते निराशा झालेल्यांविरुद्ध उपहासाने व तुच्छतेने वळले. टिंगल करणाऱ्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडू लागले: तुम्ही अजून वर गेला नाहीत कसें! एका देवदूताने तें लिहून ठेवले. देवदूत म्हणाला: ते देवाची टिंगल करीत आहेत.

मला एलीयाचे रुपांतर झाले तो काळ दाखविण्यात आला. त्याचा अंगरखा अलीशावर पडला, आणि दुष्ट तरूण त्याच्या मागोमाग मोठ्याने ओरडत अशी टिंगल करीत जाऊ लागले कीं: अरे टकल्या, वर जा! अरे टकल्या, वर जा! त्यांनी देवाची टिंगल केली होती, आणि त्यांना त्यांची शिक्षा तत्क्षणीं मिळाली.

त्यांचे बेशिस्त वर्तन बेपर्वा आईबापांच्या वागण्याच्या अनुकरणाचे प्रतीक होते. ज्यांनी पवित्रजनांच्या वर जाण्याच्या कल्पनेची चेष्टा व टिंगल केली, त्यांच्यावर देवाच्या पीडा पडतील, आणि त्यांना जाणवेल कीं देवाशीं तुच्छतेने वागणे क्षुल्लक गोष्ट नाही.

येशूने दुसऱ्या देवदूतांना त्याच्या लोकांचा डळमळणारा विश्वास बळकट करण्याकरिता, व त्यांना दुसऱ्या देवदूताचा संदेश समजण्याकरिता त्यांची तयारी करावी, आणि लवकरच स्वर्गात जी महत्त्वाची चळवळ सुरू होणार होती तिच्याकरिता त्यांनी सज्ज व्हावे म्हणून लवकर त्यांच्याकडे उडत जाण्याचे सेवाकार्य दिले. मी ह्या देवदूतांना येशूपासून मोठे सामर्थ्य व प्रकाश मिळतांना पाहिले, आणि ते दुसऱ्या देवदूताच्या कामात त्याला सहाय्य करण्याचे त्यांचे सेवाकार्य पूर्ण करण्याकरिता चटकन पृथ्वीवर उडत आले. देवाच्या लोकांवर, देवदूत आरोळी ठोकतांना, कीं "पहा, वर येत आहे, त्याला भेटण्यास सामोरे जा," तेव्हा एक मोठा प्रकाश पडला. मग मी निराश झालेल्या भक्तांना उठतांना पाहिले, आणि दुसऱ्या देवदूताच्या आवाजात सुरेल आवाज मिसळून त्यांनी घोषणा केली कीं: पहा, वर येत आहे, त्याला भेटण्यासाठीं सामोरे जा. देवदूतांपासून येणारा प्रकाश सगळीकडे अंधकारास भेदत गेला. सैतानाने व त्याच्या दूतांनी हा प्रकाश पसरू नये, व त्याचा प्रभाव पडू नये, म्हणून त्यास अडथळण करण्यास पाहिले. त्यांनी देवाच्या देवदूतांशीं हुज्जत घालून म्हटले कीं: देवाने लोकांना फसविले आहे, आणि त्यांच्या सर्व प्रकाशासह व सामर्थ्यासह ते लोकांनी आता विश्वास ठेवावा असें करू शकणार नाहीत कीं येशू येत आहे. देवाच्या देवदूतांनी त्यांचे कार्य चालू ठेवले, जरी सैतान त्यांचा मार्ग अडवू पाहत होता आणि लोकांची मने प्रकाशापासून दूर करू पाहत होता. ज्यांनी तो स्वीकारला होता ते फार आनंदी दिसले. त्यांनी त्यांच्या नजरा स्वर्गाकडे रोखल्या होत्या, व येशूच्या आगमनाची उत्कंठा धरली होती. काहीजण फार दुःखात होते, शोक करीत होते व प्रार्थना करीत होते. त्यांच्या नजरा त्यांच्या स्वतःवर खिळलेल्या दिसत होत्या, व वरच्या दिशेने पाहण्यास ते धजत नव्हते.

स्वर्गातून एक मौल्यवान प्रकाश अंधकार छेदून त्यांच्याकडे आला, आणि त्यांच्या नजरा, ज्या हताशपणे त्यांनी स्वतःवरच ठेवलेल्या होत्या, त्या त्यांनी वर वळविल्या, आणि प्रत्येक चेहऱ्यावर कृतज्ञता व पवित्र हर्ष प्रगट झाला. येशू आणि सर्व देवदूतांचे जमाव त्या विश्वासू, प्रतीक्षा करणाऱ्या भक्तांकडे अनुकंपेने पाहत होते.

ज्यांनी पहिल्या देवदूताच्या संदेशाचा प्रकाश अव्हेरला होता व त्यास विरोध केला होता, त्यांनी दुसऱ्याचा प्रकाशही गमावला, आणि, "पहा, वर येत आहे," या संदेशासोबत जें सामर्थ्य व गौरव होते त्यापासून त्यांचा काही फायदा होऊ शकला नाही. येशूने त्यांच्याकडे आठ्या घालून पाहिले व तो त्यांच्यापासून दूर झाला. त्यांनी त्याचा अवमान केला होता व त्याला अव्हेरले होते. ज्यांनी संदेश स्वीकारला होता त्यांना गौरवी मेघाने आच्छादले. देवाची इच्छा माहीत करून घेण्याकरिता त्यांनी वाट पाहिली, ते जागृत राहिले, व प्रार्थना करीत राहिले. त्याला दुःख होईल असें काही करण्यास ते फार घाबरू लागले. मी सैतानाला व त्याच्या दूतांना देवाच्या लोकांपासून हा दैवी प्रकाश बंद करण्याचा प्रयत्न करतांना पाहिले; परंतु जोंवर

प्रतीक्षा करणारे भक्त प्रकाश जतन करीत राहतील, व त्यांच्या नजरा पृथ्वीवरून काढून घेऊन वर येशूवर केंद्रित करतील तोंवर हा मौल्यवान प्रकाश त्यांच्यापासून हिरावून घेण्याचे सैतानाला मुळींच सामर्थ्य नव्हते. स्वर्गातून दिल्या गेलेल्या संदेशाने सैतान व त्याचे दूत अति संतप्त झाले, आणि ज्यांनी येशूवर प्रीति करण्याचा दावा केला होता, परंतु त्याचे आगमन तुच्छ लेखले होते, ते देवावर भिस्त टाकणाऱ्या विश्वासू भक्तांचा उपहास करू लागले व तुच्छतेने त्यांची चेष्टा करू लागले. परंतु एका देवदूताने त्यांच्या नामधारी बांधवांनी त्यांच्यावर लादलेला प्रत्येक अपमान, प्रत्येक तुच्छता, व प्रत्येक गैरवागणूक नोंदवून ठेवली. अनेकांनी ती आरोळी उच्च स्वरात दिली कीं: पहा, वर येत आहे; आणि ज्यांना येशूचे आगमन नको होते व जे त्यांना त्याच्या द्वितीय आगमनावर मनन करू देत नव्हते त्या बांधवांना ते सोडून गेले. मी येशूला त्याचे मुख त्याचे आगमन नाकारणाऱ्यांपासून व तो विषय तुच्छ लेखणाऱ्यांपासून फिरविलेले पाहिले, आणि त्याने त्याच्या देवदूतांना आदेश दिला कीं त्यांनी त्याच्या लोकांना त्या अमंगळ लोकांमधून काढून घ्यावे, नाहीतर एखादे वेळीं ते भ्रष्ट होतील. संदेशांचे पालन ज्यांनी केले होते ते मुक्त झालेले व एकमेकांत ऐक्य असलेले असें उभे राहिले. त्यांच्यावर एक पवित्र आणि तेजस्वी प्रकाश चमकत होता. त्यांनी जगाचा त्याग केला होता, जगिक गोष्टींपासून त्यांची आसक्ति काढून घेतली होती, आणि सर्व जगिक स्वप्नांचा सत्याखातर त्याग केला होता. त्यांनी त्यांचे जगिक खजाने सोडून दिले आणि कळकळीने ते स्वर्गाकडे नजर केंद्रित करू लागले, कीं त्यांच्या प्रिय मुक्तिदात्याला ते लवकरच पाहतील. त्यांच्या मुखांवरून पवित्र, समर्पित हर्ष प्रगट होत होता, आणि त्यांच्या अंतःकरणात असलेल्या शांतीविषयींचे व आनंदाविषयींचे निवेदन देत होता. येशूने त्याच्या देवदूतांना त्यांच्याकडे जाऊन त्यांना बळ देण्याचा आदेश दिला, कारण कीं त्यांच्यावर येणाऱ्या संकटाची घटका जवळ येत होती. मी पाहिले कीं ह्या प्रतीक्षा करणारांची कसोटी जशी व्हावयास पाहिजे होती तशी अद्यापि झाली नव्हती. ते चुकांपासून मुक्त झालेले नव्हते. आणि मी देवाची दया व त्याचे चांगुलपण पाहिले कीं त्याने पृथ्वीवरील लोकांना इशारा दिला आणि एका निश्चित वेळेच्या मुद्याकडे त्यांना पुन्हापुन्हा संदेश देऊन आणविले, तें अशासाठीं कीं, त्यांनी कष्ट घेऊन आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त व्हावे, कीं विधर्मियांपासून व पोपच्या लोकांपासून त्यांच्याकडे पिढ्यानुपिढ्या आलेल्या चुका त्यांना सुधरता याव्यात. या संदेशांतून देव त्याच्या लोकांना अशा स्थळीं आणत होता कीं तिथून त्याला त्यांच्याकरिता अधिक सामर्थ्याने कार्य करता येईल, आणि तेथून ते त्याच्या सर्व आज्ञा पाळू शकतील.

पहा:
*२राजे*२:११-२५; *दानिएल*८:१४; *हबक्कूक*२:१-४;
*मत्तय*२५:६; *प्रगटीकरण*१४:८; १८:१-५.

# अध्याय २७
# दर्शनमंडप

मला मग देवाच्या लोकांची घोर निराशा दाखविली गेली. त्यांनी अपेक्षिलेल्या वेळीं येशूला पाहिले नाही. त्यांचा उद्धारक कां आला नाही तें त्यांना माहीत नव्हते. भविष्यलेखांतील कालसमय कां संपले नव्हते त्याचा त्यांना काहीच पुरावा दिसू शकला नाही. एक देवदूत म्हणाला: देवाचे वचन फोल झाले कां? देव त्याची अभिवचने पूर्ण करण्यात अयशस्वी झाला कां? नाही. त्याने ज्या कशाचे वचन दिले तें सर्व त्याने पूर्णत्वास नेले आहे. येशू उठला आहे, आणि त्याने स्वर्गीय दर्शनमंडपाच्या पवित्रस्थानाचे द्वार बंद केले आहे, आणि परमपवित्रस्थानाचे द्वार उघडले आहे, आणि दर्शनमंडपाचे शुद्धिकरण करण्यासाठीं तो आत गेला आहे. देवदूत म्हणाला: जे कोणी धीराने वाट पाहतील त्या सर्वांना हें रहस्य समजेल. मनुष्याने चूक केली आहे, परंतु देवाला कोठलेही अपयश आलेले नाही. देवाने ज्या ज्या गोष्टींचे अभिवचन दिले होते तें सर्वकाही सिद्ध झाले; परंतु मनुष्य चुकीने पृथ्वीकडे बघत राहिला, असें समजून कीं भविष्यलेखांतील कालसमयांच्या शेवटीं ज्या पवित्रस्थानाची शुद्धि व्हावयाची होती तें पवित्रस्थान पृथ्वी आहे. माणसांच्या अपेक्षांचा भंग झाला आहे; परंतु देवाच्या अभिवचनाचा मुळींच नाही. येशूने निराशा झालेल्या भक्तांकडे त्याचे देवदूत पाठविले, कीं त्यांनी त्यांची मने परमपवित्रस्थानाकडे वेधावी, जिथे तो पवित्रस्थानाची शुद्धि करायला व इस्राएलाकरिता खास प्रायश्चित्त करायला गेला होता. येशूने त्याच्या देवदूतांना सांगितले कीं ज्यांनाज्यांना तो सापडेल त्या सर्वांना त्याने करावयाचे सेवाकार्य समजेल. मी पाहिले कीं येशू परमपवित्रस्थानात असतांनाच त्याचा नव्या यरुशलेमाशीं विवाह होईल, आणि परमपवित्रस्थानातील त्याचे कार्य सिद्धिस गेल्यानंतर तो राजेशाही सामर्थ्यात पृथ्वीवर खाली येईल आणि त्याच्या मौल्यवान भक्तांना त्याच्याकडे घेऊन जाईल ज्यांनी त्याच्या परतण्याची धीराने वाट पाहिली होती.

मग मला १८४४मध्ये भविष्य कालसमय संपले तेव्हा स्वर्गात नेमके काय घडले तें दाखविण्यात आले. मी पाहिले कीं येशूचे पवित्रस्थानातील सेवाकार्य संपले होते, आणि त्या दालनाचे दार त्याने बंद केले; तेव्हा ज्यांनी ख्रिस्ताच्या आगमनाचे संदेश ऐकले होते व अव्हेरले होते त्यांना मोठ्या अंधकाराने ग्रासून टाकले, आणि तो त्यांच्या दृष्टिला दिसेनासा झाला. मग येशूने मौल्यवान वस्त्रे स्वतःच्या अंगावर पेहरली. त्याच्या झग्याच्या खालच्या सबंध कडेला गोलाकारात एक घंटा व एक डाळींब, एक घंटा व एक डाळींब होते. त्याने त्याच्या खांद्यांवरून कुशल कारागिरीचे छातीवरील लेणे टांगले होते, आणि जेव्हा त्याची हालचाल होत होती तेव्हा तें हिऱ्यांप्रमाणे चमकत होते, व त्यावरील अक्षरे मोठी दिसू लागत होती; तीं लिहिलेल्या

नांवांप्रमाणे दिसत होती, किंवा छातीवरील लेण्यावर कोरली होती असें दिसत होते. त्याचे पोषाख परिधान करणे पूर्ण झाले, तेव्हा त्याच्या मस्तकावर मुगुटासारखे दिसणारे काहीतरी ठेवण्यात आले; देवदूतांनी त्याला घेरले, आणि अग्निमय रथातून तो दुसऱ्या पडद्याच्या आतून पलिकडे गेला. मग मला सांगितले गेले कीं मी स्वर्गीय पवित्रस्थानातील दोन दालनांची विशेष नोंद घ्यावी. पडदा (म्हणजेच दार) उघडला गेला आणि मला आत प्रवेश करू दिले गेले. पहिल्या दालनात मी सात दिव्यांचा दीपस्तंभ पाहिला जो श्रीमंती थाटाचा व गौरवी दिसत होता; मी समर्पणाच्या भाकरी ठेवलेला मेज, व धूपवेदी, आणि धुपाटणेसुद्धा पाहिले. या दालनातील सर्व सामान अति शुद्ध सोन्यासारखे दिसत होते, आणि त्या ठिकाणीं ज्या कोणाचा प्रवेश होई त्याची प्रतिमा त्यांत प्रतिबिंबीत होई. या दोन दालनांना दुभागणारा पडदा वैभवशाली दिसत होता. तो वेगवेगळ्या रंगांचा व साहित्याचा होता व त्याला सुंदर कड होती, व त्याच्यावर सोन्याची चित्रे काढलेली होती, जीं देवदूतांचे प्रतीक होती. पडदा उचलला गेला, आणि मी आत दुसऱ्या दालनात पाहिले. मला तेथे एक कोष दिसला जो सर्वोत्कृष्ट सोन्याचा असल्याप्रमाणे दिसत होता. कोषाच्या वरच्या टोकाभोवती जी कड होती ती सर्वांत सुंदर कारागिरीची होती व मुकुटांचे प्रतीक होती. ती उत्कृष्ट सोन्याची होती. कोषात दहा आज्ञांच्या दगडी पाट्या होत्या. कोषाच्या प्रत्येक टोकावर एक अति आकर्षक करूब दूत होता ज्यांचे पंख त्याच्यावर पसरलेले होते. त्यांचे पंख उंच उचललेले होते आणि कोषाच्या बाजूला उभे राहिलेल्या येशूच्या डोक्याच्या वरच्या बाजूला त्यांचा एकमेकांशीं स्पर्श होत होता. त्यांची तोंडे एकमेकांच्या समोरासमोर एकमेकांकडे वळलेली होती, आणि ते खाली कोषाकडे पाहत होते, जें प्रतीक होते ज्या कळकळीने सर्व देवदूत-जमाव देवाच्या आज्ञांकडे पाहतात त्याचे. करूबांच्या मध्यभागीं सोनेरी धुपाटणे होते. आणि पवित्रजनांनी विश्वासाने केलेल्या प्रार्थना जसजशा येशूकडे वर येत होत्या, तसतसें तो त्यांना त्याच्या पित्याला अर्पण करीत होता; त्यावेळीं धुपाटण्यातून मधूर सुगंध वर जात असे. तो सर्वांत सुंदर रंगांच्या धूरासारखा दिसत होता. जेथे येशू उभा होता त्या ठिकाणीं वरच्या भागात, कोषापुढे, मी एक अकल्पनीय तेजस्वी गौरवी तेज पाहिले ज्याकडे मी पाहत राहू शकत नव्हते. तें जिथे देव राहतो त्या एका राजासनाप्रमाणे दिसत होते. पित्यापुढे धूप जसा वर गेला, तसें पित्याच्या राजासनापासून येशूकडे अतिशय गौरवी तेज आले, व येशूकडून तें त्या भक्तांवर घातले गेले ज्यांच्या प्रार्थना वर मधूर सुगंधाप्रमाणे गेल्या होत्या. येशूवर प्रकाश आणि गौरवी तेज भरपूर समृद्धित ओतले गेले, आणि त्यात दयासन झाकले गेले, व गौरवी तेजाने सबंध मंदिर भरून गेले. मला त्या तेजाकडे फार वेळ बघता आले नाही. कोणतीही भाषा त्याचे वर्णन करू शकत नाही. मी अगदीच भारावून गेले, आणि त्या दृश्याच्या वैभवापासून व गौरवी तेजापासून बाजूला गेले.

मला दाखविण्यात आले कीं पृथ्वीवरील पवित्रस्थानात दोन दालने होती. तें स्वर्गातील पवित्रस्थानाच्या नमुन्याप्रमाणे घडविलेले होते. तें पृथ्वीवरील पवित्रस्थान होते, स्वर्गीय पवित्रस्थानाची प्रतिमा होते असें मला सांगण्यात आले. पृथ्वीवरील पवित्रस्थानाच्या पहिल्या दालनात जें सामान होते, तें स्वर्गीय पवित्रस्थानातील पहिल्या दालनातल्या सामानासारखे होते. पडदा वर उचलला गेला, आणि

मी परमपवित्रस्थानात नजर टाकली, आणि पाहिले कीं त्यातील सामान स्वर्गीय पवित्रस्थानात होते अगदी तसेंच होते. पृथ्वीवरील पवित्रस्थानाच्या दोन्ही दालनांत याजक सेवा करीत. पहिल्या दालनात याजक वर्षाच्या प्रत्येक दिवशीं सेवा करीत असे, आणि परमपवित्रस्थानात, तेथे नेल्या गेलेल्या पातकांपासून त्यास शुद्ध करण्यासाठीं, तो वर्षातून केवळ एकदाच प्रवेश करीत असे. मी पाहिले कीं स्वर्गीय पवित्रस्थानाच्या दोन्ही दालनांत येशू सेवा करीत होता. त्याचे स्वतःचे रक्त अर्पण करून त्याने स्वर्गीय पवित्रस्थानात प्रवेश केला. पृथ्वीवरील याजक मृत्युमुळें काढून टाकले जात, आणि म्हणून ते जास्त काळ सेवा करू शकत नसत; परंतु येशू, मी पाहिले, सदासर्वकाळाकरिताचा याजक होता. पृथ्वीवरील पवित्रस्थानात अर्पिलेल्या यज्ञांद्वारें व अर्पणांद्वारें इस्राएल लोकांनी पुढील काळीं येणाऱ्या उद्धारकाच्या पुण्याईवर भिस्त ठेवावयाची होती. आणि देवाने त्याच्या सुज्ञतेने या कामाचा तपशील आपल्याकरिता दिलेला आहे कीं आपण तीं भूतकाळातील चित्रे पाहावी, व स्वर्गीय पवित्रस्थानातील येशूचे सेवाकार्य समजून घ्यावे.

येशूच्या वधस्तंभीं गेल्याचे वेळीं, जेव्हा येशू कवटीच्या जागेवर मरण पावला, त्याने आरोळी मारली होती कीं: पूर्ण झाले आहे; आणि तेव्हा मंदिरातील पडदा वरून खालपर्यंत दुभंगला गेला होता. हें याकरिता झाले कीं पृथ्वीवरील पवित्रस्थानातील सेवा सर्वकाळाकरिता समाप्त झाल्या होत्या हें दाखविण्याकरिता, व स्पष्ट करण्याकरिता कीं यापुढे देव भक्तांना भेटण्याकरिता व पृथ्वीवरील मंदिरातील त्यांचे यज्ञ स्वीकारण्याकरिता तेथे येणार नाही. त्यावेळीं येशूचे रक्त पाडले गेले होते, जें तो स्वतः स्वर्गीय पवित्रस्थानात लागू करणार होता. याजक जसें पवित्रस्थानाची शुद्धि करण्याकरिता पृथ्वीच्या पवित्रस्थानात वर्षातून एकदा प्रवेश करीत, तसें येशूने स्वर्गीय परमपवित्रस्थानात *दानिएल ८*च्या २३०० दिवसांच्या शेवटीं, १८४४मध्ये, प्रवेश केला, कीं त्याच्या मध्यस्थीने ज्या कोणाचा फायदा होऊ शकणार होता त्या सर्वांकरिता शेवटले प्रायश्चित्त केले जावे व पवित्रस्थानाचे शुद्धिकरण केले जावे.

पहा:
*निर्गम,* अध्याय २५-२८; *लेवीय,* अध्याय १६; *२राजे* २:११;
*दानिएल* ८:१४; *मत्तय* २७:५०-५१; *इब्री.* अध्याय ९;
*प्रगटीकरण,* अध्याय २१.

# अध्याय २८
# तिसऱ्या देवदूताचा संदेश

येशूचे पवित्रस्थानातील सेवाकार्य संपून तो परमपवित्रस्थानात गेला, व देवाच्या आज्ञा असलेल्या कोषापुढे उभा राहिला, तेव्हा त्याने तिसरा संदेश घेऊन पृथ्वीला आणखी एक बलाढ्य देवदूत धाडला. त्याने त्या देवदूताच्या हातीं एक लेख दिला, व तो पृथ्वीकडे खाली वैभवात व सामर्थ्यात येत असतांना, त्याने एक भयंकर इशाऱ्याची घोषणा केली - मानवाला आतापर्यंत दिला गेला नव्हता इतका सर्वात भीषण इशारा. हा इशारा देवाच्या लेकरांनी स्वतःवर पहारा ठेवण्याकरिता नियोजिला गेला होता, व त्यांच्या पुढेच असलेल्या संकटाची व क्लेशांची घटिका त्यांना दाखविण्याकरिता होता. देवदूत म्हणाला: त्यांना श्वापदाबरोबर व त्याच्या प्रतिमेबरोबर घनघोर संघर्ष करावा लागेल. त्यांची सार्वकालिक जीवनाची एकमेव आशा खंबीर राहण्यात आहे. जरी त्यांचे प्राण पणाला लागतील, तरी त्यांनी सत्याला घट्ट धरून ठेवले पाहिजे. तिसरा देवदूत त्याचा संदेश या शब्दांनी संपवितो: येथे पवित्रजनांचा धीर आहे; येथे देवाच्या आज्ञा पाळणारे व येशूच्या विश्वासाला धरून राहणारे आहेत. ह्या शब्दांची पुनरोक्ति करीत असतांना त्याने स्वर्गीय पवित्रस्थानाकडे निर्देश केला. जे कोणी हा संदेश स्वीकारतील, त्या सर्वांची मने परमपवित्रस्थानाकडे वेधली जातील जेथे येशू कोषापुढे उभा राहिला आहे; ज्यांच्याकरिता दया अद्यापि काही अल्पकाळ राखून ठेवलेली आहे त्यांच्याकरिता आणि ज्यांनी अजाणता देवाच्या आज्ञा मोडल्या आहेत त्यांच्याकरिता तो त्याची शेवटली मध्यस्थी करीत आहे. हें प्रायश्चित्त धार्मिक मृतजनांकरिता, तसेंच धार्मिक जिवंत जनांकरिता केले जात आहे. जे देवाच्या आज्ञांवरील प्रकाश न मिळता मरण पावले आहेत व त्यामुळें त्यांनी अजाणता पाप केले आहे, त्यांच्याकरिता येशू प्रायश्चित्त करीत आहे.

येशूने परमपवित्रस्थानाचे द्वार उघडल्यावर शब्बाथाचा प्रकाश दिसू लागला, आणि देवाच्या लोकांची कसोटी व्हावयाची होती व त्यांना चाचणीतून पार पडावयाचे होते, जसें प्राचीन काळीं देवाने इस्राएली लोकांची परीक्षा घेतली होती कीं ते त्याच्या आज्ञा पाळतील किंवा नाही. मी तिसऱ्या देवदूताला वरच्या दिशेला निर्देश करतांना पाहिले; निराशा झालेल्या भक्तांना तो स्वर्गीय दर्शनमंडपाच्या परमपवित्रस्थानाकडचा मार्ग दाखवीत होता. ते विश्वासाने परमपवित्रस्थानीं येशूच्या मागोमाग गेले. त्यांना येशू पुन्हा सापडला, आणि त्यांच्या मनांत हर्ष व आशा नव्याने उगम पावली. मी त्यांना गतकाळाचे निरीक्षण करतांना पाहिले, येशूच्या द्वितीय आगमनाच्या घोषणेपासून तें १८४४ सालापर्यंतच्या कालसमयात त्यांनी जी यात्रा केली होती तिचा आढावा त्यांनी घेतला. त्यांना त्यांच्या निराशेचे स्पष्टिकरण दिले गेल्याचे

आढळते, व पुन्हा हर्ष व खात्री यांनी ते चैतन्यमय बनतात. तिसऱ्या देवदूताने गतकाळ, वर्तमान काळ, आणि भविष्यकाळ प्रकाशित केला आहे, आणि त्यांना माहीत होते कीं देवाने खरोखरी त्याच्या अद्‌भुत पद्धतिने त्यांचे मार्गदर्शन केले आहे.

मला चिन्हरुपाने असें दाखविण्यात आले कीं अवशिष्ट मंडळी येशूच्या मागोमाग परमपवित्रस्थानात गेली व तेथे त्यांनी कोष व दयासन पाहिले, आणि त्यांच्या गौरवी तेजाने ते मंत्रमुग्ध झाले. येशूने कोषाचे आच्छादन वर केले, आणि पाहा! दगडी पाट्या, आणि त्यांच्यावर दहा आज्ञा लिहिलेल्या होत्या. ते तो देवाचा ज्वलंत संदेश एकएक करून न्याहाळतात; परंतु जेव्हा ते त्या दहा पवित्र आदेशांमध्ये चौथी आज्ञा असल्याचे पाहतात, आणि इतर नऊ आज्ञांपेक्षा तिच्यावर अधिक तेजस्वी प्रकाश चमकतांना पाहतात, व तिच्याभोवताली गौरवी तेजाचे वर्तुळ पाहतात, तेव्हा त्यांना आश्चर्याचा धक्का बसून त्यांचा थरकाप होतो व ते एक पाऊल मागे घेतात. तिथे त्यांना असें काहीच आढळत नाही कीं जें त्यांना सांगते कीं शब्बाथ रद्द केला गेला आहे, किंवा त्याचा बदल आठवड्याच्या पहिल्या दिवसात केला गेला आहे. ही आज्ञा अगदी तशीच आढळते जशी ती देवाच्या मुखाने डोंगरावरून गंभीर व अधिकारयुक्त गौरवात बोलली गेली होती, आणि त्या वेळेला विजा चमकत होत्या व गडगडाट होत होते आणि जशी त्याने दगडी पाट्यांवर त्याच्या स्वतःच्या पवित्र बोटाने ती लिहून काढली होती: सहा दिवस तूं श्रम कर आणि तुझे सर्व काम कर; परंतु सातवा दिवस तुझा देव परमेश्वर याचा शब्बाथ आहे. दहा आज्ञांची किती काळजी घेतली जात आहे तें पाहिल्यावर त्यांना नवल वाटते. ते त्यांना यहोवा देवाच्या निकट ठेवलेल्या पाहतात व त्याच्या पावित्र्याने त्यांचे रक्षण केले जात होते व त्यांच्यावर पाखर घातली जात होती असें पाहतात. त्यांना जाणीव होते कीं ते दहा आज्ञांतील चौथी आज्ञा पायतळीं तुडवीत आलेले आहेत, आणि यहोवा देवाने पवित्र केलेल्या दिवसाऐवजी विधर्मियांनी व पोपच्या लोकांनी नेमून दिलेला दिवस पाळत आलेले आहेत. ते देवापुढे स्वतःला नम्र करतात, आणि त्यांच्या गतकाळच्या अपराधांबद्दल शोक करतात.

येशूने त्यांची पापकबुली व प्रार्थना त्याच्या पित्यापुढे ठेवल्या तेव्हा धुपाटण्यातील धूपाचा धूर निघू लागल्याचे मी पाहिले. आणि तो वर जाऊ लागला तेव्हा येशूवर, व दयासनावर, एक तेजस्वी प्रकाश विसावला; आणि कळकळीने प्रार्थना करणारे भक्त, देवाच्या आज्ञेचा भंग केल्याने ते अपराधी ठरले आहेत असें त्यांना स्वतः समजले तेव्हा त्यांना अति मनस्ताप झाला होता, ते आता आशीर्वादित झाले आणि त्यांचे चेहरे आशेने व हर्षाने उजळले. ते तिसऱ्या देवदूताच्या कामात त्याला जाऊन मिळाले, आणि त्यांचे आवाज उंचावून त्यांनी तो गंभीर इशारा घोषित केला. परंतु सुरुवातीला थोड्याच लोकांनी तो संदेश स्वीकारला, तरी त्यांनी उत्साहाने इशारा देण्याचे चालूच ठेवले. मग मी अनेकांना तिसऱ्या देवदूताचा संदेश अंगिकारतांना पाहिले, आणि ज्यांनी प्रथम इशाऱ्याची घोषणा केली होती त्यांच्यासोबत त्यांनी त्यांचे आवाज उठविले, आणि त्यांनी देवाला उच्च केले व त्याने पवित्र केलेला विश्रामदिन पाळून त्याची स्तुति केली.

तिसरा संदेश अंगिकारलेल्या अनेकांना पहिल्या दोन संदेशांचा काहीच अनुभव आलेला नव्हता.

सैतानाला तें समजत होते, आणि त्याची दुष्ट नजर त्यांना उलथून टाकण्याकरिता त्यांच्यावर होती; परंतु तिसरा देवदूत त्यांचे लक्ष परमपवित्रस्थानाकडे वेधत होता, आणि ज्यांना अगोदरच्या संदेशांचा अनुभव आलेला होता ते त्यांना स्वर्गीय दर्शनमंडपाचा मार्ग दाखवीत होते. अनेकांनी देवदूतांच्या संदेशांत सत्याची परिपूर्ण साखळी पाहिली, व आनंदाने तिचा स्वीकार केला. त्यांनी ज्या क्रमाने संदेश आले होते त्या क्रमाने त्यांचा अंगिकार केला, व विश्वासाने ते येशूच्या पाठोपाठ स्वर्गीय दर्शनमंडपात गेले. मला दाखविले गेले कीं हे संदेश सबंध गटाला एकत्र ठेवण्याकरिता असलेल्या जोडणाऱ्या दुव्यांप्रमाणे होते. आणि जसजसें लोक वैयक्तिक रित्या त्यांचा स्वीकार करतील व त्यांच्याविषयींची जाण करून घेतील, तसतसें त्यांचे सैतानाच्या अनेक फसव्या युक्त्यांविरुद्ध ढालींप्रमाणे संरक्षण होईल.

१८४४च्या घोर निराशेनंतर, सैतान व त्याचे दूत या गटाची श्रद्धा विचलित करून भक्तांना मोहजालांत पाडण्यासाठीं अविश्रांत श्रम घेत होते. या गोष्टींमध्ये ज्यांना वैयक्तिक अनुभव आलेला होता अशा व्यक्तिंच्या मनांवर तो प्रभाव पाडीत होता. ते नम्र असल्यासारखे दिसत होते. त्यांनी पहिल्या व दुसऱ्या संदेशांत बदल केला आणि त्यांची पूर्णता भविष्यकाळात कधींतरी होणार आहे असें म्हटले, तर इतरांनी भूतकाळांत दूरवरच्या काळाकडे निर्देश करून त्यांची तेव्हा पूर्णता झाली असें जाहीर केले. ह्या व्यक्ति अननुभवी लोकांची मने चुकीच्या मार्गाने आकर्षून त्यांची श्रद्धा ढळविण्याचा प्रयत्न करीत होते. काहीजण पवित्रशास्त्राचा शोध घेऊ लागले व गटाची कदर न करता स्वतःकरिता स्वतःची श्रद्धा निर्माण करण्यास पाहू लागले. सैतानाला या सर्व गोष्टींबाबत आनंद वाटला, कारण त्याला माहीत होते कीं जे कोणी दुवे तोडून स्वतंत्र होतील, त्यांच्यावर तो वेगवेगळ्या पद्धतिंनी चुकीचा प्रभाव पाडू शकेल आणि त्यांना वेगवेगळ्या तत्वांच्या वाऱ्यांवर इकडूनतिकडे व तिकडूनइकडे हाकारू शकेल. पहिल्या व दुसऱ्या संदेशांत ज्यांनी नेतृत्व केले होते, त्या अनेकांनी ते संदेश नाकारले, आणि सबंध गटात दुफळी माजून पांगापांग झाली. मग मी विलियम मिलरला पाहिले. तो गोंधळलेला दिसला, आणि त्याच्या लोकांकरिता त्याला अतिशय दुःख झाले व त्या दुःखाच्या भाराखाली तो वाकला. १८४४मध्ये ज्या गटात ऐक्य होते व जें एकमेकांवर प्रेम होते, तें प्रेम नष्ट होतांना व ते एकमेकांचा विरोध करतांना त्याने पाहिले. त्याने त्यांना शीत, धर्मभ्रष्ट स्थितीत परत पडतांना पाहिले. दुःखाने तो खचला. मी नेतृत्व करणाऱ्या लोकांना विलियम मिलरला निरखीत असतांना पाहिले; त्यांना भय वाटत होते कीं तो एखादे वेळीं तिसऱ्या देवदूताचा संदेश व देवाच्या आज्ञा अंगिकारील. जेव्हा स्वर्गातून आलेल्या प्रकाशाच्या दिशेने तो वळे, तेव्हा हीं माणसे त्याचे मन विचलित करण्याच्या योजना आखीत. त्याच्या मनात नैराश्याचा अंधार निर्माण करून त्याच प्रभावाखाली तो राहावा ह्याकरिता जोरदार मानवी प्रयत्न झाले. सरतेशेवटीं विलियम मिलरने त्याची वाणी स्वर्गातल्या प्रकाशाविरुद्ध उंचावली. ज्या संदेशाने त्याच्या निराशेचे पूर्ण स्पष्टिकरण दिले असते, आणि गतकाळावर प्रकाश पाडला असता, त्याच्या शिणलेल्या मनात चैतन्य उत्पन्न केले असते, त्याची आशा उत्तेजित केली असती, आणि त्याने देवाचे गौरव करण्यास त्याला प्रवृत्त केले असते, तो संदेश त्याने स्वीकारला नाही ही मोठी चूक त्याने केली. तो दैवी सुज्ञतेऐवजी मानवी शहाणपणाकडे वळला; त्याच्या

प्रभूच्या कार्यात कष्टाचे श्रम करण्याने व वयोवृद्धिमुळें त्याची प्रकृति ढासळली होती, त्यामुळें ज्यांनी त्याला सत्यापासून दूर ठेवले त्यांच्याइतका तो जबाबदार नव्हता. ती जबाबदारी त्यांच्यावर पडते, व तें पातक त्यांच्यावर घातले गेले आहे. जर विलियम मिलरला तिसऱ्या देवदूताचा प्रकाश दिसू शकला असता, तर त्याला असष्ट व रहस्यमय दिसणाऱ्या अनेक गोष्टी स्पष्ट झाल्या असत्या. त्याचे बांधव त्याच्यावर इतके जास्त प्रेम असल्याचे भासवीत व त्याच्या हिताची कळकळ असल्याचे दाखवीत, कीं त्याला वाटले कीं तो त्यांच्यापासून स्वतःला दूर करू शकत नव्हता. त्याचे अंतःकरण सत्याच्या दिशेने झुके; पण मग तो त्याच्या बांधवांकडे पाही. ते सत्याचा विरोध करीत होते. येशूच्या आगमनाची घोषणा करण्यात जे त्याच्या बाजूला उभे राहिले होते व त्याच्या खांद्याला खांदा देऊन त्यांनी कार्य केले होते त्यांच्यापासून तो कसा दूर जाऊ शकेल? त्याला वाटले कीं ते खात्रीने त्याला सत्य मार्गापासून बहकविणार नाहीत.

देवाने त्याला सैतानाच्या सामर्थ्याखाली येऊ दिले, व मृत्युला त्याच्यावर कब्जा करू दिला. त्याने त्याला कबरेत लपविले - जे त्याला सतत देवापासून दूर करीत होते त्यांच्यापासून दूर. वचनदत्त भूमित प्रवेश करण्याच्या बेतात असतांना मोशेने चूक केली. त्याचप्रमाणे, मी पाहिले कीं विलियम मिलर स्वर्गीय कनानात लवकरच प्रवेश करण्याच्या बेतात असतांना त्याने चूक केली व तो सत्याच्या विरुद्ध प्रभावाखाली आला. इतरांनी त्याला असें करण्यास प्रवृत्त केले. त्यांना त्याकरिता जाब द्यावा लागेल. परंतु देवाच्या या सेवकाच्या अमोल धुळीवर देवदूत लक्ष ठेवीत आहेत, आणि शेवटल्या कर्ण्याच्या आवाजाने तो बाहेर येईल.

पहाः
*निर्गम* २०:१-१७; ३१:१८; *१थेस्सल.* ४:१६;
*प्रगटीकरण* १४:९-१२.

# अध्याय २९
# भक्कम व्यासपीठ

मी असा एक गट पाहिला कीं ज्याने स्वतःचे चांगले रक्षण केले होते, तो खंबीर होता, आणि गटात स्थापित झालेली श्रद्धा बिघडवून टाकण्याचा जे प्रयत्न करीत होते त्यांचे ते मुळींच ऐकून घेत नव्हते. देव त्यांच्याकडे मान्यता देऊन संतोषाने बघत होता. मला तीन पायऱ्या दाखविण्यात आल्या - एक, दोन व तीन - पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या देवदूतांचे संदेश. देवदूत म्हणालाः जो कोणी या संदेशांचा एकही ठोकळा बाजूला करील किंवा एकही टाचणी हलवील तर त्याचे दुर्दैव. या संदेशांचा योग्य अर्थ प्राप्त होणे अगदीच महत्त्वाचे आहे. तें ज्या प्रकारें स्वीकारले जातील त्यावर जिवात्म्यांचे दैव अवलंबून आहे. मला हें संदेश कसें क्रमाक्रमाने दिले गेले तें पुन्हा दाखविण्यात आले, आणि देवाच्या लोकांनी त्यांचा अनुभव किती भारी मोल देऊन मिळविला होता तें मी पाहिले. तो त्यांनी मोठ्या यातनांतून व तीव्र संघर्षातून प्राप्त करून घेतला होता. देवाने त्यांना टप्प्याटप्प्याने मार्गदर्शन करीत आणले होते, आणि शेवटीं त्यांना एका मजबूत व हलू न शकणाऱ्या व्यासपीठावर ठेवले होते. मग मी व्यक्तिंना व्यासपीठानजीक येतांना पाहिले, व त्यावर चढण्यापूर्वी ते त्याचा पाया तपासू लागले. काहीजण हर्ष करीत लगेचच त्यावर चढले. इतरांनी व्यासपीठाचा पाया ज्याप्रकारें घातला गेला होता त्या पद्धतिच्या बाबतीत दोष हुडकायला सुरुवात केली. त्यांना त्यात सुधारणा करण्याची इच्छा झाली, व मग व्यासपीठ अधिक परिपूर्ण होईल, निर्दोष होईल, व लोक आणखी खूपच जास्त आनंदी होतील. काहीजण व्यासपीठावरून खाली उतरले व त्याची तपासणी करू लागले, आणि दोष काढून म्हणू लागले कीं त्याचा पाया अगदीच चुकीचा घातला गेला आहे. व्यासपीठावर असलेले जवळजवळ सर्वजण खंबीरपणे उभे राहिल्याचे मी पाहिले, व जे त्यावरून खाली उतरले होते त्यांनी त्यांच्या तक्रारी बंद कराव्या अशी त्यांना ते सूचना करू लागले, कारण कीं व्यासपीठ बांधणारा मुख्य अधिकारी प्रत्यक्ष देव होता, आणि ते त्याच्याविरुद्ध लढा देत होते. त्यांनी देवाच्या अद्‌भुत कार्याची उजळणी करून सांगितले कीं देवाने त्यांना कशा प्रकारें त्या पक्क्या व्यासपीठावर आणले होते, आणि जवळजवळ सर्वांनी एकजुटीने त्यांच्या नजरा स्वर्गाकडे वर उंचावल्या, व मोठ्या वाणीने त्यांनी देवाचे गौरव केले. याचा प्रभाव पडून तक्रार करणाऱ्यांपैकी व व्यासपीठ सोडून गेलेल्यांपैकी काहीजण पुन्हा नम्र होऊन त्यावर चढले.

ख्रिस्ताच्या पहिल्या आगमनाच्या घोषणेकडे माझे लक्ष मागील काळात वेधले गेले. येशूच्या येण्याकरिता मार्ग तयार करण्यासाठीं बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला एलीयाच्या आत्म्यात व सामर्थ्यात

पाठविले गेले होते. ज्यांनी योहानाची साक्ष अव्हेरली त्यांना येशूच्या शिकवणींचा काहीच लाभ झाला नाही. त्याच्या पहिल्या आगमनाच्या घोषणेस विरोध केल्याने त्यांनी स्वतःला अशा स्थितीत ठेवले कीं त्यांना तो मशीहा असल्याबद्दलचा भक्कमातला भक्कम पुरावा सहजगत्या समजला नाही. ज्यांनी योहानाचा संदेश अव्हेरला त्यांना सैतानाने आणखी पुढे जाण्यास व येशूचा अव्हेर करण्यास व त्याला क्रूसखांबीं वधण्यास प्रवृत्त केले. असें करण्याने, त्यांनी स्वतःला अशा ठिकाणीं ठेवले कीं जेथे त्यांना पेन्टेकॉस्टच्या दिवसाचा आशीर्वाद मिळविता आला नाही, ज्याद्वारें त्यांना स्वर्गीय पवित्रस्थानात जाण्याचा मार्ग शिकविला गेला असता. मंदिराचा पडदा फाडला गेल्याने स्पष्ट दाखविले गेले कीं याउप्पर यहूदी यज्ञार्पणे व कर्मकांडे स्वीकारली जाणार नाहीत. थोर यज्ञार्पण करण्यात आले होते व स्वीकारले गेले होते, आणि पेन्टेकॉस्टच्या दिवशीं पवित्र आत्म्याने खाली येऊन शिष्यांची मने पृथ्वीवरील पवित्रस्थानापासून स्वर्गीय पवित्रस्थानाकडे वेधली जेथे येशू त्याच्या स्वतःच्या रक्ताने प्रवेश पावला होता, आणि त्याच्या शिष्यांवर त्याने त्याच्या प्रायश्चित्ताचे लाभ ओतले होते. यहूद्यांना पूर्ण फसवेगिरीत व पूर्ण अंधकारात सोडले गेले. उद्धाराच्या योजनेवर त्यांना जो प्रकाश मिळू शकला असता तो सर्व त्यांनी गमावला, आणि तरी त्यांच्या निरुपयोगी यज्ञार्पणांवर व कर्मकांडांवर ते अजूनही भिस्त ठेवीत राहिले. पवित्रस्थानातल्या ख्रिस्ताच्या मध्यस्थीचा त्यांना लाभ होऊ शकला नाही. पृथ्वीवरल्या पवित्रस्थानाची जागा स्वर्गीय पवित्रस्थानाने घेतली होती, तरी त्यांना स्वर्गीय पवित्रस्थानाच्या मार्गाचे काहीच ज्ञान नव्हते.

यहूद्यांनी येशूचा अव्हेर करण्याचा व क्रूसखांबीं त्याला वधण्याचा जो मार्ग स्वीकारला त्याबद्दल अनेकांना भीतियुक्त घृणा वाटते. त्याच्याशीं जी लज्जास्पद वागणूक केली गेली तिचा इतिहास जेव्हा ते वाचतात, तेव्हा त्यांना वाटते कीं ते ख्रिस्तावर प्रीति करतात व त्यांनी त्याचा पेत्राप्रमाणे नकार केला नसता, किंवा यहूद्यांप्रमाणे त्याला वधस्तंभीं खिळले नसते. परंतु त्यांनी देवाच्या पुत्राकरिता जी वरवरची सहानुभूति दाखविली ती देवाने पाहिली व त्याद्वारेंच त्यांची कसोटी झाली आहे, आणि येशूकरिता जें प्रेम असल्याचा ते दावा करतात त्या प्रीतिची परीक्षा घेण्यात आली आहे.

संदेश कशा प्रकारें स्वीकारला जातो तें सबंध स्वर्ग जास्तीत जास्त उत्कंठेने पाहत होता. परंतु अनेकजण, जे येशूवर प्रीति करण्याचा दावा करीत होते, व क्रूसाची कथा वाचत असतांना अश्रु ढाळत होते, त्यांनी संदेश आनंदाने स्वीकारण्याऐवजी ते क्रोधाविष्ट झाले व येशूच्या येण्याच्या शुभ वृत्ताची चेष्टा करू लागले, व ती फसवेगिरी आहे असें म्हणू लागले. ज्यांना त्याच्या आगमनाची उत्कंठा होती त्यांच्याशीं ते सहवास ठेवीनात, तर त्यांचा ते द्वेष करू लागले व त्यांना आराधनागृहांच्या बाहेर ठेवू लागले. ज्यांनी पहिला संदेश अव्हेरला त्यांना दुसऱ्या संदेशाने काहीच फायदा होऊ शकला नाही, आणि मध्यरात्रीच्या आरोळीनेसुद्धा त्यांचा लाभ झाला नाही जी त्यांनी विश्वासाच्या योगें येशूच्या सोबत स्वर्गीय दर्शनमंडपाच्या परमपवित्रस्थानात प्रवेश करण्यास त्यांना तयार करणार होती. आणि पहिले दोन संदेश अव्हेरण्याने त्यांना तिसऱ्या देवदूताच्या संदेशात काही प्रकाश दिसत नाही, जो त्यांना परमपवित्रस्थानाचा मार्ग दाखवितो. मी पाहिले कीं जसें यहूद्यांनी येशूचा वध केला तसें नामधारी मंडळ्यांनी या संदेशांचा वध केला होता, आणि

म्हणून त्यांना स्वर्गात जी हालचाल केली गेली होती तिचे काही ज्ञान नव्हते, किंवा परमपवित्रस्थानाच्या मार्गाचे ज्ञान नव्हते, आणि त्यांना येशूच्या तेथील मध्यस्थीचा लाभ होऊ शकत नाही. यहूद्यांप्रमाणे, जे त्यांचे निरुपयोगी यज्ञ करीतच राहिले होते, तसें ते त्यांच्या अर्थहीन प्रार्थना येशूने जें दालन सोडले आहे तेथे पाठवितात; ख्रिस्ताचे अनुयायी असल्याचा दावा करणाऱ्यांची जी फसवणूक होत आहे त्याबद्दल सैतान खूष आहे, आणि तो त्यांना त्याच्या मोहजालांत अधिकाधिक पक्के पकडतो, व धार्मिक रूप पांघरून या नामधारी ख्रिश्चनांची मने स्वतःकडे आकर्षित करतो व त्याच्या सामर्थ्याने कार्य करून त्याची चिन्हे दाखवितो व खोटे चमत्कार व अद्‌भुते करतो. काहींना तो एका प्रकारें, तर काहींना निराळ्या प्रकारें फसवितो. मनांवर प्रभाव पाडण्याकरिता त्याच्याकडे वेगवेगळ्या फसव्या युक्त्या आहेत. काहीजण एका फसवेगिरीकडे भयाने पाहतात, तर दुसरी फसवेगिरी ते सहजगत्या स्वीकारतात. सैतान काहींना पिशाच्चवादाद्धारें फसवितो. तो प्रकाशाचा देवदूत असल्याप्रमाणेसुद्धा येतो, आणि सर्वत्र त्याचा प्रभाव पसरवितो. मी सगळीकडे खोट्या धर्मसुधारणा पाहिल्या. मंडळ्या फाजील उत्साहाने उत्साहित झाल्या होत्या व देव त्यांच्याकरिता अद्‌भुत रित्या कार्य करीत आहे असें त्या समजल्या जेव्हा तें कार्य दुसऱ्याच आत्म्याचे होते. हा उत्साह मावळेल आणि जगाला व मंडळ्यांना पहिल्यापेक्षा अधिक वाईट स्थितीत सोडून जाईल.

मी पाहिले कीं नामधारी ॲडव्हेंटिस्ट लोकांमध्ये व पतन पावलेल्या मंडळ्यांमध्ये देवाची प्रामाणिक लेकरे आहेत, आणि पाळकांना व लोकांना शेवटल्या पीडा ओतल्या जाण्यापूर्वी अजूनही या मंडळ्यांतून बाहेर पडण्यास पाचारण केले जाईल, व ते आनंदाने सत्यास आलिंगन देतील. सैतानाला हें माहीत आहे, आणि तिसऱ्या देवदूताच्या मोठ्या आरोळीपूर्वी तो या विविध धर्मगटांमध्ये उत्साह उत्पन्न करतो, कीं ज्यांनी सत्याचा अव्हेर केला आहे त्यांना वाटावे कीं देव त्यांच्यासोबत आहे. प्रामाणिक जनांना फसविण्याची आशा तो बाळगतो, आणि या मंडळ्यांकरिता देव अजूनही कार्य करीत आहे असें त्यांना वाटण्यास प्रवृत्त करतो. परंतु प्रकाश प्रकाशेल, व प्रामाणिक जनांपैकी प्रत्येकजण पतन पावलेल्या मंडळ्या सोडील व ते त्यांचे स्थान अवशिष्ट गटासोबत घेतील.

पहा:
*मत्तय,* अध्याय ३; *प्रे.कृ.,* अध्याय २; २*करिंथ.* ११:१४;
२*थेस्सल.* २:९-१२; *प्रगटीकरण* १४:६-१२.

# अध्याय ३०
# पिशाच्चवाद

मी दार ठोकण्याची फसवेगिरी पाहिली. आपले जे नातलग व मित्रमंडळी आता सध्या येशूमध्ये महानिद्रा घेत आहेत त्यांचे रूप घेऊन आपल्यापुढे येण्याचे सैतानाला सामर्थ्य आहे. असें दाखविण्यात येईल कीं जणू ते आपल्याजवळ आहेत: आपल्यासोबत असतांना त्यांनी जें शब्द उच्चारले, ज्यांच्याशीं आपण परिचित आहोत, तें बोलले जातील, आणि जिवंतपणीं त्यांची वाणी जशी होती अगदी तशीच वाणी व बोलण्याची ढब आपल्या कानीं पडेल. हें सर्व जगाला फसविण्याकरिता आहे, आणि या फसव्या युक्तिवर त्यांनी विश्वास ठेवावा म्हणून त्यांना मोहजालात अडकविण्यात येईल.

मी पाहिले कीं पवित्रजनांना सध्या खास रित्या लागू असलेल्या सत्याचा चांगलाच समज प्राप्त झाला असला पाहिजे, जो त्यांना पवित्रशास्त्रातून सिद्ध करावा लागेल. मृतांची स्थिती कशी असते तें त्यांना कळलेच पाहिजे, कारण सैतानाचे दुष्टात्मे अजूनही त्यांच्यापुढे दृश्य रूपात येतील आणि त्यांचे प्रिय आप्त व मित्रमंडळी असल्याचा दावा करतील; ते त्यांना पवित्रशास्त्राचा आधार नसलेली तत्वे सांगतील. त्यांच्या कुंवतीत आहेत तितके प्रयत्न ते सहानुभूति उत्पन्न करण्याकरिता करतील, व ते जें सांगतात त्याला पुष्टि देण्याकरिता हे दुष्टात्मे त्यांच्यापुढे चमत्कार करतील. या आत्म्यांचा प्रतिकार पवित्रशास्त्राच्या सत्याने करण्यास देवाच्या लोकांची तयारी झालेली असावयास पाहिजे, कीं मृतांना काहीच माहीत नसते, व हे त्यांच्यापुढे दृश्य झालेले आत्मे सैतानाचे आत्मे, दुष्टात्मे, आहेत.

मी पाहिले कीं आपण आपल्या आशेचा पाया चांगल्या प्रकारें तपासून पाहिला पाहिजे, कारण कीं आपल्याला त्याच्याकरिता पवित्रशास्त्रातून कारण द्यावे लागेल; कारण ही फसवेगिरी पसरतांना आपल्याला आढळेल, व आपल्याला तिच्याशीं तोंडोतोंड लढा करावा लागेल. आणि त्याकरिता आपली तयारी झालेली नसल्यास आपण मोहजालांत सापडू व आपल्यावर पापाचा विजय होईल. परंतु जर आपण आपल्याला जें काही शक्य आहे तें केले, आपल्यापुढेच असलेल्या संघर्षाकरिता तयारी करण्याची शिकस्त केली, तर देव त्याचा कार्यभाग करील, व त्याचा सर्वसामर्थ्यशाली बाहू आपले रक्षण करील. विश्वासू जिवात्म्यांभोवती संरक्षणाचे कुंपण बनविण्याकरिता तो गौरवी स्वर्गातून एकूण एक देवदूत पाठवील, परंतु ते फसविले जावे व सैतानाच्या खोट्या चमत्कारांनी त्यांची दिशाभूल व्हावी असें तो होऊ देणार नाही.

ही फसवेगिरी किती झपाट्याने पसरत आहे तें मी पाहिले. मला विजेच्या वेगाने एक आगगाडी जातांना दाखविली गेली. देवदूताने मला लक्षपूर्वक पाहण्याचा आदेश दिला. मी माझी नजर आगगाडीवर

केंद्रित केली. असें दिसत होते कीं जणू आख्खे जग आगगाडीतून प्रवास करीत होते. मग त्याने मला गाडीचा चालक दाखविला; तो उंच, देखण्या, राजबिंड्या मनुष्याप्रमाणे दिसत होता, व सर्व प्रवासी त्याच्यावर भिस्त टाकत होते व त्याचा खूप आदर करीत होते. मी गोंधळात पडले, आणि माझ्या सोबतच्या देवदूताला विचारले कीं तो कोण होता. तो म्हणाला: तो सैतान आहे. तो प्रकाशाच्या देवदूताच्या रुपात आगगाडीचा चालक आहे. त्याने जगाला बंदिवान केले आहे. ते फसवेगिरीच्या बळकट मोहजालांत फसलेले आहेत, आणि त्यांचा सर्वनाश व्हावा म्हणून ते खोटेपणावर विश्वास ठेवतात. त्याचा हस्तक, त्याच्यापेक्षा खालच्या पदावरचा, इंजिनियर आहे, आणि त्याचे इतर हस्तक त्याला गरज पडेल त्या त्या वेगवेगळ्या कामांत त्याने गुंतविलेले आहेत, आणि ते सर्व विजेच्या वेगाने सर्वनाशाला जात आहेत. मी देवदूताला विचारले कीं यांच्याखेरीज दुसरे कोणी उरले नव्हते कां. त्याने मला विरुद्ध दिशेला पाहायला सांगितले, आणि मी एका लहानशा गटाला अरुंद मार्गावरून प्रवास करीत असल्याचे पाहिले. त्या सर्वांत खंबीर एकजूट असल्याचे दिसत होते, आणि सत्याने त्यांना एकत्र जुळविले होते.

हा लहानसा गट शिणलेला दिसत होता, जणू ते कठीण संकटांतून व संघर्षांतून पार पडलेले होते. आणि असें दिसत होते कीं जणूकाय ढगामागून नुकताच सूर्य दिसू लागला व त्यांच्या चेहऱ्यांवर त्याचे तेज चमकू लागले, आणि त्यामुळें ते विजयी दिसू लागले, जणू त्यांचा विजय त्यांनी जवळजवळ मिळविलाच आहे.

मी पाहिले कीं देवाने जगाला मोहजालाचे स्वरूप समजण्याची संधी दिली होती. ख्रिस्ती भक्ताकरिता दुसरा कोठलाही पुरावा जरी मिळाला नाही तरी ही एक गोष्ट पुरेसा पुरावा आहे कीं: मौल्यवान व भ्रष्ट यांच्यात काही फरक केला जात नाही.

थॉमस पैन, ज्याचा देह माती बनून गेला आहे, आणि ज्याला १००० वर्षांच्या अखेरीस दुसऱ्या पुनरुत्थानाच्या वेळीं त्याचे वेतन मिळविण्याकरिता व दुसरा मृत्यु भोगण्याकरिता उठविले जाणार आहे, तो स्वर्गात आहे व तेथे उच्च आदरणीय पदावर आहे असें सैतान दाखवितो. सैतानाने त्याचा पृथ्वीवर करून घेता येईल तितका जास्त उपयोग करून घेतला, आणि आता सैतान त्याच्या फसवेगिरीने तेंच काम पुढे चालू ठेवीत आहे व म्हणत आहे कीं थॉमस पैन फार उच्च पदावर आहे आणि त्याचा सन्मान केला जात आहे; आणि तो पृथ्वीवर असतांना त्याने जी शिकवणूक दिली, तीच तो स्वर्गात देत आहे असें सैतान भासवितो. पृथ्वीवरील काहीजणांना त्याच्या आयुष्याचे व मृत्युचे फार भय वाटले होते, आणि तो जिवंत असतांना त्याने जी भ्रष्ट शिकवणूक दिली तिला जे घाबरत होते, ते आता त्याच्याकडून शिकविले जाण्यास त्याच्यापुढे लीन होतात; तो जगातील सर्वांत दुष्ट व सर्वांत भ्रष्ट मनुष्यांपैकी एक होता; तो देवाला व त्याच्या आज्ञांना तुच्छ लेखत असे.

तो, जो सर्व लबाड्यांचा जनक आहे, तो त्याच्या दूतांना प्रेषितांचे सोंग घेऊन जगाला फसविण्याकरिता पाठवितो, आणि पृथ्वीवर असतांना त्यांनी जें लिहिले होते, जें पवित्र आत्म्याच्या सांगण्यावरून त्यांनी लिहिले होते, त्याच्या अगदीच परस्परविरोधी गोष्टी ते सांगतात असें तो भासवितो.

हे खोटारडे दूत प्रेषित त्यांचीच स्वतःची शिकवण भ्रष्ट करतात व ती शुद्ध नसल्याचे जाहीर करतात असें दाखवितात. असें करण्याने तो नामधारी ख्रिश्चनांना, जे जगतात असें त्यांना नांव आहे परंतु जे मेलेले आहेत त्यांना, आणि सबंध जगाला देवाच्या वचनाच्या बाबतीत विश्वास राहणार नाही असें करू शकतो; कारण देवाचे वचनच त्याच्या मार्गात सरळसरळपणे आडवे येते, व त्याच्या योजना बिघडवून टाकण्याची त्याच्यामुळें [देवाच्या वचनामुळें] शक्यता असते. आणि म्हणून तो पवित्रशास्त्राच्या दैवी उगमाबाबत शंका निर्माण करतो, आणि मग धर्मभ्रष्ट थॉमस पैनला उचलून उभे करतो, जणू जेव्हा तो मेला तेव्हा त्याला स्वर्गात नेण्यात आले, आणि पृथ्वीवर ज्या पवित्र प्रेषितांचा त्याने द्वेष केला होता, त्यांच्यासोबत तो मिळाला आहे आणि सध्या जगाला शिकवीत आहे.

सैतान त्याच्या दूतांपैकीं एकूण एकाला त्यांचात्यांचा कार्यभाग नेमून देतो. तो त्यांना चलाख, चतुर, व कावेबाज राहण्याची सूचना करतो. तो त्यांच्यापैकीं काहींना प्रेषितांचे सोंग घ्यायला लावतो व त्यांच्याप्रमाणे बोलायला लावतो, आणि इतरांना धर्मभ्रष्ट व दुष्ट माणसांचे सोंग घ्यायला लावतो जे देवाला शाप देतदेत मेले आणि आता फार धार्मिक झाल्यासारखे दिसतात. सर्वांत पवित्र प्रेषितांमध्ये आणि दुष्टांतल्या दुष्ट धर्मभ्रष्ट मनुष्यात काही फरक केला जात नाही. ते दोघे एकच गोष्ट शिकवितात असें भासविले जाते. कोणाकडून सैतान असली शिकवण वदवून घेतो ह्याचे त्याला शुभाशुभ नाही, फक्त त्याचे उद्दिष्ट साध्य झाले पाहिजे एवढेच तो बघतो. पैन पृथ्वीवर असतांना सैतान त्याच्याशीं इतका घनिष्ठ होता आणि त्याने त्याला इतकी मदत केली होती कीं तो नेमके जें शब्द वापरत असे तें त्याला माहीत असणे त्याच्याकरिता सोपी गोष्ट आहे, आणि त्याला समर्पित असलेल्या त्याच्या मुलांनी त्याची सेवा इतक्या विश्वासूपणे केली व त्याची उद्दिष्टे इतक्या उत्तम प्रकारें पार पाडली कीं त्यांचे हस्ताक्षर ओळखणे त्याला सोपे आहे. त्याचे बहुतेक लिखाण सैतानाने त्याला तोंडीं सांगितले होते, आणि आता त्याच्या दूतांकरवीं तो त्याच भावना व तेंच विचार सहजपणे सांगतो, व तें थॉमस पैनकडून येतात असें तो दाखवितो, जो जिवंतपणीं त्याचा खराखुरा सेवक होता. ही सैतानाची सर्वांत कुशल फसवेगिरी आहे. ही सगळी शिकवण, जी मरण पावलेले प्रेषित, पवित्रजन, आणि मेलेली दुष्ट माणसे यांच्यापासून येत आहे असें जें दाखवण्यात येते, ती सरळसरळपणे सैतान महाराजांकडून येत असते.

प्रत्येक मनापुढील पडदा दूर सारण्यास आणि सैतानाची अंधकारमय, गूढ कृत्ये उघड करण्यास एवढेच पुरेसे आहे - कीं ज्याच्यावर (पैनवर) त्याने खूप प्रेम केले, व जो देवाचा इतका पूर्णपणे तिटकारा करीत होता, त्याला तो पवित्र प्रेषितांच्या व गौरवी तेजाच्या देवदूतांच्या जोडीला बसवितो, आणि जगाला आणि धर्मभ्रष्ट माणसांना जणू स्पष्टपणे सांगतो कीं: तुम्ही कितीही दुष्ट असा; तुमचा देवावर आणि पवित्रशास्त्रावर विश्वास असो किंवा नसो; तुम्हांला पाहिजे तसें तुम्ही जगा, तुम्हांला स्वर्ग मिळणारच; - कारण कीं सर्वांना माहीत असेल कीं जर थॉमस पैन स्वर्गात आहे आणि उच्च पदावर आहे, तर खात्रीने ते तेथे जातीलच. ही इतकी ठळक लबाडी आहे कीं जर इच्छा केली तर सर्वांना ती दिसू शकेल. जी गोष्ट सैतानाचे पतन झाल्यापासून सैतान करायला बघत आहे तीच गोष्ट तो थॉमस पैनसारख्या व्यक्तिंमार्फत

आता करीत आहे. त्याच्या सामर्थ्याने आणि फसव्या चमत्कारांनी तो ख्रिस्ती भक्तांच्या आशेचा पायाच उखडून टाकीत आहे, आणि स्वर्गाकडच्या अरुंद मार्गावर त्यांचा मार्ग प्रकाशित करण्याकरिता जो सूर्य दिला गेला आहे तो त्यांचा सूर्य मालवीत आहे. तो जगाला असा विश्वास ठेवायला लावीत आहे कीं पवित्रशास्त्र एखाद्या गोष्टीच्या पुस्तकापेक्षा काही अधिक चांगले नाही, तें काही ईश्वरप्रेरित नाही; आणि त्याच्या जागीं तो दुसरे काहीतरी उभे करीत आहे, तें म्हणजे, *अध्यात्मवाद,* दुसऱ्या शब्दांत, *पिशाच्चवाद!*

हा मार्ग पूर्णपणे त्याला समर्पित आहे, त्याच्या नियंत्रणाखाली आहे, आणि त्यातून तो जगाला त्याला पाहिजे त्या गोष्टीवर विश्वास ठेवायला लावू शकतो. ज्या पवित्र पुस्तकाद्वारें त्याचा व त्याच्या अनुयायांचा न्यायनिवाडा केला जाणार आहे, तें पुस्तक तो मागे अंधारात सारतो; तें तिथेच असावे असें त्याला हवे आहे. जगाचा उद्धारक एका सामान्य माणसापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही असें तो दर्शवितो; आणि येशूच्या कबरेकडे पहारा ठेवणाऱ्या रोमी पहारेकऱ्यांनी जसा फसवा, लबाड अहवाल दिला होता, जो मुख्य याजकांनी आणि वडिलजनांनी त्यांच्या तोंडीं घातला होता, त्याप्रमाणे या सोंग घेतलेल्या अध्यात्मवादाने फसविले गेलेले बिचारे अनुयायी असेंच पुन्हापुन्हा सांगत सुटतील कीं आपल्या उद्धारकाच्या जन्माच्या, मृत्युच्या व पुनरुत्थानाच्या बाबतीत कसलेही चमत्कार घडलेले नाहीत; आणि ते येशूला पवित्रशास्त्रासकट मागे अंधारात ठेवतात, जिथे त्याने असावे असें त्यांना वाटते, आणि मग ते जगाचे लक्ष त्यांच्याकडे वेधतात आणि त्यांच्या लबाड अद्‌भुतांकडे व चमत्कारांकडे पाहायला लावतात व म्हणतात कीं ख्रिस्ताच्या कार्यापेक्षा हें फारच फार अद्‌भुत कार्य व चमत्कार आहेत. अशा प्रकारें जगाला मोहजालांत अडकविण्यात येते, आणि फसव्या सुरक्षिततेत गाफील ठेवले जाते; शेवटल्या पीडा जगावर ओतल्या जाईपर्यंत ते कसल्या भयंकर फसवेगिरीत गोवले गेले आहेत ती फसवेगिरी त्यांच्यापुढे उघड होणार नाही. सैतान त्याची योजना इतक्या उत्कृष्ट प्रकारें यशस्वी होतांना पाहून हसतो, आणि आख्खे जग त्याच्या मोहजालात सापडले आहे.

पहा:
*उपदेशक* ९:५; *योहान* ११:१-४५; २*थेस्सल.* २:९-१२;
*प्रगटीकरण* १३:३-१४.

# अध्याय ३१
# लोभी वृत्ति

मी सैतानाला व त्याच्या दूतांना एकत्र सल्लामसलत करतांना पाहिले. त्याने त्याच्या दूतांना त्यांचे मोहजाल खास करून ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनाची प्रतीक्षा करणाऱ्यांवर व जे देवाच्या सर्व आज्ञा पाळीत होते त्यांच्यावर टाकावे अशी सूचना दिली. सैतानाने त्याच्या दूतांना सांगितले कीं मंडळ्या सगळ्या झोपलेल्या आहेत. तो त्याचे सामर्थ्य व फसवे चमत्कार यांत वाढ करील, आणि तो त्यांना त्याच्या कब्जात ठेवू शकेल. परंतु शब्बाथ-पाळणारांच्या पंथाचा आपण द्वेष करतो. ते सतत आपल्याविरुद्ध कार्य करीत आहेत, आणि देवाच्या आपण द्वेष करतो त्या आज्ञा पाळण्यासाठीं आपल्यापासून आपले प्रजाजन घेत आहेत.

जा, जमीनजुमल्यांच्या आणि संपत्तिच्या मालकांना चिंताकाळज्यांची नशा चढवा. जर तुम्ही त्यांनी या गोष्टींचीच आवड धरावी असें करू शकला, तर ते अजूनही आपल्या कब्जात येतील. त्यांना पाहिजे त्या गोष्टीचा दावा करू द्या, फक्त ख्रिस्ताच्या राज्याच्या यशापेक्षा, किंवा आपल्याला तिटकारा वाटतो त्या सत्यांचा प्रसार करण्यापेक्षा, त्यांनी पैशांची अधिक चिंता करावी असें करा. त्यांच्यापुढे जग जास्तीत जास्त आकर्षक रुपात सादर करा, कीं मग ते जगाच्या मोहात पडतील व जगाला देवाच्या ठिकाणीं ठेवतील. आपण सर्व पैसाअडका आपल्या लोकांकडे ठेवला पाहिजे. त्यांच्याकडे जितकी जास्त साधने असतील, तितके ते आपली प्रजा आपल्यापासून हिरावून घेऊन आपल्या राज्याची जास्त हानी करतील. आणि जेव्हा ते वेगवेगळ्या ठिकाणीं सभा घेतात, तेव्हा आपण धोक्यात असतो. तेव्हा फार जागरूक राहा. तुम्हांला जमतील तितके जास्तीत जास्त अडथळे निर्माण करा. त्यांचे एकमेकांवरील प्रेम नष्ट करा. त्यांच्या पाळकांना निराश व हताश करा, कारण आपण त्यांचा द्वेष करतो. ज्यांच्याकडे संपत्ति आहे त्यांनी ती त्यांना देऊ नये म्हणून हरएक प्रकारची सबब पुढे करा. पैशांच्या बाबींवर तुम्हांला शक्य असेल तेवढा ताबा ठेवा, आणि त्यांच्या पाळकांना गरीबीत व कष्टत्रासात लोटा. असें केल्याने त्यांचे धैर्य आणि उत्साह कमकुंवत होईल. क्षेत्राच्या प्रत्येक इंचाकरिता लढा करा. त्यांच्या स्वभावात लोभी वृत्ति व जगिक खजिन्याची आवड प्रामुख्याने उत्पन्न करा. जोंवर हें स्वभावगुण त्यांच्यावर नियंत्रण करतील, तोंवर उद्धार व देवकृपा यांचे महत्त्व कमी राहील. त्यांना आकर्षून घेण्याकरिता त्यांना अशा जास्तीत जास्त गोष्टींच्या मोहात पाडा, आणि खात्रीने ते आपले बनतील. ते तर नक्कीच आपले बनतील, परंतु एवढेच नाही, तर त्यांचा तिरस्करणीय

प्रभाव इतरांना स्वर्गाकडे मार्गदर्शन करण्याकरिता वापरला जाणार नाही. आणि जे देण्याचा प्रयत्न करतील, त्यांच्या मनात कूरकूर करण्याची वृत्ति घाला, म्हणजे ते कमीत कमी देतील.

मी पाहिले कीं सैतानाने त्याच्या योजना चांगल्या प्रकारें पार पाडल्या. आणि देवाच्या सेवकांनी सभांचे आयोजन केले, तेव्हा सैतान व त्याच्या दूतांना त्यांची कामगिरी काय होती तें समजत होते, आणि ते त्या ठिकाणीं देवाच्या कार्याला अडथळा करण्याकरिता हजर होते; तो देवाच्या लोकांच्या मनांत एकसारखा काही ना काही संशय घालीत होता. काहींना तो एका मार्गाने, तर काहींना दुसऱ्या मार्गाने घेऊन जात होता; तो नेहमी बांधवांच्या व भगिनींच्या स्वभावातील वाईट गुणांचा फायदा घेतो, आणि त्यांच्या नैसर्गिक कमकुवतपणाला चेतवून उत्साहित करतो. जर स्वार्थी व लोभी असण्याकडे त्यांचा कल असेल, तर सैतानाला त्यांच्या बाजूला उभे राहायला फार आवडते, आणि मग त्याचे सर्व सामर्थ्य वापरून तो त्यांना त्यांची आवडती पातके उघड करण्यास प्रवृत्त करतो. जर देवाच्या कृपेने आणि सत्याच्या प्रकाशाने ह्या लालची, स्वार्थी भावना थोड्याशा काढून टाकल्या, परंतु त्यांच्यावर त्यांनी पूर्ण विजय मिळविलेला नसेल, तर जेव्हा ते उद्धाराच्या प्रभावाखाली नसतात, तेव्हा सैतान त्यांच्याकडे येतो आणि त्यांच्या मनातील प्रत्येक उमदे, उदार तत्व तो त्यांना विसरण्यास भाग पाडतो, आणि त्यांना वाटू लागते कीं त्यांना खूप जास्त खपावे लागते. ते सत्कृत्ये करण्याच्या बाबतील गळून जातात आणि विसरतात कीं सैतानाच्या सामर्थ्यापासून त्यांचा उद्धार करण्याकरिता, आणि आशाहीन दुर्दशेपासून त्यांना मुक्त करण्याकरिता येशूने त्यांच्यासाठीं किती मोठा, महान त्याग केला आहे.

सैतानाने यहूदाच्या लोभी, स्वार्थी वृत्तिचा फायदा घेतला, आणि मरीयेने येशूला समर्पण केलेल्या सुगंधी द्रव्याविरुद्ध त्याला कूरकूर करण्यास प्रवृत्त केले. ही मोठी नासाडी आहे असें यहूदाला वाटले; तें विकून पैसे गरीबांना देता आले असते. त्याला गरीबांकरिता कळकळ नव्हती, पण येशूला उदार हस्तें अर्पिलेले अर्पण उधळपट्टी आहे असें तो समजला. त्याच्या दृष्टिने त्याला त्याच्या प्रभूचे मोल किती वाटत होते तें त्याने त्याला थोडक्या चांदीच्या नाण्यांकरिता विकण्याद्वारें दाखवून दिले. आणि मी पाहिले कीं त्यांच्या प्रभूची प्रतीक्षा करीत आहेत असा दावा करणाऱ्यांमध्ये काही लोक यहूदासारखे आहेत. त्यांच्यावर सैतान नियंत्रण करतो, पण त्यांना तें माहीत नसते. देव लोभाच्या किंवा स्वार्थाच्या एकासुद्धा अंशाला मान्यता देऊ शकत नाही. त्याला ह्या वृत्तिचा तिटकारा आहे, आणि ज्यांच्यामध्ये अशी वृत्ति असते त्यांच्या प्रार्थना व त्यांचे उपदेश तो तुच्छ मानतो. त्याला थोडका वेळ उरला आहे हें जेव्हा सैतानाला दिसते, तेव्हा तो त्यांना जास्तजास्त स्वार्थी, जास्तजास्त लोभीलालची बनण्यास उद्युक्त करतो, आणि मग ते कसें स्वत:मध्येंच गुरफटून जातात, कसें अनुदार, कंजूष, आणि स्वार्थी होतात तें पाहून त्याला आनंद होतो. जर अशांचे डोळे उघडता येऊ शकले, तर त्यांना सैतान नरकी विजयात त्यांच्याबाबत आनंद करतांना दिसेल, आणि त्याच्या सूचना मानणाऱ्यांच्या मूर्खपणावर तो हंसतो, कीं ते कसें त्याच्या मोहजालांत सापडतात. मग तो आणि त्याचे दूत या व्यक्तिंची हलकट व लोभी कृत्ये येशूपुढे व पवित्र देवदूतांपुढे सादर करतात, आणि उपहासाने म्हणतात: पहा हे ख्रिस्ताचे अनुयायी! ते रुपांतर होण्याकरिता तयारी करीत आहेत!

सैतान त्यांचे धर्मभ्रष्ट मार्ग निरखून पाहतो, आणि मग त्यांची तुलना पवित्रशास्त्राशीं करतो, ज्यात अशा गोष्टींचा निषेध स्पष्टपणे केलेले उतारे आहेत, आणि मग स्वर्गीय देवदूतांना चिडविण्याकरिता तो तें त्यांच्यापुढे सादर करतो आणि म्हणतो: हे पहा कसें ख्रिस्ताला व त्याच्या वचनाला अनुसरत आहेत! ख्रिस्ताच्या त्यागाची आणि उद्धाराची हीं फळे आहेत! देवदूत त्या दृश्यापासून तिटकाऱ्याने दूर जातात. देवाच्या लोकांनी नेहमी त्यांचे कर्तव्य करीत राहिले पाहिजे अशी देवाची मागणी आहे, आणि जेव्हा ते चांगली व उदार कृत्ये करण्याच्या बाबतीत शिणतात, तेव्हा तो त्यांच्याबाबतीत शिणतो. मी पाहिले कीं देवाचे लोक असल्याचा दावा करणाऱ्या लोकांनी थोडासुद्धा स्वार्थीपणा प्रगट केला तर देवाला फार असंतोष होतो, कारण कीं येशूने त्यांच्याकरिता त्याचा स्वतःचा अनमोल जीवसुद्धा राखून ठेवला नाही. प्रत्येक स्वार्थी, लोभी व्यक्ति योग्य मार्गातून ढळेल. यहूदाप्रमाणे, ज्याने त्याच्या प्रभूला विकले, ते चांगली तत्वे व उमदी, उदार वृत्ति पृथ्वीच्या थोड्याशा लाभाकरिता विकतील. अशा सर्वांना देवाच्या लोकांतून चाळले जाऊन गाळून टाकण्यात येईल. ज्या कोणाला स्वर्ग हवा असेल, त्यांनी त्यांच्या हरएक शक्तिनिशीं स्वर्गाच्या तत्वांना उत्तेजन दिले पाहिजे. आणि त्यांचे जिवात्मे स्वार्थीपणाने सुकून जाण्याऐवजी, औदार्याने ते विकसित झाले पाहिजेत, आणि प्रत्येक संधीचा एकमेकांचे हित करण्याकरिता फायदा करून घेतला पाहिजे, आणि स्वर्गाच्या ज्ञानामध्ये जास्तजास्त वाढत गेले पाहिजे. माझ्यापुढे येशू परिपूर्ण नमुना म्हणून दाखविला गेला. त्याच्या जीवनात स्वार्थी हेतु मुळींच नव्हते, तर दुसऱ्यांची सेवा तो कशाचीही अपेक्षा न करता करीत असे.

पहा:
*मार्क* १४:३-११; *लूक* १२:१५-४०; *कलस्सै.* ३:५-१६;
*१योहान* २:१५-१७.

# अध्याय ३२
# चाळणी फिरविली जाणे

मी काहींना न डळमळणाऱ्या भक्कम विश्वासाने आणि आक्रोश करीत देवाची विनवणी करीत असतांना पाहिले. त्यांचे चेहरे निस्तेज होते, आणि खूप चिंताकाळज्यांचे भाव त्यांच्या चेहऱ्यांवर दिसत होते, ज्यावरून त्यांच्या मनांत किती कटु संघर्ष चालला होता तें प्रगट होत होते. त्यांच्या चेहऱ्यांवर खंबीरपणा आणि मोठी काळजी दिसत होती, आणि त्यांच्या कपाळांवर घामाचे मोठमोठे थेंब उत्पन्न होत होते, आणि पडत होते. अधूनमधून त्यांची तोंडे देवाच्या मान्यतेच्या चिन्हांनी उजळली जात, आणि पुन्हा तेंच गंभीर, कळकळीचे, व चिंतायुक्त भाव त्यांच्या चेहऱ्यांवर दिसू लागत.

त्यांच्याभोवती दुष्ट दूतांनी गर्दी केली होती, व ते त्यांच्यावर त्यांच्या अंधकाराचा दबाव टाकत होते, तें याकरिता कीं येशू त्यांच्या दृष्टिआड केला जावा, व त्यांच्या नजरा त्यांच्या भोवतालच्या अंधकाराकडे वेधल्या जाव्या, आणि त्यांनी देवावरची भिस्त सोडून द्यावी, आणि मग त्याच्याविरुद्ध कुरकुरू लागावे. त्यांची एकमेव सुरक्षितता त्यांच्या नजरा वर स्वर्गाकडे ठेवण्यात होती. देवदूतांकडे देवाच्या लोकांची जबाबदारी होती, आणि या दुष्ट दूतांनी उत्पन्न केलेले विषारी वातावरण जसजसें या चिंताग्रस्त भक्तांभोवती पसरत होते, तसतसें ज्या देवदूतांवर त्यांची जबाबदारी होती ते त्यांच्याभोवतीचा गडद अंधकार पांगवून टाकण्याकरिता एकसारखे त्यांचे पंख त्यांच्यावर फडफडवीत होते.

मी पाहिले कीं काहीजण या क्लेश भोगण्याच्या व विनवण्या करण्याच्या कामात सहभागी होत नव्हते. ते बेफिकिर व निष्काळजी दिसत होते. ते त्यांच्याभोवतालच्या अंधकाराला प्रतिकार करीत नव्हते, आणि त्यामुळें ते दाट ढगाप्रमाणे ग्रासले गेले. देवाचे देवदूत त्यांना सोडून गेले, आणि कळकळीने प्रार्थना करणाऱ्या भक्तांच्या मदतीसाठीं गेले. जे दुष्ट दूतांचा प्रतिकार करण्याकरिता त्यांच्या सर्व शक्ति पणाला लावून संघर्ष करीत होते, आणि त्यांची मदत होण्याकरिता प्रयत्न करीत राहून चिकाटीने देवाच्या विनवण्या करीत होते, त्या सर्वांच्या मदतीला देवाचे देवदूत त्वरा करून जात असल्याचे मी पाहिले. परंतु जे स्वतःची मदत करण्याकरिता काहीच प्रयत्न करीत नव्हते त्यांना देवदूत सोडून गेले, व तेथून पुढे ते माझ्या दृष्टिला पडले नाहीत.

हे प्रार्थनाशील भक्त त्यांचा कळकळीचा आक्रोश करीत राहिले, व अधूनमधून येशूकडून त्यांच्याकडे प्रकाशाचा एखादा किरण येत गेला व त्यांच्या हृदयांना उत्तेजन मिळत गेले व त्यांचे चेहरे उजळून गेले.

मी पाहिलेल्या ह्या चाळणीचा अर्थ काय होता अशी मी विचारणा केली. मला दाखविले गेले कीं लावदिकियाच्या लोकांना खऱ्या साक्षीदाराकडून जो सल्ला दिला गेला त्या सरळसरळ साक्षीने ही चाळणी फिरेल. ही साक्ष मानणाऱ्याच्या अंतःकरणावर तिचा प्रभाव पडेल, आणि तो देवाचा ध्वज उच्च करण्यास व सत्य सरळसरळपणे सांगण्यास प्रवृत्त होईल. काहींना ही सरळ साक्ष सहन होणार नाही. ते तिच्याविरुद्ध उठतील, आणि त्यामुळें देवाच्या लोकांमध्ये चाळणी फिरू लागेल.

मी पाहिले कीं खऱ्या साक्षीदाराची साक्ष अर्धीसुद्धा मानली गेलेली नाही. मंडळीचे भवितव्य ज्या गंभीर साक्षीवर अवलंबून आहे, तिच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष जरी केले गेलेले नाही, तरी तिला हलकी समजले गेले आहे. ह्या साक्षीने खोलवर पश्चात्ताप घडवून आणला पाहिजे, आणि जे जे खरोखरी तिचा स्वीकार करतील, ते सर्व तिचे आज्ञापालन करतील व शुद्ध, पवित्र केले जातील.

देवदूत म्हणालाः जरा ऐक! लवकरच मी एक वाणी ऐकली जिचे स्वर संगीताच्या अनेक वाद्यांप्रमाणे ऐकू आले - सर्व परिपूर्ण, निर्दोष सूरांप्रमाणे, मधूर व सुसंगत. मी आतापर्यंत ऐकलेल्या कोठल्याही संगीतापेक्षा तें श्रेष्ठ होते, इतके तें दयापूर्ण, करुणामय, आणि उच्च, पवित्र हर्षाने परिपूर्ण असल्याचे भासले. माझे सर्वांग त्या सूरांनी थरारले. देवदूत म्हणालाः जरा पहा! माझे लक्ष त्या गटाकडे वेधले गेले ज्यांना मी पूर्वी पाहिले होते व ज्यांच्यावर चाळणी जोरदार फिरत होती. मी पूर्वी शोक करणाऱ्या व आत्म्याच्या तळमळीने प्रार्थना करणाऱ्या ज्या लोकांना पाहिले होते ते मला दाखविण्यात आले. मी पाहिले कीं त्यांच्याभोवती असलेल्या रक्षक देवदूतांची संख्या दुप्पट केली गेली होती, आणि त्यांना मस्तकापासून तें त्यांच्या पायांपर्यंत चिलखत चढविले गेले होते. ते सैनिकांच्या तुकडीप्रमाणे बरोबर शिस्तीने व खंबीरपणे हालचाल करीत होते. ज्या भीषण संघर्षाला त्यांनी शेवटपर्यंत तोंड दिले होते, ज्या क्लेशदायीं लढ्यातून ते पार पडले होते, तें सर्वकाही त्यांच्या चेहऱ्यांतून प्रगट होत होते. तरी, त्यांच्या चेहऱ्यांवर जरी त्यांच्या आंतरिक यातनांच्या खूणा दिसत होत्या, तरी त्यांची मुखे आता स्वर्गाच्या तेजाने व गौरवाने चमकत होती. त्यांनी विजय प्राप्त करून घेतला होता, आणि त्यामुळें अंतःकरणापासून त्यांच्यातून कृतज्ञता व पवित्र, पवित्र आनंद ओसंडत होता.

या गटातील लोकांची संख्या घटलेली होती. काहींना चाळणीने बाहेर टाकले होते व ते अर्ध्या वाटेवरच सोडले गेले होते. निष्काळजी व बेफिकिर लोकांना विजयाचे व उद्धाराचे मोल वाटणाऱ्या लोकांप्रमाणे क्लेश भोगायला, टिकून राहायला, व विनवण्या करायला नको होते, तेव्हा त्यांना तो मिळाला नाही, आणि त्यांना पाठीमागे अंधारात सोडून दिले गेले होते, आणि त्यांची संख्या ताबडतोब इतरांनी सत्यावर पकड घेऊन भरून काढली होती व ते गटात येऊन मिळाले होते. तरी दुष्ट दूत त्यांच्याभोवती येण्यास जोर करीत होते, पण त्यांचे कोठलेही सामर्थ्य त्यांच्यावर चालत नव्हते.

चिलखत घातलेल्यांना मी सत्य मोठ्या सामर्थ्यात जाहीर करतांना ऐकले. त्याचा प्रभाव पडला. मी बांधून ठेवलेल्यांना पाहिले; काही बायकांना त्यांच्या नवऱ्यांनी बांधून ठेवले होते, आणि काही मुलांना

त्यांच्या आईवडिलांनी बांधून ठेवले होते. सत्यास धरून राहणाऱ्या किंवा सत्य ऐकण्यास प्रतिबंध झालेल्या प्रामाणिक जनांनी आता बोलल्या गेलेल्या सत्यावर कळकळीने पकड घेतली. त्यांच्या नातलगांची त्यांच्या मनांतली सर्व भीति दूर झाली होती. केवळ सत्याचेच त्यांना आकर्षण होते. तें प्राणापेक्षा अधिक प्रिय व अधिक मौल्यवान होते. सत्याकरिता त्यांना तहानभूक लागलेली होती. हा मोठा बदल कसा काय घडून आला असें मी विचारले. एका देवदूताने उत्तर दिले: हा वळीव वर्षाव आहे; प्रभूच्या समक्षतेतून आलेली टवटवी आहे; तिसऱ्या देवदूताची मोठी आरोळी आहे.

या निवडलेल्या भक्तांकडे मोठे सामर्थ्य होते. देवदूत म्हणाला: जरा बघ! माझे लक्ष दुष्टांकडे, म्हणजेच विश्वास न ठेवणारांकडे, वेधले गेले. ते सर्व जागृत झाले होते. देवाच्या लोकांच्या उत्साहाने आणि सामर्थ्याने ते चेतविले गेले होते व संतप्त झाले होते. गोंधळ, सर्वत्र गोंधळ होता. या गटाविरुद्ध, ज्यांच्याकडे देवाचे सामर्थ्य व देवाचा प्रकाश होता त्यांच्याविरुद्ध, पावले उचलली गेल्याचे मी पाहिले. त्यांच्याभोवती अंधार गाढा झाला, तरी ते देवावर भिस्त टाकीत, देवाची मान्यता मिळवीत, उभे होते. मी त्यांना गोंधळून गेल्याचे पाहिले. नंतर मी त्यांना देवाकडे कळकळीने आक्रोश करतांना ऐकले. रात्रंदिवस त्यांचा आक्रोश थांबला नाही. मी हें शब्द ऐकले: हे देवा, तुझ्या इच्छेनुसार होवो! जर तुझ्या नामाचे गौरव होऊ शकत असेल, तर तुझ्या लोकांकरिता सुटकेचा मार्ग तयार कर. आमच्या भोवतालच्या विधर्म्यांपासून आमची मुक्तता कर! त्यांनी आमच्याकरिता मृत्युदंड ठरविला आहे; परंतु तुझा बाहू उद्धार आणू शकतो. हें एवढेच शब्द मला आठवत आहेत. त्यांची योग्यता नसल्याची तीव्र भावना त्यांना असल्याचे दिसत होते, आणि देवाच्या इच्छेपुढे त्यांनी संपूर्ण समर्पण केले होते. तरी प्रत्येकजण, त्यांत एकाचाही अपवाद नव्हता, कळकळीने विनवण्या करीत होता, आणि सुटकेकरिता याकोबाप्रमाणे झगडत होता.

त्यांचा कळकळीचा आक्रोश सुरू होताच देवदूत त्यांच्या सहानुभूतिमुळें त्यांची सुटका करण्यास गेले असते. परंतु एका उंच, हुकूम देणाऱ्या देवदूताने त्यांना तसें करू दिले नाही. तो म्हणाला: देवाची इच्छा अद्यापि पूर्ण झालेली नाही. त्यांनी पेला प्यायलाच हवा. त्यांचा अग्निचा बाप्तिस्मा व्हायलाच पाहिजे.

लवकरच मी देवाची वाणी ऐकली, जिने आकाशांना व पृथ्वीला हादरवून टाकले. एक मोठा भूकंप झाला. इमारती हादरल्या, व सगळ्या बाजूंस कोसळल्या. मग मी विजयाची मोठी जयोत्सवी आरोळी, संगीताप्रमाणे मधूर व स्पष्ट, ऐकली. मी त्या गटाकडे पाहिले, जो थोड्या वेळापूर्वी इतक्या दुःखकष्टांत व बंधनात होता. त्यांची बंधने तोडून टाकण्यात आली होती. त्यांच्यावर एक गौरवी प्रकाश चमकत होता. तेव्हा ते किती सुंदर दिसत होते. सर्व थकवा गेला होता आणि चिंताकाळज्यांच्या खूणा कोठल्या कोठे नाहीशा झाल्या होत्या. प्रत्येक चेहऱ्यात सुदृढ आरोग्य व सौंदर्य दिसत होते. त्यांचे शत्रु, त्यांच्याभोवतालचे विधर्मी लोक, मेलेल्या माणसांसारखे कोसळून पडले. मुक्तता पावलेल्या पवित्र भक्तांवर चमकणारा प्रकाश त्यांना सहन करता येईना. येशू आकाशातल्या मेघांमध्ये दिसेपर्यंत हा प्रकाश व हें गौरव त्यांच्यावर राहिले, आणि हा विश्वासू, कसोटी झालेला गट एका क्षणात, डोळ्याची पापणी लवते न् लवते तोच, गौरवातून जास्तजास्त गौरवात बदलला गेला. आणि कबरा उघडल्या गेल्या व पवित्रजन अमरत्व पेहरून,

व मरणावर व कबरेवर विजय पावल्याच्या आरोळ्या ठोकीत, बाहेर पडले, आणि जिवंत पवित्रजनांसोबत त्यांच्या प्रभूला हवेत भेटण्याकरिता त्यांना वर नेले गेले; आणि सर्ववेळ प्रत्येक अमर मुखातून, पवित्र केल्या गेलेल्या शुद्ध ओठांतून, गौरवाच्या व विजयाच्या समृद्ध संगीतासारख्या मधूर आरोळ्या बाहेर पडत होत्या.

पहा:
*स्तोत्र,* अध्याय ८६; *होशेय* ६:३; *हाग्गय* २:२१-२३;
*मत्तय* १०:३५-३९; २०:२३; *इफिस.* ६:१०-१८;
*१थेस्सल.* ४:१४-१८; *प्रगटीकरण* ३:१४-२२.

# अध्याय ३३
# बाबेलची पापे

दुसऱ्या देवदूताने वेगवेगळ्या मंडळ्यांचे पतन झाल्याची घोषणा केल्याच्या काळापासून त्यांची स्थिती कशी झाली आहे तें मी पाहिले. त्या जास्तजास्त धर्मभ्रष्ट झाल्या आहेत; तरी त्या ख्रिस्ताचे अनुयायी असल्याचे नांव धारण करतात. त्यांच्यात आणि जगात फरक करणे अशक्य झाले आहे. त्यांचे पाळक देवाच्या वचनातून वचने घेऊन उपदेश करतात, परंतु ते मिळमिळीत गोष्टी शिकवितात. स्वाभाविक हृदयाला यात काही विरोध करण्यासारखे भासत नाही. जगिक वृत्तिच्या अंत:करणाला सत्याच्या आत्म्याचा व सत्याच्या सामर्थ्याचा, आणि ख्रिस्ताच्या उद्धाराचा वीट येतो. पाळकांच्या लोकप्रिय सेवेत सैतानाचा कोप चेतविला जाईल, पाप्याचा थरकाप होईल, किंवा लवकरच येणाऱ्या न्यायनिवाड्याच्या भयंकर वस्तुस्थितीची जाणीव हृदयाला किंवा विवेकाला होईल असें काहीच नसते. सर्वसाधारणपणे दुष्ट मनुष्यांना खरी धार्मिकता नसलेला परंतु बाह्य रुपात धार्मिकता असल्यासारखे दाखविणारा धर्म आवडतो, आणि अशा धर्माला ते पाठिंबा देतील व मदत करतील. देवदूत म्हणाला: अंधकाराच्या सत्तांवर विजय मिळविण्याकरिता, व तो विजय टिकवून ठेवण्याकरिता नीतिमत्त्वाच्या संपूर्ण चिलखताची गरज आहे, त्यापेक्षा कमी असलेले काही चालणार नाही. सैतानाने धर्मासंबंधीची यंत्रणा म्हणून मंडळ्यांचा पूर्ण ताबा घेतलेला आहे. देवाच्या वचनातील स्पष्ट हृदयभेदी सत्ये सांगण्याऐवजी मनुष्यांचे बोल व कृति यांवर मनन केले जाते. देवदूत म्हणाला: जगाशीं मित्रत्व व जगिक वृत्ति देवाविरुद्ध वैर करतात. जेव्हा सत्य त्याच्या साधेपणात व बळात, जसें ते येशूमध्ये आहे तसें, जगाच्या वृत्तिविरुद्ध सांगितले जाते, तेव्हा लगेच छळाची वृत्ति जागृत होते. अनेक, अनेकजण, जे ख्रिस्ती असल्याचा दावा करतात, त्यांनी देवाला ओळखलेले नसते. हृदयाचे नैसर्गिक स्वभावगुण बदलले गेलेले नसतात, आणि जगिक मन देवाशीं शत्रुत्व करीतच राहते. ते सैतानाचे विश्वासू चाकर असतात, जरी त्यांनी दुसरे नांव धारण केलेले असले तरी.

मी पाहिले कीं येशूने स्वर्गीय दर्शनमंडपातील पवित्रस्थान सोडल्यापासून, व दुसऱ्या पडद्याच्या आत त्याने प्रवेश केल्यापासून, मंडळ्यांना सोडले गेले, जसें यहूद्यांना सोडले गेले होते; आणि त्या हरएक प्रकारच्या अशुद्ध व किळसवाण्या वृत्तिंनी भरल्या जात आहेत. मला मंडळ्यांमध्ये मोठी अनीति व भ्रष्टता दिसली; तरी त्या ख्रिस्ती असल्याचा दावा करतात. त्यांचा दावा, त्यांच्या प्रार्थना व त्यांचे उपदेश देवाच्या दृष्टिने अमंगळता आहे. देवदूत म्हणाला: देव त्यांच्या सभांमध्ये वास करणार नाही. विवेकाची टोचणी न लागता ते स्वार्थीपणा, खोटेपणा व फसवेगिरी करतात. आणि या सर्व वाईट वृत्तिंवर ते धर्माचा अंगरखा

घालतात. मला नामधारी मंडळ्यांचा गर्व दाखविण्यात आला. देव त्यांच्या अंतःकरणात नाही; त्यांची जगिक मने स्वतःवरच केंद्रित असतात. ते त्यांचे केविलवाणे मर्त्य देह सजवितात, आणि मग स्वतःकडे पाहून त्यांना समाधान वाटते व आनंद होतो. येशू व देवदूत त्यांच्याकडे रागाने पाहतात. देवदूत म्हणाला: त्यांची पापे आणि गर्व स्वर्गापर्यंत पोहंचला आहे. त्यांची शिक्षा ठरलेली आहे. न्याय्यत्व व न्यायनिवाडा प्रदीर्घकाळ निद्रिस्त राहिलेले आहेत, परंतु लवकरच ते जागे होतील. सूड माझा आहे, मी परतफेड करीन, असें परमेश्वर म्हणतो. तिसऱ्या देवदूताच्या भयंकर धमक्या प्रत्यक्षात घडून येणार आहेत, आणि ते देवाचा कोप प्राशन करतील. सबंध देशभर दुष्ट दूतांचे असंख्य थवे पसरत आहेत. ख्रिस्ती मंडळ्या आणि विविध धर्मसंस्था त्यांनी संपूर्ण भरलेल्या आहेत. आणि ते या धर्मसंस्थांकडे विजयोन्मादाने पाहतात, कारण धर्माचा अंगरखा मोठ्यातल्या मोठ्या गुन्ह्यांना व अनीतिला झाकत आहे.

सबंध स्वर्ग संतापून बघतो कीं मानवी जीव, जे देवाची हस्तकृति आहेत, त्यांना अवनतिच्या सर्वांत खालच्या पातळीवर लोकच ठेवतात, व त्यांच्याच बरोबरीच्या माणसांना जनावरांच्या पातळीचे लेखतात. आणि त्या प्रिय उद्धारकाचे, ज्याची करूणा त्याच्या नजरेस मानवी दुर्दशा पडल्यावर नेहमी जागृत होत असे, त्याचे अनुयायी असें स्वतःस म्हणवून घेणारे अगदी आनंदाने हें भयंकर मोठे व वाईट पातक करतात, व गुलामांचा व माणसांच्या जिवात्म्यांचा व्यापार करतात. देवदूतांनी ही सर्व नोंद करून ठेवली आहे. ती पुस्तकात लिहिली गेली आहे. देवभीरू गुलाम-पुरूषांचे व गुलाम-स्त्रियांचे, पित्यांचे, मातांचे आणि मुलांचे, भावांचे व बहिणींचे, सर्व अश्रु स्वर्गात बाटल्यांत भरून ठेवले आहेत. दुःखयातना, मानवी दुःखयातना, ठिकठिकाणीं नेल्या जातात व खरेदी केल्या जातात व विकल्या जातात. देव त्याच्या क्रोधावर आणखी थोडाच काळ आवर घालील. त्याचा क्रोध या राष्ट्राविरुद्ध खवळत आहे, आणि विशेषतः त्या धर्मसंस्थांविरुद्ध, ज्यांनी ह्या भयानक व्यापाराला मान्यता दिली आहे, आणि स्वतःच त्यात भागही घेतला आहे. असला अन्याय, असला छळ, असल्या दुःखयातना, लीन व नम्र येशूचे अनेक नामधारी अनुयायी निर्विकारपणे बेफिकिरीने पाहू शकतात. आणि त्यांच्यापैकी अनेकजण हें वर्णन करता न येणारे क्लेश स्वतःच दुसऱ्यांवर लादू शकतात व त्यात आसुरी समाधान मानू शकतात, आणि तरी देवाची भक्ति करण्याचे धाडस करतात. ही गंभीर अवहेलना आहे, आणि सैतानाला तिच्याबद्दल आनंद वाटतो, व तो येशूचा व त्याच्या देवदूतांचा अशा परस्परविरोधी वागणुकीबद्दल उपहास करून नरकी विजयाच्या स्वरात म्हणतो: *ख्रिस्ताचे अनुयायी हे असें आहेत!*

हे ख्रिस्ती असल्याचा दावा करणारे लोक हुतात्म्यांच्या क्लेशांविषयीं वाचतात, आणि त्यांच्या गालांवरून अश्रु ओघळतात. ते नवल करतात कीं माणसांची हृदये इतकी कठीण कशी असू शकतात कीं ते त्यांच्या सोबतीच्या मानवांप्रति इतके अमानुष क्रौर्य दाखवू शकतात, आणि तरी त्याच वेळीं ते त्यांच्या सोबतीच्या माणसांना गुलामगिरीत डांबतात. आणि एवढेच नाही; ते निसर्गाची बंधने तोडतात, व रोजच्या रोज त्यांच्या सोबतीच्या मानवांचा क्रूरपणे छळ करतात. ते मनाला काहीएक न वाटता सर्वांत अमानुष छळ करू शकतात व अति क्रूर वागणूक देऊ शकतात, जिची तुलना पोपचर्चच्या लोकांनी व

विधर्मियांनी ख्रिस्ताच्या अनुयायांना दिलेल्या छळाइतकी व क्रौर्याइतकी सहज होऊ शकेल. देवदूत म्हणाला: देवाच्या न्यायनिवाड्याची जेव्हा अंमलबजावणी होईल त्या दिवशीं ती ह्या माणसांपेक्षा विधर्मियांना व पोपचर्चच्या लोकांना जास्त सुसह्य होईल. छळ झालेल्यांचे आक्रोश व दुःखयातना स्वर्गापर्यंत पोहंचल्या आहेत, आणि देवदूतांना आश्चर्य वाटते कीं देवाच्या प्रतिमेनुरुप उत्पन्न केलेला माणूस किती कठीण हृदयाचा बनू शकतो व त्याच्या बरोबरीच्या माणसाला अगणित क्लेश व दुःखयातना देऊ शकतो. देवदूत म्हणाला: या अशांची नांवे रक्ताने लिहिली गेलेली आहेत, रक्ताचे पट्टे त्यांच्यावर आडवेतिडवे मारले गेले आहेत, आणि यातना भोगणारांच्या उष्ण आसवांचा पूर त्या नांवांवरून गेला आहे. देवाचा कोप तोंवर शमणार नाही जोंवर तो या प्रकाशाच्या देशाला (अमेरिकेला) त्याच्या क्रोधाचा पेला गाळापर्यंत प्यायला लावणार नाही, आणि बाबेलला तो दुप्पट वेतन देईल. तिने तुम्हांला जसें वागविले, तसें तुम्ही तिला वागवा, तिच्या कृत्यांच्या दुप्पटीने तिच्या पदरात ओता; तिने जो पेला भरला आहे, तो तिच्याकरिता दुप्पट भरा.

मी पाहिले कीं गुलामाच्या मालकाला त्याच्या गुलामाच्या जिवात्म्याकरिता जाब द्यावा लागेल ज्याला त्याने अज्ञानात ठेवले; आणि गुलामाची सर्व पातके त्याच्या मालकावर लादली जातील. अज्ञानात व अवनतित ठेवल्या गेलेल्या गुलामाला, ज्याला देवाची किंवा पवित्रशास्त्राची काहीच माहिती नाही, जो त्याच्या मालकाच्या चाबकाशिवाय दुसऱ्या कशाला घाबरत नाही, आणि त्याच्या मालकाच्या पशुंपेक्षा त्याला अधिक उच्च स्थान दिले गेलेले नाही, अशा गुलामाला देव स्वर्गाला घेऊन जाऊ शकत नाही. परंतु करुणामय देव त्याच्यासाठीं जी सर्वोत्कृष्ट गोष्ट होईल ती करील. त्याला जणू कधीं अस्तित्वच नव्हते असें तो त्याला होऊ देईल; परंतु त्याच्या मालकाला शेवटल्या सात पीडा भोगाव्या लागतील, आणि मग दुसऱ्या पुनरुत्थानाच्या वेळीं उठविले जाऊन तो दुसरा, सर्वांत भयंकर मृत्यु भोगेल. मग देवाचा कोप शमेल.

पहा:

*आमोस* ५:२१; *रोम.* १२:१९; *प्रगटीकरण* १४:९-१०; १८:६.

# अध्याय ३४
# मोठी आरोळी

मी देवदूतांना स्वर्गातून वरखाली घाईघाईने येताजातांना पाहिले. ते खाली पृथ्वीवर येत, आणि पुन्हा वर स्वर्गाला जात; कोणत्यातरी महत्त्वाच्या घटनेच्या पूर्तिकरिता ते तयारी करीत होते. मग मी एका बलाढ्य देवदूताला खाली पृथ्वीवर एक विशिष्ट काम करण्यास पाठविले गेल्याचे पाहिले; त्याने त्याची वाणी तिसऱ्या देवदूताच्या वाणीत मिसळावयाची होती, आणि त्याच्या संदेशाला सामर्थ्य व जोर द्यावयाचा होता. या देवदूताला मोठे सामर्थ्य व गौरव दिले गेले होते, आणि तो खाली येत असतांना, पृथ्वी त्याच्या गौरवाने प्रकाशित झाली. या देवदूतापुढे जो प्रकाश गेला व त्याच्यामागूनही तो जात होता, तो सगळीकडे शिरला व देवदूत मोठ्या आरोळीने, भरदार जोरदार वाणीने म्हणत गेला कीं: मोठी बाबेल पडली, पडली; ती भुतांची वस्ती व सर्व प्रकारच्या अशुद्ध आत्म्यांचा आश्रय व सर्व प्रकारच्या अशुद्ध व ओंगळ पाखरांचा आश्रय अशी झाली आहे. बाबेलच्या पतनाचा संदेश, जो दुसऱ्या देवदूताने दिला होता, तो पुन्हा दिला जातो, व १८४४पासून ख्रिस्ती मंडळ्यांमध्ये ज्या ज्या भ्रष्टतेची भर पडत चाललेली आहे तिचासुद्धा उल्लेख केला जातो. या देवदूताचे कार्य योग्य वेळेला केले जाते, व तिसऱ्या देवदूताच्या संदेशाच्या शेवटल्या मोठ्या कार्यात, तें कार्य फुगत जाऊन त्याचे मोठ्या आरोळीत रुपांतर होतांना, त्यात त्याची भर पडते. आणि सगळीकडच्या देवाच्या लोकांना त्यांच्यापुढील निकटच्या संकटाच्या घटकेला तोंड देण्यास तयार केले जाते. मी त्यांच्यावर एक मोठा प्रकाश विसावतांना पाहिला, आणि ते संदेश एकजुटीने देऊ लागले, व तिसऱ्या देवदूताचा संदेश निर्भयपणे मोठ्या सामर्थ्याने जाहीर करू लागले.

स्वर्गातून आलेल्या बलाढ्य देवदूताच्या मदतीला देवदूतांना पाठविण्यात आले, आणि मी जणू सगळीकडून ध्वनित होणाऱ्या वाणीचे आवाज ऐकले कीं: माझ्या लोकांनो, तुम्ही तिच्या पापांचे वाटेकरी होऊ नये आणि तुम्हांला तिच्या पीडांतील कोणतीही पीडा होऊ नये म्हणून तिच्यामधून निघा. कारण तिच्या पापांची रास स्वर्गापर्यंत पोहंचली आहे; आणि तिची अनीति देवाने लक्षात घेतली आहे. हा संदेश तिसऱ्या संदेशात भर घातलेला व त्यास जोडलेला दिसला, जशी मध्यरात्रीची आरोळी १८४४मध्ये दुसऱ्या देवदूताच्या संदेशाला जोडली गेली होती. धीर धरून प्रतीक्षा करणाऱ्या पवित्र जनांवर देवाचे गौरव विसावले होते, आणि त्यांनी निर्भयपणे शेवटला गंभीर इशारा दिला, बाबेलचे पतन जाहीर केले, व देवाच्या लोकांना तिच्यातून बाहेर पडण्यास सांगितले, कीं तिच्या भयंकर विनाशातून ते वाचावेत.

वाट पाहणाऱ्या भक्तांवर जो प्रकाश पाडला गेला होता तो सर्वत्र पसरला, आणि मंडळ्यांमध्ये ज्या

कोणाला काही प्रकाश मिळालेला होता, ज्यांनी तीन संदेश ऐकले नव्हते व अव्हेरले नव्हते, त्यांनी या पाचारणास प्रत्युत्तर दिले व पतन पावलेल्या मंडळ्या त्यांनी सोडल्या. हें संदेश प्रथम दिले गेले होते तेव्हाच्या काळापासून अनेकजण अधिक समजदार बनले होते व जबाबदारी पेलण्याचे वय त्यांनी गाठले होते; त्यांच्यावर हा प्रकाश पाडला गेला, आणि जीवन कीं मरण यांत निवड करण्याची संधी त्यांना दिली गेली. काहींनी जीवनाची निवड केली, व जे भक्त त्यांच्या प्रभूकरिता वाट पाहत होते व त्याच्या सर्व आज्ञा पाळीत होते त्यांच्यात त्यांनी आपले स्थान घेतले. तिसऱ्या संदेशाने त्याचे कार्य करावयाचे होते; सर्वांना ती कसोटी दिली जावयाची होती, आणि धर्मसंस्थांमधून अमोल भक्तांना बाहेर पडण्याचा आदेश दिला जावयाचा होता. प्रामाणिक व्यक्तिंमध्ये देवाचे सामर्थ्य जोरदारपणे कार्य करते, आणि देवाच्या सामर्थ्याच्या प्रगटीकरणाद्वारें नातलग व हितचिंतक भयग्रस्त होतात व त्यांच्यावर बंधन घातले जाते, म्हणून देवाच्या पवित्र आत्म्याचे कार्य ज्यांच्यावर होत आहे त्यांना अडथळा करण्यास ते धजत नाहीत, आणि अडखळण करण्याचे त्यांच्याकडे सामर्थ्यसुद्धा नाही. शेवटले पाचारण गरीब बिचाऱ्या गुलामांकडेसुद्धा नेले जाते, आणि त्यांच्यातली देवभीरू माणसे, नम्रपणे मनांतल्या भावना व्यक्त करीत राहतात, अति हर्षाने गायने अंतःकरणांपासून मोठ्याने गात राहतात कीं लवकरच त्यांची सुटका होणार आहे, व त्यांना मुक्ततेचा आनंद मिळणार आहे, आणि त्यांचे मालक त्यांना रोखू शकत नाहीत; कारण ते भयग्रस्त व आश्चर्यचकित झाल्याने त्यांच्या तोंडून शब्द फुटत नाहीत. प्रचंड सामर्थ्याचे चमत्कार केले जातात, आजाऱ्यांना बरे केले जाते, आणि विश्वासी जन जातील तेथे चिन्हे व अद्भुते घडत राहतात. कार्यात देवाचा हात आहे, आणि प्रत्येक पवित्र जन, परिणामांची कदर न करता, निर्भयपणे त्याच्या स्वतःच्या विवेकानुसार वागतो, आणि जे देवाच्या सर्व आज्ञा पाळतात त्यांच्यात जाऊन मिळतो; व ते तिसरा संदेश सामर्थ्याने सगळीकडे गाजवितात. मी पाहिले कीं मध्यरात्रीच्या आरोळीपेक्षा खूपच खूप जास्त सामर्थ्याने व बळाने तिसऱ्या संदेशाचा शेवट होईल.

देवाचे सेवक, वरून सामर्थ्याचे वरदान दिले गेलेले, त्यांचे चेहरे उजळलेले, आणि पवित्र समर्पणाने चमकत असलेले, त्यांचे काम पूर्ण करीत गेले, व स्वर्गातून आलेल्या संदेशाची घोषणा त्यांनी केली. सगळीकडल्या धर्मसंस्थांमध्ये विखरलेल्या जिवात्म्यांनी पाचारणास प्रतिसाद दिला, आणि मौल्यवान जिवांना सर्वनाश ठरलेल्या मंडळ्यांतून लगबगीने बाहेर काढण्यात आले, जसें सदोमाच्या विनाशापूर्वी लोटाला लगबगीने सदोमातून बाहेर काढले गेले होते. देवाच्या लोकांवर जें उत्तम गौरव अगदीच विपुल प्रमाणात पडत होते त्यामुळें त्यांच्यावर येणाऱ्या संकटकाळातून यशस्वीपणे पार होण्याकरिता देवाच्या लोकांना पात्र व सबळ केले गेले होते. मी सगळीकडे मोठमोठ्या जमावांचे आवाज असें बोलतांना ऐकले कीं: पवित्र जनांचा धीर येथे आहे; देवाच्या आज्ञा पाळणारे व येशूवरील विश्वासाला धरून राहणारे येथे आहेत.

पहा: *उत्पत्ति*, अध्याय १९; *प्रगटीकरण* १४:१२; १८:२-५.

# अध्याय ३५
# तिसऱ्या संदेशाचा शेवट

तिसऱ्या देवदूताच्या संदेशाचा शेवट होतांनाचा काळ मला विशेष रित्या दाखविला गेला. देवाचे सामर्थ्य त्याच्या लोकांवर विसावले होते. त्यांनी त्यांचे कार्य यशस्वीपणे पूर्ण केले होते, आणि त्यांच्यापुढे असणाऱ्या संकटकाळाकरिता त्यांची तयारी झालेली होती. त्यांना वळीव वर्षाव, म्हणजे देवाच्या समक्षतेतून येणारी टवटवी, मिळाली होती, आणि ज्वलंत साक्ष पुन्हा देण्यात येऊ लागली होती. शेवटला घोर इशारा सगळीकडे सुनावला गेला होता, आणि त्याने पृथ्वीचे रहिवासी, जे तो संदेश स्वीकारीनात, ते संतप्त झाले होते.

मी देवदूतांना स्वर्गातून वरखाली घाईघाईने येताजातांना पाहिले. पृथ्वीवरून एक देवदूत त्याच्या बाजूला लिहिण्याची लेखणी (पेन्सिल) घेऊन परतला, आणि त्याने येशूकडे अहवाल दिला कीं त्याचे काम पूर्ण झाले होते, आणि पवित्र जनांची गणति करण्यात आली होती व त्यांना मुद्रित करण्यात आले होते. मग मी पाहिले कीं येशूने, जो दहा आज्ञा असलेल्या कोषापुढे सेवा करीत होता, धुपाटणे खाली फेकले. त्याने त्याचे हात वर केले, आणि मोठ्या वाणीने तो म्हणाला: *पूर्ण झाले.* आणि देवदूतांच्या सर्व जमावांनी येशू पुढील गंभीर जाहीरनामा जाहीर करतांना त्यांचे मुगुट खाली काढून ठेवले: जो अनीतिमान आहे, त्याला येथून पुढे अनीतिमानच राहू द्या; आणि जो गलिच्छ आहे, त्याला गलिच्छच राहू द्या; आणि जो नीतिमान आहे, त्याने येथून पुढे नीतिमान असेंच राहावे; आणि जो पवित्र आहे, त्याने पवित्र असेंच राहावे.

मी पाहिले कीं प्रत्येकावरचा खटला जीवनाकरिता किंवा मृत्युकरिता निकालात काढला गेला होता. येशूने त्याच्या लोकांची पातके पुसून टाकली होती. त्याला त्याचे राज्य मिळाले होते, आणि त्याच्या राज्याच्या प्रजाजनांसाठीं त्याने प्रायश्चित्त केले होते. जेव्हा येशू स्वर्गीय दर्शनमंडपात सेवा करीत होता, तेव्हा नीतिमान मृत जनांचा न्यायनिवाडा चालू होता, व नंतर नीतिमान जिवंत जनांचा न्यायनिवाडा चालू होता. त्याच्या राज्याच्या प्रजाजनांची संख्या ठरली गेली होती. कोंकऱ्याचे लग्न संपले होते. आणि राज्य व आखव्या आकाशाखालील राज्याची थोरवी येशूला व उद्धाराच्या वारसांना दिली गेली होती, आणि येशू राजांचा राजा, व प्रभूंचा प्रभू म्हणून राज्य करणार होता.

येशू परमपवित्रस्थानातून बाहेर आला तेव्हा मी त्याच्या वस्त्रावरील घंटांचा नाद ऐकला; तें स्थान त्याने सोडल्यावर, पृथ्वीच्या रहिवाश्यांना अंधकाराच्या ढगाने आच्छादले. तेव्हा दोषी मानवामध्ये व कोपलेल्या

देवात मध्यस्थी करायला कोणी मध्यस्थ नव्हता. जेव्हा येशू देवामध्ये व दोषी मानवामध्ये उभा होता, तेव्हा लोकांवर बंधन होते; परंतु येशू मानव व पित्यामधून बाजूला झाल्यावर बंधन काढून टाकले गेले, आणि सैतानाला मनुष्यांचा ताबा मिळाला. येशू स्वर्गीय दर्शनमंडपात कायद्यानुसार सेवा करीत असतांना पीडा पाठविल्या जाणे अशक्य होते; परंतु त्याचे तेथील कार्य संपल्यावर, व त्याची मध्यस्थी बंद केल्यावर, देवाचा कोप रोखला जाऊ शकत नव्हता, आणि तो दोषी पातक्याच्या छत्र नसलेल्या मस्तकावर लोंढ्याच्या ताकदीप्रमाणे ओतला जातो, ज्याने उद्धाराचा अवमान केला, व निषेधाचा द्वेष केला. त्या भयंकर काळात, येशूची मध्यस्थी बंद झाल्यानंतरच्या काळात, पवित्रजन पवित्र देवाच्या दृष्टिपुढे मध्यस्थावाचून जगत होते. प्रत्येकाच्या बाबीबाबत निर्णय घेण्यात आला होता, प्रत्येक रत्न मोजले गेले होते. येशू क्षणभर स्वर्गीय दर्शनमंडपाच्या बाहेरील दालनात थांबला, आणि तो परमपवित्रस्थानात असतांना जीं पातके कबूल केली गेली होती, तीं त्याने पापाच्या उगमावर - सैतानावर - परत घातली. या पातकांची शिक्षा त्याने भोगली पाहिजे.

मग मी येशूला त्याची याजकीय वस्त्रे काढून ठेवतांना, व त्याचे सर्वांत गौरवी राजकीय झगे परिधान करतांना पाहिले; त्याच्या मस्तकावर अनेक मुगुट होते, एकात एक असें मुगुट; आणि देवदूतांच्या जमावांनी घेरला जाऊन त्याने स्वर्ग सोडला. पृथ्वीच्या रहिवाश्यांवर पीडा पडत होत्या. काही देवाचा निषेध करीत होते, आणि देवाला शिव्याशाप देत होते. इतरजण देवाच्या लोकांकडे धावतपळत जात होते, आणि देवाच्या न्याय्य पीडांतून कशी सुटका करून घ्यावी हें त्यांना शिकविले जाण्याची याचना करीत होते. परंतु पवित्रजनांकडे त्यांच्यासाठीं काही नव्हते. पातक्यांकरिता शेवटला अश्रु गाळला गेला होता, शेवटली कळकळीची प्रार्थना केली गेली होती, शेवटले ओझे वाहिले गेले होते. दयेची गोड वाणी त्यांना याउप्पर कधीं आमंत्रण देणार नाही. इशाऱ्याचा शेवटला शब्द बोलला गेला आहे. जेव्हा पवित्रजनांना आणि आख्ख्या स्वर्गाला त्यांच्या उद्धाराकरिता तळमळ होती, तेव्हा त्यांना स्वतःकरिता काही कळकळ नव्हती. त्यांच्यापुढे जीवन आणि मरण ठेवले गेले होते. अनेकांना जीवन हवे होते; परंतु तें मिळविण्याकरिता ते मुळींच प्रयत्न करीत नव्हते. त्यांनी जीवनाची निवड केली नाही, आणि आता पातक्याला शुद्ध करण्याकरिता प्रायश्चित्ताचे रक्त उपलब्ध नव्हते. त्यांच्याकरिता विनवणी करणारा, आणि आक्रोश करणारा करूणामय उद्धारक आता नव्हता, कीं: देवा, पातक्याला आणखी थोडा काळ संधी दे. जेव्हा येशूने तें भयंकर उद्गार काढले होते कीं: पूर्ण झाले, सर्व सिद्धिस गेले, तेव्हा तें शब्द ऐकत असतांना सबंध स्वर्ग येशूच्या बाजूला झाला होता. उद्धाराची योजना सिद्धिस गेली होती. परंतु थोडक्यांनीच ही योजना स्वीकारण्याची निवड केली होती. आणि दयेची गोड वाणी विरून गेली, तेव्हा त्यांना भयाने व दराऱ्याने ग्रासले. भयंकर स्पष्टपणे ते ऐकतातः फार उशीर! फार उशीर झाला आहे!

ज्यांनी देवाच्या वचनाचे मोल केले नव्हते ते इथूनतिथे आणि तिथूनइथे घाईघाईने जातयेत होते. ते देवाच्या वचनाचा शोध घेण्याकरिता एका समुद्रापासून दुसऱ्या समुद्रापर्यंत भटकू लागले, उत्तरेपासून पूर्वेकडे भटकू लागले. देवदूत म्हणालाः त्यांना तें सापडणार नाही. देशात दुष्काळ पडला आहे; भाकरीचा

दुष्काळ नाही, किंवा पाण्याची तहान नाही, तर देवाची वचने ऐकण्याचा दुष्काळ. देवाच्या मान्यतेच्या एका शब्दाकरिता ते काय देणार नाहीत बरे? परंतु नाही; त्यांनी ही भूकतहान सहन केली पाहिजे. दिवसेंदिवस त्यांनी उद्धाराचा अवमान केला, आणि जगिक मौजमजा आणि जगिक संपत्तिला जास्त मोल दिले, कोठल्याही स्वर्गीय आमिषापेक्षा आणि स्वर्गीय खजिन्यापेक्षा जास्त मोल दिले. त्यांनी येशूला अव्हेरले, आणि त्याच्या पवित्रजनांना तुच्छ लेखले. गलिच्छ जनांनी सदासर्वकाळाकरिता गलिच्छ राहिले पाहिजे.

पीडांचे प्रभाव सहन करावे लागतांना दुष्टांतले बहुतेक लोक फार संतप्त झाले. तें दृश्य भयंकर क्लेशांचे होते. आईबाप त्यांच्या मुलांना कटुपणे दोष देऊ लागले, आणि मुले त्यांच्या आईवडिलांना, भाऊ त्यांच्या बहिणींना, आणि बहिणी त्यांच्या भावांना दोष देऊ लागल्या. प्रत्येक दिशेला मोठे विलापाचे आक्रोश ऐकू येत होते कीं: या भयंकर घटकेपासून ज्या सत्याने मी वाचू शकलो असतो तें सत्य स्वीकारण्यापासून तुम्ही मला दूर ठेवले. लोक त्यांच्या पाळकांविरुद्ध कटुपणाने उलटतात, आणि त्यांना दोष देतात; त्यांना असें म्हणतात कीं: तुम्ही आम्हांला इशारा दिला नाही. तुम्ही आम्हांला सांगितले कीं सबंध जगाचा पालट होणार होता, आणि उत्पन्न झालेली प्रत्येक भीति दूर करायला तुम्ही जोर देत म्हणत राहिला: शांती, शांती. तुम्ही आम्हांला या घटकेविषयीं सांगितले नाही, आणि जे आम्हांला त्याबद्दल इशारा देत होते ते धर्मवेडे होते, वाईट लोक होते, ते आमचा सर्वनाश करतील, असें तुम्ही म्हटले. परंतु मी पाहिले कीं पाळकलोकांना देवाच्या कोपापासून सुटता आले नाही. त्यांच्या लोकांपेक्षा त्यांच्या यातना दहापटीने जास्त होत्या.

पहा:
*यहेज्केल* ९:२-११; *दानिएल* ७:२७; *होशेय* ६:३;
*आमोस* ८:११-१३; *प्रगटीकरण,* अध्याय १६; १७:१४.

# अध्याय ३६
# याकोबाचा क्लेशसमय

मी पवित्रजनांना शहरे व गांवे सोडून जातांना, व छोट्याछोट्या गटांत एकत्र सहवास करतांना, व सर्वांत एकांतातील निर्जन ठिकाणीं राहतांना, पाहिले. देवदूत त्यांना अन्न व पाणी पुरवीत होते; परंतु दुष्ट लोक भूक व तहान सोसत होते. मग मी पृथ्वीच्या नेतेलोकांना एकत्र सल्लामसलत करतांना पाहिले, आणि सैतान व त्याचे दूत त्यांच्याभोवती जोरदारपणे काम करण्यात गुंतले होते. मी एक लेख पाहिला, आणि त्याच्या प्रति देशातल्या वेगवेगळ्या भागांत पाठविण्यात आल्या, व त्यात हुकूम दिले गेले कीं, पवित्रजनांनी त्यांची विशिष्ट श्रद्धा सोडून दिल्याखेरीज, शब्बाथास सोडून दिल्याखेरीज, आणि आठवड्याचा पहिला दिवस ते पाळू लागल्याखेरीज, काही खास वेळेनंतर त्यांना ठार करण्याचे स्वातंत्र्य सर्वांना दिले जावे. परंतु ह्या वेळीं पवित्रजन शांत व धीरगंभीर होते, ते देवावर भिस्त ठेवीत होते, आणि त्याच्या अभिवचनाचा आधार घेत होते, कीं त्यांच्याकरिता सुटकेचा मार्ग करण्यात येईल. काही ठिकाणीं, लेखाची अंमलबजावणी होण्याची वेळ येण्यापूर्वीच दुष्ट माणसे पवित्रजनांना ठार करण्यासाठीं त्यांच्यावर चालून जाऊ लागली; परंतु सैनिकांच्या रुपात देवदूत त्यांच्यासाठीं लढू लागले. सर्वोच्च देवाच्या पवित्रजनांना नष्ट करण्याचे भाग्य सैतानाला हवे होते; परंतु येशूने त्याच्या देवदूतांना आदेश दिला कीं त्यांनी त्यांच्यावर पहारा ठेवावा, कारण कीं ज्यांनी त्यांच्याभोवतालच्या विधर्मियांच्या समक्षतेत त्याच्या आज्ञा पाळल्या होत्या, त्यांच्याशीं करार करण्यात देवाचा सन्मान होणार होता; आणि ज्यांनी येशूची प्रतीक्षा इतका प्रदीर्घकाळ केली होती, त्या विश्वासू, वाट पाहणाऱ्या भक्तांना मरण येऊ न देता त्यांचे रुपांतर करण्यात येशूचा सन्मान होणार होता.

लवकरच मी पवित्रजनांना खूपच मानसिक क्लेश भोगतांना पाहिले. ते पृथ्वीच्या दुष्ट रहिवाश्यांनी घेरलेले दिसत होते. सर्व दृश्य रुपे त्यांच्याविरुद्ध होती. काहींना भीति वाटू लागली कीं देवाने शेवटीं त्यांना दुष्टांच्या हातून नाश पावण्याकरिता सोडले आहे. परंतु जर त्यांचे डोळे उघडले जाऊ शकले असते, तर त्यांनी स्वतःला देवाच्या देवदूतांनी घेरलेले पाहिले असते. त्यानंतर संतप्त दुष्टांचा जमाव आला, आणि त्यानंतर दुष्ट दूतांचा थवा, दुष्टांनी पवित्रजनांना ठार करण्यास त्यांना घाई करीत असलेला. परंतु त्यांनी त्यांच्याजवळ जाण्याचा प्रयत्न जर केला, तर त्यांना प्रथम या बलाढ्य, पवित्र देवदूतांच्या गटाला ओलांडून जावे लागणार होते, आणि ती गोष्ट तर अशक्य होती. देवाचे देवदूत त्यांना माघार घ्यायला भाग पाडत होते, आणि त्यांच्याभोवती असलेल्या व त्यांच्यावर दबाव आणणाऱ्या वाईट दूतांनासुद्धा माघार घ्यायला लावत होते. पवित्रजनांकरिता ही घटका भयंकर, भयप्रद क्लेशांची होती. ते सुटकेकरिता रात्रंदिवस देवाकडे आक्रोश

करीत होते. बाह्य दृष्ट्या पाहू गेल्यास, त्यांच्या सुटकेची शक्यताच नव्हती. दुष्ट त्यांचा विजय अगोदरच झाला आहे असें मानून मोठ्याने ओरडून त्यांना विचारत होते: तुमचा देव तुम्हांला आमच्या हातून कां सोडवीत नाही? तुम्ही वर कां जात नाही, आणि तुमचे जीव कां वाचवीत नाही? पवित्रजन त्यांच्याकडे लक्ष देत नव्हते. याकोबाप्रमाणे ते देवासोबत झोंबी करीत होते. देवदूतांना त्यांची मुक्तता करण्याची उत्कंठा होती; परंतु त्यांनी आणखी थोडा वेळ थांबले पाहिले, आणि पेला प्याला पाहिजे, व अग्निचा बाप्तिस्मा घेतला पाहिजे. देवदूत, त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारीस विश्वासू राहून, त्यांचा पहारा करीत होते. त्यांच्या सुटकेची वेळ जवळजवळ आली होती जेव्हा देव त्याचे प्रचंड सामर्थ्य प्रगट करणार होता, व त्यांची गौरवी मुक्तता करणार होता. देव विधर्मियांमध्ये त्याच्या नामाचा उपहास होऊ देणार नव्हता. त्याच्या नामाच्या गौरवाखातर तो त्याची धीराने वाट पाहिलेल्या एकूण एकाला मुक्त करणार होता, ज्यांची नांवे पुस्तकात लिहिलेली होती.

भूतकाळातल्या विश्वासू नोहाकडे माझे लक्ष वेधले गेले. पाऊस पडू लागला होता, पूर येऊ लागले होते. नोहा आणि त्याचे कुटुंब तारवात गेले होते, आणि देवाने त्यांना बंद केले होते. नोहाने पुरातनकालीन जगाच्या रहिवाश्यांना विश्वासूपणे इशारा दिला होता, परंतु ते त्याची टिंगल करीत होते आणि त्याचा उपहास करीत होते. आणि जेव्हा पृथ्वीवर जले खाली येऊ लागली, आणि लोक एकापाठोपाठ एक बुडून मरू लागले, तेव्हा त्यांनी पाहिले कीं ज्या तारवाला ते उपहासाने इतके हसले होते, तें तारू जलांवर सुरक्षितपणे तरंगत होते व विश्वासू नोहाचे व त्याच्या कुटुंबियांचे रक्षण करीत होते. त्याप्रमाणेच, मी पाहिले, कीं देवाचे लोक, ज्यांनी जगाला त्याच्या येणाऱ्या कोपाचा इशारा दिला होता, त्यांची मुक्तता केली जाईल. त्यांनी पृथ्वीच्या रहिवाश्यांना विश्वासूपणे इशारे दिले होते, आणि ते रुपांतराची अपेक्षा करीत होते, आणि ते श्वापदाच्या आदेशापुढे नमले नव्हते, किंवा त्याची खूण त्यांनी स्वीकारली नव्हती; त्यांना दुष्टांनी नष्ट करावे असें देव होऊ देणार नाही. मी पाहिले कीं जर दुष्टांना पवित्रजनांना ठार करू दिले गेले, तर सैतान आणि त्याचे सर्व दुष्ट भूतसैन्य, आणि देवाचा द्वेष करणारे सर्वजण, फार समाधान पावतील. आणि मग, सैतान महाराजांकरिता तो किती मोठा विजय असेल बरे कीं ज्यांनी इतका प्रदीर्घकाळ त्यांच्या प्रभूच्या दर्शनाची वाट पाहिली होती, ज्या प्रभूवर त्यांची जिवापाड प्रीति होती, त्यांच्यावर त्याला संघर्षाच्या शेवटल्या लढ्यात त्याचे सामर्थ्य दाखविता यावे. पवित्रजन वर स्वर्गाला जातील या कल्पनेचा ज्यांनी उपहास केला, ते देवाची त्याच्या लोकांकरिता असलेली काळजी पाहतील, आणि त्यांची गौरवी मुक्तता पाहतील.

पवित्रजन शहरे व गांवे सोडून निघाले तेव्हा त्यांचा पाठलाग दुष्टांनी केला. पवित्रजनांना ठार करण्याकरिता त्यांनी त्यांच्या तलवारी सज्ज केल्या, परंतु त्या तुटल्या, आणि गवताच्या सुकलेल्या पातीप्रमाणे निस्तेज झाल्याप्रमाणे पडल्या. देवाचे देवदूत पवित्रजनांचे ढालीप्रमाणे रक्षण करीत होते. ते सुटकेकरिता रात्रंदिवस आक्रोश करीत असतांना, त्यांचा आक्रोश वर देवापुढे आला. पहा: *उत्पत्ति,* अध्याय ६ व ७; ३२:२४-२८; *स्तोत्र,* अध्याय ९१; *मत्तय* २०:२३; *प्रगटीकरण* १३:११-१७.

# अध्याय ३७
# पवित्रजनांची सुटका

देवाने त्याच्या लोकांची सुटका मध्यरात्रीं करायचे ठरविले. दुष्ट लोक त्यांच्याभोवती जमून त्यांची थट्टामस्करी करीत असतांना, एकाएकी सूर्य दिसू लागला, भरदुपारीं मध्यान्हीच्या वेळीं त्याचे तेज असते त्या तेजाने तो तळपत होता, आणि चंद्र होता त्या जागींच स्तब्ध उभा राहिला. दुष्टांनी हें दृश्य अत्यंत आश्चर्याने पाहिले. चिन्हे आणि अद्‌भुते एकापाठोपाठ एक अशी भराभर घडून येऊ लागली. सर्वकाही त्याच्या नैसर्गिक मार्गातून ढळलेले दिसत होते. पवित्रजन त्यांच्या मुक्ततेची चिन्हे हर्षाने व गांभीर्याने पाहत होते.

झरे वाहायचे थांबले. गडद, जड ढग वर आले, आणि एकमेकांवर आदळू लागले. परंतु तेथे एक असें निरभ्र ठिकाण होते ज्यावर गौरव विसावलेले होते, आणि तेथून देवाची वाणी अनेक जलांप्रमाणे आली, जिने आकाशे आणि पृथ्वी हादरवून टाकली. एक प्रचंड भूकंप झाला. कबरा हिंदळविल्या जाऊन उघड्या झाल्या, आणि जे तिसऱ्या देवदूताच्या संदेशाच्या श्रद्धेत शब्बाथ पाळत मरण पावले होते, ते त्यांच्या धूलिमय बिछान्यांतून उठविले गेले व गौरविले जाऊन, ज्यांनी देवाच्या आज्ञा पाळल्या होत्या त्यांच्याशीं देव जो शांततेचा करार करणार होता तो ऐकण्यास, बाहेर पडले.

आकाश उघडत आणि बंद होत होते, आणि ढवळत होते. वाऱ्याने बोरू जसें हलतात तसें डोंगरपर्वत हलत होते, आणि अंवतीभंवती सगळीकडे अणकुचिदार खडक भिरकावीत होते. समुद्र भांड्यातल्या पाण्याप्रमाणे उकळत होता, आणि भूमिवर दगड फेकीत होता. आणि देव जेव्हा येशूच्या येण्याचा दिवस व घटका बोलून जाहीर करीत होता, आणि त्याच्या लोकांपुढे सार्वकालीन करार सादर करीत होता, तेव्हा तो एकएक वाक्य बोले, आणि मग थांबे, आणि ते शब्द पृथ्वीभर पसरले जात. देवाचे इस्राएल त्यांच्या नजरा वर केंद्रित करून उभे होते, व यहोवाच्या मुखातून जसजसें शब्द येत, व जास्तीत जास्त मोठ्या आवाजाच्या गडगडाटाप्रमाणे पृथ्वीभर दणाणून जात, तसतसें ते मन लावून ऐकत. भलतेच गांभीर्याचे तें दृश्य होते. प्रत्येक वाक्याच्या शेवटीं पवित्रजन आरोळी मारीत: गौरव! हालेलूया! त्यांचे चेहरे देवाच्या तेजाने प्रकाशित झाले होते; आणि ते गौरवाने चमकू लागले, जसा मोशेचा चेहरा तो सीनायहून खाली आल्यावर चमकत होता. त्यांच्या तेजामुळें दुष्ट लोकांना त्यांच्याकडे पाहता येईना. आणि ज्यांनी देवाचा शब्बाथ पवित्र पाळण्याद्वारें देवाला सन्मानित केले होते, त्यांच्यावर जेव्हा कधीं-न-सरणारा आशीर्वाद घोषित केला गेला, तेव्हा श्वापदावर व त्याच्या मूर्तिवर विजय मिळाल्याची प्रचंड आरोळी दिली गेली.

मग योबेलाची सुरुवात झाली, जेव्हा भूमिने विसावा घ्यावयाचा होता. मी देवभीरू गुलामाला विजयानंदात उठतांना व त्याला बांधलेल्या साखळ्या तोडून टाकतांना पाहिले, आणि त्याचा दुष्ट मालक गोंधळात पडलेला होता, काय करावे हें त्याला सुचत नव्हते; कारण दुष्टांना देवाच्या वाणीचे शब्द समजू शकत नव्हते. लवकरच एक मोठा शुभ्र मेघ दिसू लागला. त्यावर मनुष्याचा पुत्र बसलेला होता.

जेव्हा हा मेघ दूरच्या अंतरावर प्रथम दृश्य झाला होता, तेव्हा तो फार लहान दिसला होता. देवदूत म्हणाला कीं तो मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह होता. आणि मेघ जसजसा पृथ्वीच्या अधिकाधिक निकट यायला लागला, तसतसें येशू विजय मिळविण्याकरिता मेघारूढ होऊन येतांना त्याचे उत्स्फूर्त गौरव व वैभव आम्ही पाहू शकलो. देवदूतांचा एक पवित्र थवा, त्यांच्या मस्तकांवर त्यांचे तेजस्वी, चमकदार मुगुट घातलेला, त्याच्या मार्गावर त्याला घेऊन येत होता. त्या दृश्याच्या गौरवाचे वर्णन करायला शब्द नाहीत. वैभवाचा तो सजीव मेघ, अनुपम गौरवाचा, आणखी आणखी जवळ येऊ लागला, आणि आम्ही येशूचे मोहक रूप स्पष्टपणे पाहू शकलो. त्याने काट्यांचा मुगुट घातला नव्हता; तर गौरवाच्या मुगुटाने त्याचे पवित्र कपाळ शृंगारलेले होते. त्याच्या वस्त्रावर व मांडीवर एक नांव लिहिलेले होते: **राजांचा राजा व प्रभूंचा प्रभू.** त्याचे डोळे अग्निच्या ज्वालेप्रमाणे होते, त्याचे पाय तळपणाऱ्या शुद्ध पितळासारखे दिसत होते, आणि त्याची वाणी संगीताच्या अनेक वाद्यांप्रमाणे ऐकू येत होती. त्याचे मुख मध्यान्हीच्या सूर्याइतके तेजस्वी होते. त्याच्यासमोर पृथ्वी थरकाप पावली, आणि आकाशे गुंडाळीप्रमाणे गुंडाळली जाऊन निघून गेली, आणि प्रत्येक डोंगर व द्वीप त्यांच्या जागांवरून दुसरीकडे हलविले गेले. आणि पृथ्वीचे राजे, आणि थोर लोक, आणि श्रीमंत माणसे, आणि मुख्य सेनापती, आणि पराक्रमी माणसे, आणि प्रत्येक गुलाम, आणि प्रत्येक स्वतंत्र मनुष्य, हे सर्व डोंगरांच्या गुहांत व खडकांआड लपले. आणि डोंगरांना व खडकांना म्हणू लागले: आमच्यावर पडा, आणि राजासनावर बसलेल्याच्या मुखापासून, आणि कोंकऱ्याच्या क्रोधापासून, आम्हांला लपवा: कारण त्याच्या कोपाचा भयंकर दिवस आला आहे, आणि कोण तरू शकेल?

जे अल्पकाळ अगोदर देवाच्या विश्वासू लेकरांना पृथ्वीवरून नष्ट करू पाहत होते, त्यांना त्यांच्यावर देवाचे गौरव विसावतांना बघावे लागले. त्यांनी त्यांना गौरविलेले पाहिले. आणि त्या सर्व भयंकर दृश्यांत त्यांना पवित्रजनांची वाणी हर्षाच्या सूरांत असें म्हणतांना ऐकू आली कीं: हा पहा, आमचा देव, आम्ही त्याची प्रतीक्षा केली आहे, आणि तो आमचा बचाव करील. देवाच्या पुत्राची वाणी निद्रिस्त पवित्रजनांना बोलावीत असतांना पृथ्वी फार जोरात हादरली. त्यांनी त्याच्या हाकेला प्रतिसाद दिला, आणि ते गौरवी अमरत्व पेहरून अशी आरोळी मारीत बाहेर पडले कीं: विजय! विजय! मरणावर आणि कबरेवर विजय. अरे मरणा, तुझी नांगी कोठे आहे? अगे कबरे, तुझा जय कोठे आहे? मग जिवंत पवित्रजन, आणि पुनरुत्थित पवित्रजन, यांनी एकत्र मिळून त्यांचे आवाज उंचावून एक प्रदीर्घ व दूरपर्यंत ऐकू जाईल अशी विजयाची आरोळी मारली. तीं रोगआजारांनी खंगलेली शरीरे, जीं कबरांत ठेवली गेली होती, तीं अमरत्वात व चैतन्यात उठविली गेली. जिवंत पवित्रजन क्षणात, डोळा लवतो न् लवतो तोच, बदलले गेले, आणि पुनरुत्थित जनांसोबत वर नेले गेले, आणि एकत्रित रित्या ते त्यांच्या प्रभूला हवेत भेटले. किती गौरवी

मीलन तें! ज्या मित्रांना मरणाने विभक्त केले होते, ते एकमेकांशीं जोडले जातात, व पुन्हा कधीं ते एकमेकांपासून विभक्त होणार नाहीत.

मेघरुपीं रथाच्या प्रत्येक बाजूला पंख होते, आणि खाली जिवंत चाके होती; आणि मेघाचा रथ वर वर जात असतांना, चाके मोठ्याने म्हणत होती: पवित्र, आणि पंख, त्यांची हालचाल होतांना, मोठ्याने म्हणत होते: पवित्र, आणि मेघाभोवती असलेला पवित्र देवदूतांचा थवा मोठ्याने म्हणत होता: पवित्र, पवित्र, पवित्र, सर्वसामर्थ्यशाली प्रभू देव. आणि पवित्रजन मेघातून मोठ्याने म्हणत होते: गौरव, हालेलूया. आणि रथ वरच्या दिशेने पवित्र नगराकडे जाऊ लागला. पवित्र नगरात प्रवेश करण्यापूर्वी, पवित्रजनांना निर्दोष, परिपूर्ण चौकोनाच्या आकारात रचले गेले, व त्यांच्या मध्यभागीं येशू होता. तो पवित्रजनांपेक्षा डोके व खांद्यांनी उंच होता, आणि देवदूतांपेक्षा डोके व खांद्यांनी उंच होता. त्याचे वैभवी रूप, आणि त्याचा मोहक चेहरा चौकोनातल्या सर्वांना दिसू शकत होता.

पहा:
*२राजे* २:११; *यशया* २५:९; *१करिंथ.* १५:५१-५५;
*१थेस्सल.* ४:१३-१७; *प्रगटीकरण* १:१३-१६; ६:१४-१७;
*प्रगटी.* १९:१६.

# अध्याय ३८
# पवित्रजनांचे पारितोषिक

मग मी संख्येने अगणित देवदूतांना नगरातून गौरवी मुगुट आणतांना पाहिले; प्रत्येक पवित्रजनाकरिता एक मुगुट व त्यावर त्याचे नांव लिहिलेले; आणि येशू मुगुटांची मागणी करीत असता, देवदूत तें त्याला सादर करीत होते; आणि देखणा येशू, त्याच्या स्वतःच्या उजव्या हाताने, पवित्रजनांच्या मस्तकांवर मुगुट ठेवीत होता. त्याच प्रकारें, देवदूतांनी वीणा आणल्या, आणि येशूने त्यासुद्धा पवित्रजनांना बक्षिस म्हणून देऊन टाकल्या. नेतृत्व करणाऱ्या देवदूतांनी पहिला स्वर छेडला, आणि मग प्रत्येक वाणी कृतज्ञतायुक्त, हर्षाच्या स्तुतित उंचावली गेली, आणि प्रत्येक हाताने वीणेच्या तारा कुशलपणे छेडल्या, व मधूर संगीत समृद्ध व परिपूर्ण सूरांत चोहों दिशांकडे पसरले. मग मी येशूला उद्धार पावलेल्या गटाला नगरीच्या फाटकाकडे नेतांना पाहिले. त्याने फाटकाचे दार हातीं धरले व त्याच्या चमचमणाऱ्या बिजागऱ्यांवर त्यास फिरवून तें मागे ढकलले, आणि सत्याचे पालन केलेल्या राष्ट्रांना आत प्रवेश करण्यास सांगितले. नगरीत डोळ्यांची तृप्ति होईल अशी प्रत्येक गोष्ट होती. त्यांनी सर्वत्र ऐश्वर्ययुक्त गौरव पाहिले. मग येशूने त्याच्या उद्धार पावलेल्या पवित्रजनांवर नजर टाकली; त्यांचे चेहरे गौरवाने तेजस्वी झालेले होते; आणि त्यांच्यावर त्याची प्रेमळ नजर केंद्रित करीत असतांना, तो त्याच्या अति कर्णमधूर, संगीतासारख्या वाणीने म्हणाला: मी माझ्या जिवात्म्याचे क्लेश पाहतो, आणि मी समाधान पावत आहे. गौरवाची ही समृद्धता सदासर्वकाळ उपभोगण्याकरिता तुमची आहे. तुमच्या दुःखांचा अंत झाला आहे. इथून पुढे मृत्यु असणार नाही, दुःख व रडणेसुद्धा असणार नाही, इथून पुढे वेदना कदापि असणार नाहीत. मी उद्धार पावलेल्या जमावाला नमन करतांना पाहिले आणि त्यांचे चमकणारे मुगुट येशूच्या चरणांशीं ठेवतांना पाहिले, आणि मग, त्याच्या सुंदर हाताने त्याने त्यांना उठविल्यावर, त्यांनी त्यांच्या सोनेरी वीणांना स्पर्श केला, आणि सबंध स्वर्ग त्यांच्या संगीताने, व कोंकऱ्याप्रीत्यर्थ गायिलेल्या त्यांच्या गीतांनी भरून गेला.

मग मी येशूला उद्धार पावलेल्या थव्याला जीवनाच्या झाडाकडे नेतांना पाहिले, आणि आम्ही पुन्हा त्याचा आकर्षक आवाज ऐकला, मर्त्य मानवाच्या कानीं कधीं पडला नाही अशा उत्कृष्ट संगीतापेक्षाही सुमधूर; तो म्हणत होता: या झाडाची पाने राष्ट्रांना बरे करण्याकरिता आहेत. तुम्ही सर्व तीं खा. जीवनाच्या झाडावर सर्वांत सुंदर फळे होती, जीं पवित्रजन पाहिजे तेवढी खाऊ शकत होते. देवाच्या नगरीत एक सर्वांत गौरवी राजासन होते, आणि राजासनाच्या खालून जीवनाच्या पाण्याच्या शुद्ध, स्फटिकाप्रमाणे नितळ असलेल्या नदीचा उगम झालेला होता. या जीवनाच्या नदीच्या प्रत्येक बाजूला जीवनाचे झाड होते.

नदीच्या किनाऱ्यांवर फळे देणारी सुंदर झाडे होती; हीं फळे अन्न म्हणून चांगली होती. स्वर्गाचे वर्णन करण्याचा प्रयत्न करण्याससुद्धा भाषा अगदीच कमकुंवत ठरते. माझ्यासमोर तें दृश्य उभे राहते तेव्हा मी आश्चर्यचकित होऊन नवल करीत राहते; आणि त्या अनुपम ऐश्वर्याने वाहवत जाऊन व त्या उत्कृष्ट गौरवाने भारली जाऊन, मी लेखणी खाली ठेवते, व माझ्या तोंडून उद्‌गार बाहेर पडतो: किती हें प्रेम! किती अद्‌भुत प्रीति! स्वर्गाचे गौरव आणि उद्धारकाची अनुपम खरी प्रीति यांचे वर्णन करण्यास सर्वांत उच्च भाषासुद्धा तोकडी पडते.

पहा: *यशया* ५३:११; *प्रगटीकरण* २१:४; २२:१-२.

# अध्याय ३९
# पृथ्वी ओसाड होते

मग मी पृथ्वी पाहिली. दुष्ट लोक मेले होते, आणि त्यांची शरीरे पृथ्वीच्या पृष्ठभागावर इतस्ततः पसरलेली होती. पृथ्वीच्या रहिवाश्यांनी शेवटल्या सात पीडांत देवाचा कोप भोगला होता. त्यांनी वेदनांनी त्यांच्या जिभा चावल्या होत्या आणि देवाला शिव्याशाप दिले होते. यहोवाचा क्रोध विशेष रूपाने खोट्या मेंढपाळांना सहन करावा लागला होता. ते त्यांच्या पायांवर उभे असतांनाच त्यांचे डोळे खोवणीतच जळून गेले होते, आणि त्यांच्या जिभा त्यांच्या तोंडांत जळून गेल्या होत्या. देवाच्या वाणीने पवित्रजनांची मुक्तता झाल्यावर, दुष्ट जमावाचा संताप एकमेकांवर गुदरला होता. पृथ्वीवर रक्ताचा प्रलय आल्यासारखे दिसत होते, आणि पृथ्वीच्या एका टोकापासून तें दुसऱ्या टोकापर्यंत मृत शरीरे पसरलेली होती.

पृथ्वी अगदी भलत्याच ओसाड स्थितीत होती. शहरे व गांवे, भूकंपाने हादरून, ढिगाऱ्यांत पडलेली होती. डोंगर त्यांच्या जागांवरून दुसरीकडे हलविले गेले होते, त्यामुळें मोठमोठ्या दऱ्या व गुफा उत्पन्न झाल्या होत्या. समुद्राने अणकुचीदार खडक पृथ्वीवर फेकले होते, आणि पृथ्वीच्या पोटातून खडक चिरून काढले गेले होते व ते पृथ्वीच्या पृष्ठभागावर सगळीकडे विखरले होते. पृथ्वी ओसाड अरण्यासारखी दिसत होती. मोठमोठे वृक्ष मुळासकट उखडले गेले होते, आणि जमनीवर इतस्ततः पसरले होते. येथे १००० वर्षे सरेपर्यंत सैतानाचे, त्याच्या दुष्ट दूतांसह, वसतिस्थान राहणार आहे. त्यांना येथेच राहावे लागेल, व ते पृथ्वीच्या भंगलेल्या पृष्ठभागावर वरखाली भटकत राहतील, आणि देवाच्या आज्ञांविरुद्ध सैतानाने केलेल्या बंडाचे परिणाम पाहतील. जो शाप त्याने आणविला आहे त्याचा प्रभाव त्याला १००० वर्षांपर्यंत भोगावा लागेल. या पृथ्वीवरच बंदिस्त असल्याने, त्याला पतन न पावलेल्या जिवांना मोहात पाडायला व त्रास द्यायला इतर ग्रहांकडे जाण्याची संधी मिळणार नाही. ह्या वेळीं सैतानाला अत्युच्च यातना भोगाव्या लागतात. त्याच्या पतनापासूनच्या काळापासून त्याचे वाईट गुण एकसारखे वापरात आणले गेले आहेत. आता त्याचे सामर्थ्य त्याच्यापासून काढून घेतले गेले आहे, आणि त्याच्या पतनापासून त्याने जो कार्यभाग केला त्यावर मनन करायला त्याला सोडले आहे, व शहारे येणाऱ्या भविष्यकाळाकडे थरकाप होत व भयग्रस्त होत पाहण्यास त्याला सोडले आहे; तेव्हा त्याने जें काही वाईट केले त्या सर्व वाईटाकरिता त्याला क्लेश भोगावे लागतील, आणि जीं पातके त्याने दुसऱ्यांकडून करवून घेतली आहेत त्या सर्व पातकांकरिता शिक्षा भोगावी लागेल.

मग मी देवदूतांकडून आणि उद्धार पावलेल्या पवित्रजनांकडून विजयाच्या आरोळ्या ऐकल्या, ज्या दहा हजार संगीतवाद्यांप्रमाणे ऐकू येत होत्या, कारण कीं याउप्पर त्यांना सैतानाकडून त्रास होणार नाही कीं त्याचे मोहपाश त्यांच्यावर येणार नाहीत, आणि दुसऱ्या जगांचे रहिवासी त्याच्या समक्षतेपासून व त्याच्या मोहपाशांपासून मुक्त झालेले असतील.

मग मी राजासने पाहिली, आणि येशू व उद्धार पावलेले पवित्रजन त्यांच्यावर बसलेले पाहिले; आणि पवित्रजन राजांप्रमाणे राज्य करू लागले आणि देवाकरिता याजक झाले, आणि दुष्ट मृतांचा न्यायनिवाडा करण्यात आला, आणि त्यांची कृत्ये देवाच्या नियमांच्या पुस्तकाशीं - देवाच्या वचनाशीं - तुलना करून पाहिली गेली, आणि देहात असतांना त्यांनी जीं कृत्ये केली त्यानुसार त्यांच्याबाबत निकाल दिला गेला. पवित्रजनांच्या सोबतीने येशूने दुष्टांची शिक्षा त्यांच्या कर्मांनुसार ठरविली जी त्यांना भोगावी लागेल; ती मृत्युच्या पुस्तकात लिहिली गेली, व त्यांच्यात्यांच्या नांवांपुढे मांडली गेली. सैतान आणि त्याच्या दूतांचासुद्धा न्याय येशूने व पवित्रजनांनी करावयाचा होता. सैतानाची शिक्षा त्याने ज्यांना फसविले त्यांच्यापेक्षा फारच फार जास्त असावयाची होती. ती त्यांच्या शिक्षेपेक्षा इतकी जास्त असेल कीं त्यांच्या शिक्षेशीं तिची तुलनाच होऊ शकणार नाही. सैतानाने ज्यांना फसविले ते नाश पावल्यावर त्याने तरीसुद्धा जिवंत राहावयाचे आहे आणि आणखी बराच काळ शिक्षा भोगावयाची आहे.

दुष्ट मृतांचा न्यायनिवाडा संपल्यानंतर, एक हजार वर्षांच्या अखेरीस, येशूने स्वर्गीय नगरी सोडली, आणि त्याच्या पाठोपाठ दूतांचे थवे जाऊ लागले. पवित्रजनसुद्धा त्याच्यासोबत गेले. येशू एका मोठ्या व प्रचंड जैतुनाच्या डोंगरावर उतरला, जो, त्याच्या पायांचा त्याला स्पर्श होताच, दुभंगला आणि तेथे एक भलामोठा मैदानी प्रदेश तयार झाला. मग आम्ही वर पाहिले आणि ती मोठी व सुंदर नगरी, तिच्या बारा पायांसह, बारा वेशींसह, प्रत्येक बाजूला तीन वेशी, आणि प्रत्येक वेशीवर एक देवदूत, अशी पाहिली. आम्ही आरोळी ठोकली: स्वर्गीय नगरी! ती महान नगरी! ती देवापासून स्वर्गातून खाली येत आहे! आणि ती तिच्या सर्व वैभवासह, आणि डोळे दिपविणाऱ्या गौरवासह, खाली आली, आणि येशूने तिच्याकरिता जो मोठा मैदानी प्रदेश तयार केला होता त्यावर विसावली.

पहा:
*जखर्या* १४:४-१२; *प्रगटीकरण* २०:२-६; २०:१२;
*प्रगटी.* २१:१०-२७.

# अध्याय ४०
# दुसरे पुनरुत्थान

मग येशू आणि सर्व देवदूतांचा पवित्र समूह, आणि सर्व पवित्रजन, यांनी नगरी सोडली. पवित्र देवदूतांनी येशूला घेरले होते, व त्याच्या मार्गावर त्याची सोबत केली होती, आणि उद्धार पावलेल्या पवित्रजनांचे थवे त्यांच्या पाठोपाठ आले. मग येशूने भयंकर, भीतिप्रद वैभवात दुष्ट मृतांना बाहेर बोलाविले; आणि ते बाहेर पडले तेव्हा ते त्याच अशक्त, रोगआजारांनी पिडलेल्या शरीरांनी बाहेर पडले ज्या शरीरांनी ते कबरांत गेले होते. कसले तें दृश्य! कसला तो देखावा! पहिल्या पुनरुत्थानात जे बाहेर आले होते ते अमर बहरात बाहेर पडले होते; परंतु दुसऱ्यात, शापाच्या खूणा सर्वांवर स्पष्ट दिसत होत्या. पृथ्वीचे राजे आणि उमदी सरदार माणसे हलक्या दर्जाच्या व खालच्या वर्गाच्या माणसांसोबत, शिकलेले आणि अडाणी असें एकत्रच बाहेर पडले. सर्वजण मनुष्याच्या पुत्राला बघतात; आणि नेमकी तींच माणसे ज्यांनी येशूला तुच्छ लेखले होते व त्याची टिंगल केली होती, व त्याला बोरूने मारले होते, आणि त्याच्या पवित्र कपाळावर काट्यांचा मुगुट घातला होता, ते त्याला त्याच्या सर्व राजशाही वैभवात पाहतात. त्याच्या न्यायालयीन चौकशीच्या वेळीं जे त्याच्यावर थुंकले, ते आता त्याच्या भेदक नजरेपासून व त्याच्या मुखाच्या गौरवापासून वळतात. ज्यांनी त्याच्या हातांपायांत खिळे घुसविले होते, ते आता त्याच्या वधस्तंभीं गेल्याच्या खूणा पाहतात. ज्यांनी त्याच्या कुशीत भाला भोसकला होता, ते त्याच्या देहावर त्यांच्या क्रौर्याच्या खूणा बघतात. आणि त्यांना माहीत होते कीं हा तोच तो आहे ज्याला त्यांनी क्रूसखांबीं दिले होते, व त्याच्या मरणसमयींच्या वेदनांचा त्यांनी उपहास केला होता. आणि मग प्रदीर्घ वेळ आत्यंतिक क्लेशांनी शोकविलाप करणे चालू होते, व ते राजांच्या राजापासून व प्रभूंच्या प्रभूपासून दूर पळून जाऊन लपायला पाहतात.

सर्वजण खडकांमध्ये लपायला पाहत आहेत, आणि ज्याला त्यांनी एकदा तुच्छ लेखले होते त्याच्या भयंकर कोपापासून स्वतःचे रक्षण करण्यास पाहत आहेत. त्याच्या वैभवाने आणि त्याच्या आत्यंतिक गौरवाने भारावून जाऊन व वेदना पावून, ते एकसूरात त्यांचे आवाज उठवितात, आणि अत्यंत स्पष्टपणे उद्गारतातः प्रभूच्या नामाने येणारा धन्यवादित असो.

मग येशू आणि पवित्र देवदूत, सर्व पवित्रजनांसोबत, पुन्हा नगरीत जातात, आणि सर्वनाश ठरलेल्या दुष्टांच्या कटु शोकविलापाने व रडण्यागागडण्याने वातावरण भरून जाते. मग मी पाहिले कीं सैतानाने त्याचे काम पुन्हा सुरू केले. तो त्याच्या प्रजाजनांमध्ये जाऊन त्यांच्या भेटीगाठी घेऊ लागला, आणि त्याने कमकुंवत व अशक्त जनांना बळकट केले, आणि मग त्याने त्यांना सांगितले कीं तो आणि

त्याचे दूत सामर्थ्यशाली आहेत. उठविल्या गेलेल्या अगणित लोकांकडे त्याने निर्देश केला. त्यांत बलाढ्य वीर आणि राजे होते जे युद्धकलेत निष्णात होते, आणि ज्यांनी राज्ये जिंकली होती. आणि तेथे धिप्पाड राक्षस होते, आणि पराक्रमी माणसे होती, जे लढाईत एकदासुद्धा हरले नव्हते. तेथे गर्विष्ठ, महत्त्वाकांक्षी नेपोलियन होता जो जवळ येत आहे असें कळताच राज्ये भीतिने थरथर कापत असत. तेथे उंचीपुरी माणसे उभी होती, दरारा उत्पन्न करणारी, देखणी व उमदी दिसणारी, जे लढाईत धारातीर्थी पडले होते. जिंकण्याच्या लालसेत ते पडले होते. त्यांच्या कबरांतून ते बाहेर पडताच, मृत्युसमयीं त्यांची विचाराची धारा जेथे बंद पडली होती, तिथूनच ती परत सुरू होते. ते युद्धात पडले तेव्हा जिंकण्याची जी वृत्ति त्यांच्यावर नियंत्रण करीत होती तीच वृत्ति त्यांच्यामध्ये आहे. सैतान त्याच्या दूतांसोबत विचारविनिमय करतो, आणि मग त्या राजांसोबत व विजेत्यांसोबत व पराक्रमी माणसांसोबत सल्लामसलत करतो. मग तो त्याच्या भव्य सैन्यावर नजर टाकतो आणि त्यांना सांगतो कीं नगरीतला गट लहान व कमकुंवत आहे, आणि ते वर जाऊन ती नगरी काबीज करू शकतात व तिच्या रहिवाश्यांना हाकलून देऊ शकतात, आणि तिची समृद्धि व गौरव स्वतःकरिता मिळवू शकतात.

सैतान त्यांना फसविण्यात यशस्वी होतो, आणि सर्वजण लगेचच स्वतःस युद्धाकरिता तयार करण्याच्या तयारीस लागतात. ते युद्धाची शस्त्रे घडवितात; कारण त्या भव्य सैन्यात अनेक कुशल माणसे आहेत. आणि मग त्यांच्या अग्रभागीं सैतानाला ठेवून जमाव पुढे चालू लागतो. राजे आणि योद्धे सैतानाच्या पाठोपाठ जातात आणि जमाव गटागटाने त्यांच्या मागून जातात. प्रत्येक गटामध्ये एक एक नेता आहे, आणि पवित्र नगरीकडे पृथ्वीच्या तुटक्या पृष्ठभागावरून कूच करीत असतांना शिस्त पाळली जाते. येशू नगरीची फाटके बंद करतो, आणि हें भव्य सैन्य त्याला वेढा घालते व स्वतःला युद्धाकरिता सज्ज करते. त्यांनी सर्व प्रकारची युद्धाची शस्त्रास्त्रे तयार केली आहेत, व भयंकर संघर्ष होईल अशी त्यांची अपेक्षा आहे. ते स्वतःची नगरीभोवती व्यवस्थितपणे मांडणी करतात. येशू व सर्व दूतजमाव त्यांच्या मस्तकांवर त्यांचे चमकणारे मुकुट घालून, आणि सर्व पवित्रजन त्यांच्या तेजस्वी मुकुटांसहित, नगरीच्या भिंतींच्या वर चढतात. येशू त्याच्या वैभवात बोलतो, आणि म्हणतोः पहा, तुम्ही पाप्यांनो, नीतिमानांचे पारितोषिक पाहा! आणि तुम्ही, माझे उद्धरलेले जनहो, तुम्ही दुष्टांचे वेतन पहा! भव्य जमाव नगरीच्या भिंतींवरील गौरवी जमावाला पाहतात. आणि त्यांच्या चमकणाऱ्या मुगुटांचे ऐश्वर्य जेव्हा ते बघतात, आणि त्यांचे चेहरे गौरवी तेजाने तेजस्वी झालेले पाहतात व त्यांत येशूची प्रतिमा प्रतिबिंबीत झाल्याचे पाहतात, आणि मग राजांच्या राजाचे व प्रभूंच्या प्रभूचे अनुपम वैभव व गौरव पाहतात, तेव्हा त्यांचे धैर्य खचते. त्यांनी गमविलेल्या खजिन्याची व हरपलेल्या गौरवाची भावना त्यांना तीव्रतेने जाणवते, आणि पापाचे वेतन मरण आहे ह्या सत्याची त्यांना जाणीव होते. त्यांनी ज्यांना तुच्छ लेखले होते, ते पवित्र, आनंदी लोक गौरवाने, सन्मानाने, अमरत्वाने, आणि सार्वकालिक जीवनाने मंडित झालेले ते पाहतात, आणि ते स्वतः मात्र नगरीबाहेर हरएक वाईट व घृण गोष्टीसोबत असल्याचे त्यांना आढळते.

पहाः *मत्तय* २३:२९; *प्रगटीकरण* ६:१५-१६; २०:७-९; २२:१२-१५.

# अध्याय ४१
# दुसरा मृत्यु

सैतान सर्वांच्या मध्ये धावत धावत जातो, आणि जमावाने कृति करावी म्हणून त्यांना चेतविण्याचा प्रयत्न करतो. परंतु देवाकडून आकाशातून त्यांच्यावर अग्नि ओतला जातो, आणि तीं थोर माणसे, आणि पराक्रमी माणसे, आणि उमदे लोक, आणि गरीब व दुर्दशा झालेली माणसे, सर्व एकत्र जळून जातात. मी पाहिले कीं काही चटकन नष्ट होतात, तर इतरांना जळून खाक व्हायला जास्त अवधी लागतो. त्यांनी शरीरात असतांना जीं कृत्ये केली होती त्यांनुसार त्यांना शिक्षा केली जाते. काहीजण अनेक दिवस जळत होते; आणि जोंवर त्यांचा कोठलाही भाग पार जळून गेला नव्हता तोंवर दुःखक्लेशाची संवेदना त्यांना होतच राहिली. देवदूत म्हणाला: जीवनाचा कीडा मरणार नाही; जोंवर अग्निला जाळण्यासाठीं अल्पांशाचा जरी कण असेल तरी तो जळून खाक झाल्याशिवाय अग्नि विझणार नाही.

परंतु सैतान आणि त्याचे दूत सर्वांत जास्त काळ यातना भोगत असतील. सैतान फक्त त्याच्याच पापांचा भार व शिक्षा भोगणार नसेल, तर सर्व उद्धरलेल्या जमावाची पातके त्याच्यावर घातली गेलेली असतील; आणि ज्या जिवात्म्यांचा त्याने नाश घडवून आणला आहे त्या नाशाकरितासुद्धा त्याने शिक्षा भोगावयाची आहे. मग मी पाहिले कीं सैतान, आणि सर्व दुष्ट जमाव, अग्निने जळून खाक झाले, आणि मग देवाचा न्याय समाधान पावला; आणि सर्व देवदूतांचे थवे, आणि सर्व उद्धरलेले पवित्रजन मोठ्या वाणीने म्हणाले: आमेन!

देवदूत म्हणाला: सैतान मूळ आहे, त्याची मुले फांद्या आहेत. आता ते मूळ आणि फांद्या जळून खाक झाले आहेत. त्यांनी सार्वकालिक मरण भोगले आहे. त्यांचे पुनरुत्थान आता कधीं होणार नाही, आणि देवाकडे स्वच्छशुद्ध विश्व राहील. मग मी पाहिले, आणि ज्या अग्निने दुष्टांना जाळून टाकले होते तो अग्नि मला पृथ्वीच्या सर्व कचऱ्याला जाळून टाकून पृथ्वीला शुद्ध करीत होता असें दिसले. मी पुन्हा पाहिले आणि मला पृथ्वी शुद्ध झालेली दिसली. तिथे शापाचे एकही चिन्ह राहिले नव्हते. पृथ्वीचा तुटका, व ओबडधोबड पृष्ठभाग आता समांतर, मोठाच मोठा मैदानी प्रदेश झाला होता. देवाचे आख्खे विश्व आता स्वच्छ होते, आणि घोर संघर्षाचा सदासर्वकाळाकरिता अंत झाला होता. जेथेकोठे आम्ही बघत होतो, ज्या कशावर आमची नजर विसावत होती, तें सुंदर व पवित्र होते. आणि सर्व उद्धरलेल्या थव्यांनी, वृद्ध आणि तरूण, मोठे आणि छोटे यांनी, त्यांचे चमकणारे मुगुट त्यांच्या उद्धारकाच्या पायांशीं ठेवले, आणि भक्तिभावाने ते त्याच्यापुढे नतमस्तक झाले, व त्या सदासर्वकाळ जगणाऱ्याची त्यांनी आराधना केली.

सुंदर नवी पृथ्वी, तिच्या संपूर्ण गौरवासहित, पवित्रजनांचे सार्वकालीन वतन होती. राज्य, आणि सत्ता, आणि आख्ख्या आकाशाखालील राज्याची थोरवी, मग सर्वोच्च देवाच्या पवित्रजनांना दिली गेली, जी त्यांच्या मालकीची सदासर्वकाळ, चिरकालीन युगांयुगांत सदासर्वकाळ, त्यांची असणार होती.

पहा:
*यशया* ६६:२४; *दानिएल* ७:२६-२७;
*प्रगटीकरण* २०:९-१५; २१:१; २२:३.

# देवाने त्याच्या स्वभावानुसार अखिल मानवजातिला घालून दिलेले त्याचे दहा कायदेकानू

माझ्याखेरीज तुला वेगळे देव नसावेत.

आपल्यासाठीं कोरीव मूर्ति करू नको. त्यांच्या पायां पडू नको किंवा त्यांची सेवा करू नको.

तुझा देव परमेश्वर ह्याचे नांव व्यर्थ घेऊ नको.

सहा दिवस श्रम करून आपले सर्व कामकाज कर; पण सातवा दिवस तुझा देव परमेश्वर ह्याचा शब्बाथ आहे, म्हणून त्या दिवशीं कोणतेंही कामकाज करू नको.

आपल्या बापाचा व आपल्या आईचा मान राख, म्हणजे जो देश तुझा देव परमेश्वर तुला देत आहे त्यात तूं चिरकाळ राहशील.

खून करू नको.

व्यभिचार करू नको.

चोरी करू नको.

आपल्या शेजाऱ्याविरुद्ध खोटी साक्ष देऊ नको.

आपल्या शेजाऱ्याच्या कोणत्याही वस्तुचा लोभ धरू नको.

*************************************************

# डोंगरावरल्या प्रवचनात
# प्रभू येशूने शिकविलेली प्रार्थना

जेव्हाजेव्हा तुम्ही प्रार्थना करता, तेव्हा ढोंग्यांसारखे असू नका. तुम्ही प्रार्थना करता तेव्हा व्यर्थ बडबड करू नका; आपण पुष्कळ बोललो म्हणजे आपले मागणे मान्य होईल असें अनेकांना वाटते. तुम्ही त्यांच्यासारखे होऊ नका, कारण तुमच्या गरजा काय आहेत हें तुमचा देवपिता तुम्ही त्याच्यापाशी मागण्यापूर्वीच जाणून आहे. ह्यास्तव तुम्ही ह्या प्रकारें प्रार्थना करा:

**हे आमच्या स्वर्गातील पित्या,**
**तुझे नांव पवित्र मानिले जावो.**
**तुझे राज्य येवो.**
**जसें स्वर्गात, तसें पृथ्वीवरही**
**तुझ्या इच्छेप्रमाणे होवो.**
**आमची रोजची भाकर**
**आज आम्हांस दे;**
**आणि जसें आम्ही आपल्या अपराध्यांस क्षमा करतो,**
**तसें तूं आमच्या अपराधांची क्षमा कर;**
**आणि आम्हांस परीक्षेत आणू नको;**
**तर आम्हांस वाईटापासून सोडीव.**
**कारण कीं राज्य, सामर्थ्य आणि गौरव हीं सर्वकाळ तुझी आहेत; आमेन.**

(मत्तय ६:५,७,९-१३.)

# स्तोत्र १९: देवाची कृत्ये आणि त्याचे नियम

आकाश देवाचा महिमा वर्णिते;
अंतरिक्ष त्याची हस्तकृति दर्शविते.
दिवस दिवसाशी संवाद करतो. रात्र रात्रीला ज्ञान प्रगट करते.
वाचा नाही शब्द नाही,
त्याची वाणी ऐकू येत नाही
तरी त्याचा स्वर सर्व पृथ्वी आक्रमितो,
त्याचे शब्द दिगंतरी पोहंचतात. ...

**परमेश्वराचे नियमशास्त्र परिपूर्ण आहे,**
**तें मनाचे पुनरुज्जीवन करिते;**
**परमेश्वराचा निर्बंध विश्वसनीय आहे,**
**तो भोळ्यांस समंजस करितो.**
**परमेश्वराचे विधि सरळ आहेत,**
**ते हृदयाला आनंदित करितात;**

**परमेश्वराची आज्ञा चोख आहे,**
**ती नेत्रांना प्रकाश देते.**
**परमेश्वराचे भय शुद्ध आहे,**
**तें सर्वकाळ टिकणारे आहे;**

**परमेश्वराचे निर्णय सत्य आहेत,**
**ते सर्वथैव न्याय्य आहेत.**
**ते सोन्यापेक्षा, बावनकशी सोन्याच्या राशीपेक्षा इष्ट आहेत.**
**ते मधापेक्षा, मोहोळांतून पाझरणाऱ्या मधापेक्षा गोड आहेत.**
**शिवाय त्यांच्यापासून तुझ्या सेवकाला बोध होतो;**
**ते पाळिल्याने मोठी फलप्राप्ति होते.**

स्वतःच्या चुका कोणाला दिसतात?
गुप्त दोषांपासून मला मुक्त कर.
तसें धिटाईने केलेल्या पातकांपासून आपल्या सेवकाला आवर.
त्यांची सत्ता माझ्यावर न चालो, म्हणजे मी पूर्ण होईन आणि
महापातकापासून अलिप्त राहीन.

हे परमेश्वरा, माझ्या दुर्गा, माझ्या उद्धारका, माझ्या तोंडचे शब्द व
माझ्या मनचे विचार तुला मान्य असोत.

***********************************************